# पोर्तुगीज-मराठा संबंध

* स.शं. देसाई *

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# पोर्तुगीज–मराठा संबंध

लेखक
**स. शं. देसाई**

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,**
**मुंबई**

अनुक्रमणिका

प्रथमावृत्ती : १९८९

**प्रकाशक :**
© सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई—४०० ०३२.

**मुद्रक :**
प्रमोद भोगटे
स्नेहेश प्रिंटर्स,
३२० ए, शाह—नाहर इंडस्ट्रियल इस्टेट, ए-१,
धनराज मिल आवार, सीताराम जाधव मार्ग,
लोअर परळ, मुंबई—४०० ०१३.

**किंमत ३० रुपये**

## अनुक्रमणिका

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती
मंडळाचे माजी अध्यक्ष माननीय
तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी
यांस
सादर अर्पण

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

प्रस्तावना ............ ६
१. हिंदुस्थानच्या जलमार्गाचा शोध ............ १५
२. पोर्तुगीज गोवा घेतात ............ २१
३. पोर्तुगीजांचे आणखी प्रसरण ............ २९
४. धर्मांतराचा धुमाकूळ ............ ३६
५. उतरती कळा ............ ४३
६. मराठा-पोर्तुगीज संबंध : शिवाजी ............ ४६
शिवाजी पोर्तुगीज संबंध (पुढे चालू) ............ ५४
८. संभाजी ............ ६८
९. संभाजीची गोव्यावर स्वारी ............ ७७
१०. छत्रपती राजाराम ............ ८७
११. महाराणी ताराबाई ............ ९१
१२. छत्रपती शाहू ............ ९७
१३. वसईचा पाडाव ............ १०८
१४. पेशवाई : नानासाहेब पेशवा ............ ११८
१५. पेशवाईची अखेर ............ १२५
१६. वाडीकर सावंत ............ १३१
१७. करवीरचे छत्रपती ............ १४८
१८. सोंधे संस्थान ............ १५९
संदर्भ ग्रंथ ............ १६७

# प्रस्तावना

मराठे आणि पोर्तुगीज यांच्यामधील परस्पर संबंधांचे विस्तृत विवेचन मी 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पोर्तुगीज दप्तर खंड दुसरा' (प्रकाशक : महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ), 'करवीरचे छत्रपती आणि पोर्तुगीज' (प्रकाशक : करवीर छत्रपती प्रतिष्ठान, कोल्हापूर) व 'शिवशाही पोर्तुगीज कागदपत्रे' (प्रकाशक : शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) ह्या तीन खंडाना लिहिलेल्या प्रदीर्घ प्रस्तावनातून केले आहे. प्रस्तुतच्या तीन साधन ग्रंथानंतर आता हा मराठे आणि पोर्तुगीज यांच्यामधील संबंधाचा इतिहास प्रकाशात येत आहे.

पोर्तुगाल ही हिंदुस्थानच्या जलमार्गाचा शोध लावणारी पहिली युरोपियन सत्ता. तथापि पोर्तुगीजांच्या पूर्वी अरब प्रवासी आणि व्यापारी हिंदुस्थानात जलमार्गाने व खुष्कीच्या मार्गाने येत असत. मध्ययुगीन कालात अरब व्यापाऱ्यानी आणि विचारवंतानी भारतीय माल आणि भारतीय तत्वज्ञान आफ्रिका मार्गे युरोपात पोचविण्याचे उल्लेखनीय कार्य केले आहे. योगायोगाची किंवा दुर्दैवाची गोष्ट ही की, पोर्तुगीज नावाड्याना हिंदी महासागरात आणि पर्यायाने हिंदुस्थानच्या समुद्रात आणून सोडण्यास अरबच कारणीभूत ठरले. असे सांगतात की, पोर्तुगीज लोकानी हिंदुस्थानच्या सुवर्णभूमीच्या अद्भूतरम्य कथा कर्णोपकर्णी ऐकल्या होत्या. त्यामुळे सोन्याचा धूर वाहात असलेल्या ह्या समृद्ध देशात जाऊन तेथील धनसंपत्ती लुटून आणून आपला गरीब देश श्रीमंत करावा, ह्या महत्त्वाकांक्षेने प्रेरित होऊन ते हिंदुस्थानच्या शोधार्थ बाहेर पडले.

पोर्तुगीज लोक गरीब होते. परंतु धट्टेकट्टे आणि धाडसी होते. हरघडी समुद्राशी संबंध येत असल्याने लांबचा सागरी प्रवास करण्यास त्याना भीती वाटत नव्हती. ते हिंदुस्थानच्या शोधार्थ बाहेर पडले खरे; परंतु हिंदुस्थान नेमके कुठे आहे हे त्याना माहीत नव्हते. त्यामुळे ते हिंदुस्थानचा शोध करीत आफ्रिकेत गेले. तेथे त्यांची अरब नावाड्यांशी गाठ पडली असता त्यांच्याकडून त्याना कळले की, ते ज्या सुवर्णभूमीच्या शोधार्थ बाहेर पडले होते, तें विजयनगरचें अलौकिक (fabulous) साम्राज्य आफ्रिकेत नसून आशिया खंडात होते. ती माहिती मिळताच पोर्तुगीज नावाडी अरब वाटाड्याना घेऊन हिंदी महासागराकडे निघाले.

उण्यापुऱ्या एक वर्षाचा प्रवास केल्यावर पोर्तुगीज नावाडी सन १४९८ साली मलबारच्या किनाऱ्यास लागले. तेथे त्याना चौकशी अंती विजयनगरच्या साम्राज्यविषयीची माहिती कळली. सुप्रसिद्ध आंग्ल इतिहासकार 'रॉबर्ट सिवेल' याने A Forgotten Empire ह्या विजयनगरच्या साम्राज्याच्या इतिहासात पोर्तुगीजांविषयी सविस्तरपणे लिहिले आहे. त्यानी विजयनगरशी व्यापार करून व त्याच्या सेवेत राहून आपला देश समृद्ध केला, व सन १५६५ साली विजय नगरचे साम्राज्य कोलंमडून पडले तेव्हा पोर्तुगीजांचे वैभवही अस्तंगत झाले, असे सिवेल म्हणतो (......the struggles of The Portuguese on westem coast were earried on for the porpose of ensuring its maritime trade; and that when the empire fell in 1565 the prosperity of portuguese Goa fell with it never to rise again (Introduction, pg 2)

विजयनगरचे साम्राज्य रसातळास गेले, परंतु त्याची स्मृतिज्योत तेवत ठेवली ती पोर्तुगीजानीच. विजयनगरच्या साम्राज्याचा पहिला इतिहास स. १८९७ साली पोर्तुगीज मध्ये प्रकाशित झाला. तत्पूर्वी

अनुक्रमणिका

प्रख्यात पोर्तुगीज इतिहासकर ज्युआंव द बारुरुश (joao de Barros) ह्याने Deeadas da Asia ह्या दहा खंडांच्या आशियाच्या इतिहासाच्या पहिल्या खंडात स. १५५२ मध्ये म्हणजे विजयनगरचे साम्राज्य अस्तित्वात असता ह्या साम्राज्याविषयींच्या त्रोटक माहितीचा अंतर्भाव केला होता. रॉबर्ट सिवेलने विजयनगरच्या साम्राज्याचा इतिहास लिहिला तो ह्याच पोर्तुगीज साधनांच्या आधाराने.

सिवेलने पोर्तुगीज सत्तेच्या ऱ्हासाचेही विवेचन आपल्या ग्रंथातून केले आहे. तो म्हणतो की, विजयनगरच्या अस्तानंतर आशियातील पोर्तुगीज सत्तेला उतरती कळा लागली त्याची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत : पोर्तुगीजांकडून एतद्देशीय लोकांवर झालेला जुलूम; त्यांचा अनियंत्रित कारभार; जेसुईट पाद्र्यांची असहिष्णु वृत्ती, आणि धर्मसमिक्षण (Inquisition) संस्थेकडून एतद्देशीय लोकांचा झालेला छळ (......The violence and despotism of the viceroys and the uneompromising intoerance of the Jesuits Fathers, as well as the horror endmgered in their (inhabitants) minds by th severities of the terrible Inquisition at Goa (Preface pg VII-VIII)

पोर्तुगाल हे युरोपातील एक छोटे आणि गरीब राष्ट्र असल्याने त्याची साधनेही मर्यादित होती. त्यामुळे हिंदुस्थानात त्याला इंग्रजांप्रमाणे मोठे साम्राज्य स्थापन करणे शक्य झाले नाही. तरीही हिंदुस्थानच्या पश्चिम आणि पूर्व किनाऱ्यावर त्याने पुढील वसाहती स्थापन करून त्या काही काळ धरून ठेवण्याची शिकस्त केली.

**आंजेदिव :** (इ. १५०५) या बेटावर त्यानी एक गड आणि चर्च बांधिले.

**कन्नानूर :** (इ. १५०५) कन्नानूरच्या राजाकडून पोर्तुगीजांनी प्रथम वखार घालण्यासाठी जागा मिळविली व तिथेच बळजबरीने किल्ला बांधिला.

**कालिकत :** (इ. स. १५१३) हे ठाणे त्याना इ. १५२५ मध्ये सोडावे लागले.

**गोवे :** (इ. १५१०)

**क्लिलॉन :** (इ. १५१९) या ठाण्यास यानी 'सां थोमे' हे नाव ठेवले होते.

**चौल :** (इ. १५२१) हे ठाणे त्यानी अहमदनगरचा सुल्तान बुऱ्हाण निजामशाह याच्याकडून घेतले. ते मराठ्यानी काबीज केले.

**चलियम :** हे ठाणे त्यानी चलियमच्या राजाकडून वखारीसाठी म्हणून मिळविले. तेथे त्यानी एक किल्ला बांधिला. पण १५७१ त त्याना तेथून हुसकून लावण्यात आले.

**वसई :** वसई आणि त्याच्या लगतचा ठाणे जिल्ह्यातील प्रदेश त्याना गुजरातचा सुल्तान बहादुर शाह याच्याकडून १५३४ साली मिळाला. परंतु वसईच्या युद्धात मराठ्यांकडून त्यांचा पराभव झाल्याने त्याना तो खाली करावा लागला.

**दीव :** गुजरातचा सुल्तान बहादुर शाह याच्याकडून त्याना १५३५ साली मिळाले.

**क्रांगानूर** (इ. १५३६) क्रांगानूरचा राजा झामोरिनचा मांडलिक होता. झामोरिनशी झालेल्या युद्धात क्रांगानूरच्या राजाने पोर्तुगीजाना क्रांगानूरमधून हाकलून लावले.

**दमण :** हे ठाणे पोर्तुगीजाना सुल्तान बहादूर शाह याजकडून १५५० त मिळाले.

**होनावर :** हे ठाणे पोर्तुगीजानी गिरसषाच्या राणीचा पराभव करून काबीज करून घेतले होते. परंतु पुढे त्याना ते सोडावे लागले.

**कुंदापूर, बसरूर** अथवा **बार्सेलोर :** हे ठाणे त्याना बिदनूरच्या राजाकडून १५६९ साली मिळाले होते. पुढे त्याना ते सोडावे लागले.

**मैलापूर :** हे ठाणे पोर्तुगीजानी विजयनगरच्या यादवी युद्धाचे वेळी १६१४ त व्यापिले. परंतु पुढे त्याना ते सोडावे लागले.

**नागपट्टणम :** याचाही अंतर्भाव विजयनगरच्या साम्राज्यात होत होता. पण पुढे पोर्तुगीजाना ते सोडावे लागले.

**गंगोळ्ळी :** (१६३०) बिदनूरच्या वारसा युद्धात पोर्तुगीजानी हे ठाणे व्यापिले. परंतु पुढे त्याना ते सोडावे लागले.

वरील सर्व वसाहतीपैकी गोवा, दमण आणि दीव ह्या तीन वसाहती पोर्तुगीजांकडे शेवटपर्यंत राहिल्या. ठरलेल्या वसाहतीतून स्थानिक सत्ताधाऱ्यानी त्यांची हाकलपट्टी केली.

पोर्तुगीज आणि दक्षिण भारतातील स्थानिक सत्ताधारी यांच्यामधील संघर्षाचा इतिहास के. एम्. पणिक्कार यानी India and Indian Ocean व Asia and Westen Dominanee ह्या दोन ग्रंथातून जो सादर केला आहे त्यात त्यानी आफाँस द आल्बुकेर्क याच्या कालिकतच्या लढाईतील पराभवाचा प्रसंग चित्रित केला आहे. ह्या लढाईत आफाँस द आल्बुकेर्क तोफेचा गोळा लागून जखमी झाला. त्याला बेशुद्धावस्थेतच त्याच्या ध्वजनौकेवर हलविण्यात आले. आल्बुकेर्क शुद्धीवर आला तेव्हा आपली अवस्था पाहून तो अंतर्मुख बनला. त्याला कळून चुकले की, पोर्तुगीजाना आता दक्षिण भारतात स्थान नाही. पणिक्कार म्हणतात : The defeat at ealicut had far reaching results. Albuquerque was now convinced that Cochin was too near the power of the Zamori to form a safe base for emperial plans. Looking around be selected Goa, as it had an excellent harbour a suitable hinterland, which could be easily held and what was more suffieiently far away from any ruler with as trong enough navy (India and Indian Ocean pp 51-52).

(कालिकताच्या पराभवाचे परिणाम इरगामी झाले. आल्बुकेर्कला आता शंका उरली नाही की, कोचिन हे झामोरिनच्या राज्याच्या अगदी नजीक असल्याने पोर्तुगीज साम्राज्याचा तळ म्हणून ते सुरक्षित

अनुक्रमणिका

नाही. त्या दृष्टीकोणातून त्याने इतर ठाण्यांचा विचार केला असता गोवे त्याला सुरक्षित वाटले. ते एक चांगले बंदर तर होतेच; शिवाय त्याचा भूप्रदेशही परकी आक्रमणातून बचावाचे युद्ध खेळण्यास उपयुक्त होता. पुनः बलाढ्य आरमार असलेल्या सागरी सत्तांपासूनही ते लांब होते)

आल्बुकेर्कने इ. १५१० साली आदिलशाहाकडून गोवे घेतले व पोर्तुगीजांची पूर्वेकडील साम्राज्याची दक्षिणेत असलेली राजधानी तेथे हलविली. बहुतेक सर्व पोर्तुगीज नावड्यांप्रमाणे आल्बुकेर्क एकतंत्री आणि निर्दय असला तरी, त्याला न्यायाची चाड होती. तसेच तो एक कुशल प्रशासकही होता. आपल्या अल्प राजकीय कारकीर्दीत त्याने गोव्यातील अंदाधुंदीचे निर्मूलन करून सगळ्यांवर न्यायदेवतेचा वचक निर्माण केला. परंतु पुढे पोर्तुगालच्या राजसत्तेचे भक्कम पाठबळ असलेल्या धर्मसमीक्षण संस्थेसमोर त्याचे काही चालले नाही, ती गोष्ट अलाहिदा. त्यामुळे तो वैफल्यग्रस्त बनून त्याच अवस्थेत मरण पावला.

आल्बुकेर्क सत्ताहीन झाल्यावर गोव्यातील धर्मसमीक्षण संस्था बेताल बनली व तिचा नंगानाच सर्वत्र सुरू झाला. मिशनऱ्यानी प्रथम तिसवाडी बेटात धर्मांतराची मोहीम सुरू केली. ह्या कामी त्यांच्या दिमतीला पोर्तुगीज लष्कर होते. अल्पावधीत तिसवाडी बेट निर्हिंदू बनले. मिशनऱ्यानी धर्मांतराची मोहिम अचानकपणे सुरू केल्याने गाफील स्थितीत असलेले हिंदू किंकर्तव्यमूढ बनल्याने आपला धर्म आणि देव वाचविण्यासाठी त्यानी सुरक्षित ठिकाणी पळ काढला. परंतु ही अवस्था फार दिवस टिकली नाही. पुढे हिंदूकडून मिशनऱ्याना प्रतिकार होऊ लागला. तसे झाले नसते, तर पाद्र्याना साष्टी तालुक्यातील मडगाव शहरी प्रवेश करण्यास सत्तेचाळीस–अठ्ठेचाळीस वर्षे लागली नसती. ते तिकडे स. १५६८ साली येऊन पोहोचले. मडगावहून पाद्री आणि पोर्तुगीज सैन्य पुढे सरकले. ठिकठिकाणी त्याना हिंदूकडून प्रतिकार झाला. परंतु त्यांच्या मोहिमेला कडवा विरोध झाला तो कुकळ्ळी येथे.

कुकळ्ळी व त्याच्या परिसरातील हिंदूनी एकत्र येऊन पोर्तुगीज मिशनरी आणि पोर्तुगीज लष्कर यांचाशी संघटीतपणे जो सामाना दिला तें नऊ वर्षांचे धर्मयुद्ध म्हणून ओळखले जाते. केवळ गोव्याच्याच नव्हे, तर हिंदुस्थानच्या इतिहासातील ते एक अभिनव असे धर्मयुद्ध आहे, असे मानण्यास जागा आहे. असे प्रदीर्घ धर्मयुद्ध भारतात अन्यत्र कुठे झाले असेल असे वाटत नाही. परंतु हे युद्ध उत्स्फूर्त नव्हते. कारण, त्याला एक पार्श्वभूमी होती. तिचा मागोवा घ्यायचा झाल्यास फार मागे जावे लागेल.

स. १३१७ साली देवगिरीचा शेवटचा राजा शंकरदेव याचा दिल्लीचा सुल्तान मुबारक खिलजी याच्याकडून पराभव झाला व महाराष्ट्र पारतंत्र्याखाली गेला. यादवांचे संरक्षण छत्र गेल्याने महाराष्ट्रातील हिंदू पोरके बनले. परंतु परकी आक्रमकांचा प्रतिकार केल्याखेरीज हिंदूचा तरणोपाय नव्हता. पण राजसत्तेचे नेतृत्व गेल्याने निर्नायक बनलेल्या हिंदूना अविंधाच्या प्रतिकारासाठी संघटीतपणे एकत्र आणण्याची आवश्यकता होती. त्यासाठी कुणीतरी पुढाकार घेण्याची जरूरी होती. हे काम उत्तर कोकणातील मालाड येथील कुणी नायकोराव देसाई याने केले. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यानी संपादित केलेल्या केशवाचार्यकृत 'महिकावतींच्या बखरी'वरून कळून येते, की, एके रात्री देवी भवानीने नायकोरावाच्या स्वप्नी येऊन त्याला दृष्टांत दिला की, त्याचा पुरोहित केशवाचार्य याच्या मदतीने त्याने महाराष्ट्र धर्माचे पुनरुत्थान घडवून आणण्याचा प्रयत्न करावा. ही घटना स. १४४८ त घडली.

नायकोराव देसाई व केशवाचार्य या दोघानी देवी भवानीच्या आदेशानुसार मालाड येथील महालजा अथवा जोगेश्वरी देवीच्या मंदिराच्या आवारात हिंदूचा एक मोठा मेळावा भरविला. महिकावतीच्या बखरीत

अनुक्रमणिका

नमूद केल्याप्रमाणे त्या मेळाव्यास दूरदूरचे हिंदू आले होते. त्यात ९६ कुळीचे ३६५५ शास्त्रधारक किंवा क्षत्रिय मराठे, ५९१ ब्राह्मण आणि अन्य हिंदू जातीजमातीचे पुष्कळ लोक उपस्थित होते. मेळाव्यात निर्णय घेण्यात आला की, अविंधांचा प्रतिकार करण्यासाठी शस्त्रधारकानी म्हणजे क्षत्रिय मराठ्यानी पुढाकार घ्यावा व इतर हिंदूनी त्याना मदत करावी (केशवाचार्य शाण्णव कुळीच्या मराठ्याचा क्षत्रिय म्हणून उल्लेख न करता **शस्त्रधारक** म्हणून करतो.)

मालाडच्या मेळाव्यात झालेल्या निर्णयानुसार **महाराष्ट्र धर्माची** जोपासना करण्यासाठी हिंदू कटिबद्ध झाले व त्यानी अविंधाचा प्रतिकार करण्यास प्रारंभ केला.

वरील प्रकरणाचा येथे संक्षेपाने उल्लेख करण्याचे कारण की, कुकळ्ळीच्या क्षत्रिय मराठ्यानी पोर्तुगीजांचा दीर्घकाल प्रतिकार केला तो महाराष्ट्र धर्माच्या व पर्यायाने हिंदू धर्माच्या रक्षणाच्या भावनेने प्रेरित होऊन. त्याचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे कुकळ्ळी येथील स. १५७९ सालचा शिलालेख (पणजी येथील सरकारी पुराणवस्तु संग्रहालयात तो बघावयास मिळतो)

मागे उल्लेख आलाच आहे की, कॅथलिक मिशनऱ्यांनी हिंदूच्या ख्रिस्ती करणाची मोहीम तिसवाडी अथवा गोवा बेटापासून सुरू केली होती व साष्टी प्रांतात त्यांचे आगमन स. १५६८ साली झाले होते. त्या भागातील अनेक गावे बाटवीत व हिंदू मंदिरांची मोडतोड करीत अथवा त्यांचे चर्चमध्ये रुपांतर करीत ते कुकळ्ळीपर्यंत येऊन पोहोचले होते. तेथेही त्यानी अनेक हिंदू मंदिरांचा विध्वंस केला. त्यातील रामेश्वराचे मंदिर म्हणून ओळखले जाणारे मंदिर कुणी विठोजी मेगोजी नावाच्या गृहस्थाने नव्याने बांधून स. १५७९ त त्याचा जीर्णोद्धार केला. ह्या समारंभप्रसंगी त्याने जो एक शिलालेख खोदून घेतला तो तब्बल तीनशेश्यांयशी वर्षानी कुकळ्ळी येथील एका चॅपेलच्या आवारात उपलब्ध झाला. प्रस्तुतचे चॅपेल म्हणजेच पूर्वीचे रामेश्वराचे मंदिर होते, की ज्याचा जीर्णोद्धार विठोजो मेगोजी ह्याने केला होता. पुढे कॅथलिक मिशनऱ्यानी हे मंदिरही दुसऱ्यांदा पाडून त्याचे जागी वरील चॅपेल बांधिले. तें सांप्रत अस्तित्वत आहे.

विठोजी मेगोजी हा आपल्या शिलालेखात स्वतःला सूर्यवंशी क्षत्रिय मराठा म्हणवितो. शिलालेखाच्या शेवटी म्हटले आहे की, 'जो कुणी **मराठा होऊनी** हे मंदिर पुनरुपी बांधील त्याला काशियात्रा केल्याचे पुण्य लाभेल.'

'मराठा होऊनी' ही संज्ञा शिवकालीन कागदपत्रात आढळत असली, तरी तिचा जुना उल्लेख कुकळ्ळीच्या शिलालेखात सर्वप्रथम आला असावा, असा काही तज्ञ इतिहास संशोधकांचा तर्क आहे. तेव्हा सांगायचा मुद्दा हा की, ह्या संज्ञेचा संबंध महिकावतीच्या बखरीतील महाराष्ट्र धर्माशी येतो.

कुकळ्ळीच्या नऊ वर्षाच्या धर्मयुद्धाचे वीस सूत्रधार अथवा नेते कुकळ्ळी आणि तदलगतच्या अनेक गावातील मराठ्यांतून आले होते. त्यानी हे युद्ध शर्थीने लढवून पोर्तुगीज लष्कराला जेरीस आणले. अखेर पोर्तुगालच्या राजाने ह्या युद्धांत हस्तक्षेप करून ते सामोपचाराने संपुष्टात आणले. 'सिल्वा' आडनावाचा एक खास दूत पोर्तुगालहून कुकळ्ळीला पाठविण्यात आला होता. त्याने कुकळ्ळी येथील मराठ्यांच्या पुढाऱ्यांशी वाटाघाटी करून त्यांच्या बहुतेक सर्व मागण्या मान्य केल्या.

कुकळ्ळीचे परागंदा झालेले हिंदू आपापल्या गावी येऊन नव्याने स्थायिक झाले. परंतु कुकळ्ळीच्या मराठ्यांची परागंदा झालेली कुलदेवता श्री शांतादुर्गा कुकळ्ळीस परत आली नाही. तिने फातर्पे येथेच राहाणे पसंत केले.

अशी समजूत आहे की, कुकळ्ळीचे मराठे व पोर्तुगीज यांच्यामध्ये झालेली उपरिनिर्दिष्ट युद्ध हे गोव्यातील शेवटचे धर्मयुद्ध. तदनंतर मिशनऱ्याकडून गोव्यात मोठ्या प्रमाणात सार्वत्रिक धर्मांतरे झाली नाहीत. काही तुरळक झाली; परंतु ती सक्तीची नव्हती.

कुकळ्ळीच्या धर्मयुद्धानंतर उण्यापुऱ्या पाऊणशे वर्षांनी पोर्तुगीजांचा आणि शिवाजी महाराजांचा संबंध आला. स. १६५८ साली शिवाजी महाराजानी उत्तर कोकणवर स्वारी केली, तेव्हा त्यांचे सैन्य पोर्तुगीजांच्या अमलाखाली असलेल्या चौल आणि दमण ह्या दोन ठाण्यात घुसल्याने पोर्तुगीजानी महाराजांकडे तक्रार केली होती. ह्या घटनेनंतर तीन वर्षांनी म्हणजे स. १६६१ साली शिवाजी महाराजानी दक्षिण कोकणवर स्वारी केली, तेव्हा त्यांचे सैन्य गोव्याच्या उत्तर सीमेला भिडल्याने घोडामैदान जवळ आले. शिवाजी महाराजांशी पोर्तुगीजांचा आता प्रत्यक्ष संबंध आला. गोव्याचे पोर्तुगीज इतके दिवस महाराजांचे प्रताप दुरून ऐकत आले होते. आता ते त्याचे शेजारी बनल्याने त्यांच्याशी राजनैतिक संबंध प्रस्थापित करणे त्याना हितावह वाटले. त्यानी महाराजांकडे आपला एक दूत पाठवून त्यांच्याशी राजनैतिक संबंध प्रस्थापित करण्याची इच्छा दर्शविली.. महाराजानी पोर्तुगीजांच्या इच्छेची कदर करून त्यांच्याशी राजनैतिक संबंध प्रस्थापित करण्याचा निर्णय घेतला; परंतु ह्या ठिकाणी एक गोष्ट नमूद केली पाहिजे ती ही की, शिवाजी महाराज हे विधियुक्त सिंहासनाधिष्ट झालेले राजे नसल्याने महाराजांच्या राजदूतास पोर्तुगीजानी सार्वभौम राजाच्या दूताप्रमाणे वागणूक दिली नाही. मात्र ही वागणूक त्यानी छत्रपती संभाजी महाराजांच्या राजदूतास दिली.

आपण अभिषित राजे नसल्याने परकी सत्ता आपणास सार्वभौम राजा म्हणून मान देण्यास तयार नाहीत, याची जाणीव शिवाजी महाराजाना झाली होती. म्हणून त्यानी अखेर राज्यारोहणाचा विधियुक्त सोहळा घडवून आणला. गोव्याचे पोर्तुगीज शिवाजी महाराजांशी वागताना वरकरणी मैत्रीचा आभास करीत असले तरी त्यांच्या वर्धेष्णु सामर्थ्याचा ते आतून मत्सर करीत होते. त्यांच्या शत्रूना गुप्तपणे त्यांच्याविरूद्ध मदत करीत होते. त्यांचा हा दुटप्पीपणा शिवाजी महाराजांना आकलन झाला होता व म्हणून ते त्यांचा काटा काढण्याची वाट पाहात होते.

पोर्तुगीजांशी संघर्ष निर्माण होण्याचे प्रसंग अनेकदा उद्‌भवले. त्यापैकी पहिला प्रसंग शिवाजी महाराजानी खोलगडचा किल्ला बांधावयास घेतला तेव्हाचा आहे. हा किल्ला पोर्तुगीजांच्या ताब्यातील साष्टी प्रांताच्या सीमेवर साळ नदीच्या संगमावर उभा आहे. त्याच्या बांधकामास प्रारंभ झाला, तेव्हा त्याच्यापासून आपल्या दक्षिण सीमेला व नौकायनास धोका पोहोचेल हे लक्षात घेऊन गोव्याच्या व्हिसेरेइने त्याला हरकत घेतली. परंतु महाराजानी त्या हरकतीची दखल घेतली नाही. ते पाहून व्हिसेरेइचे पित्त खळवळले व त्याने खोलगडच्या किल्ल्याचे बांधकाम बलप्रयोग करून पाडून टाकण्याचा बेत केला. त्याने आपल्या सल्लागार मंडळाची बैठक भरवून खोलगडच्या किल्ल्याचे बांधकाम सैन्य धाडून पाडून टाकण्याचा ठराव संमत करून घेतला. परंतु त्या ठरावाची कार्यवाही करण्याचा हिय्या त्याला झाला नाही. ठराव कागदोपत्रीत राहिला.

दुसरा प्रसंग शिवाजी महाराजानी बार्देश प्रांतावर जातीने स्वारी केली तेव्हा आला. या स्वारीत महाराजानी तीन पाद्र्याना पकडून त्याना हिंदू होण्यास सांगितले असता त्यानी नकार दिला, तेव्हां त्याना झाडांना टांगून त्यानी फांशी दिले. महाराजानी कैक पोर्तुगीज लोकाना युद्धकैदी म्हणून पकडून नेऊन खंडणी घेऊन त्यांची मुक्तता केली. परंतु महाराजांकडून इतकी अप्रतिष्ठा होऊन देखील पोर्तुगीजानी महाराजांशी समर प्रसंग टाळला. वरील ठळक घटनाखेरीज आणखी बऱ्याच लहानसहान घटना अशा आहेत की त्यांच्यातून उभयपक्षात युद्ध पेटण्याची शक्यता होती. परंतु पोर्तुगीजानी प्रत्येक वेळी माघार घेतली. तरीही शिवाजी महाराजांच्या हातून आपली सुटका नाही याची त्यांना कल्पना असल्याने ते शेवटच्या त्या मोठ्या समर प्रसंगाची पुष्कळ दिवसांपासून तयारी करीत होते. युद्ध सामुग्री गोळा केली जात होती व सौन्य भरती होत होती. महाराजांची स्वारी दक्षिण गोव्यात कुकळ्ळीच्या बाजूने होणार असल्याची बातमी लागल्याने पोर्तुगीजानी ह्या स्वारीला तोंड देण्यासाठी पाच हजार सैन्य कुकळ्ळी येथे गोळा केले होते. परंतु महाराजांच्या स्वारी ऐवजी त्यांच्या निधनाची वार्ता त्याना ऐकावयास मिळाली. ती ऐकून गोव्याचा व्हिसेरेइ उद्गारला, ‘आम्ही काळजी मुक्त झालो. कारण, युद्धपेक्षा शांततेच्या काळातच त्याची आम्हाला अधिक भीती बाटायची.’

संभाजी महाराजांचा आणि पोर्तुगीजांचा संबंध ते पन्हाळ्यास कैदेत होते तेव्हा सुरू झाला होता. उभयपक्षांमध्ये गुप्त पत्रव्यवहार चालू होता. शिवाजी महाराजांच्या नंतर गादीवर येण्यासाठी संभाजी महाराजाना अन्य काही लोकांप्रमाणे पोर्तुगीजांच्याही मदतीचीही आवश्यकता भासत होती. म्हणून त्यानी आपल्या खास दूतांमार्फत त्यांच्याशी संपर्क साधला होता. परंतु परकी मदतीविना त्याना गादी मिळाल्यावर त्यांच्या वर्तनात बदल झाला. पोर्तुगीजाशी वागताना त्यानी ताठर भूमिका स्वीकारली. स. १६८२ साली पोर्तुगीजांचे एक शिष्टमंडळ रायगडला गेले. परंतु ह्या शिष्टमंडळाने संभाजी महाराजांसाठी मोठा नगराणा नेला नव्हता म्हणून त्यानी मंडळाला मुलाखत दिली नाही. शिष्टमंडळ हात हलवीत परत आले. तरीही गोव्याच्या व्हिसेरेइने संभाजी महाराजांच्या राजदूतास सार्वभौम राजाच्या दूताप्रमाणे मानाने वागविले.

शिवाजी महाराजांच्याप्रमाणे संभाजी महाराजांनाही पोर्तुगीजांचा शेजार नको होता. म्हणून ते त्याना गोव्यातून हुसकून लावण्याच्या संधीची वाट पाहात होते. ती संधी त्याना आंजेदिव बेट प्रकरणी मिळाली. आंजेदिव बेट उत्तर कारवार प्रांताच्या समुद्र किनाऱ्यावर आहे. वास्को डी गामाच्या पहिल्या स्वारीचे वेळी पोर्तुगीजानी हे बेट व्यापिले होते. तेथे त्यानी एक किल्ला आणि चर्चही बांधिले होते. परंतु तेथे हिवतापाचा प्रादुर्भाव झाल्याने नंतर त्यानी ते सोडून दिले होते. पुढे शिवाजी महाराजानी उत्तर कारवार प्रांत घेतल्यावर आंजेदिव बेट त्यांच्या अमलाखाली आले. परंतु त्यानी ते ताब्यात घेतले नाही. ते संभाजी महाराजांच्या लक्षात आले. त्यानी ते कबजात घेऊन त्याची तटबंदी करण्याची योजना आखली. परंतु ह्या योजनेचा सुगावा पोर्तुगीजाना लागल्याने त्यानी त्या बेटावर सैन्य उतरवून ते ताब्यात घेण्याची घाई केली.

पोर्तुगीजानी आंजेदिव बेट ताब्यात घेतल्याने संभाजी महाराज क्रोधाविष्ट झाले व त्यानी पोर्तुगीजाना धडा शिकविण्याचे ठरविले. ह्या प्रकरणातून जें युद्ध पेटले त्यात पोर्तुगीजांवर हार खाण्याची पाळी आली. पोर्तुगीज सैन्याचे नेतृत्व व्हिसेरेइ जातीने करीत होता. परंतु मराठ्यांचा जोर होताच त्याने रणांगणातून पळ काढला. त्यामुळे राजधानीत येऊन आपला राजदंड सेंट झेवियरच्या शवपेटी शेजारी ठेवून गोव्याचे रक्षण करावे म्हणून त्याची करुणा भाकली. ह्या सामुदायिक प्रार्थनेत व्हिसेरेइ खेरीज गोवा शहरातील बहुतेक सर्व नागरिक सामील झाले होते.

अनुक्रमणिका

सेंट झवियरने चमत्कार केल्याने म्हणा, अथवा पोर्तुगीजांच्या सहाय्यार्थ आलेल्या मोगल सैन्याचा प्रतिकार करण्यासाठी म्हणून म्हणा मराठ्यांचे गोवा शहराच्या तटास भिडलेले सैन्य माघारा परतले व अशा रीतीने गोवा शहराचा बचाव झाला. तेव्हापासून सेंट फ्रान्सिस झवियर हा गोव्याचा रक्षणकर्ता (पॅट्रन) संत म्हणून ओळखला जाऊ लागला.

संभाजी महाराजांच्या वधानंतर स्वराज्याची सूत्रे राजारामाच्या हाती आली. त्याने दूरदृष्टीने पोर्तुगीजांशी सलोख्याचे संबंध ठेवले. पोर्तुगीजानाही मराठ्यांशी चांगले संबंध ठेवणे इष्ट वाटले. त्याचे कारण हे की, मोगलासारख्या बलाढ्य सत्तेचा शेजार त्याना नको होता. गोव्याच्या व्हिसेरेइने पोर्तुगालच्या राजास ह्या कालात लिहिलेल्या पत्रात उल्लेख आढळतो की, 'मुसलमान हे दगलबाज असल्याने त्यांच्यावर कधीच विश्वास ठेवू नये. त्यांच्याऐवजी मराठ्यांचा शेजार बरा.' परंतु राजारामाशी मैत्रीचे संबंध ठेवून मोगलांचा रोष ओढवून घेण्यास पोर्तुगीज तयार नव्हते. म्हणून वरकरणी ते मोगलांशी मैत्रीचे संबंध ठेवण्याचा आभास करून मराठ्याना आंतून चोरून मदत करीत होते.

राजारामाच्या कारकीर्दीच्या संदर्भात येथे एका गोष्टीचा प्रकर्षाने उल्लेख केला पाहिजे तो हा की, स्वराज्याचा भाग म्हणून समजले जाणारे सांप्रतच्या गोव्याचे, सांगे, केपे आणि काणकोण हे तीन तालुके व काणकोणपासून गंगावळी नदीपर्यंतचा उत्तर कारवार जिल्ह्याचा प्रदेश राजारामाने सोंधेच्या राजास सालिना बावीस हजार होनाना भोगवट्यास दिला. (हा सर्व टापू पोर्तुगीजाना स. १७६० साली सोंधेच्या राजाकडून मिळाला). राजारामाच्या मृत्युनंतर महाराणी ताराबाईच्या कारकीर्दीत पोर्तुगीज आणि मराठे यांचे संबंध सलोख्याचेच होते. इतकेच नव्हे तर ताराबाईंच्या कर्तबगारीवर पोर्तुगीज खुष होते. (एका पोर्तुगीज लेखकाने आपल्या ग्रंथात ताराबाईविषयी गौरवपूर्ण उल्लेख केला आहे.)

शाहूच्या कारकीर्दीच्या प्रारंभीच पोर्तुगीजांचे आणि त्याचे संबंध बिंघडले. त्याचे कारण हे की, शाहूकडे त्यानी नजराणा पाठवून तो राजा झाला म्हणून त्याचे अभिनंदन केले नव्हते.

पोर्तुगीजानी शाहूकडे नजराणा पाठवून त्याचे अभिनंदन केले नाही त्याचे कारण हे की, त्यांच्याकडे नजराणा पाठविण्याची पद्धत नव्हती हे तर झालेच; पण मोगलांचे मांडलिकत्व पत्करून तो अधिकारावर आला म्हणून त्याच्याविषयी त्याना आदर वाटत नव्हता.

शाहूचे आणि पोर्तुगीजांचे संबंध वरील घटनेमुळे बिघडले व त्यातूनच वसईचे युद्ध उद्‌भवले.

वसईचे युद्ध चालू असताना देखील शाहू पोर्तुगीजाना पत्रे पाठवून त्याना आपणास नजराणा पाठविल्याबद्दंल कळवीत होता. परंतु ही मागणी त्यानी कधीच मान्य केली नाही. गोव्याचा व्हिसेरेइ पोर्तुगालच्या राजास लिहिलेल्या पत्रातून म्हणतो की, 'एका मांडलिक राजाकडे नजराणा पाठवून आम्ही आमची प्रतिष्ठा कमी करून घेणार नाही.' पोर्तुगीजांचे हे हट्टाग्रही धोरण शेवटपर्यंत टिकले. त्यानी हा प्रश्न आपल्या राष्ट्राच्या प्रतिष्ठेचा केला.

वसईचे युद्ध चालू असता पेशव्यानी गोव्यातही पोर्तुगीजांविरूद्ध दुसरी आघाडी उघडली होती. पेशव्याचे दोन मातबर सरदार आणि निकटवर्ती नातेवाईक इचलकरंजीचे व्यंकटराव घोरपडे व नरगुंदचे दादाजीराव भावे या दोघांकडे ह्या लष्करी मोहिमेची सूत्रे होती. त्या दोघांना शाहूचे एक मंत्री नारोराम हे

अनुक्रमणिका

मदत करीत होते. ह्या तिघानी पोर्तुगीजांकडून मोठी लांच घेऊन गोव्याची मोहीम रेंगाळत ठेवली. वास्तविक गोवे घेणे हा पेशव्यांच्या सरदारांच्या हातचा नुसता मळ होता. परंतु त्यानी तसे केले नाही, कारण पोर्तुगीजांकडून लांच घेतल्याने ते त्यांचे मिंधे बनले होते.

पोर्तुगीज आणि पेशवे यांच्यासंबंधीची पोर्तुगीज कागद पत्रे चाळली तर पेशव्यांचे सरदार आणि त्यांचे मुत्सद्दि यांच्या वर्तनावर विदारक प्रकाश पडतो. उदादरणार्थ, गोव्याचा व्हिसेरेइ पुणे दरबारातील पोर्तुगीजांचे वकील नारायण शेणवी धुमे याना दि. ३ जानेवारी १७७५ रोजी लिहिलेल्या पत्रात म्हणतो :

'आशियाई लोक हे लांचलुचपतीला बळी पडणारे असतात. तेव्हा तुम्ही मंत्री आणि अधिकारी याना लांच चारून त्याना सहज वश करून घेऊ शकाल. मात्र पैशांचा व्यवहार विश्वासू माणसांमार्फत करावा.'

वानगी दाखल वरील अवतरण दिले आहे. त्यावरून पोर्तुगीज आणि पेशवाईतील मुत्सद्दि यांच्यामधील संबंधावर चांगला प्रकाश पडतो.

वसईचे युद्ध हे पोर्तुगीजानी हिंदुस्थानात लढविलेले शेवटचे मोठे युद्ध. त्यात हार खावी लागल्याने पोर्तुगीज सत्तेला हिंदुस्थानात दुय्यम स्थान प्राप्त झाले. मात्र 'काप गेले तरी भोक राहिले' ह्या म्हणीस अनुसरून त्यानी आपल्या राष्ट्राची प्रतिष्ठा टिकवून ठेवण्याचा प्रयत्न शेवटपर्यंत केला. कुठल्याच ठिकाणी त्यानी कुणाशी तडजोड केल्याचे उदाहरण आढळत नाही. त्यांचा हा कणखर बाणा आणि त्यांचा देशाभिमान कौतुकास्पद आहे यांत शंका नाही.

शेवटी ह्या पुस्तकाच्या प्रकाशनाला हस्ते परहस्ते ज्यांचा हातभार लागला त्यांचे मला आभार मानायचे आहेत.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष माननीय डॉ. सुरेन्द्र बारलिंगे, मंडळाचे माजी सचिव श्री. चिं. द्वा. देशमुख व विद्यमान सचिव श्री. पां. र. पाटील यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

गोवा पुराभिलेख खात्याचे संचालक डॉ. प्रकाशचंद्र पां. शिरोडकर व पुराभिलेख खात्यांतील दोन अधिकारी श्री. रिवणकर आणि श्री. डिचोलकर यानी गोव्याच्या एका व्हिसेरेइने शिवाजी महाराजाना लिहिलेल्या दुर्मिळ पत्राची फोटो प्रत पुस्तकाच्या मुखपृष्ठासाठी उपलब्ध करून दिली त्याबद्दल त्या तिघांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

स्नेहेश प्रिंटर्सचे श्री. प्रमोद भोगटे यानी पुस्तकाच्या मुद्रणाचे किचकट काम आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने व्यवस्थितपणे केले, त्याबद्दल त्यांच्याही मी आभारी आहे.

—स. शं. देसाई

अनुक्रमणिका

# १. हिंदुस्थानच्या जलमार्गाचा शोध

पोर्तुगाल हा इबेरियन द्विपकल्पाच्या पश्चिम दिशेकडचा सुमारे एक पंचमांश भाग आहे. इ. स. च्या १० व्या शतकापर्यंत राजकीय दृष्ट्या इबेरियन द्विपकल्प एक सलग होते. इ. स. १०९५ साली 'काउंट दों एंरिक द बोर्गोन्स' या नावाच्या उमरावाला 'कोंदाद द पोर्तुगालेंस' ही 'कौंटी' त्याने स्पेनची राजकन्या दोना 'तेरेझा' हिच्याशी विवाह केला, तेव्हा हुंड्या दाखल मिळाली. प्रारंभी हा परगणा अवघा दोन जिल्ह्यांचा होता. नंतरच्या दोनशे अडीचशे वर्षाच्या कालावधीत पोर्तुगीज लोकानी 'मूर' अथवा मुसलमान लोकांशी आणि खुद्द स्पेन देशाशी युद्ध करून आपल्या छोट्या राष्ट्राचा मोठा विस्तार केला. इ. स. १३८५ साली त्यानी स्पेनशी युद्ध करून 'आल्जिबाररोत' नावाच्या लढाईत स्पॅनिश सैन्याचा मोठा पराभव केला. या विजयामुळे त्याना आफ्रिकेत लष्करी मोहिमा करण्याची ईर्षा उत्पन्न झाली. या मोहिमासाठी त्याना जे नाविक दल हवे होते, ते त्यानी तयार केले होते. राजपुत्र दों एंरिक याने 'साग्रिश' या नावाच्या बंदरात आरमारी जहाजे बांधण्याची गोदी बांधिली होती. या जहाजांसाठी जे लाकूड लागले, ते त्याने स्वतः लावलेल्या एका 'पाईन' वृक्षाच्या बनातून आणले होते.

इ. स. १४८७ साली 'बार्नोलोमेव दियश' नावाच्या धाडशी पोर्तुगीज नावाड्याने आफ्रिकेच्या 'काबु द बोआ इश्पेरांस' अथवा 'केप ऑफ गुड होपला' वळसा घालण्यात यश संपादन केल्याने त्याहून मोठ्या नाविक मोहिमा हाती घेण्याचा आत्मविश्वास पोर्तुगीज लोकांमध्ये निर्माण झाला. परंतु पोर्तुगाल हे गरीब राष्ट्र असल्याने त्याला व्हेनिस, जिनोआ, वगैरे इटालियन गणराज्यांसारखी भौतिक समृद्धता संपादन करायची झाल्यास व्यापारांत पडणे आवश्यक होते. सुदैवाने लांबच्या सफरी करू शकणारे **धाडसी** आणि ईर्षावान खलाशी 'साग्रिश' येथील नाविक शाळेतून शिकून बाहेर पडत होते, आणि खळवळत्या अथांग महासागरांच्या प्रचंड लाटांशी झुंज देऊ शकणाऱ्या बलाढ्य नौकाही पोर्तुगीज गोदीत बांधल्या जात होत्या. योगायोगाची गोष्ट म्हणजे धाडसी उपक्रमाना प्रोत्साहन देणारा दों मानुएल पहिला हा नशिबवान राजा राज्य करीत होता. त्याच्या कानावर जेव्हा आले की, हिंदुस्थान या नावाचा एक समृद्ध देश आशिया खंडात आहे, व त्या देशाशी व्यापार करून अरब लोक धनाढ्य बनले आहेत, तेव्हा हिंदुस्थानच्या जलमार्गाचा शोध लावण्याची मोहीम हाती घेण्याचा निर्णय त्याने तडकाफडकी घेऊन टाकला.

हिंदुस्थानच्या जलमार्गाच्या मोहिमेची तयारी धुमधडाक्याने सुरू झाली. दाणागोटा गोळा करण्यात आला, नावाड्यांची निवड झाली, नौकाही बांधून तयार झाल्या. आणि ह्या मोहिमेचे नेतृत्व 'व्हाश्कु द गामा' ऊर्फ 'वास्को डी गामा' या नावाच्या नावाड्याचे हाती सुपूर्द करण्यात आले.

दि. ८ जुलै १४८७ रोजी व्हाश्कु द गामा तीन नौका घेऊन हिंदुस्थानच्या जलमार्गाचा शोध लावण्याच्या संस्मरणीय मोहिमेवर निघाला. त्याचे वय तेव्हा सदतीस वर्षाचे होते. खरे सांगायचे तर, या निवडीमागे नियतीचाच हात असला पाहिजे. कारण, व्हाश्कु द गामाने तत्पूर्वी एकादी यशस्वी नाविक मोहीम केल्याची माहिती उपलब्ध नाही. मात्र एकादी मोठी मोहीम करण्याचे कर्तृत्व त्याच्यामध्ये होते. हा मध्यम बांध्याचा आणि पीळदार शरीरयष्टीचा नावाडी उग्र चर्येचा, दृढ निश्चयी, शीघ्रकोपी आणि निष्ठुर असल्याने आपल्या हाताखालच्या लोकांवर हुकुमत गाजविण्यास तो लायक होता. त्याचा निष्ठुरपणा आणि त्यांचे क्रौर्य जगाच्या इतिहासात अजरामर झाले. आपल्या हुकुमाविरूद्ध आवाज उठविणाऱ्या खलाशाना त्याने देहान्त प्रायश्चित दिले व अनेकांचा अमानुष छळ केला. व्हाश्कु द गामा हिंदुस्थानच्या सफरीवर एकटा जात नव्हता. त्याचा ज्येष्ठ बंधु 'पाउलु द गामा' हा त्याच्या सोबतीला होता. परंतु या दोघा बंधूच्या

अनुक्रमणिका

स्वभावात विरोधाभास होता. व्हाश्कु द गामा जितका क्रुर होता, तितका पाउलु द गामा मनाने कनवाळू होता. कनिष्ठ बंधूच्या हडेलहप्पी वागणुकीस कंटाळलेल्या नावाड्यांची मने पाउलु द गामा याने आपल्या प्रेमळ आणि सुस्वभावी वागणुकीने काबीज केल्याने त्यांचा हिंदुस्थानापर्यंतचा प्रदीर्घ प्रवास निर्विघ्नपणे पार पडला. न झाल्यास व्हाश्कु द गामाच्या अरेरावीने गांजलेल्या खलाश्यानी बंड केल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नव्हते. परंतु हा गुणवान पाउलु द गामा आपल्या मायभूमीस माघारी परंतु शकला नाही. परतीच्या प्रवासांत तो आजारी पडून मरण पावला.

हिंदुस्थानच्या सफरीवर निघालेल्या पोर्तुगीज नौकांचे वजन ६० ते १५० टन होते. दि. १७ मे १४९८ या दिवशी त्या मलबारच्या किनाऱ्यास कालिकत शहराच्या उत्तरेस आठ मैलांवर 'कपट' नावाच्या खेड्याच्या किनाऱ्यास लागल्या.

पोर्तुगीज लोक आणि अरब हे एकमेकाना फार पूर्वीपासून परिचित होते. अरब लोकानी पोर्तुगाल आणि स्पेन ह्या दोन्ही देशांवर तीनशे साडेतीनशे वर्षे राज्य केले होते. ते एकेकाळचे आपले राज्यकर्ते म्हणून पोर्तुगीज लोक त्यांचा भयंकर द्वेष करीत असत. ती द्वेष भावना त्यांच्या रोमरंध्रात इतकी भिनली होती की, 'मूर' अथवा मुसलमान म्हटला की त्यांचा कपाळशूळ उठत असे. त्यामुळे मलबारच्या किनाऱ्यावर अरब नौकांची वाहतूक पोर्तुगीज नावाड्यांच्या निदर्शनास आली, तेव्हा ते संतप्त झाल्यावाचून राहिले नाहीत. परंतु कालिकतचा हिंदू राजा सामुरी अथवा झामोरिन याला पोर्तुगीज आणि अरब यांच्या मधील शत्रूत्वाची गंध वार्ताही नव्हती. कुणी परकी लोक आपल्या राज्याच्या समुद्र किनारी जलमार्गाने आल्याची बातमी लागताच आपल्या हिंदू परंपरेस अनुसरून त्यांचे स्वागत करण्यासाठी त्याने आपले काही इसम पोर्तुगीजांकडे धाडले व त्याना आपल्या भेटीस येण्याचे निमंत्रण दिले. व्हाश्कु द गामाने त्या निमंत्रणाचा अर्थात स्वीकार केला. पोर्तुगाल हे छोटे राष्ट्र तर होतेच; परंतु श्रीमंतही नव्हते. त्यातच पोर्तुगीज नावाड्याना येथील हिंदू लोकांचे आणि इथल्या राजे रजवाड्यांचे रीती रिवाजही माहीत नव्हते. त्यामुळे व्हाश्कु द गामा आपले काही खास सोबती घेऊन राजा सामुरीच्या दर्शनास गेला, तेव्हा त्याने बरोबर मौल्यवान नजराणे नेले नव्हते. ही गोष्ट राजा सामुरी आणि त्याच्या दरबारांतील लोकांना खटकल्यावाचून राहिली नाही. त्यातच पोर्तुगीज नावाड्यांच्या दरबारातील अनाडी वागणुकीचीही भर पडली. या बाबतीत काही इतिहासकारांचे मत आहे की, सामुरीच्या राज्यात अरब लोकांचे प्रस्थ असल्याचे आढळून आल्याने व्हाश्कु द गामा व त्याचे सोबती आधीच बिथरले होते व म्हणून त्यानी राजा सामूरी व त्याचे मानकरी यांचा दरबारांत जाणून बुजून पाणउतारा केला. मात्र राजा सामुरीच्या दरबाराचे वैभव पाहून पोर्तुगीज नावाडी दिपून गेल्यावाचून राहिले नाहीत.

राजा सामुरी हा सुसंस्कृत असल्याने पोर्तुगीजांच्या अडाणी वागणुकीने तो बिलकूल चिडला नाही. तो अत्यंत सयंमाने वागला. त्याने व्हाश्कु द गामा व त्याचे सोबती यांचे चांगले स्वागत केले व त्यांचा योग्य तो आदर सत्कार करून त्यांची त्याने बोळवण केली. राजा सामुरीकडून पोर्तुगीज नावाड्यांचे जे स्वागत झाले, त्याचा अनुकूल परिणाम त्यांच्या मनावर झाल्यावाचून राहिला नाही. ते राजा सामुरीवर फार खुष झाले व त्याच्याविषयी त्यांच्या मनात निर्माण झालेली प्रतिकूल भावना दूर झाली. त्यानी त्याच्याशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचे ठरविले.

पोर्तुगीज नावाड्यांच्या मनात हे जे परिवर्तन झाले, त्याला आणखीही एक कारण आहे. तोपर्यंत पोर्तुगीजाना मुसलमानी आणि यहुदी या दोन धर्मांखेरीज आणखी धर्म जगात आहेत याची मुळीच कल्पना

नव्हती. राजा सामुरी हा अरब नसला, तरी तो हिंदुस्थानातील मुसलमान असला पाहिजे अशी त्यांची समजूत होती. परंतु त्याचा पोषाख आणि त्याचा राजदरबार पाहिल्यावर तो मुसलमान नसल्याची त्यांची खात्री पटली. त्याना वाटले की तो ज्या अर्थी मुसलमान नाही त्या अर्थी तो ख्रिश्चन असला पाहिजे. ह्या त्यांच्या समजुतीला दुजोरा मिळतो तो त्यानी लिहून ठेवलेल्या त्यांच्या हिंदुस्थानच्या पहिल्या सफरीच्या वृत्तांतावरून. त्यात त्यानी स्पष्टपणे नमूद केले आहे की, मलबारच्या किनाऱ्यावरील रहिवाशी ख्रिश्चन धर्मी आहेत. मात्र त्यांच्या मंदिरातील 'व्हर्जिन मेरी'च्या मूर्ती ह्या युरोपात आढळणाऱ्या मेरी व्हर्जिनच्या परंपरागत मूर्तीसारख्या नसून वेगळ्या आहेत.

पोर्तुगीज नावाड्यांचा सांस्कृतिक दर्जा कनिष्ठ होता, हे कालिकत शहराच्या बाजारात त्यानी खरेदी केलेल्या वस्तूंवरूनही सिद्ध झाले. आधीच राजा सामुरीच्या दरबारातील त्यांच्या आडमुठ्या वर्तनाचा सर्वत्र बभ्रा झालाच होता. त्यांत त्यानी कालिकत शहराच्या बाजारात खरेदी केलेल्या सवंग वस्तूच्या बातमीची भर पडली. त्यावरून लोकांचा पक्का ग्रह झाला की ह्या परकी लोकांची संस्कृती हीन असली पाहिजे. या बाबतीत काही पोर्तुगीज विद्वानानीही टिप्पणी करून ठेवली आहेत. उदाहरणार्थ 'डॉ. आगोस्तिन्यु द फ्रेइताश' हा पोर्तुगीज विद्वान म्हणतो की, 'पोर्तुगीज नावाड्यानी आशिया खंडात जे अडाणीपणाचे वर्तन केले, त्यामुळे पोर्तुगीज लोकांचे हसे झाल्यावाचून राहिले नाही.' याबाबतीत डॉ. फ्रेश्ताश यांचा असा दृष्टिकोण आहे की, 'पोर्तुगीजानी आफ्रिकेत ज्या लष्करी मोहिमा केल्या त्यांत पोर्तुगालची एक सबंध पिढी पुरती गारद झाली. त्यामुळे नंतरची जी पिढी जन्मास आली ती अडाणी निघाली. त्याचा परिणाम असा झाला की या पिढीचे जे खलाशी आशिया खंडात गेले त्यांच्या हातून अशिष्ट आणि जंगली वागणूक घडल्याने पोर्तुगाल हा रानटी लोकांचा देश असावा, अशी परदेशात समजूत पसरली. याच्या उलट इंग्रज लोक आपल्या देशाबाहेर फार उशीरा पडले. त्यांचा शेक्सपीयर व त्यांचा मिल्टन हे त्यांच्या साम्राज्य स्थापनेच्या पूर्वीचे आहेत. इंग्लंडचा सांस्कृतिक दर्जा प्रस्थापित झाल्यावरच त्या देशाने सागरी मोहिमा हाती घेतल्याने त्या देशाचे खलाशी परदेशात समंजसपणे वागले.'

व्हाश्कु द गामा व त्याचे सोबती यांचे वास्तव्य मलबार किनाऱ्यावर तब्बल चार महिने होते. नंतर त्याना माघारी परतण्याचे वेध लागले. तोपर्यंत ऑगष्ट महिन्याच्या मध्यास पावसाळी वारे शांत व्हायला लागले होते. हा प्रदीर्घ कालावधी त्यानी रिकामपणात घालविला असला तरी त्यानी निरीक्षण मात्र भरपूर केले. मलबारी लोकांच्या चालीरीती, त्यांचे खाणेपिणे, वगैरे गोष्टींचा त्यानी चांगला अभ्यास केला. मलबारच्या किनाऱ्यावरील काही उल्लेखनीय वस्तूंचे नमुनेही त्यानी गोळा केले. या कामी त्याना त्या प्रदेशांत तब्बल वीस वर्षे वास्तव्य करून राहिलेल्या एका इटालियन गृहस्थाची व स्पॅनिश भाषा अवगत असलेल्या एका 'ट्युनिशियन' मुसलमानाची मदत झाली. या मुसलमान गृहस्थाची आणि पोर्तुगीज नावाड्यांची पुढे इतकी सलगी झाली की, तो पुरताच पोर्तुगीज धार्जिणा बनला व पोर्तुगीजांच्या बरोबर युरोपला जाण्याचा त्याने बेत केला. व्हाश्कु द गामाने आपल्या हाताखालच्या खलाशांच्या दडपणामुळे मायदेशी परतण्याचा जरी निर्णय घेतला असला तरी, त्याला हिंदुस्थानला कायमचा रामराम ठोकायचा नव्हता. कालिकतशी आणि राजा सामुरीशी त्याला संबंध जोडायचा होता. आपला एक प्रतिनिधी आणि पोर्तुगालहून आणलेल्या काही वस्तू त्याला मागे ठेवायच्या होत्या. आपला हा मनोदय त्याने राजा सामुरीस कळविला, तेव्हा त्याला प्रत्युत्तर देण्यात आले की, कालिकत राज्यांतील कायद्याप्रमाणे त्याला मागे ठेवण्यात यायच्या मालाची जकात भरावी लागेल. हा माल विक्रीसाठी ठेवण्यात येणार असल्याने त्यावर विक्रीकर आकारला गेल्यास तो काही अन्याय ठरत नव्हता. पण व्हाश्कुद गामा विक्रीकर भरण्यास तयार

नव्हता. या प्रश्नावरून सरकारी अधिकाऱ्यांची आणि त्याची बाचाबाची झाली असता सरकारी अधिकाऱ्यानी त्याचा माल जप्त करून त्याच्या प्रतिनिधीस कैद केले.

वरील घटनेमुळे व्हाश्कु द गामाचा अहंकार दुखवला गेला. त्याला आणि त्याच्या अनुयायाना तो आपला अपमान वाटला व त्यानी त्याचा बदला घेण्याचे ठरविले. व्हाश्कु द गामाच्या नौकेवर कालिकत शहरातील बारा प्रतिष्ठित नागरिक त्याला निरोप देण्यासाठी म्हणून गेले होते. त्याना त्याने कद करून नौका समुद्रात हाकारल्या.

व्हाश्कु द गामाची दगलबाजी पाहून राजा सामुरी पुरताच दिग्मूढ झाला. त्याने पोर्तुगीजाचा जो माल जप्त केला होता तो त्याने सोडला व पोर्तुगिजांच्या प्रतिनिधीस मुक्त करून व्हाश्कु द गामास निरोप धाडला की ह्या औदार्याच्या बदली आपल्या अटक केलेल्या प्रजाजनास मुक्त करावे. व्हाश्कु द गामाने सात नागरिकाना मुक्त केले. परंतु उरलेल्या पाच जणाना घेऊन पलायन केले.

पावसाळी वारे पडले असले तरी समुद्र अद्याप शांत झाला नव्हता. त्यामुळे नौका गति घेऊ शकत नव्हत्या. म्हणून समुद्र शांत होईस्तोवर पोर्तुगीज नावाड्यानी सप्टेंबर महिन्यात कारवारच्या किनाऱ्यावरील आंजेदिव बेटावर काही दिवस मुक्काम केला. तेथे त्याना एक ज्यू मनुष्य भेटला. मुसलमान चाच्यांनी त्याला पकडून मुसलमान केले होते. व्हाश्कु द गामाने त्याला ख्रिश्चन करून घेऊन त्याला गाश्पार कुरैया (Gaspar Correa) हे नांव ठेवले. नंतरच्या दहाबारा वर्षात ह्या पूर्वाश्रमीच्या गुलामाची पोर्तुगीजाना मोठी मदत झाली.

सप्टेंबर महिन्याअखेर समुद्र शांत झाला आणि पोर्तुगीजानी आंजेदिव बेट सोडले. ते पोर्तुगालहून हिंदुस्थानच्या सफरीवर निघाले, तेव्हा १७० जण होते. त्यांच्यापैकी अवघे ५५ जण दोन नौकांसह पोर्तुगाल पुनः गाठू शकले.

व्हाश्कु द गामा व त्याचे सोबती यानी कालिकतला दगलबाजी करून काळे तोंड केले, तेव्हा राजा सामुरीला वाटले होते की पोर्तुगीज पुनः काही आपणास तोंड दाखविणार नाहीत. तो या भ्रमात असल्याने पुरताच गाफील राहिला. याच्या उलट व्हाश्कु द गामाने मलबार सोडले ते फिरून इकडे येण्याचा बेत करून. कारण, हिंदुस्थानची समृद्धि आणि इथल्या लोकांचे ऐश्वर्य पाहून त्याचे डोळे दिपून गेले होते. ही श्रीमंती लुटून नेऊन आपला कंगाल देश संपन्न करण्याची सुखस्वप्ने त्याने मलबार किनाऱ्यावरील तीन महिन्याच्या वास्तव्यात पाहिली होती.

व्हाश्कु द गामा पोर्तुगालला परतला, तेव्हा त्याचे आणि त्याच्या सोबत्यांचे प्रचंड स्वागत झाले. ते हिंदुस्थानच्या सफरीवरून परत येतील असे कुणालाच वाटले नव्हते. राजा दों मानुएल दुसरा याला तर आपल्या नावाड्यानी हिंदुस्थानच्या जलमार्गाचा शोध लावला म्हणून आकाश ठेंगणे वाटले. व्हाश्कु द गामाने हिंदुस्थानातून आणलेल्या मौल्यवान चीजा पाहून त्याचे डोळे दिपले. हिंदुस्थानच्या सुवर्ण भूमीचा त्याला हेवा तर वाटलाच; पण व्हाश्कु द गामाप्रमाणे ती सुवर्णभूमी लुटण्याचीही त्याला हांव सुटली. पण ती महत्त्वाकांक्षा मनात बाळगून त्याचे समाधान झाले नाही. आपल्या कारकीर्दीत हिंदुस्थानच्या जलमार्गाचा शोध आपल्या नावाड्यानी लावला हे अख्ख्या युरोपाला कळावे म्हणून त्याने रोमला पोप महाराजांकडे एक वैभवशाली वकिलात (Embaixada) पाठविली. तीत व्हाश्कु द गामाने हिंदुस्थानातून आणलेल्या व

अनुक्रमणिका

युरोपियन लोकानी कधी न बघितलेल्या वस्तूंचा अंतर्भाव झालेला होता. वकिलातीत सगळ्यांसमोर कालिकतहून पकडून आणलेले कैदी त्यांच्या पोषाखात जात होते. ती वकिलात रोमला पोहोचण्यास पुष्कळ दिवस लागले. वाटेत सगळीकडे तिचे प्रदर्शन झाल्याने राजा दों मानुएलचा ती रोमला पाठविण्याचा उद्देश सफल झाला.

हिंदुस्थानच्या जलमार्गाच्या शोधाचा सोहळा पोर्तुगालात पुष्कळ दिवस चालला. अख्खे राष्ट्र त्या अभूतपूर्व विजयोत्सवात सामील झाले. पण हा सोहळा चालू असता राजा दों मानुएल स्वस्थ बसून नव्हता. व्हाश्कु द गामाच्या सल्ल्यानुसार हिंदुस्थानला दुसरे आरमार पाठविण्याची तयारी करण्याचा आदेश त्याने आपल्या मंत्र्याना दिला होता. परंतु या वेळी त्या आरमाराचे नेतृत्व करण्यासाठी व्हाश्कु द गामाची फेर निवड न होता त्यासाठी पेद्रु आल्वारिश द काब्राल (Pedro Alvares de Cabral) या नावाच्या दुसऱ्या एका अनुभवी दर्यासारंगाची नेमणूक करण्यात आली. दि. ९ मार्च १५०० या दिवशी काब्राल तेरा गलबते आणि १५०० नावाडी घेऊन हिदुस्थानच्या दुसऱ्या सफरीवर निघाला. त्याच्या सोबतीला 'केप ऑफ गुड होप'ला वळसा घालणारा प्रख्यात दर्यासारंग बार्तोलोमेव दीयश (Bartolomeo Dias) व व्हाश्कु द गामाच्या सफरीत भाग घेतलेला अनुभवी नावाडी निकोलाय कुएल्यु (Nicolao Coelho) हे दोघे होते. परंतु काब्रालच्या सफरीला मुहूर्त चांगला लागला नाही. त्याचे आरमार 'काबव्हेर्द' बेटांच्या दरम्यान प्रतिकूल हवामानामुळे भंगले. एक गलबत समुद्रात बेपत्ता झाले. दुसरे वाट चुकून मायदेशास माघारी परतले. तर उरलेलीही हिंदुस्थानाला जाण्याऐवजी अमेरिकेला गेली. तेथे त्याना अनायासे 'ब्राझिल'चा शोध लागला. परंतु तत्पूर्वी या गलबतांपैकी पांच बेपत्ता झाली होती. त्यांपैकी चारानी वादळांत सापडल्याने समुद्राचा तळ गाठला. त्यांचे नेतृत्व बार्गोलोमेव दियश हा करीत होता. त्याच्या दुर्दैवी सोबत्यांसह त्याला जलसमाधी मिळाली.

काब्रालने ब्राझिलचा शोध लावला खरा, परंतु तो सुखी नव्हता. कारण, त्याला हुकूम झाला होता हिंदुस्थानला जाण्याचा. त्यामुळे ब्राझिलला फार दिवस मुक्काम न करता तो लगेच आपल्या सहा गलबतांसह हिंदुस्थानकडे निघाला. दि. १३ सप्टेंबर १५०० या दिवशी तो कालिकतच्या किनाऱ्यावर येऊन पोहोचला. त्याने पहिले काम कोणते केले असेल, तर ते राजा सामुरीची सदिच्छा संपादन करण्यासाठी व्हाश्कु द गामाने ज्या पाच लोकाना पकडून नेले होते, त्याना कालिकत बंदरात पाठविण्याचे. पाचही लोकाना ख्रिश्चन करण्यात आले असल्याने ते पाश्चात्य पेहेराव करीत होते. काब्रालला वाटले होते की ते लोक परत आल्याने राजा सामुरीला आनंद होईल. परंतु ते लोक आता हिंदु राहिले नसल्याने ते परत आल्याने राजा सामुरीला आनंद झाला नाही, इतकेच नव्हे तर व्हाश्कु द गामाकडून त्याचा अपमान झाला असल्याने त्याने काब्रालला मुलाखत देण्यासही उत्सुकता दर्शविली नाही. पण काब्राल नाउमेद झाला नाही. त्याने चिकाटीने मार्ग प्रतिक्षा करून राजा सामुरीची अखेर मुलाखत घेतली.

काब्रालला हिंदुस्थानला पाठविण्यात आले, तेव्हा राजा दों मानुएल याने त्याला सूचना दिली होती की, कोणत्याही परिस्थितीत मलबारच्या किनाऱ्यास पोर्तुगीज मालाची वखार उघडण्यासाठी राजा सामुरीचे मन वळवून त्याची परवानगी मिळवावी. परंतु व्हाश्कु द गामा व त्याचे सोबती यानी आपल्या बेमुर्वतखोर कृत्यानी राजा सामुरीचे मन दुखविले असल्याने पोर्तुगीजाना आपल्या देशात आश्रय देण्यास तो तयार नव्हता. परंतु काब्रालने त्याची वारंवार मनधरणी केल्याने तो अखेर पोर्तुगीजाना कालिकत बंदरात मालाची वखार उघडू देण्यास व तिच्यांवर पोर्तुगीज राष्ट्राचा ध्वज लावू देण्यास तयार झाला. हे सर्व सव्यापसव्य करण्यास तीन साडेतीन महिने लागले.

राजा सामुरी आणि काब्राल या दोघांच्यामध्ये जो करार झाला, तदनुसार पोर्तुगीजाना सामुरीच्या राज्यांत व्यापार करण्यास मुभा मिळाली. परंतु पोर्तुगीज नावाड्यांनी अशी चुकीची समजूत करून घेतली की, आपणाशिवाय इतर परकी लोकाना या पुढे मलबार प्रांतात व्यापार करता येणार नाही. या समजुतीप्रमाणे एका मुसलमान गलबतावर माल चढविण्यात येत असता त्यानी हरकत घेतली, तेव्हा त्यांच्या भ्रमाचा भोपळा फुटला. पोर्तुगीज नावाड्यांची दंडेली पाहून लोक चिडले व त्यानी पोर्तुगीज नावाड्याभोवती गर्दी केली. ते पाहून उर्मट स्वभावाचे पोर्तुगीज नावाडी वर्दळीवर आले. आपल्याच देशांत आपल्यावर कुरघोडी करणाऱ्या पोर्तुगीजांचे हे वर्तन मलबारी लोकाना सहन न झाल्याने त्यानी पोर्तुगीज वखारीवर हल्ला चढवून ती जाळून टाकली. या हल्ल्यात सुमारे तीस चाळीस पोर्तुगीज नावाडी ठार झाले. उरलेल्यानी जीव घेऊन पळ काढला. त्यांनी कशी बशी आपली जहाजे गाठली.

मलबारी लोकांनी आपली वखार जाळून आपल्या तीस-चाळीस लोकांना ठार केलेले पाहून पोर्तुगीज नावाडी क्रोधाने बेफाम झाले. त्या भरात त्यानी कालिकत बंदरातील नौकांची जाळपोळ करून ६०० निरपराध लोकांची अमानुष कत्तल केली. या दुर्दैवी लोकांमध्ये बहुसंख्य स्थानिक कोळी असून उरलेले परकी लोक होते. परंतु ह्या क्रूर हत्त्याकांडाने पोर्तुगीजांचा क्रोध शमला नाही. त्यानी सतत दोन दिवस कालिकत शहरावर तोफांचा भडिमार करून अनेकांची घरे आणि संसार उध्वस्त करून टाकले.

पोर्तुगीजानी आपल्या भाईबदांच्या हत्त्याकांडाचा बदला घेतला. पण आता त्यांच्यावर वस्तुस्थितीचा विचार करण्याची पाळी आली. कालिकत बंदरात त्याना आता कुणी मित्र उरला नसल्याने त्याना जीवनोपयोगी वस्तु मिळणे मुष्किल झाले. त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. त्यांच्यावर उपासमारीची पाळी आली. परंतु ह्या कठीण परिस्थितीतून त्यांची अखेर मुक्तता झाली. कोचिनचा राजा हा सामुरीचा शत्रू असल्याचे त्याना कुणाकडून तरी कळले. काब्रालने विलंब न लावता कोचिनच्या राजाशी संपर्क साधून त्याच्याशी मैत्रीची बोलणी सुरू केली.

पोर्तुगीजांचे आणि सामुरीचे वितुष्ट आल्याचे कळताच कोचिनचा राजा पोर्तुगीजांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्यास त्वरीत तयार झाला. त्याने पोर्तुगीज लोकाना आपल्या बंदरात येऊन राहाण्यास परवानगी दिली. नंतर उभय पक्षांमध्ये एक व्यापारी करार झाला.

कोचिनचा राजा आणि काब्राल या दोघांमध्ये जो मैत्रीचा करार झाला तो हिंदुस्थानच्या भवितव्याच्या दृष्टीने अत्यंत घातक ठरला. त्या कराराचे अनिष्ट परिणाम या देशाला भोगावे लागले. कोचिनच्या राजाने पोर्तुगीजाना आपल्या राज्यात थारा दिला नसता, तर त्याना हिंदुस्थानमधून कायमचे तोंड काळे करावे लागले असते. परंतु जे काय घडायचे असते ते घडल्यावाचून राहात नाही हेच खरे.

काब्रालने आपल्या नौका कोचिन बंदराकडे हाकारताच राजा सामुरीने दि. ९ जानेवारी १५०१ या दिवशी आपले आरमार त्याच्या पाठलागास रवाना केले. त्यात ८० ते ८५ नौकाचा अंतर्भाव झालेला होता. परंतु त्या आरमाराची व पोर्तुगीज नौकांची गाठ पडण्यापूर्वीच काब्रालने घाईघाईने कोचिन बंदरात माल भरून पोर्तुगालला कूच केले होते.

अनुक्रमणिका

# २. पोर्तुगीज गोवा घेतात

व्हाश्कु ह गामा आणि त्याचे सोबती यांचा समज झाला होता की, हिंदुस्थानातील बिगर मुसलमान लोकांचा ख्रिश्चन धर्म युरोपियन ख्रिश्चनाच्या धर्माहून वेगळा असला पाहिजे. तसे असल्यास त्याना युरोपियन ख्रिश्चन धर्माचे शिक्षण देणे अगत्याचे आहे, असे त्याने वाटले होते व हिंदुस्थानच्या सफरीहून पोर्तुगालला परतल्यावर राजा दों मानुएल व त्यांच्या दरबारातील लोक यांच्या मनावर त्यानी तसे बिंबविले होते. परंतु पेद्रु आल्व्हारिश काब्राल आणि त्याचे सहकारी हिंदुस्थानच्या दुसऱ्या सफरीवरून परतले, तेव्हा त्यानी राजा दों मानुएल याला अहवाल सादर केला, की हिंदुस्थानातील बहुसंख्य बिगर मुसलमान लोक हे ख्रिश्चन नसून मूर्तिपूजक (Pagaos) आहेत. काब्रालचा हा वृत्तांत राजा दों मानुएल व त्याचे सरदार मानकरी याना खरा वाटला व त्यामुळे त्यांच्या पूर्वीच्या धोरणात बदल झाला. हिंदुस्थानचे बहुसंख्य रहिवाशी जर मूर्तिपूजक असतील, तर त्याना ख्रिश्चन धर्मात आणण्याचे प्रयत्न केले पाहिजेत, असे त्याना वाटले.

अरब व्यापाऱ्यांच्या हाती असलेला मसाल्याचा व्यापार हिसकावून घेतला पाहिजे, असे पोर्तुगीजाना फार दिवसांपासून वाटत होते. त्या धोरणास अनुसरून राजा दों मानुएल याने हिंदुस्थानला तिसरे आरमार पाठविण्याची तयारी करण्याचे फर्मान काढले. या मोहिमेचे नेतृत्व काब्रालच्या हाती सुपूर्त करण्याचा त्याचा मनोदय होता. परंतु तो बदलून त्याने त्या मोहिमेवर व्हाश्कु द गामा याला पुनः पाठविण्याचे ठरविले. तिसऱ्या मोहिमेची सर्व तयारी झाल्यावर व्हाश्कु द गामाने आपल्या आरमारी तांड्यासह पोर्तुगाल सोडले. दि. २९ ऑक्टोबर १५०१ या दिवशी तो कालिकतला येऊन दाखल झाला. वाटेत त्याने मक्केची यात्रा करून हिंदुस्थानला परतणाऱ्या मुसलमान यात्रेकरूंचा भयंकर छळ केल्याने क्रुरकर्मा म्हणून त्याचे इतिहासात नाव झाले. त्याच्याबरोबरच पोर्तुगीज नावाडी हे जंगली म्हणून हिंदुस्थानात ते ओळखले जाऊ लागले.

व्हाश्कु द गामाचे कालिकातला आगमन झाले, तेव्हा राजा सामुरी व कोचिनचा राजा या दोघांमध्ये युद्ध चालू होते. सामुरीच्या सैन्याच्या दडपणामुळे कोचिनच्या राजाचे सैन्य मागे हटत होते. अशावेळी व्हाश्कु द गामाचे मलबारला आगमन झाले. कोचिनच्या राजाला देव पावल्यासारखे वाटले. कारण, पोर्तुगीजांचा आणि त्याचा मैत्रीचा करार झाला असल्याने, त्या करारानुसार त्याला मदत करण्यास पोर्तुगीज बद्धपरिकर होते. व्हाश्कु द गामाने कोचिनच्या राजाच्या हाकेस ओ देऊन राजा सामुरीवर हत्यार उपसले. त्याने कालिकत शहरावर तोफांचा भडिमार करून शेकडो लोकांची निर्घृण हत्त्या केली. अनेक लोकांचे संसार त्या हल्ल्यात उजाड झाले. परंतु त्याने हा हल्ला मैत्रीच्या करारास अनुसरून निरपेक्ष बुद्धीने केला नाही. त्यामागे त्याचा स्वार्थ दडलेला होता. त्याला मलबार किनाऱ्याला पाय रोवण्यास हक्काची जागा हवी होती. ती त्याने तलवारीच्या बळावर मिळविली. कोचिनच्या राजास त्याने कोचिन आणि कन्नानोर येथे वखारी उघडण्यास जागा देण्यास भाग पाडले. परंतु तेवढ्याने त्याचे समाधान झाले नाही. कोचिनचा राजा आपला मांडलिक आहे असे समजून तो आणि त्याचे सोबती कोचिनमध्ये मन मानेल तसे वागू लागले. त्या राज्यातील सर्व कायदेकानून त्यानी धाब्यावर बसविले. फार कशाला! कोचिनच्या राजाची परवानगी न घेता त्यानी दोन्ही वखारीभोवताली तटबंदी उभारली. बिचारा कोचिनचा राजा! हजारो मैलांवरून आलेल्या त्या मूठभर लोकांची मुजोरी त्याला निमुटपणे सहन करावी लागली. चूड पेटवून राजरोसपणे भूत घरात आणल्याचा त्याला पश्चाताप झाला.

कान्नानोर आणि कोचिन या दोन ठिकाणी व्यापारी वखारी उघडून कोचीनच्या राज्याकडून व्यापारी सवलती संपादून व्हाश्कु द गामा पोर्तुगालला परतला.

व्हाश्कु द गामानंतर हिंदुस्थानच्या चौथ्या सफरीवर जाण्याचा मान आफाँस द आल्बुकेर्क (Afonso de Albuquerque) याला मिळाला. दि. ६ एप्रिल १५०४ या दिवशी त्याने पोर्तुगाल सोडले. तो मलबारला येऊन दाखल झाला तेव्हा कोचिनचा राजा आणि सामुरी या दोघांमधले युद्ध चालूच होते. ते स्वतःच्या हिंमतीवर खेळून सामुरीचा पराभव करण्याचा आत्मविश्वास कोचीनच्या राजास वाटत नसल्याने मागच्या प्रमाणे या वेळीही त्याने पोर्तुगीजांची मदत मागितली. आल्बुकेर्कलाही तेच हवे होते. पडत्या फळाची आज्ञा घेऊन तो या युद्धात पडला व त्याने कोचिनच्या राजास सामुरी विरूद्ध विजय मिळवून दिला. पराभूत सामुरीला कोचिनच्या राजाशी तह करणे भाग पडले. बुडत्याचा पाय खोलात या म्हणीप्रमाणे कोचिनच्या राजाला त्याच्या इच्छेविरूद्ध पोर्तुगीजांच्या आहारी जावे लागले. आल्बुकेर्क त्याच्या असाह्यतेचा फायदा उपटल्याखेरीज राहिला नाही. त्याने कोचिनच्या बंदरात आपणास हवा तो माल आपल्या जहाजांवर भरला व विजयी वीराप्रमाणे तो पोर्तुगाला परतला. त्याने 'दुआर्त पाशेकु' या नावाच्या आपल्या दुय्यमास काही खलाशी मदतीला देऊन वखारींच्या रक्षणासाठी मागे ठेवले. परंतु हा मनुष्य थोडासा समंजस होता. कोचिनच्या राजाच्या मर्जीप्रमाणे वागून त्याने त्याचा अनुग्रह संपादन केला. पोर्तुगीज लोक मलबारच्या किनाऱ्यावर प्रतिकूल परिस्थितीत चिकाटीने राहिल्याने त्यांच्या प्रयत्नांचे फळ त्याना मिळाले. ते तेथे स्थिर झाले, इतकेच नव्हे, तर मसाल्याचा व्यापार काबीज करण्यातही ते यशस्वी झाले, त्यामुळे पोर्तुगालच्या राजास हिंदुस्थानला हक्काने आरमारे पाठविता येऊ लागली. आफाँस द आल्बुकेर्क पोर्तुगालला परतल्यावर, पोर्तुगालच्या राजाने दों फ्रान्सिश्कु द आल्मैद या नावाच्या उमरावास हिंदुस्थानचा 'व्हिसेरेइ' अथवा व्हाइसरॉय म्हणून पाठविले. त्याच्या अधिकारपदाची मुदत तीन वर्षांची होती.

पोर्तुगालच्या राजाने तोपर्यंत जे दर्यासारंग हिंदुस्थानला पाठविले ते सर्व सामान्य कुळांतले होते. परंतु दों फ्रान्सिश्कु द अल्मैद हा उमराव घराण्यातला होता. तो वयाने पंचेचाळीस वर्षांचा होता. तो उमराव घराण्यातला होता म्हणूनच पोर्तुगालच्या राजाला त्याला व्हिसेरेइ हा किताब बहाल करणे भाग पडले होते. सामान्य कुळातील लोकांना तो किताब मिळत नव्हता. आल्मैदाला पोर्तुगालच्या राजाने जे काम सांगितले त्यात कोचिन आणि कान्नानोर येथील वखारींचा कारभार पाहाणे, किल्वा आणि आंजेदिव बेटावर किल्ले उभारणे आणि किल्वा व कान्नोनोर येथील वखारींच्या तटबंदींचे रुपांतर किल्ल्यांमध्ये करणे यांचा अंतर्भाव होत होता.

आल्मैदाने राजाची आज्ञा अमलांत आणली. परंतु हिंदुस्थानच्या मार्गावर असता वाटेत त्याने आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील अनेक शहरांची लुटालूट आणि जाळपोळ केली. त्याने आंजेदिव बेटावर किल्ला बांधला परंतु पोर्तुगीजाना त्याचा उपयोग होत नव्हता म्हणून सात वर्षानी त्यानी तो किल्ला पाडून जमीनदोस्त केला.

आल्मैदाचा मुक्काम आंजेदिव बेटावर असता विजयनगरचा सम्राट वीर नरसिंह यांच्या होनावर येथील सुभेदाराचा आणि त्याचा संघर्ष उडाला. परंतु विजयनगरचा दर्यासारंग थिमय्या याने मध्यस्थी करून त्या दोघांमध्ये समेट घडवून आणला. या मध्यस्थीमुळे पोर्तुगीजांचा आणि थिमय्याचा जो स्नेह जुळला तो शेवटपर्यंत टिकला. आणि पोर्तुगीजांनी गोवे घेतले त्याला थिमय्याच कारणीभूत ठरला.

अनुक्रमणिका

फ्रान्सिश्कु द अल्मैदा हा कट्टर मुसलमान विरोधक होता. त्याला मुसलमान लोक डोळ्यांसमोर देखील नको असत. त्याच्या ह्या मुसलमान विरोधामुळे मुसलमानाचा आणि पोर्तुगीजाचा वारंवार संघर्ष उडू लागला. इ. स. १५०६ सालच्या मार्च महिन्यात पोर्तुगीज आरमाराची आणि मुसलमान व्यापाऱ्यांच्या नौकांची गांठ पडून घनघोर आरमारी लढाई झाली. राजा सामुरी हा मुसलमानाचा मित्र असल्याने त्याने आपल्या काही युद्धनौका मुसलमान आरमाराच्या मदतीस पाठविल्या. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. पोर्तुगीज आरमाराने मुसलमान आरमाराचा धुव्वा उडविला. सुप्रसिद्ध इटालियन प्रवासी 'वार्तेमा' (Varthema) याने या आरमारी लढाईचा वृत्तांत मागे ठेवला आहे. तो पोर्तुगीजांच्या बाजूने या लढाईत मुसलमानांशी लढला होता.

उपर्युक्त पराभवाचा सूड उगविण्यासाठी कान्नानूरच्या राजाने तेथील पोर्तुगीज ठाण्यास वेढा घातला. त्याला राजा सामुरीने सैन्य धाडून मदत केली. पोर्तुगीजाना बाहेरून अन्नधान्याची बेगमी न मिळाल्याने त्यांची भयंकर उपासमार झाली. तरीही त्यानी शरणागती पत्करली नाही. अखेर पोर्तुगालहून आरमार आल्यावर त्यांची वेढ्यातून मुक्तता झाली. हे उदाहरण येथे देण्याचे कारण की, पोर्तुगीजानी उपासमार सहन करून देखील मोठ्या चिकाटीने आपली ठाणी लढविली.

पोर्तुगालहून जे आरमार व्हिसेरेइ दों फ्रान्सिश्कु द आल्मैद याच्या मदतीला आले, त्याचे नेतृत्व त्रिस्तांव द कुन्य (Tristao de Cunha) या नावाच्या दर्यासारंगाकडे होते. खरे तर हिंदुस्थानचा गव्हर्नर म्हणून त्याचीच अगोदर नेमणूक झाली होती. परंतु तो डोळ्यांच्या रोगाने आजारी पडल्याने त्याचे जागी दों फ्रान्सिश्कु द अल्मैद याला व्हिसेरेइ म्हणून पाठविण्यात आले होते. त्रिस्तांव द कुन्य याच्या दिमतीला आफाँस द आल्बुकेर्कला पाठविण्यात आले होते. त्याला हुकूम झाला होता की त्याने लाल समुद्रात 'सोकोत्रा' बेटावर जाऊन तेथे एक किल्ला बांधावा व तेथून नंतर ओर्मुजला जावे. त्या दरम्यान दों फ्रान्सिश्कु द आल्मैद याच्या अधिकारपदाची मुदत संपल्यावर त्याचे जागी आल्बुकेर्कने गव्हर्नर म्हणून काम करायचे होते. तो सामान्य कुळातील असल्याने व्हिसेरेइच्या किताबतीस अपात्र होता.

इकडे त्रिस्तांव द कुन्य याने कान्नानूर येथील वेढ्यात सापडलेल्या पोर्तुगीज शिबंदीची मुक्तता केल्यावर आपल्या जहाजांवर माल भरून दि. १० डिसेंबर १५०७ या दिवशी पोर्तुगालला प्रयाण केले.

पोर्तुगीज आरमाराचे हिंदी महासागरांत विशेषे करून मलबार किनाऱ्यावर बस्तान बसल्याने अरबांचा व्यापार बुडत चालला. ते वास्तविक चांगले दर्यावर्दी लोक होते. परंतु त्यांच्या युद्धनौका पोर्तुगीज युद्धनौकासारख्या बलाढ्य नसल्याने आरमारी लढाईत त्या टिकत नसत. अरबांचे दोस्तदेशी राजे यांच्या आरमाराचीही गत अरबाच्या आरमारासारखी होती. त्यामुळे पोर्तुगीजांचे फावल्याने त्याना हिंदी महासागरांत आपले प्राबल्य निर्माण करता आले. त्याचा अनिष्ट परिणाम इजिप्तच्या सुल्तानाला भोगावा लागला. हिंदुस्थानातील मसाल्याचा व्यापार अरब लोकांच्या हाती आल्याने या व्यापारावरील जकातीचे उत्पन्न इजिप्तच्या सुल्तानास मिळत असे. ते उत्पन्न कमी झाल्याने त्याची आर्थिक स्थिती खालावली. दुसरा प्रश्न राजकीय होता. हिंदी महासागरात पोर्तुगीजांचे वर्चस्व निर्माण झाल्याने इजिप्तच्या सार्वभौमत्वाला धोका पोहोचला होता. त्या सर्व परिस्थितीचा विचार करून इजिप्तचा सुल्तान 'कान्सुर एल घोरी' याने पोर्तुगीजांशी दोन हात करण्यासाठी हिंदुस्थानच्या समुद्रात एक बलाढ्य आरमार पाठविण्याची तयारी सुरू केली. त्याचे नेतृत्व इजिप्तचा दर्यासारंग अमीर हुसेन हा करीत होता. इ. स. १५०७ च्या ऑगष्ट महिन्यात हे आरमार एडन येथें येऊन दाखल झाले व तेथून ते दीवला रवाना होऊन दि. २० सप्टेंबर रोजी तेथे

पोहोचले. दीव त्यावेळी गुजरातच्या सुल्तानाच्या अमलाखाली असून मलिक आयाज हा त्याचा सुभेदार होता.

इ. स. १५०८ च्या जानेवारी महिन्यात व्हिसेरेइ दों फ्रान्सिकु द आल्मैद याचा मुलगा 'चौल'च्या बंदरात आपल्या आरमारी काफिल्यासह आला असता पोर्तुगीज आरमाराचा शोध करीत निघालेले इजिप्तचे आरमार तेथे येऊन दाखल झाले. तोपर्यंत हे आरमार हिंदुस्थानच्या समुद्रात आल्याची गंधवार्ताही पोर्तुगीजाना नव्हती. त्यामुळे दों फ्रान्सिश्कु द अल्मैद याचा मुलगा दों लौरेसु द आल्मैदा याची पुरतीच गाळण उडाली. तरीही त्याने पळ न काढता इजिप्तच्या आरमाराशी सामना देण्याचे ठरविले. इजिप्तचे आरमार प्रचंड होते, तर पोर्तुगीज नौका अवघ्या आठ होत्या. त्यांचा पडशा पाडण्यास इजिप्तच्या आरमाराला वेळ लागला नाही. या आरमारी लढाईत दों लौरेसु द आल्मैदा ठार झाला.

इजिप्तचे आरमार हिंदुस्थानच्या समुद्रात घुसले आहे व त्याने आपल्या मुलाचा पहिला बळी घेतला आहे, हे व्हिसेरेइ दों फ्रान्सिश्कु द आल्मैद याला कोचिन येथे कळताच तो आपल्या मुलाच्या मृत्यूचा सूड घेण्यासाठी त्वरीत इजिप्तच्या आरमाराच्या शोधार्थ निघाला. तत्पूर्वी आफाँस द आल्बुकेर्क हा लाल समुद्रातून आपल्या आरमारी काफिल्यासह कान्नानूर येथे दाखल झाला होता.

दों फ्रान्सिश्कु द आल्मैद हा आपल्या मुलाच्या मृत्यूच्या सूडाने इतका पेटून गेला होता की, इजिप्तच्या आरमारावर त्याने एकदम झडपच घातली. उभय आरमारांची लढाई दीव येथे होऊन इजिप्तच्या प्रचंड आरमाराची तीत पुरती वाताहात झाली. इजिप्तच्या आरमाराच्या ह्या पराभवामुळे हिंदी महासागरात पोर्तुगीज आरमाराला आव्हान देऊ शकणारी अन्य सागरी सत्ता त्या भागात उरली नाही.

इजिप्तच्या आरमाराचा पराभव करून दों फ्रान्सिश्कु द आल्मैद इ. स. १५०९ च्या मार्च महिन्यात कोचीनला परतला. त्याच्या अधिकारपदाची मुदत संपुष्टात आली असल्याने त्याला आपली सुत्रे आफाँस द आल्बुकेर्क याच्या हाती सुपुर्त करून मायदेशास परतायचे होते. परंतु इजितच्या आरमारावर विजय मिळविल्याने त्याला गर्व चढला होता. त्याला सत्ता सोडायची नव्हती. ते जेव्हा पोर्तुगालला कळले तेव्हा त्याला त्याचे अधिकारपद आल्बुकेर्कच्या हाती सुपुर्द करून त्वरीत माघारा परतण्याचा हुकूम झाला. त्या हुकमाप्रमाणे त्याने आपले पद खाली करून पोर्तुगालला प्रयाण केले.

आल्बुकेर्कला गव्हर्नरपद मिळाले तेव्हा त्याचे वय ५९ वर्षांचे होते. तो जसा शूर होता तसाच अत्यंत शिस्त प्रियही होता. व्हिसेरेइ दों फ्रान्सिश्कु द आल्मैद याच्या कारकीर्दीत राज्यकारभारात सावळा गोंधळ माजून सैन्यात बेशिस्त बोकाळली होती. आल्बुकेर्कला ते सर्व निपटून काढावे लागले. ते काम करताना त्याला राज्यकारभातील आणि सैन्यातील खानदानी (Fidalgo) घराण्यातील अधिकाऱ्यांचा विरोध झाल्यावाचून राहिला नाही. परंतु त्याने त्याची परवा केली नाही. अखेर सर्व गोष्टींची घडी नीट बसवून लाल समुद्रातील पोर्तुगीज ठाण्याचा बंदोबस्त करण्यासाठी इ. स. १५१० च्या जानेवारी महिन्यात त्याने ओर्मुजकडे प्रयाण केले.

आफाँस द आल्बुकेर्कचा मुक्काम सोकोत्रा बेटावर असता विजयनगरचा दर्यासारंग थिमय्या अथवा तिमोजा हा त्याला तिकडे भेटावयास गेला. विजापूरच्या आदिलशाही अमलाखाली असलेल्या गोव्याची मुक्तता करण्यासाठी पोर्तुगीजांची मदत मिळविण्यासाठी म्हणून थिमय्याने ही लांबची सफर केली होती.

गोव्यावर पूर्वी विजयनगरची सत्ता होती. परंतु नंतर ते अहमदनगर येथील निजामशाही अमलाखाली जाऊन निजामशाहीची शकले झाल्यावर विजापूरच्या आदिलशाहाने त्याच्यावर ताबा मिळविला होता. विजापूरचा सुल्तान युसुफ आदिलशाहा चाळीस वर्षे राज्य केल्यावर नुकताच मरण पावला होता. त्याच्यानंतर विजापूरच्या गादीवर आलेला सुल्तान इस्माइल आदिलशाहा हा व्यसनी आणि मतिमंद निघाल्याने राज्यकारभार ढिला पडला होता. ती संधि साधून मोक्याचे ठिकाणी असलेले गोवे आणखी कुणीतरी घेईल म्हणून महत्वाकांक्षी थिमय्या ते पोर्तुगीजांच्या मदतीने घेऊ पहात होता. पण त्या मागेही त्याचा स्वार्थी हेतू होता. गोवे त्याला विजयनगरला जोडायचे नव्हते, तर तेथे त्याला स्वतःचे स्वतंत्र राज्य स्थापायचे होते.

इ. स. १५०५ साली थिमय्या आणि दों फ्रान्सिश्कु द आल्मैदा या दोघांची होनावर येथे भेट झाली, तेव्हा त्यानी अरबी समुद्रातून मुसलमानाची हकालपट्टी करण्याच्या एका योजनेवर खल केला होता. परंतु आल्मैदा आपल्या कारकीर्दीची मुदत संपल्यावर पोर्तुगालला परतल्याने उपर्युक्त योजना गुलदस्तात पडली होती. तिची कार्यवाही करून गोव्याची मुक्तता करावी यास्तव थिमय्या आफाँस द आल्बुकेर्क याच्या भेटीस लाल समुद्रात गेला होता. असे सांगतात की, थिमय्याच्या गोवा मुक्तीच्या योजनेला गोव्यातील हिंदु पुढाऱ्यांचाही पाठिंबा होता. मुसलमानी अमलाखाली गोव्यांतील हिंदूंचा भयंकर छळ झाला होता. विशेषतः हिंदू स्त्रिया आणि मुसलमान पुरुष यांच्या संकरापासून निर्माण झालेल्या ‘नायटे’ या नावाच्या मुसलमानाचा उपद्रव हिंदूना पुष्कळच होत होता.

नायटे हे लोक चांगले दर्यावर्दी होते. मुसलमानी राजवटीत ते चाचेगिरीवर उपजीविका करीत असत. कारवारच्या किनाऱ्यावरील होनावर आणि भटकळ ही दोन्ही बंदरे त्यांची आश्रयस्थाने होती. तेथून विजयनगरच्या व्यापारी जहाजांवर हल्ले करून ती ते लुटीत. या हल्ल्यांमुळे विजयनगरच्या व्यापाऱ्यांची पुष्कळच नुकसानी होऊ लागली. विशेषतः अरबस्थानातून विजयनगरच्या बंदरात येणाऱ्या घोड्यांच्या आयातीवर नायट्यांच्या हल्ल्यांचा प्रतिकूल परिणाम होऊ लागला. या हल्ल्याना आळा घालण्यासाठी विजयनगरचा सम्राट कृष्णदेव राय याने त्यांच्या विरुद्ध मोहीम सुरू केली. विजयनगरच्या नौदलाने भटकळ आणि होनावर बंदरातून नायट्यांची हकालपट्टी केली. परंतु गोवे आदिलशाही अमलाखाली असल्याने बरेचसे नायटे इकडे येऊन विजयनगरच्या नौकाना उपद्रव देऊ लागले. त्यांचा नायनाट करणे हाही गोवा घेण्यामागील थिमय्याचा हेतू होता.

थिमय्या आणि आल्बुकेर्क या दोघांची मुलाखत सोकोत्रा बेटावर झाली. आपली योजना थिमय्याने आल्बुकेर्कला सादर केली. या बैठकीला आल्बुकेर्कचा चिटणीस ‘गाश्पार कुरैया’ हा उपस्थित असल्याने त्याने लिहून ठेवलेला या बैठकीचा वृत्तांत नंतर उपलब्ध झाला. त्यांत आल्बुकेर्क व थिमय्या यांच्यामधील संवाद टिपण्यात आलेला आहे. थिमय्याने आल्बुकेर्कला विदित केले की, गोव्यांतील हिंदूचा व तेथील व्यापाऱ्यांचा मुसलमानाकडून छळ होत असल्याने त्यानी आपणाला गोव्याची मुक्तता घडवून आणण्याची विनंती केली आहे.

आल्बुकेर्कने थिमय्याचे म्हणणे ऐकून घेतले व गोव्याची मुक्तता घडवून आणण्याचे त्याला वचन दिले. तो त्याला असेही म्हणाला की, गोवा घेतल्यावर त्याचा कारभारी म्हणून तुमची नेमणूक केली जाईल. पण त्या मुलाखतींच्या वेळीच त्याच्या डोक्यात वेगळेच विचार सुरू झाले होते. पोर्तुगीज लोकांचे तोपर्यंत कुठेच बस्तान बसले नव्हते. आपल्या पूर्वेकडील साम्राज्यासाठी त्याना कुठेतरी एक कायम

स्वरुपाची राजधानी स्थापन करायची होती. आल्बुकेर्कने गोवे बघितले नव्हते. परंतु थिमय्याने त्याचे जे वर्णन बैठकीत केले, त्यावरून ते राजधानी स्थापन करण्यास योग्य आहे असे त्याला वाटले. परंतु आल्बुकेर्कच्या डोक्यात सुरू असलेल्या विचारचक्राची थिमय्याला पुसटही कल्पना झाली नाही. तो धरून चालत होता की, आगापिच्छा नसलेल्या पोर्तुगीज लोकाना गोव्याचे महत्त्व मुळीच कळणार नाही. तो मनात मांडे रचित होता की, आल्बुकेर्कने गोवे घेतले की ते आपण त्याच्याकडून खंडणी भरण्याच्या अटीवर घ्यायचे.

गोवा घेण्याचा आल्बुकेर्कचा बेत कायम झाला. त्याने आपल्या आरमारी अधिकाऱ्याना तळ मोडून नौका कोचीनच्या दिशेने हाकारण्याचा हुकूम केला. तिकडे पोहोचल्यावर आणखी युद्धनौका आणि लष्कर घेऊन गोव्याकडे प्रयाण करण्याचा त्याचा बेत होता. तदनुसार त्याने कोचीनला पोहोचल्यावर युद्धसामग्री, नौका आणि लष्कराची कुमक घेऊनच गोव्याकडे कुच केले.

दि. २८ फेंब्रुवारी १५१० या दिवशी पोर्तुगीज आरमार गोवा बेटाच्या सामुद्रधुनीत उगवले, तेव्हा स्थानिक रहिवाशी आणि विजापूरची तिथली शिबंदी ते परकी आरमार पाहून पुरतीच स्तिमित झाली. विशेषतः विजापूरच्या शिबंदीची तर पुरतीच गाळण झाली. कारण, परचक्राची भीती नसल्याने विजापूरच्या सुल्तानाने गोवा बेटावर सैन्य विशेष ठेवले नव्हते. सुभेदार युसुफ गुर्गी याच्या हाताखाली अवघे २०० सैनिक होते. त्या मूठभर सैन्यासह तो शत्रूशी मुकाबला करू शकत नव्हता.

आल्बुकेर्कने गोवा बेटांत सैन्य उतरविले. सुभेदार युसुफ गुर्गी पळून गेला. पण त्याच्या हाताखालच्या सैन्याने मात्र शत्रूचा नेटाने प्रतिकार केला. परंतु आल्बुकेर्कच्या ताज्या दमाच्या पोर्तुगीज शिपायांसमोर त्याचा निभाव न लागल्याने त्याने अखेर शरणागती पत्करली.

गोवा बेटांतील हिंदू पुढाऱ्यांच्या संमतीनेच थिमय्याने पोर्तुगीजाना गोवा घेण्यास प्रवृत्त केले असल्याने त्यानी पोर्तुगीज सैनिकांचे चांगले स्वागत केले. हिंदु पुढाऱ्यानी आल्बुकेर्कच्या सामोरा जाऊन गोवा शहराची किल्ली त्याच्या हवाली करून त्याचे अभय मागितले. त्याने त्याना अभय देऊन सांगितले की, तुम्हाला आता कुणीच त्रास देणार नाही. मात्र तुम्ही विजापूरच्या बादशहास जो कर भरत होता तो मात्र नियमितपणे पोर्तुगीजाना भरा आणि कायद्याचे पालन करा.

आल्बुकेर्कच्या हातास मोठी लूट लागली. हत्ती, घोडे, धान्याची कोठारे वगैरे. गोवा बंदरात सोळा परकी नौका नांगर टाकून होत्या. त्याही त्याने जप्त केल्या. नंतर वचन दिल्याप्रमाणे गोव्याच्या ठाणेदार म्हणून त्याने थिमय्याची नेमणूक केली.

दोन महिने निघून गेले. आल्बुकेर्कने गोवा बेटांत पोर्तुगीज राजवट बसविण्यास प्रारंभ केला. अकस्मात एके दिवशी बातमी आली की, विजापूरचे सैन्य गोवा बेटाच्या दिशेने दौडत येत आहे. ही बातमी गोवा शहरात पसरताच मुसलमान नागरिकाना चेव आला. त्यातच एका काझीला आल्बुकेर्कने देहान्त प्रायश्चित दिल्याने ते बिथरले होते. काझीचा गुन्हा काय तर तो आपल्या धर्मबांधवाना ख्रिश्चन धर्माची दीक्षा घेऊ नका असा उपदेश करीत होता. ते आल्बुकेर्कच्या कानी गेल्याने त्याचे पित्त खवळून त्याने काझीस देहान्त प्रायश्चित्ताची सजा दिली होती.

अनुक्रमणिका

विजापूरचे सैन्य गोवा बेटाच्या हद्दीवर येताच गोवा शहरातील मुसलमानानी पोर्तुगीजांविरुद्ध बंड पुकारले. त्यांचा बंदोबस्त करावा की आदिलशहाच्या सैन्यास थोपून धरावे हे पोर्तुगीज सेनाधिकाऱ्याना कळेना. त्यांची पुरतीच त्रेधातिरपीट उडाली. त्या दरम्यान विजापूरच्या सैन्याचा लोंढा गोवा शहरात घुसला होता, पोर्तुगीज सैनिकानी त्या सैन्याचा प्रतिकार न करता जीव बचावण्यासाठी बंदरात नांगरून टाकलेल्या आपल्या नौका गाठल्या. मात्र जाता जाता त्यानी काही श्रीमंत मुसलमानाना व त्यांच्या स्त्रियाना आणि मुलाना पकडून आपणाबरोबर नेले. काही मुसलमानाना त्यानी कंठस्नानही घातले.

गोव्याच्या खाडीतून नौका सुरक्षितपणे बाहेर काढण्यास आल्बुकेर्कला फार सायास पडले. आदिलशहाचे आरमार पोर्तुगीज नौकांच्या पाठलागास निघाले होते. एक मोठी नौका नदीच्या मुखात टाकून पोर्तुगीज नावाडी पळ काढण्याची तयारी करीत होते. परंतु आल्बुकेर्कने ती नौका महत्प्रयासाने नदी बाहेर काढली. तरीही विजापूरच्या सैन्याशी झालेल्या हातघाईच्या लढाईत त्याचा दों आंतोनियु द नोरोन्य या नावाचा भाचा प्राणांतिक जखमी झाला. ती हानी फार मोठी होती. कारण हा शांत स्वभावाचा तरूण सर्वसामान्य पोर्तुगीज सैनिकांमध्ये अत्यंत लोकप्रिय होता. ज्यावळी आफाँस द आल्बुकेर्क आणि त्यांचे तापट स्वभावाचे अधिकारी यांच्यामध्ये शाब्दिक चकमक उडे, तेव्हा दों आंतोनियु द नोरोन्य मध्ये पडून आफाँस द आल्बुकेर्क व त्यांचे अधिकारी यांना शांत करण्याचे काम उत्कृष्टपणे पार पाडी. तरीही एका कारणावरून आल्बुकेर्कचे खलाशी बंडास प्रवृत्त झाले. त्याचे असे झाले : आल्बुकेर्कने गोवा बेटातून माघार घेतली तेव्हा त्याने पकडून ओलीस ठेवलेल्या सुंदर मुसलमान स्त्रियांवर त्याच्या सहकाऱ्यांची वाकडी नजर वळली. त्यांच्यापैकी दोघानी एके रात्री अंधाराची संधि साधून त्यांचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला. आल्बुकेर्कला जेव्हा हे कळले, तेव्हा त्याने त्या दोघा अधिकाऱ्याना कडक शिक्षा केली. त्यामुळे पोर्तुगीज नावाडी बंडास प्रवृत्त झाले. परंतु ते बंड मोडून काढण्यात आल्बुकेर्क यशस्वी झाला.

विजापूरच्या सैन्याने पोर्तुगीजाना गोवा बेटातून हाकलून लावून आदिलशहाची राजवट तेथे फिरून प्रस्थापित केली. परंतु हा पराभव सहन करून गप्प बसण्यास आल्बुकेर्क तयार नव्हता. गोवा बेट फिरून काबीज केल्याखेरीज आपल्या राजास तोंड दाखविण्याची त्याची तयारी नव्हती. म्हणून कान्नानोरला परतल्यावर गोव्यावर फेर हल्ला करण्याची जोरदार तयारी त्याने केली.

दि. ३ अक्टोबर १५१० रोजी आल्बुकेर्क २८ नौका आणि १७०० सैनिक घेऊन गोवा फिरून घेण्याच्या मोहिमेवर कान्नानोरहून निघाला. होनावर येथे त्याने थोडा मुक्काम केला. कारण त्याचा सहकारी थिमय्या हा त्याची होनावर बंदरात मार्गप्रतीक्षा करीत राहिला होता.

एके दिवशी आल्बुकेर्क थिमय्याने त्याच्यासाठी आयोजित केलेल्या मेजवानीस आपल्या काही सहकाऱ्यांसह उपस्थित राहिला असता, समुद्रात अकस्मात वादळाचा प्रादुर्भाव झाला. सतत तीन दिवसपर्यंत आल्बुकेर्क आणि त्याचे सहकारी होनावर बंदरात अडकून पडले. आपल्या आरमारास आपण मुकतो की काय अशी भीती त्याना वाटली. परंतु ते प्राणावर आलेले संकट बोटावर निभावले. वादळात दोन नौका आणि तीस माणसे बुडाली. त्यात आल्बुकेर्कचा एक चिटणीस होता.

आदिलशहा रायचूरच्या दो आबांत विजयनगरच्या सैन्याशी युद्धांत गुंतला होता. तरीही त्याने गोव्याच्या रक्षणाची कडेकोट तयारी केली होती. ८००० सैन्य डोळ्यांत तेल घालून जागता पहारा करीत होते. समुद्र किनाऱ्यावर आणि खाडीत ज्या ठिकाणी सैन्य उतरविता येणे शक्य होते तेथे भरभक्कम तटबंध्या

उभारून तोफा आणि बंदुकधारी सैन्य ठेवण्यात आले होते. फक्त गोदीच्या बाजूने तेवढी तटबंदी बळकट नव्हती. कारण त्या बाजूने हल्ला होईल असे लष्करी तज्ञाना वाटले नव्हते. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे आल्बुकेर्कने तीच कमकुवत फळी हेरून हल्ल्यासाठी तेथे सैन्य उतरविले.

दि. २५ नवंबर १५१० या दिवशी लढाईस तोंड फुटले. आदिलशाही सैन्याने पोर्तुगीज आक्रमकांचा कसून प्रतिकार केला. परंतु पोर्तुगीज नौसैनिकानी तो प्रतिकार मोडून काढून गोवा बेटात प्रवेश केला. तरीही आदिलशाही सैन्य लढतच होते. सतत तीन दिवसपर्यंत शहरात रणधुमाळी चालली, अखेर हातघाईच्या लढाईत आदिलशाही सैन्याचा पोर्तुगीज सौनिकांसमोर निभाव लागला नाही. त्याला शरणागती पत्करावी लागली. तीन दिवसपर्यंत अहोरात्र युद्ध चालू राहिल्याने शहरात प्रेतांचा खच आणि रक्ताचा सडा पडला होता. आल्बुकेर्कने हिंदू नागरिकांच्या वाटेस न जाण्याची ताकीद आपल्या सैनिकाना दिली होती. त्यानी त्या आज्ञेचे कसोशीने पालन केले. मात्र मुसलमानांची त्यानी गय केली नाही. त्यानी त्यांची भयंकर कत्तल केली. एका पत्रात आल्बुकेर्कने स्वतःच कबूल केले आहे की. ६००० मुसलमान त्या तीन दिवसात ठार झाले. पोर्तुगीजांकडील अवघे ४० ठार आणि २०० जखमी झाले.

गोवा घेतल्यावर सुमारे एक आठवड्याच्या आत आल्बुकेर्कने गोवा बेटात शांतता प्रस्तापित केली. तो जसा शूर होता, तसाच धोरणीही होता, त्याला पुरेसे माहीत होते की, गोवा बेटांतील रहिवाश्यांचे प्रेम संपादन केल्याखेरीज आपणाला सुखाने राज्य करता येणार नाही. म्हणून त्याने द्वाही फिरवून जाहीर केले की, सर्व लोकाना धार्मिक स्वातंत्र्य राहील. मात्र हिंदुमधील सतीची चाल त्याने त्वरीत बंद केली. तेवढी एक गोष्ट वगळता हिंदूच्या धार्मिक चालीरीतीत त्याने ढवळाढवळ केली नाही. त्याने गोव्यातील ग्राम संस्थाही चालू ठेवल्या (त्या अजून टिकून आहेत).

तसे पाहिले तर ‘रुमी’ लोकांचा उपद्रव वगळता गोव्यातील हिंदू चालीरीती आदिलशाही राजवटीत सुरक्षित होत्या. तरीही हिंदू लोकानी नव्या पोर्तुगीज सत्ताधाऱ्यांचे चांगले स्वागत केले. परंतु पोर्तुगीजानी अजून आपले खायचे दांत बाहेर काढले नव्हते. पोर्तुगीजानी जेव्हा आपले अस्सल रूप धारण केले, तेव्हा गोव्यातील हिंदूची आगीतून फोफाट्यांत सापडल्यासारखी गत झाली.

आल्बुकेर्कने हिंदूना धार्मिक स्वातंत्र्य दिले होते. परंतु लवकरच त्याने तिसवाडीतील सप्त कोटीश्वराचे मंदिर पाडून त्याचे जागी एक चर्च बांधिले. त्याचबरोबर त्याने स्थानिक स्त्रियांचे आपल्या सैनिकांशी सक्तीने विवाह लावून देण्यास प्रारंभ केला. तत्पूर्वी त्याने ओलीस ठेवलेल्या मुसलमान स्त्रियांचे व लढाईत ठार झालेल्या मुसलमान सैनिकांच्या विधवांचे विवाह आपल्या सैनिकांशी लावून दिले होते. जीत आणि जेते यांच्यामध्ये समन्वय साधण्याच्या ध्येयवादास अनुसरून त्याने हा उपक्रम सुरू केला होता. परंतु गोवा बेटातील हिंदूना तो मानवणे शक्य नव्हते. त्याना आपल्या भवितव्याची चिंता वाटू लागली. आदिलशाही राजवटीत गोव्यात गुलामांचा व्यापार चालू होता, असा पुरावा उपलब्ध नाही. परंतु पोर्तुगीजानी मात्र तो सुरू केल्याचा पुरावा आढळतो. तसेच गोवा बेटांतील श्रीमंत लोकांकडूनही त्यानी भरमसाट कर वसूल करण्यास प्रारंभ केला.

गोवा घेतल्यावर आल्बुकेर्कने आपल्या राजास खुष करण्यासाठी तीन लक्ष रुपये त्याच्या भांडाराकडे पाठवून दिले.

अनुक्रमणिका

# ३. पोर्तुगीजांचे आणखी प्रसरण

गोव्याचा सुभेदार म्हणून थिमय्याची नेमणूक करण्याचे वचन आल्बुकेर्कने त्याला आधीच दिले होते. त्या वचनास तो जागला. त्याने थिमय्याची गोव्याचा सुभेदार म्हणून नेमणूक केली. तत्पूर्वी थिमय्याचा महादेवराव या नावाचा एक सरदार तीन हजार सैन्यासह पोर्तुगीजाना येऊन मिळाला होता. तो पोर्तुगीजांबरोबर आदिलशाही सैन्याशी लढला होता व मुसलमानांच्या हत्याकांडातही तो सामील झाला होता. थिमय्याने त्याला उदात्त हिंदू परंपरेला काळीमा फासणाऱ्या ह्या अघोरी कृत्यापासून परावृत्त केले नाही म्हणून गोवा बेटातील हिंदू लोकांच्या तिरस्करास तो पात्र ठरला. हिंदूच्या ह्या भावनेची धूर्त आल्बुकेर्कला कल्पना झाल्याने त्याने थिमय्याची गोव्याच्या ठाणेदारपदावरून त्वरीत उचलबांगडी करून त्याचे जागी होनावरच्या राजाचा भाचा मल्हारराव याची ठाणेदार म्हणून नेमणूक केली.

ज्युआंव द बाररुश (Juao de Barros) हा पोर्तुगीज इतिहासकार म्हणतो की, थिमय्याची जात कनिष्ठ असल्याने त्याच्या अमलाखाली राहण्यास गोव्यातील हिंदू नाखुष असल्याचे पाहून आल्बुकेर्कने त्याची ठाणेदार पदावरून उचलबांगडी केली.

मल्हारराव ठाणेदार म्हणून गोव्यात फार दिवस राहू शकला नाही. तो गोव्यात असताना त्याचा मावळा होनावरचा राजा मरण पावल्याने त्याला त्वरीत तिकडे जावे लागले. होनावर राज्यातील वारसा हक्कानुसार राजा निपुत्रिक मरण पावला तर त्याचा भाचा सिंहासनावर येत होता. या प्रथेस अनुसरून होनावरचे राजसिंहासन मल्हाररावास प्राप्त झाले. मल्हारराव निघून गेल्यावर थिमय्याला गोव्यात कुणी विचारीनासा झाला. ते त्याच्या मनाला लागल्याने तो आपल्या कुटुंबातील माणसाना घेऊन विजयनगरला परतला. पण तेथेही त्याच्या वाईटावर असलेले लोक होते. त्यांच्यापैकी कुणीतरी त्याला विष प्रयोग करून ठार मारले. तो मेल्यावर त्याची बायकामुले निराधार बनली. ती फिरून पोर्तुगीजांच्या आश्रयास गोव्यास परतली. नंतर त्यानी इकडे ख्रिश्चन धर्माची दीक्षा घेतली.

गोव्यात पोर्तुगीज अमल स्थिरस्थावर झाल्यावर आफाँस द आल्बुकेर्क आपले आरमार घेऊन मलाक्काकडे रवाना झाला. इ. स. १५१५ पर्यंत तो त्या भागात होता. इकडे त्याच्या गैरहजेरीची संधी साधून आदिलशहाने गोवा बेट घेण्यासाठी फौलादखान या नावाच्या सरदारास सैन्य देऊन रवाना केले. त्याने भाणस्तरी मार्गे तिसवाडी बेटात शिरून तेथील कॅप्टन रुद्रिगिश रेबेल याला ठार केले. परंतु स्थानिक लोकांचे सहकार्य त्याला न मिळाल्याने तो गोवा बेट घेण्याचा प्रयत्न सोडून माघारा परतला.

फौलादखानास अपयश आल्याचे पाहून आदिलशहाने रसूलखान या नावाच्या सरदाराकडे गोवा बेट घेण्याची कामगिरी सुपुर्त केली. परंतु फौलादखानाचे आणि रसूलखानाचे वैमनस्य असल्याने फौलादखानाने त्याच्या कामात विघ्ने आणली. ह्या सुंदोपसुंदीत फौलादखानाचा पराभव करण्यासाठी रसुलखानाने पोर्तुगीजांची मदत घेऊन त्याला कैद केले. परंतु नंतर त्याने तो उपकार विसरून जाऊन पोर्तुगीजाना गोवा बेट सोडून जाण्याची ताकीद केली.

गोवा बेटातील पोर्तुगीज शिबंदीत ११०० सैनिक होते. त्यांच्यापैकी ४५० पोर्तुगीज असून उरलेले एतद्देशीय होते. ठाण्यात अन्नाची बेगमीही भरपूर नव्हती. त्यावरून काही पोर्तुगीज सैनिकाना वाटले की,

अनुक्रमणिका

आदिलशाही सैन्यासमोर आपला निभाव लागणे कठीण आहे. यास्तव आपला जीव बचावण्यासाठी साठ पोर्तुगीज सैनिक शत्रूला जाऊन मिळाले.

आपलेच सैनिक शत्रूला सामील झालेले पाहून पोर्तुगीज शिबंदीच्या कमांडरचे आणि त्याच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांचे नैतीक धैर्य खचले. शत्रूला शरण जावे की काय याविषयी त्यांच्यामध्ये खल सुरू झाला. शरणागती पत्करावी या मताचे जे अधिकारी होते, त्यांचा म्होरक्या दों फेर्नांद म्हणून होता. एका मुसलमान विधवेशी त्याने विवाह केला होता. पोर्तुगालात असता तो गुंड म्हणून ओळखला जात होता. आदिलशाही सरदार रसूलखान यांच्याशी संपर्क साधून गोवा बेट त्याच्या हवाली करण्याची बोलणी करणाऱ्या पोर्तुगीज अधिकाऱ्यांचे नेतृत्व दों. फेर्नांद याच्याकडे होते. परंतु हा कट ऐनवेळी उघडकीस आल्याने गोवा विश्वासघाताने घेण्याचा रसूलखानाचा डाव उधळला गेला.

गोव्यात वरील घडामोडी घडत होत्या, तेव्हा आफाँस द आल्बुकेर्क मलाक्काहून कोचिनकडे माघार परतत होता. कोचिनला येऊन दाखल झाल्यावर त्याला गोव्यातील घडामोडींची इत्थंभूत हकीकत कळली. त्याने यत्किंचितही विलंब न लावता १८०० सैनिकांची कुमक गोव्यास धाडली. सैन्यापाशी जी शस्त्रसामग्री होती तीत पोर्तुगालहून आलेल्या नवीन प्रकारच्या प्रभावी बंदुकांचा अंतर्भाव होत होता. हे सैन्य ऐन वेळी गोव्यास येऊन दाखल झाल्याने गोवा बेट पोर्तुगीजांच्या ताब्यात राहू शकले. नंतर काही दिवसानी आल्बुकेर्कचेही गोव्यास आगमन झाले.

आल्बुकर्कने आपल्या हाताशी असलेल्या मूठभर सैन्यासह विजापूरच्या प्रचंड फौजेशी जे दोन हात केले, ते पोर्तुगालच्या सागरोत्तर साम्राज्याच्या इतिहासाचे एक तेजस्वी पान म्हणून समजले जाते. हे युद्ध जर आल्बुकेर्क हरला असता तर पोर्तुगीजाना गोवा बेटांतून चंबूगबाळे आवरून पळ काढावा लागला असता.

कोचिनहून आलेल्या ताज्या दमाच्या पोर्तुगीज सैन्यासमोर विजापूरचा सरदार रसूलखान याचा निभाव न लागल्याने त्याला अपयश पत्करून भाणस्तरी मार्गे माघार घ्यावी लागली.

इ. स. १५१३ सालच्या फेब्रुवारीत आफाँस द आल्बुकेर्क आपल्या आरमारासह लाल समुद्राकडे निघाला. एडन आणि जेद्दा ही दोन्ही शहरे काबीज करणे हा त्याच्या प्रयाणामागील मनोदय होता. परंतु तो सफल होऊ शकला नाही. मात्र इराणच्या बादशहाशी राजनैतिक संबंध जोडण्यात आल्बुकेर्क यशस्वी झाला.

इ. स. १५१५ सालच्या नवबंर महिन्यात आल्बुकेर्कला वाटू लागले की आपला अंत समीप आला आहे. ती जाणीव होताच त्याने हिंदुस्थानला परतण्याचे ठरविले. परंतु हिंदुस्थानच्या वाटेवर असता त्याला निरोप मिळला की हिंदुस्थानचा कॅप्टन जनरल म्हणून लोपु सोअरिश (Lopo Soares) याची नेमणूक झाली आहे. त्या बातमीने त्याला फार वाईट वाटले. कारण त्याचे अनेक संकल्प अपूर्ण राहिले होते. त्याला दीव बेट घ्यायचे होते व अरबस्तानांत आणखी ठाणी स्थापन करायची होती. परंतु राजाज्ञेप्रमाणे त्याला आता मायदेशास परतणे भाग होते. तरीही आपली व्यथा व्यक्त करून त्याने दि. ६ डिसेंबर १५१५ रोजी राजास उद्देशून एक हृदयस्पर्शी पत्र लिहिले. परंतु ते पत्र पोर्तुगालला पोहोचण्यापूर्वीच दि. १६ डिसेंबर १५१५ रोजी त्यांचे निधन झाले. मृत्युसमयी त्याचे वय ६२ वर्षाचे होते. परंतु त्याला गोव्याचे दर्शन घ्यायचे होते. त्याची

अनुक्रमणिका

ही इच्छा सफल होऊ शकली नाही. त्याची नौका गोव्याच्या किनाऱ्यास लागण्यापूर्वी तो मरण पावला. त्याचे दफन गोव्यात करण्यात आले; परंतु त्याचे अवशेष या ना त्या कारणांनी पोर्तुगालला नेण्याचे तब्बल पन्नास वर्षेपर्यंत राहून गेले. अखेर या प्रकरणी पोपला हस्तक्षेप करावा लागला. एका खास आज्ञेनुसार त्याने हे अवशेष दि. ६ एप्रिल १५६६ रोजी पोर्तुगालला नेण्याची व्यवस्था केली.

आल्बुकेर्क अविवाहित होता. परंतु एक निग्रो रक्षा त्याने बाळगली होती. तिच्यापासून त्याला एक अनौरस मुलगा झाला. बहुतेक सर्व पोर्तुगीज नावाड्यांप्रमाणे तो क्रुर आणि निर्दय होता. परंतु त्याला न्यायाची चाड होती. त्याच्या घराचे दार सगळ्याना खुले होते. कुणीही यावे आणि आपले गाऱ्हाणे त्याच्या कानावर घालावे. मुसलमानाचा तो कट्टर शत्र होता. परंतु त्याना त्याने न्याय नाकारला नाही. एकदा दोन पोतुगीज नावाड्यानी एका मुसलमान व्यापाऱ्याकडे चोरी केला असता ता कागाळी आल्बुकेर्ककडे आली, तेव्हा त्याने त्या दोघा गुन्हेगाराना कठोर सजा दिली. त्याच्या न्याय प्रियतेमुळे गोव्याचे हिंदू त्याचे चाहते बनले होते. तो निधन पावल्याची बातमी कळताच ते हळहळले.

आल्बुकेर्कने पोर्तुगालच्या राजास एक हृदयस्पर्शी पत्र लिहिल्याचा उल्लेख वर आलाच आहे. ते पत्र मिळताच राजाने आपला हुकूम रद्द करून लोपु द सोआरिश याला माघार बोलविल व आपल्या नेमणुकीची मुदत वाढवील, याची आल्बुकेर्कला खात्री वाटत होती. पत्रात आपण हिंदुस्थानात काय काय केले आणि आपणास आणखी काय काय करायचे आहे त्याचा तपशील त्याने लिहिला होता. खरे तर त्याच्या हितशत्रूनी त्याच्या विरूद्ध राजाचे कान फुंकल्याने त्याने त्याला माघारा बोलविले होते. परंतु त्याचे पत्र वाचताक्षणी राजाचा त्याच्या विषयीचा प्रतिकूल ग्रह दूर झाला व त्याने त्याच्या नेमणुकीची मुदत वाढविण्याचे ठरविले. परंतु तत्पूर्वीच त्याच्या शोचनीय निधनाची वार्ता पोर्तुगालला जाऊन थडकली.

आफाँस द आल्बुकर्क याचे जागी हिंदुस्थानचा गव्हर्नर म्हणून आलेला लोपू द सोआरिश हा बरोबर मोठे आरमार घेऊन आला होता. त्यात १५ युद्धनौका आणि १५०० सैनिक होते. तसा तो हिंदुस्थानला नवीन नव्हता. इ. स. १५०४ साली तो हिंदुस्थानात एक आरमारी काफिला घेऊन आला होता व अनेक लढायात भाग घेऊन त्याने मर्दुमकी गाजविली होती. आफाँस द आल्बुकेर्कचा वारसदार म्हणून त्याची नेमणूक झाली, त्याला त्याची ही पात्रता कारणीभूत ठरली होती. त्याने हिंदुस्थानला आल्या आल्या श्रीलंकेची मोहीम काढून इ. स. १५१८ च्या सप्टेंबर महिन्यात कोलंबो शहर घेतले. तेथे एक किल्ला बांधण्यासाठी तो त्याचा पाया घालतो आहे, तोच त्याच्या नेमणुकीची मुदत संपून त्याला पोर्तुगालला परतावे लागले.

लोपु द सोआरिश यांच्यानंतर दियोगु लोपिश द सिकॅरा (Diogo Lopes de Siquera) यांची हिंदुस्थानचा गव्हर्नर म्हणून नेमणूक झाली. दि. ८ सप्टेंबर १५१८ या दिवशी तो गोव्यास येऊन पोहोचला. त्याची मुदत तीन वर्षांची होती व या कालावधीत दीव घेऊन तेथे एक किल्ला बांधण्याचा त्याला हूकूम झाला होता. परंतु दीव त्याला घेता आले नाही. अखेर तीन वर्षांची कारकीर्द संपल्यावर त्याला माघारा परतावे लागले.

इ. स. १५२१ च्या सप्टेंबर महिन्यात दुआर्त द मिनेझिरा (Duarte de Menezes) हा सिकैरानंतर हिंदुस्थानचा गव्हर्नर म्हणून आला. तो गोव्यात इ. स. १५२३ अखेरपर्यंत होता. परंतु त्याला सांगण्यात आलेली एकही कामगिरी तो पार पाडू शकला नाही. त्याचे एक प्रमुख कारण हे की, हिंदुस्थानात येणारे

बहुतेक सर्व मोठे पोर्तुगीज अधिकारी आता पैशाच्या मागे लागत असल्याने त्याना सांगण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या कामगिऱ्यांकडे त्यांचे दुर्लक्ष होऊ लागले होते. एकमेकांशी भांडण करणे आणि कोणत्याही मार्गानी संपत्ती गोळा करणे, यांतच त्यांची शक्ति आणि वेळ खर्च होत होता. त्यांच्या विषयींच्या कागाळ्या पोर्तुगालचा नवीन राजा दों ज्युआव तिसरा याच्या कानावर गेल्या तेव्हा त्याने हिंदुस्थानातील पोर्तुगीज अधिकाऱ्यांमध्ये माजलेला हा भ्रष्टाचार निपटून काढण्यासाठी व्हाश्कु द गामा याला हिंदुस्थानचा तिसरा व्हिसेरेइ म्हणून गोव्यास पाठविले. इ. स. १५२४ सालच्या सप्टेंबर महिन्यात तो गोव्यास येऊन दाखल झाला. अधिकार सुत्रे हाती घेतल्यावर तो राज्यकारभारात माजलेली घाण निपटून काढण्याच्या कामास लागला. लांचलुचपतीला आळा घालून कामचुकार अधिकाऱ्यांना वठणीवर आणणे हे त्याचे पहिले काम होते.

व्हाश्कु द गामाने गोव्यात जहाजे बांधण्याची गोदी सुरु केली. गरीब लोकांसाठी सुरु करण्यात आलेल्या रुग्णालयांचा ऐतखाऊ आणि आळशी पोर्तुगीज लोक फायदा घेत होते, म्हणून ती त्याने बंदच करून टाकली. मलबारच्या किनाऱ्यावरील पोर्तुगीज वसाहतीत तर व्हाश्कु द गामाच्या आगमनाने हलकल्लोळच माजला. तिकडे गोव्यापेक्षा अधिक बेशिस्तपणा बोकाळला होता. व्हाश्कु द गामाची वक्रदृष्टी आपणाकडे वळणार म्हणून तिकडचे भ्रष्ट पोर्तुगीज लोक भयभीत झाल्याने त्यांची पळापळ सुरु झाली. त्यांच्यापैकी काही जणानी सत्ताधाऱ्यांकडे नोकऱ्या धरल्या.

व्हाश्कु द गामाला हिंदुस्थानातील पोर्तुगीज वसाहतीत शिस्त आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचे संपूर्ण अधिकार बहाल करण्यात आले असल्याने त्याच्या वरवंट्याखाली बरेच लोक चिरडले गेले. परंतु गामाचे काम पूर्ण होण्यापूर्वीच त्याचे निधन झाल्याने ते अर्धवट राहिले. त्याच्या शत्रूनी सुटकेचा श्वास सोडला. तो इ. स. १५२४ च्या नाताळात वयाच्या चौसष्टाव्या वर्षी मरण पावला.

व्हाश्कु द गामाच्या नंतर हिंदुस्थानचा गव्हर्नर म्हणून आलेला दों एरिक द मिनोझश (Dom Henrique de Menezes) हा शिपायी गडी असून वयाने अवघा पंचेचाळीस वर्षांचा होता. त्याला युद्धाची खुमखुमी असल्याने मलबार प्रांतातील सत्ताधाऱ्यांची कुरापत काढून त्याने मलबार युद्ध ओढवून घेतले. ते पोर्तुगीजाना फार महागात पडले. ते युद्ध चालू असतानाच दों एरिक द मिनेझिश कान्नानूर येथे मरण पावला.

द मिनेझिश याच्या नंतर नूनु द कुन्य (Nuno de Cunha) याला हिंदुस्थानचा गव्हर्नर म्हणून पाठविण्यात आले. तो दि. २४ अक्टोबर १५२९ रोजी गोव्यास येऊन दाखल झाला व २५ नवंबरला त्याने अधिकार ग्रहण केले. त्याच्या कारकिर्दीचा मुख्य विशेष म्हणजे पोर्तुगीज हिंदुस्थानच्या गव्हर्नराना गोवा ते मलबार अशी जी येंजा करावी लागत होती ती बंद करून त्याने पोर्तुगीज हिंदुस्थानची राजधानी गोव्याला कायम केली.

नूनु द कुन्य याला पोर्तुगीज हिंदुस्थानची राजधानी कायम करण्यापलीकडे दीव घेण्याचाही हुकूम झाला होता. त्या हुकुमाप्रमाणे त्याने दीवच्या दिशेने आरमारी हालचाली सुरू करताच गुजरातच्या सुलतानाशी त्याचा संघर्ष उडाला. या संघर्षाची पार्श्वभूमि अशी :

अनुक्रमणिका

इ. स. १५२६ साली बाबर हिंदुस्थानचा एकमेव स्वामी बनला. सिंधपासून बंगालच्या उपसागरापर्यंतचा विस्तीर्ण प्रदेश त्याच्या अधिपत्याखाली आला खरा, परंतु गुजरात आणि दख्खन त्याच्या अमला बाहेर होती. ती काबीज करण्यापूर्वीच इ. स. १५३० साली त्याचे निधन झाले. त्याचा पुत्र हुमायुन हा महत्वाकांक्षी असल्याने त्याने वरील दोन्ही प्रदेश आपल्या अमलाखाली आणण्यासाठी लष्करी मोहीम सुरू केली. इ. स. १५३५ च्या सुमारास हुमायुन आणि गुजरातचा सुल्तान या दोघांच्या सैन्यामध्ये 'मंदसर'ची लढाई झाली. तीत गुजरातच्या सुल्तानाचा पराभव झाल्याने मोगली आक्रमणाला तोंड देण्यासाठी त्याला पोर्तुगीजांकडे मदतीचा संदर्भ लावावा लागला. परंतु पोर्तुगीज त्याला फुकाची मदत देण्यास तयार नव्हते. त्याना दीव येथे नाविक तळ स्थापण्यासाठी जागा हवी होती. संकटात सापडलेल्या गुजरातच्या सुल्तानाला पोर्तुगीजांची अट मान्य करण्यापलीकडे दुसरा इलाज उरला नाही. तत्पूर्वी इ. स. १५३४ साली त्याने पोर्तुगीजाना वसई बेट देऊन टाकले होते.

गुजरातचा सुल्तान बहादुरशहा - याच्या मदतीस नूनु द कुन्य हा आपले आरमार घेऊन दीवला निघाला. परंतु हुमायुनने तत्पूर्वीच गुजरातमधून माघार घेतली होती. ते पाहून बहादुरशहाने सुटकेचा श्वास सोडला. पोर्तुगीजांकडून प्रत्यक्ष मदत होण्यापूर्वीच हुमायुनने माघार घेतल्याने पोर्तुगीजांना दीव येथे नाविक तळ देण्याचे बंधन आपणावर उरले नाही, अशी त्याची समजूत झाली. परंतु नूनु द कुन्य याने कराराप्रमाणे तळासाठी जागा दिलीच पाहिजे असा हट्ट बहादुरशहाकडे धरला. त्याचे कुन्याची मागणी फेटाळून तर लावलीच, पण दीव खाली करण्याची त्याच्याकडे मागणी केली. त्याला कुन्याने अर्थात नकार दिला.

बहादुरशहास पोर्तुगीजविरोध परवडण्यासारखा नव्हता. हुमायुन गुजरातेत परत आला तर पोर्तुगीजांकडे त्याला मदतीसाठी हात पसरावा लागणार होता. म्हणून त्याने दीवच्या आरमारी तळाचा प्रश्न सामोपचाराने मिटविण्यासाठी नुनू द कुन्याकडे वाटाघाटीचा प्रस्ताव धाडला. कुन्याने बहादुरशहाच्या सूचनेस रुकार दिला व मुलाखत जमिनीवर व्हावी असे बहादुरशहाने सुचविले. पण ती सूचना कुन्यास पसंत पडली नाही. बहादुरशहा दगलबाजीने आपणास कैद करील अशी त्याला भीती वाटली. त्याने बहादुरशहास कळविले की वाटाघाटी पोर्तुगीज आरमाराच्या ध्वज नौकेवर व्हाव्या.

नूनु द कुन्याची सूचना मान्य करून बहादुरशहा त्याला भेटण्यासाठी त्याच्या ध्वजनौकेवर चढतानाच त्याला अपघात होऊन पाण्यात पडून तो बुडून मेला. अर्थात हे म्हणणे पोर्तुगीजांचे. त्याच्या विरूद्ध मुसलमानानी पोर्तुगीजांवर आरोप केला की त्यानी बहादुरशहास दगलबाजीने पकडण्याचा प्रयत्न केला असता त्या झटापटीत तो निसटून समुद्रात पडून मेला. ही घटना दि. १३ फेब्रुवारी १५३७ रोजी घडली.

बहादुरशहा इजिप्तचा सुल्तान सुलेमान याचा दोस्त होता. तो पोर्तुगीजांकडून मारला गेल्याची बातमी कळताच आपल्या मित्राच्या मृत्यूचा सूड उगविण्यासाठी त्याने दीवला एक प्रचंड आरमार धाडले. इ. स. १५३८ च्या अक्टोबर महिन्यात तुर्की आरमाराने दीवची कोंडी केली. परंतु पोर्तुगीजांच्या मदतीला दक्षिणेकडून वीस युद्धनौकांचा एक आरमारी काफिला येत असल्याची बातमी तुर्की आरमाराच्या दर्यासारंगाला कळताच त्या आरमाराच्या भयाने त्याने दीवची कोंडी उठवून माघार घेतली. या घडामोडी चालू असतानाच नूनु द कुन्य याच्या कारकीर्दीची मुदत संपल्याने त्याला पोर्तुगालला माघारा परतावे लागले. त्याचा वारसदार 'गार्सिया द नोरोन्य' हा प्रख्यात आफॉंस द आल्बुकेर्कचा भाचा असून त्याला

अनुक्रमणिका

व्हिसेरेइचा किताब करण्यात आला होता. त्याचे वैषम्य नूनु द कुन्य याला वाटले. तो परतीच्या प्रवासात आजारी पडून वाटेतच मरण पावला.

आफाँस द आल्बुकेर्कने आपल्या मायभूमीसाठी हिंदुस्थानात मोठा पराक्रम करून देखील त्याला पोर्तुगालच्या राजाने व्हिसेरेइचा किताब दिला नव्हता. ते त्याच्या मनात राहिल्याने त्याने अल्बुकेर्कचा भाचा गार्सिया द नोरोन्य याला तो हुद्दा देऊन आल्बुकेर्कवर झालेल्या अन्यायाचे परिमार्जन केले.

गार्सिया द नोरोन्य व गुजरातचा सुल्तान या दोघामध्ये दीवच्या प्रश्नाबाबत १५३९ च्या मार्च महिन्यात तह होऊन तो प्रश्न मिटला. दीवचा किल्ला व दीव शहर यांच्यामध्ये एक भिंत उभारावी व दीव बंदराची एक तृतियांश जकात पोर्तुगीजाना सुल्तानाने द्यावी असे ठरले.

विजापूरचा सुल्तान युसूफ आदिलशहा व पोर्तुगीज यांच्या मधला संघर्ष चालूच होता. त्याने इ. स. १५१६ व १५२० या दोन साली गोवा बेट घेण्याचे दोन जोरदार अयशस्वी प्रयत्न केले. शेवटच्या युद्धात तर त्याला साष्ट आणि बार्देश हे दोन प्रांत गमवावे लागले.

इ. स. १५३३ साली युसुफ आदिलशहा मरण पावला. त्याच्यामागे त्याचे दोन मुलगे मल्लू अथवा मियालखान आणि इब्राहिम या दोघामध्ये गादीसाठी भांडणे सुरू झाली. इब्राहिमने मल्लू विरूद्ध पोर्तुगीजांची मदत घेतली. त्या यादवी युद्धात इब्राहिमचा जय झाला. त्याने पोर्तुगीजांची मदत घेतल्याने त्याचा मोबदला त्याला द्यावा लागला. साष्ट आणि बार्देश हे दोन्ही प्रांत त्याला एका करारान्वये पोर्तुगीजाना कायमचे द्यावे लागले. परंतु नंतर त्याला उपरती झाली व पोर्तुगीजांची कुरापत काढून बोरी आणि रायतुर या ठिकाणी झालेल्या लढाईत गमावलेले दोन्ही प्रांत त्याने पोर्तुगीजांचा पराभव करून परत मिळविले.

इ. स. १५३९ साली गोवा शहरात पटकीच्या साथीच्या प्रादुर्भाव झाला. ती साथ तब्बल चार महिने चालू राहिली व तिने ७०० माणसांचा बळी घेतला. साथीच्या आजाराबरोबर पोर्तुगीज ‘फिदाल्ग’ लोकांच्या दंगामस्तीचा उपद्रवही गोवा शहराच्या नागरिकाना आणि शासकीय अधिकाऱ्याना सहन करावा लागला. हे लोक अमीर उमराव घराण्यातून आले असल्याने त्याना शासन करण्याचा अधिकार पोर्तुगीज अधिकाऱ्याना नव्हता. त्यांच्या गुन्ह्यांचा न्यायनिवाडा केवळ पोर्तुगालचा राजाच तेवढा करू शके.

इ. स. १५४० साली गोंसालू व्हाज द कौतिन्यु या नावाच्या एका बदमाश फिदाल्गाने तुरुंग फोडून चाळीस कैद्यांसह पलायन केले. तो आपल्या साथीदारांसह सरहद्द ओलांडून आदिलशहास जाऊन मिळाला व त्याच्या सैन्यात भरती होऊन आपल्या देशबांधवांशी लढला. थोडक्यात सांगायचे म्हणजे गोवा बेटात बदमाश लोकानी अशी अंदाधुंदी माजविली होती. त्यांच्या गुंडगिरीची रसभरित वर्णने इटालियन प्रवासी ‘मानुची’ याच्या ‘स्तोरिया द मोगोर’ या ग्रंथात वाचावयास मिळतात.

तथापि गोवा बेटात जरी अंदाधुंदी माजली असली, तरी इतरत्र पोर्तुगीजांची आगेकूच चालूच होती. गव्हर्नर न्यूनु द कुन्य याने गुजरातच्या सुल्तानाशी युद्ध करून दीव बेटावर आपले पाय घट्ट रोवल्याचे वर आलेच आहे. त्याच सुमारास त्याने गुजरातच्या सुल्तानाकडून ठाणे, तारापूर, बांद्रा, माहीम मुंबई बेट काबीज केले होते. इ. स. १५३४ साली गोव्यात बिशपची गादी स्थापन करण्यात आली.

१५४२ साली सां. फान्सिश्कु द शाव्हिएरचे गोव्यात आगमन होऊन धर्मांतराच्या कार्यास चालना मिळाली. पोप पॉल तिसरा याचा प्रतिनिधी म्हणून शाव्हिएरची नेमणूक झाली होती. इ. स. १५३९ साली गुजरातचा सुल्तान व पोर्तुगीज यांच्याध्ये तह होऊन दीवचा प्रश्न मिटला होता. परंतु या तहाने गुजरातचा सुल्तान आणि पोर्तुगीज हे दोघेही समाधानी नव्हते. दोघानाही युद्धाची खुमखुमी होती. पोर्तुगीजाना सबंध दीव बेट आपल्या ताब्यात हवे होते. म्हणून त्यानी दीवचा किल्ला व दीव शहर यांच्यामध्ये उभारण्यात आलेली भिंत पाडून सुल्तानाची कुरापत काढली. या आक्रमणामुळे सुल्तान प्रक्षुब्ध झाला व त्याने पोर्तुगीजांवर हल्ला करण्याचा हुकूम आपल्या सैन्यास दिला.

इ. स. १५४५ साली दों ज्युआव द काश्त्रू (Dom juao de Castra) हा गव्हर्नर म्हणून आला. गुजरातच्या सुल्तानाचे सैन्य दीवला वेढा घालून बसले होते. त्या सैन्याशी मुकाबला करण्याचे काम दों ज्युआव द काश्त्रूला करावे लागले. त्याने गोव्यातून सैन्य नेऊन लढाईचे नेतृत्व स्वतः पत्करले. लढाई बरेच दिवस चालली. त्यात सुल्तानाच्या फौजेचा पराभव झाला. ३००० सैनिक ठार होऊन ६०० कैद झाले. ठार झालेल्यात सुल्तानाच्या सैन्याचा सेनापती सरदार रमझान रुमी खान हा होता.

दों ज्युआद द काश्त्रूने गुजरातच्या सुल्तानाचा पराभव केल्याने पोर्तुगालात त्याची फार वाहवा झाली. त्याने केलेल्या पराक्रमाचे पारितोषिक म्हणून पोर्तुगालच्या राजाने त्याला व्हिसेरेइची बढती देऊन त्याची कारकीर्द आणखी तीन वर्षांनी वाढविली. परंतु दों ज्युआव द काश्त्रूच्या नशिबात व्हिसेरेइचा अधिकार उपभोगण्याचे नव्हते. पोर्तुगालच्या राजाकडून त्याला शाबासकीचे पत्र आले, तेव्हा तो ज्वराने आजारी होता. त्यातून तो बरा झाला नाही. इ. स. १५४८ च्या जून महिन्यात त्याचे निधन झाले. दों ज्युआव द काश्त्रू हा शेवटचा मोठा व्हिसेरेइ. त्याच्या मृत्युनंतर आशिया खंडातील पोर्तुगीज सत्तेला उतरती कळा लागली.

इ. स. १५६५ साली दक्षिण हिंदुस्थानातील मुसलमानी सुल्तानांच्या संयुक्त फौजा व विजयनगरचे सैन्य यांची तालिकोट येथे घनघोर लढाई होऊन तीत विजयनगरच्या सैन्याचा पराभव झाला. त्या पराभवाचा अनिष्ट परिणाम पोर्तुगीजाना भोगावा लागला. कारण, विजयनगरशी व्यापार करून त्यानी आपला देश समृद्ध केला होता. विजयनगरचे साम्राज्य रसातळास गेल्याने पोर्तुगालचा हिंदुस्थानातील व्यापार बुडून ते गरीब झाले.

इ. स. १५५८ साली व्हिसेरेइ 'कोंस्तांतिन द ब्रागांस' याने दमण घेऊन तेथे एक किल्ला बांधिला. याच सुमारास महाकवी लुईज द कामॉइश याचे गोव्यात वास्तव्य होते. त्याने पोर्तुगीज अधिकाऱ्यांच्या अंदाधुंदीवर सडकून टीका केल्याने ते त्याच्यावर क्रोधाविष्ट झाले व त्यानी त्याला गोव्यातून हद्दपार केले. तत्पूर्वी थोडे दिवस अगोदर गोव्यात मुद्रण कलेचे आगमन झाले होते. इ. स. १५५७ साली सां. फ्रांन्सिश्कु द शाव्हिएर याने ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यासाठी एक प्रश्नावली तयार करून ती छापून प्रसिद्ध केली. हिंदुस्थानात छापण्यात आलेले ते पहिले पुस्तक होय.

# ४. धर्मांतराचा धुमाकूळ

इ. स. १५६० साली गोवा बेटांत 'इंक्विझिशन' अथवा धर्म समीक्षण संस्थेची स्थापना झाली. पोर्तुगीजांच्या अंमलाखाली असलेल्या प्रदेशांतील बिगर ख्रिश्चन रहिवाश्याना त्यांच्या धर्माप्रमाणे वागू न देणे व नवख्रिश्चन लोक त्यांच्या जुन्या हिंदूधर्मातील चालीरीतींचे आचरण करीत असल्यास त्याना कडक शासन करणे. हा इंक्विझिशनच्या स्थापने मागील उद्देश होता. परंतु हे ढोबळ धोरण डावलून इंक्विझिशनने गोव्यात आणि ठाणे जिल्ह्यातील पोर्तुगीज वसाहतीत जो धुमाकूळ घातला त्याला इतिहासात तोड नाही. इंक्विझिशनमध्ये काम करणाऱ्या भिक्षूनी केवळ हिंदुचा आणि हिंदू चालीरीतींचे आचरण करणाऱ्या नवख्रिश्चनाचाच छळ केला असे नव्हे; तर त्यांच्या विषय वासनेला बळी पडण्यास नकार देणाऱ्या नवख्रिश्चन स्त्रियांना देखील जाळून मारण्याची शिक्षा देण्यास त्यानी कमी केले नाही. धर्माच्या नावाखाली त्यानी धाकधपटशा दाखवून लोकाना लुटून अलोट संपत्ती गोळा केली.

इ .स १५६७ साली साष्टी प्रांताचा सुभेदार दियोगु रुद्रिगिश याने एका रात्रीत त्या प्रांतातील २८० हिंदू मंदिरे पाडण्याचा विक्रम केला. हिंदूची ही मंदिरे आणि मशिदी कलाकुसरीच्या दृष्टीने अत्यंत सुंदर होती. ती जेसुईट पाद्र्यांच्या डोळ्यात खुपसली. हिंदू मंदिरे पाडून लोकांचे सक्तीने धर्मांतर घडवून आणण्याची ही मोहीम पोर्तुगीजांच्या अमलाखालच्या तिसवाडी, बार्देश आणि साष्ट प्रांतात सुरू होताच तेथील हिंदू लोकांमध्ये भयंकर घबराट माजला. आपल्या धर्माचे आणि देवांचे रक्षण करण्यासाठी त्यानी नजीकच्या आदिलशाही प्रदेशांत मोठ्या प्रमाणात स्थलांतर केले. काही हिंदूना आपले भरले संसार आणि शेती भाती सोडून पळ काढवेना. ते कठीण परिस्थितीतही मागे राहिले. परंतु मिशनऱ्यानी त्यांच्यावर इतके कडक निर्बंध लादले की त्याना अखेर आपल्या गावांचा त्याग करावा लागला.

इ. स. १६१३ साली व्हिसेरेइ दों. डोरोनिमु द आझावेदु याने फतवा काढला की इंक्विझिशने नेमून दिलेल्या वेळात हिंदूना आपली लग्नकार्ये पार पाडणे अशक्य झाल्यास त्यानी ती गावाबाहेर जाऊन पार पाडावी. त्यांच्या हातून जर या निर्बंधांची पायमल्ली झाली, तर त्याना १००० अश्रफींचा दंड भरावा लागेल. या रकमेपैकी एक तृतियांश रक्कम गुन्ह्याची खबर देणाऱ्या फितुराला मिळत होती, तर उरलेली इंक्विझिशनच्या पोतडीत जात होती. इंक्विझिशनमध्ये काम करणाऱ्या पाद्र्यांची संक्रांत प्रथम हिंदू देवांवर आणि हिंदू मंदिरावर आली. तो एक मानसशास्त्रीय प्रयोग होता. हिंदू मंदिरे पाडून हिंदूचे देव उकिरड्यावर फेकून दिले तरी, ते आपले काहीच वाकडे करू शकत नाहीत, हे हिंदूच्या मनावर बिंबवून त्याना ख्रिश्चन धर्म स्वीकारावयास लावणे हा तो उद्देश होता. काही हिंदूना मिशनरी या कृप्तीचा प्रयोग करून आपल्या कळपात ओढू शकले. परंतु पुष्कळशा हिंदूनी आपल्या घरादारांचा त्याग केला. पण जे गाव सोडण्यास तयार झाले नाहीत त्यानी आपल्या धर्माच्या रक्षणासाठी मिशनरी व त्यांना मदत करणारे पोर्तुगीज लष्कर यांचा प्राणपणाने प्रतिकार केला. असे एक रोमहर्षक प्रकरण साष्टी प्रांतातील कुकळ्ळी या गावी घडले.

इ. स. १५६८ साली पाद्र्यांचा एक तांडा आणि पोर्तुगीज लष्कर साष्टी प्रांतातील गावे बाटवीत मडगाव शहरात घुसले. त्याबरोबर हिंदूमध्ये घबराट माजून पळापळ सुरु झाली. दामोदर हा मडगावच्या हिंदूचा कुलदेव. त्याला घेऊन हिंदू लोक आदिलशाही प्रदेशांतील जांबावली गावी गेले. तेथील नदीकिनाऱ्यावरील झाडीत त्यानी त्याला लपवून ठेवले. जे हिंदू मडगावी मागे राहिले त्यांच्यावर धर्मांतराची संक्रांत आली. मडगाव बाटविल्यावर विजयी पाद्र्यानी आपला मोर्चा दक्षिणेकडे नावेली, सिरली, दांडेवाडी, वगैरे गावांकडे वळविला. गायी मारून त्यानी त्यांचे मांस हिंदूच्या तोंडात कोंबले व त्या

गावांतील हिंदू मंदिरे भ्रष्ट केली. एकही हिंदू त्यांनी त्या गावातून औषधाला ठेवला नाही. सक्तीच्या धर्मांतराची ती वार्ता कुकळ्ळी, वेरोडा, वगैरे गावात वणव्यासारखी पसरून सर्वत्र भीतीचे वातावरण निर्माण झाले. परंतु त्या गावातील मराठे हे कडवे योद्धे असल्याने पाद्र्यांच्या आक्रमणाला तोंड दिल्याखेरीज शस्त्र खाली ठेवायचे नाही, असा पण करून ते आगामी संकटास तोंड देण्यास सिद्ध झाले. शस्त्रास्त्रांची जमवाजमव सुरु झाली. लोहारांचे भाते अहोरात्र काम करू लागले, ऐरणीवर घणाचे आघात होऊ लागले. भाले, तलवारी, बाण, तोड्यांच्या बंदुका यांचा ढीग पडू लागला. तरणे ताठे आणि म्हातारे कोतारे पुरुष देखील शस्त्रे वापरण्याचा सराव करू लागले. कुकळ्ळीच्या मराठ्यांच्या मदतीला आदिलशाही प्रदेशांतील त्यांचे भाऊबंद आणि सगेसोयरेही आले. हा हा म्हणता दोन अडीच हजार मराठे तळहातावर शिर घेऊन पाद्र्यांच्या आक्रमणाला तोंड देऊन धर्म रक्षणार्थ सज्ज झाले. त्यांच्या टेहेळणी पथकानी चौक्या पहारे बसविले. कुकळ्ळीच्या हिंदूनी प्रतिकाराची तयारी केली आहे, हे मिशनरी व त्यांचे पाठिराखे पोर्तुगीज सेनाधिकारी याना त्यांच्या हस्तकांकडून कळत होते. परंतु त्यानी माघार न घेता कुकल्ळीच्या दिशेने कूच केले. ते कुकल्ळी गावात एकदम शिरले नाहीत. त्यानी गावाबाहेर आपली छावणी ठोकली. हिंदू मंडळीने त्याना आपल्या गनिमी काव्याचा हिसका दाखविण्याचे ठरविले. त्यानी रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन पोर्तुगीजांच्या छावणीवर चोरटे हल्ले करण्याचा सपाटा सुरू केला. त्यानी बऱ्याच पोर्तुगीज सैनिकाना कंठस्नान घालून त्यांची हत्यारे आणि दारूगोळा हस्तगत केला. पोर्तुगीजांना कुकळ्ळीकर हिंदू सैन्याच्या ताकतीचा अंदाज लागेना. त्यानी डावपेच लढविण्यास प्रारंभ केला. कुकल्ळीची छावणी मोडून त्यानी पारोडे, केपे, कुडचडे वगैरे गावाकडे आपला मोहरा वळविला. परंतु ही गावे सोंधेच्या राजाच्या राज्यात मोडत असल्याने सोंध्याच्या सैन्याने त्याना अटकाव केला. त्यामुळे त्याना माघार घ्यावी लागली. परंतु कुकळ्ळीकर हिंदूना ते विसरले नाहीत.

चार पांच वर्षे अनिश्चित स्थितीत निघून गेली. पोर्तुगीजानी आपला नाद सोडलेला नाही हे कुकळ्ळीकर हिंदू जाणून असल्याने गाफील नव्हते. पोर्तुगीजांची आणि पाद्र्यांची धाड आपल्यावर आल्या वांचून राहाणार नाहीत याची त्याना पुरेपुर कल्पना होती. अकस्मात् इ. १५७५ साली पोर्तुगीज सैनिक कुकल्ळी गावाला लागून असलेल्या असोळणे गावच्या साळ नदीच्या किनाऱ्यावर गोळा झाल्याची बातमी आली. कुकल्ळीकरानी त्यांच्यावर चाल करण्याचे ठरविले. परंतु दुसरी बातमी आली की, पोर्तुगीज सैन्य आणि पाद्रीत साळ नदी ओलांडून असोळणे गावात शिरले आहेत व त्यानी बाटाबाटीस प्रारंभ केला आहे. ते कळताच कुकल्ळीकर हिंदू वेळ न दवडता पोर्तुगीजांवर चालून गेले. उभय पक्षांमध्ये लढाईस तोंड फुटले. पोर्तुगीज सैन्य मोठ्या तयारीने आले होते. शिवाय त्यांची शस्त्रे आधुनिक असल्याने कुकल्ळीकराना माघार घ्यावी लागली. ते पाहताच पाद्र्याना चेव आला. 'ज्युलियानुश' या नावाचा एक पाद्री काही पोर्तुगाज सैनिकाना घेऊन पुढे सरसावला. त्याने असोळणे गावातील वेताळाच्या मंदिराकडे चाल करून त्याला आग लावून दिली. कुकल्ळीकरानी ते पाहिले. परंतु त्यावेळी त्याना काहीच करता आले नाही. मात्र रात्रीच्यावेळी येऊन त्यानी पाद्री ज्युलियानुश याला त्याच्या इतर साथीदार पाद्र्यांसह ठार केले.

कुकल्ळीकर हिंदू पोर्तुगीजाना असोळणे गावातून हुसकून लावू शकले नाहीत. त्याना माघार घ्यावी लागली.

हिंदूचा पराभव झाल्याने पाद्र्याना आणि पोर्तुगीज सैन्याला चेव आला. त्यानी असोळणे गाव तर बाटविलेच; पण त्याच्या आजूबाजूच्या गावातील हिंदूचेही धर्मांतर घडवून आणले. काही हिंदू पळून गेले. जाताना ते आपली देवदैवतेही बरोबर घेण्यास विसरले नाहीत.

अनुक्रमणिका

कुकल्ळी हा हिंदूचा शेवटचा बालेकिल्ला. तो पडला की अख्खा साष्ट प्रांत ख्रिस्तीधर्ममय होणार होता. पोर्तुगीज सैन्याने हिंदूच्या त्या शेवटच्या बालेकिल्ल्यावर हल्ला करण्याची जोरदार तयारी सुरू केली. कुकल्ळीकर हिंदुना पोर्तुगीजांच्या हालचालीच्या बित्तंबातम्या त्यांच्या गुप्तहेराकडून कळत होत्या. पोर्तुगीज हल्ल्याची तयारी करीत असल्याची बातमी कळताच ते अस्वस्थ झाले. परंतु त्यानी धीर सोडला नाही, की गावही खाली केले नाही. तथापि, पोर्तुगीजांच्या हल्ल्यात पराभव झाल्यास त्यांच्या हातून आपल्या देवदैवतांची विटंबना होऊ नये म्हणून आपली कुळावी देवी शांतादुर्गा हिची मूर्ती फातर्पे गावी नेऊन तिकडे तिची स्थापना करण्याची दक्षता घेतली. देवी बरोबरच तिचा पुजारीवर्ग आणि सेवक वर्गही फातर्पेला पाठविण्यात आला. त्या दरम्यान पोर्तुगीज सैन्याच्या आणि कुकल्ळीकरांच्या चकमकी झडतच होत्या पोर्तुगीज सैन्य कुकल्ळीवर मोठा आणि शेवटचा हल्ला करण्याची वाट पहात होते.

इ. स. १५८२ साली कॅप्टन फिगेरेदो या नावाचा पोर्तुगीज अधिकारी तहाचा प्रस्ताव घेऊन कुकल्ळीकरांकडे आला. ते एकूण पाच जण होते आणि निःशस्त्र होते. कॅप्टन फिगेरेदला मोडकी तोडकी कोकणी भाषा अवगत होती. आपल्या लाघवी बोलण्याने कुकल्ळीकर हिंदू पुढाऱ्याची मने काबीज करण्यात तो यशस्वी झाला. तो म्हणाला की, आम्ही तुमच्या वाटेस जात नाही आणि तुम्हीही आमच्या वाटेस जाऊ नका. दोघानी गुण्या गोविंदाने राहू या. कुकल्ळीकर हिंदू पुढारी फिगेरेदच्या मायावीपणाला फसले. ते म्हणाले की, तुमच्याशी आम्ही शेजार धर्माने वागण्यास तयार आहो.

त्या दिवशी बोलणी तेवढ्यावरच संपली. पुढची बोलणी असोळणेच्या कोटांत व्हावी असे ठरले. कॅ. फिगेरेदो कुकल्ळीकर हिंदू पुढाऱ्यांचा निरोप घेऊन निघून गेला.

ठरलेल्या दिवशी कुकल्ळीकर हिंदूचे सोळा पुढारी पोर्तुगीजांशी सलोख्याच्या पुढील वाटाघाटी करण्याकरता असोळणेला गेले. पोर्तुगीजांकडून दगाफटा होईल याची त्यानी कल्पना केली नव्हती. परंतु त्यानी असोळणेच्या कोटांत प्रवेश करण्याचाच अवकाश, कोटाचा दरवाजा एकदम बंद झाला. आपणास विश्वासघाताने पकडण्यासाठी कॅ. फिगेरेदने कोटांत बोलवून घेतले याची त्या दुदैवी पुढाऱ्याना कल्पना झाली. परंतु आता काहीच करता येण्यासारखे नव्हते. ते पोर्तुगीजांच्या तावडीत आयतेच सापडले होते. इतक्यात काळू नाइक या नावाचा पुढारी पोर्तुगीज सैनिकांचे कडे तोडून कोटाच्या तटाचे दिशेने तीरासारखा धावला. हा हां म्हणता तो तटावर चढून गेला व तटाखालून वाहणाऱ्या साळनदीत उडी टाकून अदृश्य झाला. पोर्तुगीज सैनिकानी काळू नायकाचे धाडस पाहून दिग्मूढ होऊन तोंडात बोटे घातली. काळू नायकाच्या मागे त्याच्या सोबत्याना पोर्तुगीजानी हालहाल करून ठार मारले.

काळू नायकाचे साळनदीतून पोहत जाऊन जमीन गांठली. त्याने कुकल्ळीला जाऊन असोळणेच्या कोटांत घडलेला प्रसंग आपल्या भाऊबंदाना विदित केला, तेव्हा कुकल्ळी गावात हाहाःकार माजला. संतापाची एक प्रचंड लाट त्या बातमीने सर्वत्र पसरली. पोर्तुगीजांची ही दगलबाजी नवख्रिश्चनानाही आवडली नाही. पोर्तुगीजांचा सूड घेण्यासाठी तेही आपल्या पूर्वाश्रमीच्या हिंदू भाऊबंदाना सामील झाले. त्या दरम्यान पाद्री आणि पोर्तुगीज लष्कराधीकारी कुकल्ळीमध्ये प्रवेश करण्याची तयारी करीत होते. कुकल्ळीच्या हिंदु पुढाऱ्यांचा आपण काटा काढला असल्याने निर्णायक हिंदू आपणास संघटीतपणे प्रतिकार करू शकणार नाहीत, अशी त्यांची समजूत झाली होती.

अनुक्रमणिका

दि. ९ जुलै १५८३ रोजी पाद्र्यांची तुकडी आणि पोर्तुगीज सैन्य कुकल्ली गावच्या हद्दीत शिरले. त्यानी भिवसा येथील महादेवाचे मंदिर भ्रष्ट करून 'असणी कट्टा' येथील रामाच्या देवळा समोरील तलावात गायीच्या आंतड्या टाकून ते तीर्थ भ्रष्ट केले. नंतर दोन्ही मंदिराना त्यानी आग लावून दिली. या अत्याचाराची वार्ता गावात पसरताच सर्व लोक मिळेल ते हत्यार घेऊन आक्रमकांच्या प्रतिकारासाठी धावले. 'झुंजागाळ' या नावाचे ठिकाणी उभयपक्षांत तुंबळ लढाई झाली. तीत पोर्तुगीजांकडील २०० ठार होऊन अनेक जखमी झाले. हिंदूचे १५० ठार झाले. पोर्तुगीजानी माघार घेऊन पांजरखण येथे तळ ठोकला. 'झुंजागाळ' हे रण मैदान शत्रूच्या रक्ताने न्हावून निघाल्याने कुकल्लीच्या इतिहासात अमर झाले.

पोर्तुगीजानी पराभूत होऊन माघार घेतली असली, तरी तो पराभव पत्करून ते स्वस्थ बसण्यास तयार नव्हते. कुकल्लीकर आणि वेरडेकर देसायानी त्यांच्या तळावर चोरटे हल्ले चढवून त्याना हैराण केले, तरी त्यानी पांजरखण येथील तळ हलविला नाही. ते कुमकेची वाट पाहात होते. ती कुमक एकदाची आली आणि त्यानी कुकल्लीवर पुनः चाल केली. सर्वांसमोर 'बेर्नू' या नावाचा इटालियन मिशनरी जात होता. त्याने आपला मोहरा कुकल्लीच्या देसायांची कुळावी देवी शांतादुर्गा हिच्या 'तळयेभाट' येथील मंदिराकडे वळविला. मंदिराच्या रक्षणार्थ शेकडो हिंदू सैनिक छातीचा कोट करून पोर्तुगीज आक्रमकांची मार्ग प्रतिक्षा करीत होते. पायघोळ झगा घातलेला 'बेर्नू' समोर दिसताच एक कुऱ्हाड घेतलेला हिंदू सैनिक त्वेषाने पुढे सरसावला व त्याने बेर्नूच्या मस्तकावर कुऱ्हाडीचा वार करून देवी शांता दुर्गेच्या मंदिरासमोरील प्रांगण त्याच्या रक्ताने भिजविले. या हिंदू सैनिकाचे नाव यशवंत ऊर्फ येसू नाईक असून तो ९५ वर्षांचा वृद्ध होता. केवळ धर्म रक्षणाची वीरश्री अंगात संचारल्याने तो पाद्र्यांचा समाचार घेण्यासाठी म्हणून आला होता. परंतु 'बेर्नूला' ठार करून त्याचा आवेश उतरला नाही. त्याने आणखी दहा पंधरा आक्रमकाना आपल्या कुऱ्हाडीने लोळविले.

'शांतादुर्गा की जय' 'खंडेराय की जय' अशा गर्जना करीत हिंदू सैन्य पोर्तुगीजांवर आणि मिशनऱ्यांवर तुटून पडले. या धुमश्चक्रीत तेरा मिशनरी आणि अनेक पोर्तुगीज सैनिक ठार आणि जखमी झाले. हिंदूचा जोर झाल्याने त्याना माघार घ्यावी लागली. वरील लढाई चालू होती, ते हा काही मिशनरी गावात शिरून हिंदूंच्या घरांवर गायीच्या मांसांचे तुकडे टाकीत हिंडत होते. पोर्तुगीज सैन्य पळून गेल्यावर या मिशनऱ्याना हिंदूनी हुडकून काढून त्याना तिठ्यावर नेऊन ठार केले. त्यांची प्रेते त्यानीच भ्रष्ट केलेल्या असणी कट्टा येथील रामाच्या मंदिरा समोरच्या तीर्थात फेकून देण्यात आली.

कुकळ्ळीच्या धर्मयुद्धात एकूण १७ मिशनरी ठार आले. ते हुतात्मे झाल्याचे पोपने नंतर एक आज्ञापत्र काढून जाहीर केले. त्यांच्या हौतात्म्याचा स्मृतिदिन आजही गोव्यातील मिशनरी दरवर्षी पाळतात. परंतु पोर्तुगीजांच्या दगाबाजीला बळी पडलेले हिंदू पुढारी मात्र विस्मृतीच्या दरीत लुप्त झाले, दोन पराभव पत्करले. तरी पोर्तुगीज सैन्य आणि मिशनरी नाउमेद झाले नाहीत. ते आता पुरते हट्टास पेटले होते. दि. १५ जुलै १५८३ या दिवशी ते मोठ्या संख्येने कुकल्लीवर तिसऱ्यांदा चालून आले. परंतु हिंदू आता थकले होते. त्याना बाहेरून कुमक येण्याची आशा नव्हती. त्यानी कुकल्लीचा कोट खाली करून आपल्या बायकामुलांसह आदिलशाही अमलाखालच्या बाळ्ळी महालात स्थलांतर केले. ते स्वस्थ बसले नाहीत. बाळ्ळी महालातील जंगलांचा आणि टेकड्यांचा आश्रय घेऊन त्यानी पोर्तुगीजांशी गनिमी युद्ध सुरू केले.

कुकल्ली गाव ओस पडले. तेथील शेते ओस पडली. पोर्तुगीज आक्रमकानी नारळीच्या बागा ताब्यात घेऊन काही दिवस शाहाळ्यांवर गुजराणा केली. पण गावे ओस पडल्याने गावात राहून काय फायदा

अनुक्रमणिका

होता? निर्मनुष्य गावात वास्तव्य करण्यासही त्याना भीति वाटत होती. अधून मधून कुकल्लीकर देसाई अंधाऱ्या रात्री भुतांसारखे येऊन त्यांच्यावर छापे घालून पसार होत. त्या चोरट्या हल्ल्यानी ते हैराण झाले होते. त्यांचे नैतिक धैर्य खचत चालले होते.

कुकल्लीचे धर्मयुद्ध तब्बल नऊ वर्षे चालले. कुकल्लीकर देसायानी ते रानावनाचा आश्रय घेऊन लढविले.

कुकल्ली ओस पडल्याची बातमी पोर्तुगालला कळली तेव्हा तेथील राज्यकर्त्यांना शहाणपण सुचले. त्यानी 'ज्युआंव द सिल्वा' या नावाच्या एका चतुर आणि विद्वान अधिकाऱ्यास कुकल्लीकर देसायांशी समेटाच्या वाटाघाटी करण्यासाठी गोव्यास पाठविले. कुकल्लीकर देसायाना चुचकारुन त्याना कुकल्लीत येऊन राहाण्यास प्रवृत्त करणे ही त्याची मुख्य कामगिरी होती. तो कुकल्लीस येऊन दाखल झाला. त्याने पहिले काम कोणते केले असेल तर ते कुकल्लीचा कोट पोर्तुगीज सैन्यास खाली करावयास लावून मिशनऱ्यांच्या धर्मांतराच्या कार्यावर बंदी घालण्याचे. नंतर त्याने मध्यस्थ लोकांना कुकल्लीकर देसायांकडे धाडून त्याना कुकल्लीस येऊन राहाण्यास प्रवृत्त केले. परंतु पोर्तुगीजांच्या दगलबाजीस पुनः बळी पडण्यास देसाई मंडळी तयार नव्हती. तरीही त्यांचे मन वळविण्याची चिकाटी द सिल्वाने सोडली नाही.

सिल्वाच्या चिकाटीला यश आले. त्याच्या प्रामाणिकपणावर कुकल्लीकर देसायांचा विश्वास बसून ते कुकल्लीला माघारा परतण्यास तयार झाले. परंतु तत्पूर्वी सिल्वाचा आणि आपला एक लेखी करार व्हावा अशी सूचना त्यानी केली. ती सिल्वाने मान्य केली. कुकल्लीत मिशनऱ्यानी धर्मान्तर करायचे नाही; हिंदूच्या आचार विचारांवर निर्बंध लादायचे नाहीत, त्यांचे धर्मस्वातंत्र्य अबाधित राखायचे; देसायांची कुळावी देवी शांतादुर्गा हिच्या सेवेकऱ्याच्या जमिनी त्याना परत करणे; देवीच्या दिवाबत्तीसाठी सालीना दोन मण तेल देणे; श्रावण महिन्यातील देवीची रंगपूजा सरकारी खर्चाने बांधणे; गावच्या शेतजमिनी ठराविक कर आकारून देसाई गावकरांखेरीज आणखी कुणाला न देणे; ह्या अटी मंडळीने द सिल्वाला सादर केल्या. त्या त्याने मान्य केल्या. नंतर लेखी करार झाला. त्याचे नाव कॉंप्रोमिस अथवा समझोता हे आहे. तो चारशे वर्षाचा ऐतिहासिक दस्तऐवज अद्याप सुरक्षित आहे.

इंक्विझिशनच्या अतिरेकाच्या बातम्या पोर्तुगालला जाऊ लागल्याने पोर्तुगालचा राजा आणि त्याचे समंजस सल्लागार अस्वस्थ होत होते. इंक्विझिशनच्या कारवायाना आळा घातला पाहिजे असे त्याना मनोमन वाटू लागले होते. तद्नुसार पोर्तुगालच्या राजाने आपल्या व्हिसेरेइना इंक्विझिशनला सबुरीने वागण्याचा सल्ला देण्याचा हुकूम केला.

इ. स. १६७९ साली दो पेद्रु द अल्मैद या नावाचा नवीन व्हिसेरेई गोव्यात आला. त्याने हिंदूवरील कडक निर्बंध ढिले केले. हिंदूना तोपर्यंत विवाहविधी गावाबाहेर पाडावे लागत होते. त्याने हे विधी बंदिस्त घरांमध्ये पार पाडण्याची सवलत जाहीर केली. मात्र एक हत्यारी पहारेकरी दाराबाहेर ठेवला पाहिजे, अशी अट घातली. लग्न समारंभात होमहवनासारखे विधी करायचे नाहीत, हा जो निर्बंध होता त्याचे हिंदूकडून पालन होते की नाही ते बघण्याचे काम ह्या पहारेकऱ्याचे होते.

वरील निर्बंधाविरूद्ध तक्रार करून हिंदूनी पोर्तुगालच्या राजास अर्जांवर अर्ज पाठविण्याचा सपाटा सुरू केला. त्याला यश येऊन पोर्तुगालच्या राजाने दि. ४ मार्च १७०१ रोजी एका आज्ञापत्रानुसार जाहीर

केले की, हिंदूना चार भिंतीच्या आत होमहवनाधि विधीनुसार लग्ने लावण्याची मूभा राहील. परंतु ही सवलत इंक्विझिशनच्या नियमाना बाधक होती म्हणून गोव्याच्या व्हिसेरेइने पोर्तुगालच्या राजास तसे कळविले. पोर्तुगालांत इंक्विझिशनचा वरचश्मा असल्याने पोर्तुगालच्या राजास त्याचा विरोध पत्करणे अशक्य होते. म्हणून त्याने दि. ४ मार्च १७०१ चे आज्ञापत्र रद्दबातल ठरविले.

दि. ३ मार्च १७१५ रोजी पोर्तुगालचा राजा दों ज्युआव याने इंक्विझिशनच्या जाचक निर्बंधांबाबत गोव्याच्या व्हिसेरेइला लिहिले : 'माझ्या राज्यातील हिंदूना बंद घरांमध्ये विवाहविधी पार पाडण्याची जी सवलत होती तिचा उपसर्ग कॅथलिकाना कसा होतो? इंक्विझिशनकडून हिंदूचा छळ होत आहे. त्याना तुरुंगवासासारखी शिक्षा देण्यात येत असल्याने त्यानी मोठ्या प्रमाणात स्थलांतर सुरू केले आहे. त्याचा अनिष्ट परिणाम तेथील अर्थ व्यवस्थेवर होत आहे. गावची गावे ओस पडत आहेत, असे मला कळले आहे. तरी वस्तुस्थितीचा सविस्तर अहवाल मला सादर करावा.' व्हिसेरेइने राजास उत्तर धाडले की, इंक्विझिशनकडून अतिरेक होत आहे, असे मला वाटत नाही. इंक्विझिशनच्या दडपणास बळी पडून व्हिसेरेइने हे खोटे उत्तर धाडले, यांत शंका नाही.

पोर्तुगीजांची अरेरावी आणि त्यांची आक्रमणे दख्खनमध्ये बिनविरोध चालू होती का? असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविकच आहे. त्याला उत्तर देता येईल की, दख्खनमधील देशी सत्ताधाऱ्यानी पोर्तुगीजांना हाकलून लावण्याचा प्रयत्न केला होता.

इ. स. १५५८ साली विजापूरचा बादशहा दुसरा अली आदिलशहा, अहमदनगरचा बादशाहा मूर्तजा निजामशहा व कालिकतचा राजा सामुरी या तिघानी एकत्र येऊन पोर्तुगीजांचा पाडाव करण्याचा एक प्रयत्न केला होता. अली आदिलशहाने गोव्यावर एक लक्ष सैन्यासह स्वारी केली होती, तर मूर्तजा निजामशहाने चौलवर सैन्य धाडले होते. मलबारांत सामुरीने तिसरी आघाडी उघडली होती. परंतु या तिघांही सत्ताधाऱ्यांपाशी पोर्तुगीजांची कोंडी करू शकणारे बलाढ्य आरमार नसल्याने पोर्तुगीजाना हिंदुस्थानातून हुसकून लावण्याचे त्यांचे प्रयत्न यशस्वी होऊ शकले नाहीत. तरीही सामुरीच्या सैन्याने 'चाले' येथील पोर्तुगीज शिबंदीला शरणागती पत्करण्यास लावले. अली आदिलशहाची गोव्यावरील स्वारी फसली, तर मूर्तजा निजामशहाचे सैन्य चौलचा पाडाव करू शकले नाही. त्यामुळे दोघानाही पोर्तुगीजांशी तह करावा लागला.

इ. स. १५७८ साली पोर्तुगालचा राजा दों. संबास्तियाप आफ्रिकेत 'आल्कासेर द किबीर' नावाच्या लढाईत बेपत्ता झाला. त्याचे संपूर्ण सैन्य गारद झाले. तो आविवाहित असल्याने पोर्तुगीज वारसाहक्काच्या कायद्यानुसार त्याची स्पेनचा राजा दुसरा फिलिप याच्याकडे गेली. तो पोर्तुगीज राजघराण्यातला नातू होता. त्याने इ. स. १५८० साली पोर्तुगाल स्पेनला जोडून टाकले. ते इ. स. १६४० पर्यंत तब्बल ६० वर्षे स्पॅनिश अमलाखाली होते.

पोर्तुगालवर स्पेनची राजवट आली तरी स्पेनचे राजे कडवे कॅथलिक असल्याने त्यांचा गोव्यातील हिंदुविषयीच्या धोरणात बदल झाला नाही. पोर्तुगालप्रमाणेच स्पेन मध्येही इंक्विझिनशचा प्रभाव होता. पोर्तुगालहून जे व्हिसेरेइ आणि बडे अधिकारी हिंदुस्थानात येत त्याना इंक्विझिशनचे लांगूल चालन केल्याखेरीज आपले आसन टिकविता येत नसे. आता त्याना कामही विशेष नव्हते. गोवा, दमण, दीव,

अनुक्रमणिका

वसई, चौल वगैरे बंदरांचे रक्षण करणे व इंक्विझिशनच्या आज्ञेनुसार हिंदूचा छळ करणे एवढेच काम त्याना आता उरले होते.

अनुक्रमणिका

# ५. उतरती कळा

स्पेनचा राजा दुसरा फिलिप याला वारसा हक्कानुसार पोर्तुगालचे राजसिंहासन प्राप्त झाले असले तरी त्याने दोन्ही देशांच्या वसाहतींचा कारभार पृथकपणे चालविला होता. पोर्तुगीज वसाहतींचा कारभार चालविण्यासाठी त्याने स्पॅनिश अधिकारी न नेमता पोर्तुगीज अधिकारीच नेमले. फार कशाला, दोन्ही देशांच्या वसाहतीमध्ये व्यापाराची देवाण घेवाण करण्यास देखील त्याने मान्यता दिली नाही. त्याच्या या धोरणामागे कोणता उद्देश होता ते शेवटपर्यंत स्पष्ट झाले नाही. मात्र डच लोकांचे वेस्टइंडीजमध्ये प्राबल्य निर्माण झाले तेव्हा त्याने डचांना विरोध करण्यासाठी दोन्ही देशांच्या आरमाराची व सैन्याची संयुक्त फळी निर्माण करण्यास संमती दर्शविली.

सोळाव्या शतका अखेर पोर्तुगीज आरमाराला आव्हान देऊ शकणारी सागरी सत्ता हिंदी महासागरात अन्य कोणती नव्हती. इ. स. १६०० साली इग्लंडची ईस्ट इंडिया कंपनी सुरू झाली. तद्नंतर तीन वर्षानी म्हणजे इ. स. १६०३ साली डच ईस्ट इंडिया कंपनीच्या आरमारी नौका हिंदी महासागरांत संचार करू लागल्या. या दोन्ही देशांच्या आरमाराना पोर्तुगीज आरमाराला तोंड देणे भाग पडले. तोपर्यंत पोर्तुगीज व्यापाऱ्यानी हिंदुस्थानात आणि पूर्वेकडील देशांत व्यापार करून अलोट संपती संपादन केली होती. इंग्रजानी आणि डचानी आपल्या व्यापारी कंपन्या स्थापन केल्या, त्या मागे पोर्तुगीजांप्रमाणे हिंदुस्थानात आणि पूर्वेकडील देशात व्यापार करून पैसा मिळविणे हाच उद्देश होता. मात्र पोर्तुगीजांप्रमाणे धर्म प्रसार करण्याचे त्यांचे धोरण नव्हते. ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाल्यावर इंग्रज व्यापारी हिंदुस्थानात येऊ लागले. त्यानी मोगल बादशहाची परवानगी घेऊन सुरत बंदरात एक व्यापारी वखार उघडली. परंतु पोर्तुगालचा राजा आपण हिंदी महासागराचा स्वामी म्हणवून घेत असल्याने पोर्तुगीज अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय अन्य राष्ट्रांच्या जहाजाना हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर संचार करता येत नव्हता. पोर्तुगीजांच्या ह्या दंडलेलीला इंग्रजानी आव्हान देण्याचे ठरविले. इ. स. १६२० सालच्या नवंबर महिन्यात 'हार्ट' आणि 'ईगल' या नावाच्या दोन ब्रिटिश नौका पोर्तुगीजांचे परवाने न घेता सुरत बंदराकडे निघाल्या असता पोर्तुगीज युद्धनौकानी त्याना हटकले. त्या दोन्ही नौकानी पोर्तुगीजांशी संघर्ष टाळून माघार घेतली. परंतु लवकरच त्याना 'लंडन' आणि 'रोएबक' ह्या युद्धनौका येऊन मिळाल्या. ह्या चारही नौकानी पोर्तुगीज आरमाराला आव्हान देण्याचे ठरविले. दि. १७ डिसेंबर १६२० रोजी ब्रिटिश आणि पोर्तुगीज युद्धनौकांची लढाई होऊन पोर्तुगीज युद्धनौकांचा पराभव झाला. परंतु तो मान्य करून पोर्तुगीज आरमारी अधिकारी गप्प बसले नाहीत. त्यानी इंग्रज युद्ध नौकांकडून झालेल्या पराभवाचा बदला घेण्याचे ठरविले. दि. २८ डिसेंबर १६२० रोजी पोर्तुगीज आरमाराची आणि ब्रिटिश आरमाराची पुनः गाठ पडून लढाईस तोंड फुटले. पोर्तुगीज आरमाराचा या लढाईत सपशेल पराभव झाला. त्याची फलश्रुती म्हणजे पोर्तुगीजांचे हिंदी महासागरावरील स्वयंभू स्वामित्व संपुष्टात येऊन इंग्रजांचा वरचश्मा सुरू झाला. इंग्रज युद्धनौका आता मिळेल त्या ठिकाणी पोर्तुगीज युद्धनौकावर हल्ले चढवू लागल्या. पोर्तुगीजांकडून डचांचाहि अधिक्षेप झाला होता, म्हणून तेही इंग्रजाना पोर्तुगीजांविरूद्ध मदत करू लागले. किंबहुना पोर्तुगीजांचे हिंदी महासागरांतील वर्चस्व नष्ट करणे हे इंग्रज आणि डच ह्या दोघांचेही उद्दीष्ट असल्याने त्यानी पोर्तुगीजांविरूद्ध संयुक्त मोहिम सुरू केली असल्यास नवल नव्हते.

इ स. १६२३ च्या जानेवारीत इंग्रज आणि डच युद्धनौकानी गोवा बंदराची कोंडी केली. नंतर ती उठविण्यात आली तरी, तरी चकमकी चालूच राहिल्या. इ. स. १६२४-२५ च्या दरम्यान इंग्रज आणि डच युद्धनौकानी एका पोर्तुगीज आरमारी तुकडीला अरबी समुद्रात गाठून तिच्यावर हल्ला चढविला. उभय

अनुक्रमणिका

पक्षांची या लढाईत मोठीच हानी झाली. तदनंतर आणखी तीन आरमारी लढाया झाल्या. त्या अनिर्णित राहिल्या. परंतु प्राणहानी अतोनात झाली. त्यादरम्यान इंग्रज आणि डच या दोघांचे सामर्थ्य वाढत होते, तर पोर्तुगीजांचे कमी होत होते. इ. स. १६३४ ते १६४० या दरम्यानच्या काळात डचानी पोर्तुगीजांचा एवढा पिच्छा पुरविला की, पर्शियन आखातांपासून जपानपर्यंतच्या प्रदेशांतून त्यानी पोर्तुगीजांची पुरतीच हकालपट्टी केली. इ. स. १६४१ साली मलाया द्विपकल्पातील पोर्तुगीजांचा सिंगापूर हा शेवटचा बाले किल्ला डचांचे हाती पडला. तसेच इ. स. १६५८ साली डचानी पोर्तुगीजांना सिलोनमधून हुसकून लावले. इ. स. १६६३ साली डचानी मलबार किनाऱ्यावरील कोचिनचे ठाणे घेतले.

डचांनी अल्पावधीतच पोर्तुगीजांवर जे विजय मिळविले त्याची कारणे पुढील प्रमाणे होती : श्रेष्ठ दर्जाची आर्थिक साधने, श्रेष्ठ दर्जाचे मनुष्य बल, श्रेष्ठ दर्जाची आरमारी सामर्थ्य. याच्या उलट पोर्तुगालची सर्व बाबतीत पिच्छेहाट होत होती. सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धाअखेर ते एक शक्तीहीन राष्ट्र बनले होते. उणी पुरी पाऊणशे वर्षे पोर्तुगीज नावाडी समुद्रात संचार करीत होते. पॅसिफिक आणि हिंदी महासागरात ते बलवान होते. अनेक ठिकाणी वसाहती स्थापन करण्याचा प्रयत्न केल्याने त्यांची पुष्कळ प्राणहानी झाली होती. आफ्रिकेतील लष्करी मोहिमात असंख्य पोर्तुगीज सैनिक कामास आले होते. मनुष्यबलाप्रमाणेच द्रव्याचीही हानी अतोनात झाली होती. याच्या उलट डच आणि इंग्रज नावाडी पोर्तुगीजांच्या मानाने ताज्या दमाचे होते. पोर्तुगीजांनंतर शंभर वर्षांनी ते आपल्या देशाबाहेर पडले असल्याने त्यांची प्राणहानी पोर्तुगीजांच्या इतकी झाली नाही.

सोळाव्या शतकाच्या पूर्वाधांत पोर्तुगाल आणि हॉलंड ह्या दोन्ही देशांची लोकसंख्या अनुक्रमे पंधरा आणि साडेबारा लक्ष होती. डचांची लोकसंख्या पोर्तुगीजांच्याहून अडीच लक्षानी कमी असली, तरी उपरिनिर्दिषप्रमाणे ते ताज्या दमाचे होते. शिवाय त्यांच्या आरमारांत आणि सैन्यात जर्मनी, स्वीडन, नार्वे, डेन्मार्क वगैरे देशांतील भाडोत्री सैनिक भरती झाले होते.

इ. स. १६३३ साली पोर्तुगीजांच्या प्रतिस्पर्ध्यात आणखी एकाची भर पडली. आणि ते म्हणजे फ्रेंच. परंतु इंग्रज आणि डच याच्या मानाने फ्रेंचाकडून पोर्तुगीजांची विशेष हानी झाली नाही. तरीही त्यांची पिच्छेहाट थांबली नाही. शहाजहान बादशहाने बंगालमधून त्यांची हकालपट्टी केल्याने हिंदुस्थानातील त्यांची उरली सुरली पत गेली.

इ. स. १६५२ साली बेदनूरचा राजा शिवाप्पा नायक आणि पोर्तुगीज यांचे वितुष्ट आल्याने त्याची परिणती युद्धात झाली. पोर्तुगीजानी बेदनूर राज्यातील भाउबंदकी साधून त्या राज्याची मंगळूर, होनावर, बारकूर आदि बंदरे व्यापिली. परंतु शिवाप्पा नायकाने मंगळूर आणि होनावर ही दोन्ही बंदरे पोर्तुगीजांकडून त्याच वर्षी परत घेतली. शिवाप्पा नायकाचा समाचार घेण्यासाठी एक पोर्तुगीज आरमारी तुकडी बेदनूरला पाठविण्यात आली. परंतु बेदनूरच्या ठाण्यावर तोफा डागण्यापलिकडे ही आरमारी तुकडी आणखी काही करू शकली नाही.

इ. स. १६५४ साली विजापूरच्या सैन्याने बार्देश प्रांतावर स्वारी केली. सुमारे सत्यांशी वर्षाच्या शांततेनंतर हे युद्ध पेटत होते. विजापूरच्या सैन्याने पोर्तुगीजांची काही ठाणी घेतली. परंतु पोर्तुगीजानी चढाई करण्याची तयारी सुरू केल्याची बातमी कळताच आदिलशहाने आपल्या सैन्यास गोव्यातून माघार घेण्याचा हुकूम केला. उभय पक्षांमध्ये नंतर एक तह झाला. तथापि तो फार दिवस टिकला नाही. इ. स.

१६५९ साली आदिलशाही सैन्य गोव्यात परत घुसले. परंतु या वेळी त्याला कसून प्रतिकार झाला. पोर्तुगीजानी स्वारीचा सुगावा लागल्याने युद्धाची तयारी केली होती. मडगाव येथे उभय फौजांची लढाई होऊन तीत विजापूरच्या सैन्याचा सपशेल पराभव झाला. त्याने गोव्यातून काढता पाय घेतला.

मागे आलेच आहे की, इंग्रजानी पोर्तुगीजांचा सर्वत्र पिच्छा पुरविला होता. त्याना स्वतःच्या हिमतीने तोंड देणे पोर्तुगीजाना कठीण गेल्याने त्याना समेट करावा लागला. इ. स. १६६१ साली इंग्रज आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये मैत्रीच्या वाटाघाटी सुरू झाल्या. पोर्तुगालच्या राजाने इंग्लंडची सदिच्छा संपादन करण्यासाठी आपली कन्या कॅथरिना ही इंग्लंडचा राजा दुसरा चार्लस याला देण्याचे ठरविले. दि. २३ जून १६६१ या दिवशी विवाहाचा करार पार पडला. पोर्तुगालच्या राजाने आंदण म्हणून मुंबई बेट इंग्लंडच्या राजास बहाल केले. शिवाय वीस लक्ष पोर्तुगीज 'कुझादशू' आणि आफ्रिकेतील 'टंजियर' शहरही दिले.

वरील विवाह यशस्वी झाला नाही. त्याचे कारण म्हणजे इंग्लंडचा राजा चार्लस दुसरा हा प्रॉटेस्टंट तर कॅथरिना ही कॅथलिक होती. परंतु विवाहाच्या कराराप्रमाणे मुंबई बेट इंग्लंडच्या राजास मिळालेच. हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील हे सागरी महत्त्वाचे ठिकाण पोर्तुगीजांच्या हातचे गेल्यास हिंदुस्थानांतील पोर्तुगीज हितसंबंधावर अनिष्ट परिणाम होतील, अशा आशयाचे कळकळीचे पत्र गोव्याच्या व्हिसेरेइ लुईज द मेंदोंस फुर्तादि याने आपल्या राजास लिहिले होते. इतकेच नव्हे गोव्याचा गव्हर्नर आंतोनियु मेलू द काश्त्रु याने मुंबईचे हस्तांतर करण्यासही नकार दिला होता. परंतु राजाची आज्ञा त्याला अखेर मान्य करावी लागली. मुंबईच्या हस्तांतराचा औपचारिक समारंभ दि. १८ जानेवारी १६६५ या दिवशी पार पडला.

# ६. मराठा-पोर्तुगीज संबंध : शिवाजी

मराठा–पोर्तुगीज संबंधाची सुरुवात शिवाजी महाराजांच्यापासून झाली हे जरी खरे असले तरी महाराजांचे पिते शहाजीराजे हे निजामशाही सरदार होते. तेव्हा त्यांचा आणि पोर्तुगीजांचा संबंध आला होता. शहाजीराजे आदिलशाहीत गेल्यावर हा संबंध दृढ झाला. गोव्याचा व्हिसेरेइ दो ब्राझ द काश्त्रु व गव्हर्नर आंतोनियु मेलु द काश्त्रु या दोघांशी शहाजे राजे यांचा पत्रव्यवहार होता. परंतु तो केवळ औपचारिक स्वरुपाचा होता. मराठे आणि पोर्तुगीज यांच्या मध्ये राजकीय पातळीवर संबंध निर्माण झाला तो शिवाजी महाराजानी स्वराज्याची स्थापना केल्यावर.

शिवाजी महाराजानी उत्तर कोकणवर इ. स. १६५८ साली स्वारी केली तेव्हा पोर्तुगीजांशी त्यांचा प्रत्यक्ष संबंध आला. त्यांच्या सैन्याकडून पोर्तुगीजांच्या ताब्यांतील दमण आणि चौल ह्या ठाण्यांत अतिक्रमण झाल्याबद्दल त्यानी महाराजाकडे निषेध नोंदविला होता. परंतु महाराजानी या निषेधाची दखल घेतली असल्याचा पुरावा उपलब्ध नाही. पण गोव्याचे हंगामी गव्हर्नर फ्रान्सिश्कु द काश्त्रु व आंतोनियु द सौझ कौतिन्यु या दोघानी हिंदुस्थानातील राजकीय घडामोडीचा आढावा घेऊन दि. १५ मे १६५८ या दिवशी पोर्तुगालच्या राजास लिहिलेल्या पत्रात शिवाजी महाराजांच्या लष्करी हालचालीचा उल्लेख केला आहे. ते म्हणतात :

‘......आदिलशहाचा एक जुना सरदार शहाजी याचा पुत्र शिवाजी याने आदिलशहाविरुद्ध बंड करून त्याचा प्रदेश घेण्याचा सपाटा सुरू केला आहे.’

इ. स. १६५९ साली शिवाजी महाराजानी पेण येथे आरमारी जहाजे बांधण्याची एक गोदी सुरू करून काही पोर्तुगीज कारागिराना नोकरीस ठेवले. परंतु ह्या युद्धनौका बांधून झाल्या, तर त्यांचा उपयोग शिवाजी महाराज आपणाविरुद्ध करतील या भीतीने वसई येथील पोर्तुगीज अधिकाऱ्यानी पोर्तुगीज कारागिराना शिवाजी महाराजांची नोकरी सोडण्याची चिथावणी दिली. वसईच्या कॅप्टनने गोव्याच्या हंगामी गव्हर्नरानाही पत्र पाठवून या गंभीर बाबीचा विचार करण्याची विनंती केली. त्या पत्राबाबत विचार विनिमय करून आवश्यक ती कारवाई करण्याचा निर्णय घेण्यासाठी दि. १९ जुलै १६५९ या दिवशी गोव्याच्या राज्यसल्लागार मंडळाची बैठक भरली. बैठकीसमोर वसईच्या कॅप्टनचे पत्र वाचण्यात आले. तो लिहित होता :

‘...शिवाजी राजे यानी दांड्याच्या सिद्दीशी युद्ध करण्याच्या इराद्याने भिवंडी, कल्याण आणि पेण या तीन ठिकाणी वीस युद्धनौका बांधावयास घेतल्या असून हे काम त्याने रुइ लैतांव द व्हिएगश (Ruy Leitao de Viegas) याच्याकडे सुपूर्त केले आहे. ह्या आरमारासाठी जे लाकूड लागणार आहे ते आमच्या हद्दीतून नेण्याची परवानगी देणे त्याने मागितली आहे. परंतु ही परवानगी देणे आमच्या हिताचे नाही. कारण, त्यानी युद्धनौका बांधल्या, तर त्यांच्या आरमारी सामर्थ्यात मोठी भर पडून ते बलाढ्य होतील. त्यांच्याशी आमचे सांप्रत मैत्रीचे संबंध असले, तरी ते टिकावू स्वरुपाचे आहेत असे म्हणता येत नाही. ते तर बिघडले तर त्यांच्यापासून आम्हाला उपसर्ग पोहोचण्यांची भीती आहे. ते लोकाना सांगत आहेत, की हे आरमार आपण सिद्दीशी युद्ध करण्यासाठी बांधीत आहो. पण ते आमच्या साष्टी बेटावर हल्ला करणार नाहीत याची हमी कोण देईल? साष्टी बेटाला ठाणे नदीचे नैसर्गिक संरक्षण आहे. शिवाजीचे आरमार बांधून झाले, तर ठाणे नदीतून आपल्या नौका ते साष्टी बेटापर्यंत पाठवू शकतील. तरी मान्यवर गव्हर्नरांना माझी विनंती आहे, की त्यानी

अनुक्रमणिका

या प्रश्नाबाबत योग्य तो निर्णय घेऊन मला पुढील कारवाईचा आदेश द्यावा. या बाबतीत माझे स्पष्ट मत आहे की, आमचे आरमारी सामर्थ्य मर्यादित आहे. त्याची कल्पना मान्यवर गव्हर्नरानाही आहे. म्हणून शिवाजी राजे यांचे आरमार आमच्या आरमाराहून वरचढ होऊ नये, यास्तव त्यांची आरमार बांधण्याची योजना हाणून पाडली पाहिजे.........'

राज्य सल्लागार मंडळाने वसईच्या कॅप्टनच्या पत्राचा विचार करून गव्हर्नर महाशयाना सल्ला दिला की, 'शिवाजी राजे यांचा आरमाराला ठाणे नदीतून व वसईच्या खाडीतून संचार करण्यास प्रतिबंध करण्याबाबत वसईच्या कॅप्टनला आदेश द्यावा. आणि शिवाजी राजे यानी वसईच्या कॅप्टनची आज्ञा धाब्यावर बसविली, तर त्याना विरोध करण्याची आज्ञा वसईच्या कॅप्टनला द्यावी. दुसरी गोष्ट शिवाजी राजे यांच्या युद्धनौका बांधण्याचे जे काम चालू आहे त्याला प्रतिबंधक करण्यासाठी माजगाव, मुंबई आणि कारंजा येथील युद्धनौका सज्ज कराव्या......'

या प्रकरणी रुइ द लैतांव व्हिएगश याने जे निवेदन दि. ७ अक्टोबर १६५९ रोजी मुंबई येथे केले, ते उपलब्ध आहे. ते असे :

'मी रुइ द लैतांव जाहीर करतो की, मी शिवाजी राजे यांच्याकडे जहाजे बांधण्याच्या कामावर कल्याण येथे होतो. माझ्या हाताखाली काही काळे आणि गोरे लोक होते. शिवाजी राजे यानी पेण येथे आणि अन्यत्र ज्या वीस युद्धनौका बांधावयास घेतल्या होत्या, त्यांचा उपयोग दांड्याच्या सिद्धी विरूद्ध होणार असल्याचे शिवाजी राजे यानी जाहीर केले होते. ह्या कामावर मी देखरेख करीत असता एके दिवशी वसईच्या कॅप्टननी माझ्याकडे ज्युआंव द सालाझार याना पाठवून मला कळविले की, शिवाजी राजे जे आरमार बांधीत आहेत त्याचे काम जर तुम्ही बंद पाडलेत तर तुमच्या हातून तुमच्या देशाची आणि तुमच्या राजाची मोठीच सेवा घडेल. मी माझ्या राजाचा इमानी प्रजाजन असल्याने त्यांच्या हितसंबंधाना बाध येईल असे कृत्य माझ्या हातून होणे इष्ट नाही, असा विचार करून वसईच्या कॅप्टनचा आदेश पाळण्याचे मी ठरविले. माझ्या हाताखाली गोरे, काळे आणि बायकामुले मिळून चारशे लोक होते. त्यांच्या शिवाय बाटगे लोक होते ते वेगळे. आम्ही सगळ्यानी शिवाजीची नोकरी सोडून इकडे येण्याचा निर्णय घेतला. आम्ही मोठ्या शिताफीने इकडे आलो. या कामी ज्युआंव द सालाझार यानी मोठा धोका पत्करला. निघण्याचा सर्व खर्च मला एकट्यालाच करावा लागला.'

वसईच्या पोर्तुगीज अधिकाऱ्यानी आपल्याकडे काम करणाऱ्या पोर्तुगीज कारागिरांना चिथावणी दिल्याने ते आपणास न सांगता न सावरता मुंबईस पळून गेले, हे शिवाजी महाराजाना कळले. त्या घटनेमुळे पोर्तुगीजांविषयी त्यांच्या मनात प्रतिकूल ग्रह निर्माण झाला. त्याच वर्षी पोर्तुगीज लोक विश्वास ठेवण्याच्या लायकीचे नाहीत हे त्याना आणखी एका प्रसंगावरून पटले. त्यांनी त्या वर्षी जिजिऱ्याच्या सिद्दीवरील मोहीम हाती घेतली असता पोर्तुगीजानी सिद्दीला आतून मदत केल्याने ती अयशस्वी झाली. शिवाजी महाराजानी व्हिसेरेइकडे तक्रार केली. प्रत्युत्तर आले की, सिद्दीला आपण दारूगोळ्याची अथवा अन्न पुरवठ्याची मदत करीत नाही. परंतु चोरून मदत पाठविणे चालूच राहिले.

इ. स. १६६१ साली शिवाजी महाराजानी कुडाळवर स्वारी केली तेव्हा त्यांचे सैन्य गोव्याच्या हद्दीवर आले. इतके दिवस पोर्तुगीजाची भूमिका नुसती बघ्याची होती. आता शिवाजी महाराज त्यांचे शेजारी बनले. त्यांचा वचक त्याना वाटत होताच. आता ते जवळ आल्याने त्यांच्याशी मैत्रीचे संबंध ठेवणे

आपल्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हिताचे आहे असे त्याना वाटल्याने इ. स. १६६३ सालच्या एप्रिल महिन्यात गव्हर्नर आंतोनियु द मेलू द काश्त्रु याने शिवाजी महाराजाना एक पत्र पाठवून त्यांच्याशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याची इच्छा दर्शविली.

उपरिनिर्दिष्ट पत्रानुसार पोर्तुगीजांकडचा दों आल्व्हारू द आताईद (Dom Alvaro de Ataide) या नावाचा दूत महाराजांकडे गेला. पण त्याने केलेल्या मैत्रीच्या वाटाघाटीची माहिती पोर्तुगीज अथवा मराठी कागदपत्रात उपलब्ध नाही.

इ. स. १६६४ च्या ऑगस्ट महिन्यात शिवाजी महाराज वरच्या चौलमध्ये पन्नास युद्धनौका बांधित असल्याची बातमी खालच्या चौलच्या पोर्तुगीज कॅप्टनने गोव्याच्या गव्हर्नरला कळवून पुढच्या कारवाईचा हुकूम करावा अशी त्याला विनंती केली. गव्हर्नरने राज्य सल्लागार मंडळाची बैठक बोलावून कौल मागितला. आपल्या प्रास्ताविक भाषणात गव्हर्नर म्हणाला : ‘चौलचे कॅप्टन ज्युआंव बॉर्जिस द सिल्वा यानी कळविले आहे की शिवाजी वरच्या चौलमध्ये पन्नास युद्धनौका बांधित आहे. त्यापैकी सात बांधून तयार असून त्या लवकरच समुद्रात लोटल्या जाणार आहेत. तरी शिवाजीस विरोध करावा की करू नये तत्संबंधीचे आज्ञापत्र त्वरीत पाठवावे. शिवजीस विरोध करायचा झाल्यास चौलच्या किल्ल्यात माणसे कमी असल्याने कुमक धाडावी.’

गव्हर्नरने राज्य सल्लागार मंडळाचे मत अजमावताना वरील प्रश्नासंबंधी आपला अभिप्राय व्यक्त केला. तो म्हणाला की, ‘शिवाजी बलाढ्य असल्याने त्याच्याशी वागताना सबुरीचे धोरण अवलंबिणे आपल्या हिताचे आहे.’ गव्हर्नरच्या या मताला सल्लागार मंडळाच्या सर्व सदस्यानी पाठिंबा दर्शवून शिवाजी महाराजांची कुरापत काढू नये, असे एकमताने ठरविले. मात्र चौलच्या कॅप्टनच्या विनंतीनुसार त्याला कुमक धाडावी, अशी सूचना गव्हर्नरला केली. इ. स. १६६४ च्या डिसेंबर महिन्यात विजापूरचा सरदार खवास खान याची व शिवाजी महाराजांची लढाई कुडाळ नजीक होऊन तीत खवास खानाचा पराभव झाला. ती वार्ता गोव्याच्या व्हिसेरेइला कळताच त्याने पत्र पाठवून शिवाजी महाराजांचे अभिनंदन केले. प्रस्तुतच्या लढाईत कुडाळचा लखम सावंत, पेडणेचा केशव प्रभू आणि केशव नाईक व डिचोलीचा रवळू शेणवी हे चौघे खवास खानाच्या बाजूने महाराजांच्या सैन्याशी लढले असल्याने खानाचा पराभव होताच ते शिवाजी महाराजांच्या भयाने पोर्तुगीजांच्या आश्रयास गेले. परंतु तिकडे ते स्वस्थ बसले नाहीत. त्यानी शिवाजी महाराजांच्या प्रदेशास उपद्रव देण्यास प्रारंभ केला.

इ. स. १६६६ च्या मार्च महिन्यात शिवाजी महाराजानी विजापूरच्या ताब्यात असलेल्या फोंड्याच्या किल्ल्यास वेढा घातला. तो लढविण्यासाठी अंत्रुज महालातील विजापूरच्या अंकित असलेल्या मोकासदार देसायानी पोर्तुगीजांकडे दारूगोळ्यांची आणि शस्त्रास्त्रांची मदत मागितली. देसायांच्या विनंतीचा विचार करण्यासाठी पोर्तुगीज हिंदुस्थानचा कॅप्टन जनरल आंतोनियु द मेलु काश्त्रू याने राज्य सल्लागार मंडळाची बैठक दि. २२ मार्च रोजी बोलाविली. याच बैठकीत चौलच्या कॅप्टनने गव्हर्नरला पाठविलेल्या एका पत्राचाही विचार झाला. चौलचा कॅप्टन पत्रात म्हणत होता की चौल शहरातील व्यापाऱ्यांकडून दोन लक्ष रुपये गोळा करून ते आपणाकडे पाठवावे. आपण ते लवकरच परत करू अशा आशयाचे पत्र शिवाजीने आपणास लिहिले आहे. गव्हर्नरने दोन्ही पत्रे राज्यसल्लागार मंडळासमोर चर्चेसाठी ठेवली. या प्रसंगी केलेल्या भाषणात तो म्हणाला की, ‘शिवाजी उसने घेतलेले दोन लक्ष रुपये परत करू म्हणतो. परंतु त्याच्या आश्वासनावर विश्वास ठेवता येत नाही. फोंड्याच्या किल्ल्याच्या बाबतीत बोलायचे झाल्यास हा

अनुक्रमणिका

किल्ला शिवाजीने घेतला तर, आमच्या साष्टी प्राताला त्याच्यापासून धोका पोहोचेल असे रासईच्या किल्लेदाराचे मत आहे. ते पुढे म्हणतात की, शिवाजीच्या फौजा लुटीच्या आशेने साष्टीत शिरल्या तर त्याना आवरणे कठीण जाईल. म्हणून विजापूरच्या मांडलिक देसायानी आमच्यापाशी दारू गोळ्याची आणि शस्त्रांची जी मदत मागितली आहे, ती त्याना देण्यात यावी, असे रासईच्या किल्लेदाराचे म्हणणे आहे. मात्र ही मदत शापोरा येथे एका निर्जन ठिकाणी शिवाजीला तिचा सुगावा लागणार नाही अशा रीतीने उतरावी, अशी सूचना त्यांनी केली आहे.

राज्य सल्लागार मंडळाने निर्णय दिला की, फोंड्याचा किल्ला लढविण्यासाठी तेथील देसायाना दारू गोळ्याची मदत पाठवावी. चौल प्रकरणी त्यानी गव्हर्नरला सल्ला दिला की, त्या ठाण्याचे शिवाजीच्या संभाव्य हल्ल्यापासून रक्षण करण्यासाठी वसई येथील पायदळाचा एक भाग तिकडे पाठविण्यात यावा. राज्य सल्लागार मंडळाच्या निर्णयानुसार गोव्याच्या गव्हर्नरने फोंड्यास दारूगोळ्याची आणि शस्त्रांची मदत पाठविली. त्या मदतीमुळे किल्ल्यांतील शिबंदीला कुमक येईस्तोवर किल्ला लढविणे शक्य झाले. अखेर विजापूरचा सरदार रुस्तुम जम्मा याने येऊन शिवाजी महाराजाना वेढा उठविण्यास भाग पाडले.

शिवाजी महाराजानी सुरतेवर स्वारी करून मोगल साम्राज्यांतील ह्या अग्रगण्य बंदराची लूट केली, तेव्हा पोर्तुगीजांनी थक्क होऊन तोंडात बोटे घातली. औरंगजेबासारख्या आशियाखंडातील बलाढ्य बादशहाची कुरापत काढण्याचे धाडस तोंपर्यंत कुणालाच झाले नव्हते. ते धाडस शिवाजी महाराजानी केल्याने त्यानी त्यांची तुलना शिकंदर आणि ज्यूलियस सीझर या दोघांशी केली. गोव्याचा गव्हर्नर दि. १८ जानेवारी १६६६ रोजी पोर्तुगालच्या राजास पाठविलेल्या पत्रात सुरतेवरील स्वारीचा उल्लेख करून म्हणतो : ‘शिवाजीने मोगल आणि आदिलशहा या दोघांच्या सैन्यामधून विद्युल्लतेप्रमाणे वाट काढून सुरतेवर हल्ला केला. त्या शहराची त्याने मनसोक्त लूट केली व आमच्याच प्रदेशाच्या हद्दीवरून तो माघारा परतला. सुरतेच्या लुटीमुळे मोगल बादशहा क्रोधविष्ट झाला असून आपला एक अव्वल दर्जाचा सरदार महाराजा जयसिंग याला त्याने शिवाजीवर मोठे सैन्य देऊन पाठविले आहे.’

महाराजा जयसिंगाच्या स्वारीचा तपशील येथे देण्याची आवश्यकता नाही. जयसिंगाशी पुरंदरचा तह करून शिवाजी महाराज औरंगजेबाच्या भेटीस आग्र्यास गेले. दि. १२ मे १९६६ रोजी ते औरंगजेबाच्या दरबारात दाखल झाले व दि. २९ मे ला तुरुंगातून निसटून स्वदेशी परतले. ह्या नाट्यपूर्ण घटनेचा उल्लेख गोव्याच्या व्हिसेरेइने त्या वर्षी पोर्तुगालच्या राजास लिहिलेल्या पत्रात आढळतो. तो म्हणतो :

‘शिवाजी मोगलांच्या तुरुंगातून एका फळांच्या पेटाऱ्यातून निसटला. तब्बल छत्तीस तास तो ह्या बंद पेटाऱ्यात होता. ज्या दिवशी तो आपला राज्यात येऊन दाखल झाला, त्याच दिवशी त्याने वाडीच्या सावंतांवर सैन्य धाडले. आदिलशहाने त्याच्या समाचारास चाळीस हजार घोडदळ आणि मोठे पायदळ रवाना केले. हे सैन्य घाट उतरून कोकणात शिरले. गोव्यापासून ते अवघे सहा कोसांवर होते. शिवाजीने ह्या सैन्याच्या सेनापतीस मोठी लांच चारून त्याला माघार घ्यावयास लावले. हा सेनापती मग आपल्याच राजाच्या मुलुखाची जाळपोळ करीत परत गेला. शिवाजीने कोकणात शिरून आदिलशहाच्या सरदारास त्याने जेवढी लांच चारली होती, त्याच्या दुप्पट पैसा त्याने वसूल केला. त्याने कोकणातील अनेक देसायाना आपल्या अंकित केले असून आता त्याचे सैन्य आमच्या हद्दीवर येऊन दाखल झाले आहे. या सैन्याच्या सेनापतीचे आणि आमचे दळणवळण चालू आहे. शिवाजीचे चातुर्य, त्याचा पराक्रम, त्याच्या हालचाली आणि त्याचे लष्करी डावपेच पाहून त्याची तुलना करायची झाल्यास ती सीझर आणि सिकंदर

यांच्याशी करावी लागेल, आणि शेवटी हा मनुष्य सगळीकडेच आहे. त्याचे निश्चित ठिकाण अमूकच असे नाही. तो संबंध आशियाशी युद्ध करीत आहे.

मोगल बादशहाचे सैन्य लक्षावधी आहे. पण ह्या सैन्याच्या नाकावर टिच्चून शिवाजीने सुरत शहर लुटले. त्याच्या समुद्रावरील सैन्याची देखील मला भीती वाटते. त्याच्या युद्धनौका मोठ्या नाहीत, पण त्या पुष्कळ आहेत. शिवाजी महाराजानी आदिलशाही सरदारास लांच चारून त्याला माघार घ्यावयास लावले, असे गोव्याचा गव्हर्नर पोर्तुगालच्या राजास लिहिलेल्या पत्रात म्हणत असला, तरी मराठी कागदपत्रात तसा उल्लेख कुठेच आढळत नाही. मात्र महाराजानी कुडाळच्या देसायाना आपले स्वामित्व पत्करण्यास लावले हे खरे. त्यांनी त्यांच्याकडून निष्ठेची शपथ घेतली, पण तिचे पालन मात्र त्यानी केले नाही. त्याचे कारण असे की, विजापूरच्या नामधारी राजवटीत ते जी अनियंत्रित सत्ता उपभोगित होते, तशी सत्ता त्याना शिवाजी महाराजांच्या राज्यात उपभोगता येणे शक्य नव्हते. त्यांना शिवाजी महाराजांच्या विरूद्ध बंडाळी आरंभिली होती. पोर्तुगीजांच्या आश्रयास राहून ते महाराजांच्या प्रदेशाला उपद्रव देत होते. महाराजाना ते सहन होणे शक्य नव्हते. यास्तव त्यानी पोर्तुगीज हद्दीत शिरून बंडखोर देसायाना शासन करण्याचा बेत केला. परंतु पोर्तुगीजांच्या सार्वभौमत्वाचा भंग करण्याचे ते एकच कारण नव्हते. बंडखोर देसायाना पोर्तुगीजांची फूस होती हे तर खरेच, परंतु आपल्या राज्यातील हिंदूनी ख्रिश्चन धर्म स्वीकारावा अशी परिस्थिती पोर्तुगीजांनी निर्माण केल्याच्या कागाळ्या महाराजांच्या कानावर येत होत्या.

पोर्तुगीजांच्या अमलाखालच्या प्रदेशांत सक्तीचे धर्मांतर होत होते, असा उल्लेख पोर्तुगीज कागदपत्रात आढळत नाही. परंतु इंग्रजी कागदपत्रात तो आढळतो.

शिवाजी महाराजानी पोर्तुगीजांच्या कडून होणाऱ्या आगळिका लक्षात घेऊन बंडखोर देसायांचा बदोबस्त करण्याच्या निमित्ताने इ. स. १६६७ मध्ये पोर्तुगीजांच्या ताब्यातील बार्देश आणि साष्ट जिल्ह्यात सैन्य घुसविले. ह्या स्वारीबाबत गोव्यात वास्तव्य करून असलेल्या एका इंग्रज गृहस्थाने दि. ३० नवंबर १६६७ रोजी कारवारच्या आपल्या वखारीला लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे : 'शिवाजीला ह्या (हिंदुच्या) छळाबद्दल वाईट वाटले व त्याने बार्देशवर स्वारी करून त्याच्या हातात लागलेल्या चार पाद्र्यांना हिंदू होण्यास सांगितले. त्यांनी जेव्हा नकार दिला, तेव्हा त्याने त्यांना ठार मारले...व्हिसेरेइने शिवाजीची दहशत घेतली व धर्मांतराबाबतचे कडक निर्बंध त्याने मागे घेतले. शिवाजीने सर्वत्र जाळपोळ करून दीड कोट पागोडा नेल्या.'

शिवाजी महाराज बार्देश आणि साष्ट प्रांतात सैन्य घुसवितील याची अटकळ गोव्याच्या पोर्तुगीज अधिकाऱ्यानी केली नव्हती. शिवाजी महाराजानी त्यांच्या आश्रयास गोव्यात जाऊन राहिलेल्या बंडखोर देसायांना आपल्या हवाली करण्याची मागणी केली, तेव्हा पोर्तुगीज अधिकाऱ्यानी टोलवाटोलवी चालविली होती. महाराजानी पोर्तुगीज प्रदेशात सैन्य घुसविले तरी देखील आपल्या तटस्थेतेचे ते समर्थन करीत होते. उदाहरणार्थ व्हिसेरेइ कौंट द सां व्हिसेंत हा शिवाजी महाराजाना दि. २३ नवंबर १६६७ रोजी लिहिलेल्या पत्रात म्हणतो :

'मी या राज्याच्या राज्य कारभाराची सुत्रे हाती घेतली, तेव्हा आशियाखंडातील राजेरजवाड्यांशी आमचे मैत्रीचे संबंध होते, ते चालू ठेवण्याचे धोरण मी अवलंबिले. विशेषतः आपणाशी तर मी घनिष्ठ संबंध

ठेवण्याचा प्रयत्न केला. मी आपणाकडे माझा दूत सर्वप्रथम पाठविला व आपणास पत्र लिहिले. पण उत्तर आले नाही. आणि आपले जे पत्र आले ते आमच्या राज्यात आपले सैन्य घुसल्याचे कळवून.

‘आमच्या राज्यात ज्या देसायानी आश्रय घेतला ते आदिलशहाचे प्रजाजन आहेत. आदिलशहाशी आमचे मैत्रीचे संबंध असल्याने त्याचे पालन करणे आमचे कर्तव्य आहे. देसायाना आम्ही आमच्या राज्यात आश्रय दिला तो आदिलशहाशी झालेल्या मैत्रीच्या करारास अनुसरून. आपणाला आणि जगालाही माहीत आहे की, आपल्या मित्रांशी कसे वागावे ते पोर्तुगीजाना चांगले कळते. कोकणांतील देसायानी आमच्या आश्रयास राहून कुणाला उपद्रव दिला, तर ते आम्हाला खपणार नाही. पण त्यानी आपल्या राज्यात जाऊन आपल्या माणसांसह कुठे गडबड केली, तर तो पोर्तुगीजांचा गुन्हा ठरत नाही. आम्ही पोर्तुगीज लोक मैत्रीचे जतन इमाने इतबारे करतो. परंतु आमच्या शत्रूना आम्ही वाईट असतो. आपल्या पत्राचे हे उत्तर आहे...’

दि. २४ नवंबर १६६७ या दिवशी गोव्याच्या व्हिसेरेइने शिवाजी महाराजाना आणखी एक पत्र लिहिले. त्यात तो म्हणतो :

‘आपले दुसरे पत्र मिळाले. आपल्या पत्राला मी जे उत्तर धाडले त्यावरून आपल्या ध्यानी येईलच की, आमच्या राज्याने आपणाशी मैत्री आणि तह टिकवून ठेवला होता, त्याचा आपण भंग केला आहे. आपण उभय पक्षांमध्ये तह व्हावा अशी अपेक्षा पत्रातून केली आहे. पण तह होणे न होणे आपल्याच हाती आहे. मी आपणाला स्मरण करून देतो की, माझ्यापाशी मोठे आरमार असून मी त्याचा सेनापती आहे...’

व्हिसेरेइने शिवाजी महाराजाना उपरिनिर्दिष्ट तारखेस लिहिलेले आणखी एक पत्र उपलब्ध आहे. त्यात तो म्हणतो :

‘...आपल्या विनंतीनुसार रामजी शेणवी कोठारी ह्याना आपणाकडे पाठविण्यात येत आहे. आपणाला आम्हास जे काय कळवायचे आहे ते त्याना विदित करावे...’

रामजी शेणवी कोठारी शिवाजी महाराजाना भेटून गोव्यास परतले. शिवाजी महाराजानी त्यांच्याकडे व्हिसरेइला जे पत्र दिले त्याला व्हिसेरेइने पुढील उत्तर केले :

‘...रामजी शेणवी यांच्यामार्फत पाठविलेले पत्र पावले. त्यावरून आम्हास कळून चुकले की आमची आणि आपली जी मैत्री होती ती पुढे चालू रहावी अशी आपली इच्छा आहे. त्या मैत्रीचा भंग आपण बार्देशमध्ये सैन्य घुसविल्याने झाला होता. ही मैत्री चालविणे, न चालविणे आपल्याच हातात आहे. तरी मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, ह्या राज्याच्या प्रतिष्ठेला बाध येईल असे कोणतेच कृत्य मी माझ्या हातून होऊ देणार नाही. तरीही मी आपल्या सोयींचा जरूर विचार करीन. तरी पुढील बोलणी करण्याची आपली इच्छा असल्यास आवश्यक ते अधिकार देऊन आपला मनुष्य इकडे पाठवावा. मात्र त्याला प्रथम रामजी शेणवी कोठारी यांच्याशी सल्लामसलत करावी लागेल. आपणाशी चांगली टिकावू मैत्री साधण्याची उमेद मी बाळगून आहे. अशी मैत्री की जिच्यामुळे लढाई आणि मतभेदांचे प्रसंग टळू शकतील.’

व्हिसेरेइच्या सूचनेप्रमाणे शिवाजी महाराजानी साकोपंत या नावाचा आपला मुत्सद्दी गोव्यास पाठविला. त्याने पोर्तुगीजांचा मुत्सद्दी रामजी शेणवी कोठारी याच्याशी तहाबाबतची प्राथमिक बोलणी

अनुक्रमणिका

केल्यावर तहासंबंधीची अधिकृत बोलणी त्याने व्हिसेरेइशी केली असावी. कारण दि. ५ डिसेंबर १६६७ या दिवशी उभय पक्षांमध्ये एक तह झाल्याची माहिती उपलब्ध आहे. त्याच दिवशी व्हिसेरेइने महाराजाना पत्र पाठविले.

'...आपले वकील साकोपंत यांच्यामार्फत आपला आणि आमचा मैत्रीचा आणि शांततेचा करार झाला. या करारांतील कलमांचे पालन दोन्ही पक्षानी करायचे आहे. मी ह्या करारावर सही केली आहे व माझे स्वामी पोर्तुगालचे महाराज यांच्या राजचिन्हाचा शिक्काही त्याच्यावर उमटविला आहे. आपले वकील साकोपंत यांच्याबरोबर रेव्हरंड पाद्री गोंसालू मार्तींश याना आपणाकडे पाठवीत आहे. त्यानी पूर्वी आदिलशहाच्या दरबारात आमचे वकील म्हणून काम केले आहे. श्री. साकोपंत यानी आपली कामगिरी उत्कृष्टपणे बजावली. ते चतुर आहेत, यांत संदेह नाही. त्यांच्याकडे आपण पाठविलेला नजराणा त्यानी आम्हाला नजर केला. एक घोडा आणि पोषाख असा तो नजराणा आहे. त्यांच्याबरोबर मी आपणाला आमचा नजराणा पाठवीत आहे. मैत्रीचे प्रतीक आणि आपणाविषयी मला वाटणारे प्रेम म्हणून त्याचा आपण स्वीकार करावा.' उपयुक्त पत्र व्हिसेरेइने महाराजाना पाठविले. त्याच तारखेला त्यानी महाराजाना आणखी एक पत्र पाठविले त्यात तो म्हणतो :

'...आपणाकडे जात असलेले आमचे वकील रेव्हरंड पाद्री गोंसालू मार्तींश यानी विजापूरच्या दरबारात आमचे वकील म्हणून पूर्वी काम केले आहे. ते हुषार असल्याने आपणाकडे आमचे वकील म्हणून त्यांची निवड करण्यात आली आहे. ते तहाची कलमे आपल्या सहीसाठी आपणाबरोबर नेत आहेत. ते आपणाला जे काय विदित करतील त्यावर आपण विश्वास ठेवावा.'

पोर्तुगीजांचा वकील रेव्हरंड पाद्री गोंसालू मार्तींश यानी जी तहाची कलमे आपणाबरोबर नेली होती, ती त्यांनी शिवाजी महाराजांकडून शिक्कामोर्तब करून आणली. ती मराठीत असून त्यांची तारीख दि. ११ डिसेंबर १६६७ ही आहे. ह्या मराठी करारनाम्याला जे पोर्तुगीज भाषांतर जोडण्यात आले त्याचे भाषांतर पुढीलप्रमाणे आहे :

'महान शिवाजी राजे व कौंट व्हिसेरेइ यांच्यामध्ये झालेल्या मैत्रीच्या कराराचा मसुदा.

'महान कौंट व्हिसेरेइ यानी जो करारनामा पाठविला त्याचा आशय असा :

'आमच्या राज्याच्या आश्रयास आलेल्या देसायांचा पाठलाग करीत शिवाजी राजे आपल्या सैन्यासह आमच्या राज्यात घुसल्याचे पाहून आम्हाला फार वाईट वाटले. त्याचे परिमार्जन करण्यासाठी शिवाजी राजे यानी आम्हाला वारंवार पत्रे पाठवून दिलगिरी प्रदर्शित केली व ह्या राज्याशी असलेली त्यांची मैत्री टिकविण्याची व ती पुढे चालू ठेवण्याची इच्छा दर्शविली. त्याच्या विनंतीस अनुसरून आम्ही पुढील अटी सुचविल्या :

१. शिवाजी राजे यांच्या सैन्याने बार्देशमध्ये दि. १९ नवंबर १६६७ रोजी जी बायका मुले कैद करून नेली त्याना त्यानी खंडणी न घेता अथवा त्याना ओलीस न ठेवता सोडून द्यावे त्याचप्रमाणे आमच्या स्वामीच्या प्रजाजनांची गुरेढोरे आणि गोणीचे बैल पळविण्यात आले, तेही परत करावेत. कारण महान व्हिसेरेइ यानी ज्या अर्थी सौम्यपणे लिहिले त्याअर्थी आणि त्यानी लिहिल्याप्रमाणे जी माणसे इकडे कैद

करून ठेवण्यात आली होती, त्याना एक छदामही न घेता मुक्त करून, पाद्रि गोंसालु मार्तीश यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

२. लखम सावंत आणि केशव नाईक हे जे देसाई आमच्या राज्याच्या आश्रयास येऊन राहिले आहेत. त्याना ताकीद करण्यात येत आहे की, त्यांचे वास्तव्य आमच्या राज्यात असेस्तोवर तो त्यांनी शिवाजी राजे यांच्याशी अथवा त्यांच्या प्रजाजनाशी युद्ध करू नये वा त्यांची कुरापत काढू नये. त्यानी जर तसे केले, आणि ते जर मला कळले, अथवा शिवाजी राजे यानी माझ्या निदर्शनास आणले, तर त्याना आमच्या स्वामीच्या राज्यात फिरून प्रवेश मिळणार नाही. आमच्या राज्यात असलेले नारबा सावंत आणि मल्लू शेणवी या दोघाना देखील असाच इशारा देण्यात येत आहे. जे देसाई आमच्या राज्यात येऊन राहिले आहेत, त्यानी बंडाळीस प्रवृत्त होऊ नये म्हणून त्याना गोवा शहरातच वास्तव्य करण्याची सक्ती केली जाईल. त्यानी साष्टीत अथवा बार्देशमध्ये काही गडबड न करता राहिले पाहिजे. त्यानी दंगेधोपे माजविले अथवा या राज्यातील प्रजाजनाची कुरापत राहिले पाहिजे. त्यानी दंगेधोपे माजविले अथवा या राज्यातील प्रजाजनाची कुरापत काढली, तर त्याना या बेटातून हद्दपार करण्यात येईल.

३. बालाघाटाहून जो व्यापारी माल आणि गोणीचे बैल या बेटात तसेच साष्टी आणि बार्देश प्रांतात येतील त्याना प्रतिबंध केला जाऊ नये, अथवा माल अडवून ठेवण्यात येऊ नये. तसेच या बेटांतून अथवा आमच्या स्वामीच्या इतर प्रदेशातून जे गोणीचे बैल बालाघाटी माल आणण्यासाठी जातील त्याना अडथळा केला जाऊ नये. शिवाजी राजे आणि आदिलशहा यांच्यामध्ये युद्ध जुंपले, तरी देखील हा व्यापार चालू राहावा.

४. उभय पक्षांची जमिनीवर आणि समुद्रावरही मैत्री असावी. जर या मैत्रीत व्यत्यय येण्यासारखे एकादे कृत्य घडले तर शिवाजी राजे यानी कौंट व्हिसेरेइ यांच्याकडे व कौंट व्हिसेरेइ यानी शिवाजी राजे यांच्याकडे त्याचा खुलासा मागावा. हा खुलासा मिळाल्याखेरीज मैत्री भंग पावू नये.

उपरिनिर्दिष्ट अट मान्य करण्यात येत आहे.

५. शिवाजी राजे याना कौंट व्हिसेरेई यांच्याशी एकाद्या कामाविषयी वाटाघाटी करायच्या असतील, तर एकाद्या विश्वासू मनुष्यामार्फत त्या करता येतील. तीच गोष्ट हत्यारांच्या उपयोगाचीही आहे.

गोवा ५ डिसेंबर १६६७

कौंट व्हिसेरेई यानी लिहिल्याप्रमाणे व उल्लेखिल्याप्रमाणे मी हे मान्य करीत आहे.

२५ जमादिलाकर, १०६८ पोतुगीज ११ डिसेंबर १६६७

शिवाजी राजे यांचा शिक्का.

# शिवाजी पोर्तुगीज संबंध (पुढे चालू)

दि. १९ डिसेंबर १६६७ या दिवशी व्हिसेरेइने शिवाजी महाराजाना पुढील पत्र पाठविले :

‘पाद्री गोंसालू मार्तिंश यांच्यामार्फत आपण सही करून पाठविलेली तहाची कलमे आणि आपले पत्र मिळाले. आपण माझी सद्‌भावना जाणून घेतलीत, आणि पाद्री गोंसालू मार्तिंश यांचा चांगला परामर्ष केलात, त्याबद्दल आणि कैदी परत केल्याबद्दल मी आपला आभारी आहे. आपण देसायांविषयी निर्धास्त असावे. ते गोवा बेटातच राहतील व या राज्यातून अन्यत्र कुठे जाणार नाहीत. त्यांच्या बरोबर शरणार्थी लखम सावंत यानाही ठेवण्यात येणार आहे. मात्र ते एखाद्या बागेत काम करण्यासाठी जातील. पण ती बाग देखील गोवा बेटातच असेल.

‘आपले वकील साकोपंत यांच्या विनंतीवरून आपल्या सर्व बंदरातील आणि जमिनीवरील व्यापाऱ्यांच्या सुरक्षिततेबाबत हुकूम काढण्यात येत आहे. आपली आणखी कोणती इच्छा असेल आणि ती जर आपले या प्रदेशाचे सुभेदार श्री. दत्तोपंत यांनी माझ्या कानावर घातली, तर आमच्या दोघामधील मैत्रीस अनुसरून श्री. दत्तोपंत याना मदत करण्याची मी काळजी घेईन. आमच्या मधील मैत्रीविषयी मी आपणास आश्वासन देतो की, मी तिचे कटाक्षाने पालन करीन. आपणही तिचे पालन कराल अशी आशा बाळगतो.

आपल्या दैवी अनुग्रहाने ईश्वर आपणावर प्रकाश पाडो.’

शिवाजी महाराजाना लिहिल्याप्रमाणे व्हिसेरेइने गोव्याच्या आश्रयास येऊन राहिलेल्या देसायांसंबंधी दि. १७ डिसेंबर १६६७ रोजी पुढील आज्ञापत्र काढले :

देसाई लखम सावंत आणि केशव नाईक या दोघांच्या निदर्शनास आणण्यात येत आहे की, त्या दोघानी गोवा बेटातच राहावे. शिवाजीच्या प्रदेशात जाऊ नये वा कुणाला तिकडे पाठवू नये. आणि जर त्यांच्यापैकी कुणी आपली माणसे बाहेर पाठविलेल्याचे आढळून आले, तर त्या माणसाना पुनः या राज्यात परत घेतले जाणार नाही. आणि ती जर परत आली तर शिवाजी राजे यांच्याशी असलेल्या आमच्या मैत्रीचा भंग केल्याच्या गुन्ह्यावरून त्याना कडक शिक्षा केली जाईल. तसेच देसायानी आपले नोकर अथवा प्रजाजन याना शिवाजीच्या राज्यात पाठविल्याचे आम्हाला कळेल, तर त्याना उपरिनिर्दिष्ट कायद्याप्रमाणे वागविले जाईल.

नारबा सावंत हे सांप्रत आमच्या राज्य बाहेर असल्याने त्याना वरील कायदा लागू केला जाणार नाही. परंतु ते जर इकडे आले, तर मात्र त्याना हा निर्बंध लागू केला जाईल. आणि त्यानी जर हा निर्बंध पाळण्यास नकार दिला, तर त्याना या राज्यात राहू दिले जाणार नाही. उपर्युक्त देसायाना या राज्यातील प्रजाजनाना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मदत करू नये. डिचोलीचे म्हाळोबा शेणवी याना देखील हा निर्बंध लागू आहे.

शिवाजी महाराज व गोव्याचा व्हिसेरेइ यांच्यामध्ये झालेल्या तहाप्रमाणे शिवाजी महाराजानी बार्देशमधून पकडून नेलेले सर्व युद्धकैदी मुक्त केले. त्यांच्यामध्ये बायका मुलांचा अधिक भरणा होता.

शिवाजी महाराजांचे स्त्री दाक्षिण्य प्रसिद्ध आहे. मुसलमान इतिहासकार खाफीखान व शिवाजी महाराजांचा पोर्तुगीज चरित्रकार कॉस्म द ग्वार्द या दोघानी देखील महाराजांच्या स्त्री दाक्षिण्याचा गौरव केला आहे. गोव्याच्या व्हिसेरेइने शिवाजी महाराजांशी झालेल्या तहाच्या संदर्भात जे पत्र आपल्या राजास पाठविले त्यात त्याने म्हटले आहे की, शिवाजीने गोव्यातून जी लूट आणि बायका मुले पकडून नेली ती त्याने परत केली आहेत.

व्हिसेरेइने गोवा राज्याच्या आश्रयास येऊन राहिलेल्या देसायानी शिवाजी महाराजांच्या प्रदेशात जाऊन दंगेधोपे माजवू नयेत म्हणून त्यांच्यावर निर्बंध घातले खरे, परंतु त्याना न जुमानता त्यानी दंगेधोपे माजविण्याचा सपाटा चालूच ठेवला. त्यामुळे त्याना गोव्याबाहेर हाकलून लावणे व्हिसेरेइला भाग पडले. यासंबंधी किल्ले भिगवणचा अथवा रायगडचा किल्लेदार रायाजी गंगादास याला दि. २६ फेब्रुवारी १६६८ या दिवशी व्हिसेरेइ लिहितो :

‘देसायांचे हस्तक शिवाजी राजे यांच्या राज्यात शिरून बंडाळी माजवीत असल्याचे आपण माझ्या निदर्शनास वारंवार आणले आहे. पण ह्या बंडाळीला आळा घालण्यास मी असमर्थ आहे. त्याचे कारण हे की, देसायाची माणसे आमच्या राज्यातून शिवाजी राजे यांच्या राज्यात जात नाहीत. ती इतर ठिकाणाहून कुठून तरी जात असतील. तरी पण लखम सावंत आणि केशव प्रभू ह्या दोघा उपद्व्यापी देसायाना मी आमच्या राज्यातून हाकलून देत आहे. असे जर झाले, तर आपण आणि शिवाजी राजे यांचे प्रजाजन देसायांच्या उपद्रवापासून मुक्त होतील अशी आशा आहे.’

पेडण्याचे सुभेदार वीरो पंडित याना दि. ८ जून १६६८ रोजी व्हिसेरेइने जे पत्र पाठविले त्यात त्याने म्हटले आहे की, उपद्व्यापी देसायाना आमच्या राज्यातून हाकलून देण्यात आले आहे. व्हिसेरेइने शिवाजी महाराजानाही ही गोष्ट कळविल्याचा पुरावा उपलब्ध आहे.

गोव्याच्या व्हिसेरेइने बंडखोर देसायाना गोवा राज्यातून हाकलून लावले ते अर्थात कुडाळ मध्ये परत गेले. परंतु शिवाजी महाराजानी त्याना पकडून शासन न करता औदार्याने वागविले. त्यानंतर त्यानी ज्याअर्थी बंडाळी माजविल्याचा पुरावा उपलब्ध नाही, त्यावरून ते शिवाजी महाराजांचे प्रजाजन म्हणून कुडाळमध्ये राहिले असले पाहिजेत.

शिवाजी महाराजांचा आणि पोर्तुगीजांचा जो तह झाला तो महाराजाना फायदेशीर नव्हता, असे काही इतिहासकारांचे म्हणणे आहे. परंतु अन्य काही इतिहासकारांचा असा दृष्टिकोण आहे की, एका परकी राजवटीने शिवाजी महाराजांशी समान पातळीवर तह केल्याने त्यांच्या राज्यास कायदेशीर मान्यता प्राप्त झाली. कारण, तोपर्यंत ते बंडखोर म्हणूनच ओळखले जात होते.

शिवाजी महाराजांचा आणि पोर्तुगीजांचा शांततेचा तह झाला असला तरी कटकटी चालूच होत्या.

पोर्तुगालचा राजा हा सातासमुद्राचा स्वामी म्हणवून घेत होता. तदनुसार अरबी समुद्रात संचार करणाऱ्या इतर देशांच्या नौकाना पोर्तुगीज युद्ध नौका ‘कार्ताज’ अथवा पोर्तुगीज दस्तके बाळगण्यास भाग पाडीत. परंतु ही दस्तके फुकट मिळत नसत. ती घेण्यासाठी पैसे भरावे लागत. प्रत्येक दस्तकास सालिना बाराशे ‘अश्रफी’ भराव्या लागत. जी व्यापारी जहाजे पोर्तुगीजांची हस्तके बाळगण्यास नकार देत त्यांच्यावर

अनुक्रमणिका

पोर्तुगीज युद्धनौका तोफा डागून ती बुडवून टाकीत. एवढा मोठा मोगल बादशहा, परंतु त्याच्या नौकानादेखील पोर्तुगीज दस्तके बाळगावी लागत, या बाबतीत गोव्याचा व्हिसेरेइ शिवाजी महाराजांचा वेंगुर्ला बंदराचा हवालदार तानाजी राम याला इ. स. १६७८ साली लिहिलेल्या एका पत्रात म्हणतो :

'आमचे दस्तक न बाळगणाऱ्या कुणाच्याही जहाजाला हिंदुस्थानच्या समुद्रात संचार करता येणार नाही. हा अधिकार आम्हाला जुने कायदेकानू आणि चालीरीती ह्यानुसार प्राप्त झाला आहे. या अधिकारानुसार आमचे दस्तक न बाळगणाऱ्या परक्या जहाजाना अटक करण्याचा हुकूम आमच्या दर्यासारंगाना देण्यात आला आहे.'

शिवाजी महाराज आरंभी पोर्तुगीज दस्तके घेत असत. परंतु पोर्तुगीजांचा आणि त्यांचा शांततेचा तह झाल्यावर त्यानी पोर्तुगीजांची दस्तके घ्यायची नाहीत असे ठरविले असावे. इतकेच नव्हे, तर त्यांच्या राज्याचा समुद्रकिनाऱ्यावरून संचार करणाऱ्या पोर्तुगीज जहाजाना ते आपली दस्तके घेण्यास भाग पाडीत अथवा त्यांच्याकडून जकात वसूल करीत, असे वाटते. गोव्याच्या व्हिसेरेइने उपरिनिर्दिष्ट पत्र तानाजी राम यांना पाठविले ते शिवाजी महाराजांच्या युद्धनौकानी पोर्तुगीजांची चार जहाजे पकडून राजापूरच्या बंदरात नेली तेव्हा. त्याचवर्षी अंकोला (कारवार) येथील शिवाजी महाराजाच्या सुभेदाराने त्याच्या अमलाखालच्या प्रदेशात शिरलेल्या काही पोर्तुगीज सैनिकाना अटक केली, तेव्हा गोव्याच्या व्हिसेरेइने अंकोल्याच्या सुभेदारास लिहिले :

'...आपली चार जहाजे आम्ही पकडली त्याचा बदला म्हणून आपण आमच्या शिपायाना कैद केले. परंतु हा न्याय उफराटा आहे. वेंगुर्ल्याला जाणाऱ्या तीन जहाजांचा उल्लेख आपण करता त्यांच्यापाशी आमचे दस्तक नव्हते म्हणून ती आम्ही पकडली होती. परंतु ती शिवाजी महाराजांच्या प्रजाजनांची आहेत असे कळल्यावर शिवाजी महाराजांची आणि आमची मैत्री लक्षात घेऊन लगेच ती सोडून देण्यात आली.'

वरील घटनावरून असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही की, शिवाजी महाराजांनी पोर्तुगीजांशी जशास तसे या धोरणाचा अवलंब केल्याने त्यांची जहाजे म्हटली की पोर्तुगीज अधिकारी ती सोडून देत होते. शिवाजी महाराजांच्या युद्धनौका पोर्तुगीज व्यापारी जहाजांवर हल्ले करण्यातही कमी करीत नसत. त्यामुळे त्यांच्या किनारे पट्टीतील व्यापारावर प्रतिकूल परिणाम होऊन तो डबघाईस आला.

शिवाजी महाराजांचा आणि पोर्तुगीजांचा मैत्रीचा आणि शांततेचा करार झाला. परंतु पोर्तुगीजांकडून त्या कराराचे कटाक्षाने पालन होत नव्हते. त्यांच्या हितसंबंधाच्या आड तो करार येत असल्यास त्याचा भंग करण्यास ते मागे पुढे पाहत नसत. त्याचा प्रत्यय शिवाजी महाराजाना सिद्दीशी झालेल्या युद्धाचे वेळी आला. या युद्धात पोर्तुगीजांनी सिद्दीस मदत केल्याने शिवाजी महाराजाना त्याचा पराभव करणे अशक्य झाले. यासंबंधी काही पोर्तुगीज दस्तऐवज उधृत केले, तर पोर्तुगीजांच्या दुटप्पी धोरणाची स्पष्ट कल्पना करता येईल. उदाहरणार्थ पुढील दस्तऐवज :

'दि. २९ मे १६७१ रोजी पानेली येथे व्हिसेरेइ आणि हिंदुस्थानचे कॅप्टन जनरल कौंट द लाउरादिव यानी राज्य सल्लागार मंडळाची बैठक पाचारण केली. त्यानी राज्य सचिव डॉ. आंद्रे फ्रेइरी द आताईद याना बैठकीसमोर ठरावाचे वाचन खड्या आवाजात करण्यास सांगितले. त्या सूचनेप्रमाणे त्यानी ठरावाचे वाचन करण्यास प्रारंभ केला :

‘दांड्याच्या किल्ल्यास शिवाजीने वेढा घालून पुष्कळ दिवस झाले आहेत. आमच्या चौल येथील किल्ल्याचे कॅप्टन नुन द मेलु द सिल्व यानी वारंवार पत्रे पाठवून दांड्याच्या वेढ्याचा वृत्तांत आम्हाला कळविला आहे. आम्ही त्याना मागे सूचना केली होती की, सिद्दीस शक्य ती मदत करावी. त्या सूचनेनुसार ते सिद्दीला मदत करीत आहेत. या मदतीमागील आपला उद्देश उघड आहे. दांड्याचा किल्ला घेऊन शिवाजी वरचढ झालेला आम्हाला नको आहे. या वेढ्यापायी सिद्दी इतका डबघाईस आला आहे की, सैन्याचा पगार घालण्यास त्याच्यापाशी पैसा नाही. या अडचणीतून निभावणी व्हावी म्हणून त्याने आमच्यापाशी मदतीची याचना केली. आम्ही त्याला मदत केली तर त्याच्या बदली तो आमचे मांडलिकत्व पत्करण्यास तयार आहे......’

राज्य सल्लागार मंडळाने सिद्दीस मदत पाठविण्याचा निर्णय एक मताने घेतला.

सिद्दीला पोर्तुगीजांकडून मदत होत असल्याने त्याचा पराभव आपण करू शकत नाही हे जेव्हा शिवाजी महाराजांना कळून चुकले, तेव्हा त्यानी विठ्ठलपंत नावाचा आपला वकाल गोव्यास पाठविला. त्याच्यामध्ये आणि व्हिसेरेइमध्ये पुढील खलित्यांची अदलाबदल झाली. विठ्ठल पंडित यांचा खलिता असा :

१. शिवाजी राजे यांच्या नौकाना पोर्तुगीजानी येताजाता अटकाव करू नये की उपद्रव देऊ नये.

२. दांड्याच्या हबशाना आश्रय देऊ नये की त्यांना कोणत्याच प्रकारची मदत करू नये. यासंबंधी पोर्तुगीज अधिकाऱ्यानी आपल्या सर्व बंदराना हुकूम पाठवावे.

३. आमची मालाची गलबते आणि इतर नौका पोर्तुगीज अधिकाऱ्यानी पकडल्या असतील त्या त्वरीत सोडून द्याव्या.

४. प्रस्तुतच्या वकिलाबरोबर बंदराच्या अधिकाऱ्याना पत्रे देऊन एक मनुष्य पाठवावा. पत्रात शिवाजी राजे यांच्या सुभेदारांशी चांगले संबंध ठेण्याची सूचना बंदरांच्या अधिकाऱ्याना करण्यात यावी. त्याचप्रमाणे बंदराच्या कॅप्टननी सरकारी हुकूमाप्रमाणे वागावे.

५. इमामाने (मस्कतचा) आमच्याशी बोलणी केली की, त्यांच्या नौकाना पाणी भरण्याची व अन्नवस्तूंचा पुरवठा करण्याची सवलत आमच्या बंदरातून मिळावी. त्याचप्रमाणे आम्ही त्याच्या मदतीला गलबते आणि होड्या द्याव्या अशी त्यांची मागणी होती. त्याला आम्ही उत्तर पाठविले की, पोर्तुगीज हे आमचे मित्र असल्याने त्यांच्याविरूद्ध त्याला आम्ही मदत करू शकत नाही. तसेच त्याने जर आमची कुरापत काढली तर पोर्तुगीज आम्हाला त्याच्याविरूद्ध मदत केल्यावाचून राहाणार नाहीत. तसेच त्याने जर पोर्तुगीजांशी युद्ध केले तर आम्ही त्याना मदत करू. त्यासाठी आवश्यक तो खर्च ते आम्हाला देतील.

६. मोगलांशी आमचे युद्ध चालू आहे. त्यासाठी पोर्तुगीजांची आणि आमची मैत्री व्हावी. पोर्तुगीजानी मोगलाना कोणत्याच प्रकारची मदत करू नये, की त्याना आपल्या राज्यात थारा देऊ नये. आपल्या राज्यात पोर्तुगीजानी आम्हाला मदत करावी व तत्संबंधीची पत्रे आपल्या अधिकाऱ्याना पाठवावी.

अनुक्रमणिका

७. मागे जे काय घडले ते त्यावर पडदा टाकण्यात यावा. कारण यापुढे आम्ही पोर्तुगीजांच्या वाटेस जाणार नाही.

शिवाजी महाराजांचे वकील विठ्ठल पंडित यांच्या खलित्याला गोव्याच्या गव्हर्नरने जबाब दिला :

१. नौका आणि जहाजे छोटी असली तर त्याना अनिर्बंधपणे वाहतूक करता येईल. त्यांच्या वाटेला कुणी जाणार नाही. परंतु नौका 'गालियोता' –(गलबते) सारख्या मोठ्या असल्या, तर त्याना आमच्या किनाऱ्यावरून व समुद्रातून संचार करायचा झाल्यास आमचे परवाने घ्यावे लागतील. हे परवाने मोगलबादशहाचे प्रजाजन घेतात त्याप्रमाणे दिले जातील.

२. हे कलम मान्य आहे.

३. ह्या राज्यातील प्रजाजनांच्या, व्यापाऱ्यांच्या आणि ह्या शहरातील नागरिकांच्या त्याचप्रमाणे बंदराच्या व किल्ल्यांच्या मालकीच्या ज्या नौका पकडण्यात आल्या आहेत, त्या मुक्त करण्यात आल्यास शिवाजी राजे व त्यांचे प्रजाजन यांच्या ज्या नौका पकडण्यात आल्या आहेत त्या मुक्त करण्यात येतील.

४. सरकारच्या वतीने एक मुनष्य पत्रे देऊन बंदराच्या कॅप्टनकडे पाठविला जाईल. पत्रात शिवाजी राजे यांच्या सुभेदारांशी आणि मंत्र्याशी सलोख्याने वागण्याची सूचना असेल.

५. शिवाजी राजे यानी इमामाविरुद्ध आमच्याकडे मदत मागितली अर्थात त्यानी त्याच्याशी युद्ध पुकारले, तर आमच्या राज्याचे मित्र या नात्याने आम्ही शिवाजी राजे याना आनंदाने मदत करू. मात्र शिवाजी राजे अथवा त्यांचे सुभेदार यानी इमामाला पाणी अथवा अन्नपुरवठा करायचा नाही ही अट राहील.

६. ह्या राज्याचे मोगल बादशहाशी असलेले जुने करारमदार पाळण्याचे आमच्यावर बंधन असल्याने त्यांच्या पीडित प्रजाजनाना आमच्या बंदरात आणि किल्ल्यात आश्रय देण्यास आम्ही बद्धपारकर आहो. त्याचप्रमाणे शिवाजी राजे व त्याचे सुभेदार आणि सरदार याना जर आमचा आश्रय हवा असेल, तर आम्ही तो त्याना अवश्य देऊ.

७. उभय पक्षांचा सलोखा झाल्यावर जुन्या गोष्टी विसरल्या जातील. शिवाजी राजे यानीही आमच्या प्रमाणे वागावे.

आंतोनियु मेलू द काश्त्रू
शिवाजी राजे यांचा शिक्का.

प्रस्तुतच्या करारास पुढील कलमाचा समावेष करण्यात आला. शिवाजी राजे आणि पोर्तुगीज हिंदुस्थानचे गव्हर्नर व कॅप्टन जनरल यांच्यामधील कराराची दुरुस्ती आणि फेर सुधारणा :

अनुक्रमणिका

या शहरात गेल्या दोन महिन्यापासून वास्तव्य करणारे दोघे नागरिक मलप्पा शेट आणि सांताप्पा गांवस या दोघांकडून जे तीन हजार पागोडा शिवाजी राजे यांच्या राज्यात बळजबरीने काढून घेण्यात आले ते त्या दोघाना कोणतीही क्लृप्ति न लढविता परत करण्यात यावे.

बालघाट येथून या बेटात बार्देशमध्ये आणि साष्टी प्रांतात जे गोणीचे बैल आणि माल येईल त्याला प्रतिबंध होऊ नये की तो काढून घेतला जाऊ नये. त्याचप्रमाणे पोर्तुगालच्या राजाच्या या मुलुखातून जो माल आणि गोणीचे बैल बालाघाटला अथवा अन्यत्र जातील त्यानाही प्रतिबंध होऊ नये. या मालावरील नेहमीची आणि पूर्वापारापासून लागू असलेली जकात वसूल केली जाईल. शिवाजी राजे आणि आदिलशहा या दोघांमध्ये युद्ध सुरू असले, तरी देखील या मालाच्या वाहतुकीवर त्याचा परिणाम होऊ नये.

शिवाजी राजे यांच्या बंदरात ज्या नौका पकडून ठेवण्यात आल्या असतील त्या शिवाजी राजे यानी ताबडतोब सोडून द्याव्या. या बाबतीत त्यानी कोणतीच सबब सांगू नये. तसेच त्यानी या नौकांच्या मालकांकडे पैशाची मागणी करू नये. या नौका त्यांच्या मालकाना आमच्या उत्तरेकडे जाणाऱ्या आरमारासमक्ष परत करण्यात याव्या. त्याचप्रमाणे शिवाजी राजे यांच्या प्रजाजनांच्या ज्या नौका आमच्या चौल अथवा उत्तरेकडील प्रांताच्या बंदरात पकडून ठेवण्यात आल्या असतील त्या ताब्यात घेण्यासाठी त्यांच्या मालकानी आमच्या उत्तरेकडील आरमाराबरोबर तिकडे जावे. शिवाजी राजे यानी आमच्या स्वामीच्या राज्याशेजारी मुलुख काबीज केला असल्यास त्या मुलुखात आणि आमच्या राज्याच्या हद्दीवर चुना आणि दगड यांची पक्की इमारत बांधू नये. मग या दोन्ही राज्यांमध्ये नदी वाहत असो वा नसो. उभय पक्षांमध्ये दृढ मैत्री असावी. ती समुद्रावर तशीच भूप्रदेशांतही चालू राहावी. एकाद्याने जर दुसऱ्याची कुरापत काढली तर पहिल्याकडे दुसऱ्याने तिचा जाब मागावा. उदाहरणार्थ, शिवाजी राजे यांच्याकडून आमची आगळीक घडली, तर आम्ही त्यांच्याकडे जाब मागूं आणि आमच्याकडून शिवाजी राजे यांची आगळीक घडल्यास त्यानी आमच्याकडे तक्रार करावी. आगळिकेची चौकशी झाल्याखेरीज कुणीही दुसऱ्याकडील संबंध तोडू नये.

या कलमाचे पालन करण्यास गव्हर्नर बद्धपरिकर आहेत. आमच्या स्वामीच्या आरमाराने ज्या नौका पकडल्या असतील त्या सोडून देण्याचा हुकूम गव्हर्नर महाशय देतील. त्याचप्रमाणे ज्या नौका बंदरात अथवा शहरात पकडून ठेवलेल्या असतील त्या कोणताच खर्च न आकारता परत केल्या जातील. शिवाजी राजे यांचे जे प्रजाजन ह्या राज्याचे शत्रू नसतील त्यानी ह्या राज्यातील बंदरे करण्यासाठी परवाने मागितले असल्यास ते त्याना देण्यात येतील. मात्र मोगल बादशहाचे प्रजाजन जो कर भरतात ते त्याना भरावा लागेल.

ज्या छोट्या होड्या कारंजाहून या शहरापर्यंत मीठ किंवा तत्सम वस्तूंची अथवा औषधांची वाहतूक करीत असतील त्याना परवाना घ्यावा लागणार नाही. त्या होड्या आरमारी जहाजाना भेटल्या असल्यास त्या त्याना अटकाव करणार नाहीत.

आमच्या स्वामीची आरमारी अथवा व्यापारी जहाजे समुद्रात तुफान झाले असता अथवा अन्य काही कारणाने शिवाजी राजे यांच्या बंदरात शिरली तर त्यांचा चांगला परामर्ष त्या बंदरात व्हावा. त्याना त्यांच्या पैशातून आवश्यक त्या वस्तू पुरविण्यात याव्या. अशीच वागणूक शिवाजी राजे यांच्या नौकाना आमच्या बंदरात देण्यात येईल. सिद्दी दांडा ज्याअर्थी या राज्याचा मांडलिक आहे, त्याअर्थी त्याला संकटप्रसंगी

अनुक्रमणिका

मदत करण्यास गव्हर्नर महाशय बद्धपरिकर आहेत. त्याने कोणत्याही वेळी पोर्तुगालच्या राजाकडे मदत मागितली असता ती त्याला देण्याचे बंधन या राज्यावर आहे. परंतु शिवाजी राजे आणि सिद्दी या दोघांचे शत्रूत्व असल्याकारणे त्या दोघांचा संघर्ष उडाल्यास गव्हर्नर महाशय मध्यस्थी करून हातघाईचा प्रसंग टाळण्याचा प्रयत्न करतील. त्यासाठी शिवाजी राजे यांचे या दरबारातील वकील विठ्ठल पंडित याना वाटाघाटी करण्याचे आवश्यक ते अधिकार त्यानी द्यावेत. उभय पक्षांची समुद्रावर आणि भूप्रदेशात अशी दोन्ही ठिकाणी दृढ मैत्री असावी. या मैत्रीचा भंग होण्याचा प्रसंग उद्‌भवला, तर परस्परांनी एकमेकाकडील राजनैतिक संबंध तोडण्यापूर्वी मतभेद मिटविण्याचा प्रयत्न करावा.

गोवा, १० फेब्रुवारी १६७०

शिवाजी महाराज आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये तह झाला, फेर तह झाला, परंतु मैत्रीचे संबंध दृढ झाले नाहीत. दोघांच्याही परस्परांविरुद्धच्या तक्रारी चालूच राहिल्या. महाराजानी आपली माणसे पोर्तुगीज प्रदेशात पाठवून पोर्तुगीजाना सतावून सोडण्याचा सपाटा सुरू केला. हे अघोषित युद्ध दोघानाही फायद्याचे नव्हते. पोर्तुगीजाना तर फायद्याचे नव्हतेच, कारण त्यांचा प्रदेश लहान असल्याने त्याची आर्थिक झळ त्याना पोचत होती. दुसरी गोष्ट म्हणजे पोर्तुगीजाना शह देण्यासाठी त्यांचा हाडवैरी मस्कतचा इमाम याच्याशी संधान साधल्याची हूल शिवाजी महाराजांनी उडवून दिली होती. इमामाची आणि महाराजांची हातमिळवणी झाली तर त्यांच्याकडून पोर्तुगीजांची कोंडी होण्याची भीती होती. म्हणून पोर्तुगीजानी नमते घेऊन शिवाजी महाराजांशी आणखी एक तह केला. (त्याची कलमे उपलब्ध नाहीत.)

परंतु वरील तह फार दिवस टिकला नसावा, कारण दि. २४ ऑगस्ट १६७२ रोजी गोव्याचा व्हिसेरेइ पोर्तुगालच्या राजास लिहितो :

‘अलि आदिलशहाचा बंडखोर प्रजाजन शिवाजी याने गतवर्षीच्या पावसाळ्यात बार्देशमध्ये शिरून अशांतता माजविण्याचा प्रयत्न केला. परंतु आमच्या जागरूकतेमुळे त्याची डाळ शिजू शकली नाही.’

बहुदा महाराजांची ही बार्देशवरील दुसरी स्वारी काही आकस्मिक अडचणीमुळे फत्ते झाली नसावी. तरीही त्यानी आदिलशाही प्रदेशात धडक मारून आपल्या राज्याची हद्द फोंड्यापर्यंत भिडविली. इ. स. १६७२ साल अखेर त्यांच्या राज्यात पेडणे, साखळी आणि डिचोली हे तीन महाल मोडत होते.

दक्षिण कोकणातील मोहीम चालू असतांच शिवाजी महाराजानी कल्याण, भिवंडी भागातही सैन्य धाडले होते. त्यामुळे त्यांचा दमणमधील पोर्तुगीजांशी संबंध आला. त्यावेळी दमणच्या हद्दीतील काही खेड्यांचे चोर दरोडेखोरांपासून रक्षण करण्याकरिता इ. स. १६१५ साली रामनगरच्या राजाशी पोर्तुगीजानी ‘चौथ’चा करार केला होता. पुढे रामनगरच्या एका कोळी सरदाराने आपल्या राजाविरुद्ध बंड करून त्याचा काही मुलुख बळकावून व त्या मुलुखाचा आपण स्वतंत्र राजा झाल्याची द्वाही फिरविली. कोळी राजाचे पारिपत्य रामनगरच्या राजाला करता आले नाही.

पुढे पोर्तुगीजानाही कोळी राजाने उपद्रव देण्यास प्रारंभ केला. तो त्यांच्याकडे ‘चौथ’ची मागणी करू लागला. पोर्तुगीजानी अर्थात त्याची मागणी धुडकावून लावली. त्यामुळे चिडून जाऊन त्याने दमणच्या प्रदेशात लुटालूट आणि जाळपोळ सुरू केली. जव्हारच्या राजाला वठणीवर आणणे पोर्तुगीजाना अशक्य

झाल्याने त्याचा बंदोबस्त करण्याची विनंती त्यानी शिवाजी महाराजाना केली. या विनंतीस अनुसरून इ. स. १६७२ च्या एप्रिल महिन्यात महाराजानी आपले पंतप्रधान मोरोपंत पिंगळे याना सैन्य देऊन जव्हारच्या राजावर धाडले. मोरोपंतानी दि. ५ जून १६७२ रोजी जव्हार घेतले. राजा विक्रमशहा मुकणे जंगलात पळून गेला. मोरोपंताच्या हातास विक्रमशहाचा एकोणतीस लक्ष रुपयांचा खजिना लागला.

आता 'चौथ'चा उल्लेख येथे आला आहे म्हणून त्याच्या उगमाची कथा येथे दिली पाहिजे.

अठराव्या शतकातील ख्यातनाम पोर्तुगीज इतिहासकार 'दियोगु द कौतु' याने Decadas da Asia Vol II मध्ये चौथाईच्या उगमाची कथा दिली आहे. ती अशी :

'सुमारे चारशे वर्षामागे रजपूत लोक गुजरातेत मोठ्या संख्येने उतरले. त्याना गुजरातेत हिंदू लोकांची वस्ती आढळली. पूर्वेकडील सर्व लोकांमध्ये हे लोक दुबळे आणि बायकी आहेत. त्यामुळे रजपूत लोकाना गुजरातेत आपली राज्ये स्थापन करण्यास विशेष सायास पडले नाहीत. गुजरातेतील शेतकऱ्यानी रजपुताना विनंती केली की, तुम्ही आमच्या शेतजमिनी आम्हाला पेरण्यास परवानगी द्यावी. त्याबद्दल आम्ही तुम्हाला उत्पन्नाचा एक चतुर्थांश भाग देऊ. या कराला गुजराती भाषेत 'चौथा' म्हणतात. 'चौथा' ह्या शब्दाचा 'चौथ' हा अपभ्रंश आहे.

'रजपुतांच्या नंतर गुजरातेत मुसलमान आले. त्यानी खंबायतचे राज्य जिंकून घेतले. खंबायतच्या राजानी मुसलमानाचे मांडलिकत्व पत्करले. त्यांनी आपल्या राज्याची आपल्या भाऊबंदामध्ये विभागणी केली. साष्टीचा (रामनगर) राजा हा त्याच मांडलिकांपैकी एक होय. त्याच्या वाडवडिलाना सुल्तान बहादुरशा याने दमणचा प्रदेश बहाल केला होता. हा प्रदेश पहाडी, खडकाळ आणि लहान लहान टेकड्यानी व्यापिलेला आहे. तिकडे बांबूची मोठमोठी बने असून जगातील उत्तम प्रकारचे सागाचे लाकूड तिकडच्या जंगलात आढळते.

'साष्टीचे (रामनगर) राजे नेहमीच हिंदू होते आणि आहेत. सुल्तान बहादुरशहाने वसईचा टापू गव्हर्नर नूनु द कुन्य याना दिला, तेव्हा या मुलखाची चौथाई साष्टीच्या राजाला मिळावी अशी अट घातली होती. व्हिसेरेइनी या अटीत बदल केला नाही. साष्टीच्या राजास जे काय मिळत असे ते देण्याचे त्यांनी कबूल केले. तथापि दमणमध्ये ज्या चोऱ्यामाऱ्या होत असत त्याचा साष्टीच्या राजाने बंदोबस्त केला पाहिजे अशी अट त्यानी घातली. दमणचे लोक उपरिनिर्दिष्टप्रमाणे रामनगरच्या (धरमपूर) राजास चौथाई देत असत. या राजाला पोर्तुगीजमध्ये 'चौतिया' असे म्हणतात (सभासदांच्या बखरीत रामनगरच्या राजाचा उल्लेख 'चौतेआ' या नावाने आला आहे.)

मोगल बादशहाच्या सरदारानी रामनगरच्या राजाचा पराभव केला, तेव्हा त्यानी पोर्तुगीजांकडे चौथाईच्या कराची मागणी केली. यासंबंधी गोव्याच्या व्हिसेरेइ दि. ११ जुलै १६३८ साली पोर्तुगालच्या राजास लिहिलेल्या पत्रात म्हणतो :

'........मोगल बादशहा आपले साम्राज्य सुधारण्याचे धोरण पत्करून थांबला नाही तर त्याने 'कोल' राजाच्या राज्यात खंडणी वसूल करण्याची आज्ञा आपल्या सेनाधिकाऱ्याना केली. हे राज्य दमणपासून वसईपर्यंत पसरले आहे. साष्टीच्या चौतिया राजाला दमण शहराचे नागरिक चौथाईचा कर

अनुक्रमणिका

भरत असत. या कराचे बदली चौतिया राजाने दमण शहराचे चोर दरोडेखोरांपासून रक्षण करायचे होते. परंतु ह्या राजाला मोगलांच्या आक्रमणापासून आपले रक्षण करता आले नाही. त्याने पळून येऊन दमण शहराच्या तटांजवळ आपली छावणी ठोकली व मोगलांपासून आपला बचाव करण्यासाठी आमची मदत मागितली. पोर्तुगीजानी अशी मदत देण्याचे पूर्वी कबूल केले होते. दमणचे कॅप्टन दों फिलीप द कामारा यानी दि. २२ मार्च रोजी मला पत्र लिहून कोणत्या धोरणाचा अवलंब करावा तत्संबंधी माझा सल्ला मागितला. त्याचबरोबर किल्ल्याच्या नदीपलीकडच्या 'सां जेरोनिम्' किल्ल्याच्या रक्षणासाठी लष्कराची व दारुगोळ्याची कुमक पाठविण्याची विनंती केली.

'दमणचे कॅप्टन दों फिलिप द कामारा यानी दि. ९ एप्रिल आणि ५ मे रोजी मला जी पत्रे पाठवली आहेत त्यात म्हटले आहे की, मोगल बादशहाचे सरदार त्याना नजराणे देऊन आपणाकडे माणसे पाठवावी व चौथाई देण्यास सिद्ध व्हावे, असे कळवीत आहेत. त्यानी त्याना तूर्त मोघम पत्रे पाठवून गप्प बसविले आहे. मी त्याना प्रत्युतर धाडले आहे की, मोगल सरदार आणि साष्टीचा राजा यांच्यामधील युद्धाचा शेवट काय होतो ते पाहून बादशहाच्या सरदारास अंतिम निर्णय कळवावा. तोपर्यंत त्याला मोघम पत्रे पाठवून झुलवीत ठेवावे. कारण, साष्टीचा राजा मोगल बादशहाचा मांडलिक बनण्याची शक्यता आहे. मी महाराजाना याप्रकरणी संपूर्ण माहिती कळविणार आहे.'

शिवाजी महाराजानी रामनगरचे राज्य घेऊन पोर्तुगीजांकडे चौथची मागणी केली, तेव्हा देखील त्यानी वरील धोरणाचा अवलंब केला. त्यानी महाराजाना संदिग्ध पत्रे पाठवून चौथ देण्याची टाळाटाळ केली. दमणच्या पोर्तुगीज अधिकाऱ्यानी महाराजाना कळविले की, तुम्हाला चौथ द्यायचा की नाही तो प्रश्न व्हिसेरेइच्या सल्लागार मंडळाच्या विचाराधीन आहे. पण जोपर्यंत तुम्ही रामनगरच्या संपूर्ण राज्याचा कब्जा करणार नाही तोपर्यंत चौथ आम्ही तुम्हाला आणि रामनगरच्या राजालाही देणार नाही.

इ. स. १६७७ पर्यंत शिवाजी महाराजानी रामनगरचे बहुतेक सर्व राज्य घेतले व दमणच्या हद्दीवर आपले सैन्य आणून उभे केले. त्यांच्या सैन्याच्या उपस्थितीमुळे दमण शहराचे चोर दरोडेखोरांच्या उपद्रवापासून रक्षण होऊ लागले. त्यामुळे दमण शहराच्या नगरपालिकेने शिवाजी महाराजाना चौथचा कर देण्याचा ठराव संमत केला. परंतु व्हिसेरेइची प्रस्तुत ठरावाला मंजुरी मिळाल्याखेरीज दमण शहर चौथचा कर शिवाजी महाराजाना देऊ शकत नव्हते. त्या दरम्यान रामनगरचा राजा पोर्तुगीजांचा आश्रयास राहून व भिल्लांचे सैन्य उभारून शिवाजी महाराजांशी गनिमी युद्ध खेळत होता. पोर्तुगीज अधिकारी त्याला चोरून पैशाची आणि जीवनोपयोगी वस्तूची मदत करीत होते. त्याने गोव्याच्या व्हिसेरेइला पत्र पाठवून चौथच्या थकलेल्या बाकीची मागणी केली, तेव्हा व्हिसेरेइने त्याला उत्तर धाडले : '......चौथचा कर आमच्याकडे तुम्हीही मागता आणि शिवाजी राजेही मागतात. तेव्हा तुम्हा दोघांमधील युद्धाचा निकाल लागेपर्यंत मी तुम्हाला चौथची थकलेली बाकी देऊ शकत नाही. तरीपण शिवाजी राजे यांच्याशी तुमचे युद्ध चालू असल्याने थकलेल्या चार हजार रुपयांच्या करापैकी तीन हजार रुपये तुम्हाला गुप्तपणे देण्याबद्दल मी उत्तरेकडील सेनापतीस कळवीत आहे.'

पोर्तुगीजानी चौथचा कर भरण्याच्या बाबतीत टंगळमंगळ चालविली असली तरी पोर्तुगीजांविरूद्ध महाराजानी शस्त्रबलाचा उपयोग केला साही. त्यावेळी कल्याण भिवंडी भागात त्यांचे आठदहा हजार सैन्य होते. त्यांची इच्छा असल्यास त्याना पोर्तुगीजाच्या अमलाखालचा मुलुख घेता आला असता पण त्यानी तसे केले नाही की, पोर्तुगीजाकडे चौथचा कर मागण्याचेही सोडले नाही. पोर्तुगीजानी त्याना शेवटपर्यंत

उडवाउडवीची उत्तरे दिली. त्याचा एक नमुना पुढील प्रमाणे आहे. गोव्याचा गव्हर्नर आंतोनियु पाईश द सांद हा शिवाजी महाराजांचे पोर्तुगीजाकडील वकील पितांबर शेणवी याना दि. १२ जुलै १६७८ रोजी लिहितो :

'गोव्याचे राज्य हे कुणाचे मांडलिक नाही. त्यामुळे शिवाजी राजे याना चौथचा कर आम्ही भरण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. मात्र एक गोष्ट खरी की, दमणमधील आणि उत्तरेकडील काही खेड्यांचे चोर दरोडेखोरापासून रक्षण व्हावे म्हणून चौतिया राजाशी एक करार करण्यात आला होता. परंतु त्या कराराचा गोव्याच्या राज्याशी काही संबंध नाही. तरी देखील पितांबर शेणवी यानी शिवाजी राजे याना विदित करावे की त्यानी चौथबाबत दमणच्या कॅप्टनशी वाटाघाटी कराव्या. तो जर त्याना चौथचा कर देण्यास तयार असेल तर आमची त्याला हरकत नाही.'

ही निव्वळ लुच्चगिरी होती. कारण गोव्याचा गव्हर्नर अथवा व्हिसेरेइ हा केवळ गोवा प्रदेशाचा गव्हर्नर नसून हिंदुस्थानातील सर्व पोर्तुगीज वसाहतींचा प्रमुख होता. त्याने जर दमणच्या कॅप्टनला चौथचा कर शिवाजी महाराजाना भरण्याचा हुकूम केला असता तर त्याची अंमलबजावणी त्याला करावी लागली असती. चौथच्या कराचा घोळ पोर्तुगीजानी तब्बल दहा वर्षे घातला. उभयपक्षांमध्ये पत्रोपत्री आणि वाटाघाटी झाल्यावर गोव्याच्या गव्हर्नर एकदाचा चौथचा कर भरण्यास तयार झाला. पण त्यालाही तसेच जबरदस्त कारण घडले.

इ. स. १६७५ साली शिवाजी महाराजानी फोंड्याच्या किल्ल्यास वेढा घातला. मागच्या प्रमाणे यावेळीही पोर्तुगीजानी फोंड्याच्या आदिलशाही शिबंदीला दारुगोळ्याची आणि अन्नाची चोरून मदत पाठविण्यास सुरुवात केली. शिवाजी महाराजाना त्याचा सुगावा लागल्याने त्यानी बोरी नदीवर पहारा ठेवला. एके दिवशी अन्नधान्याची आणि दारू गोळ्याची दहा शिबाडे बोरीनदीतून फोंड्यास जात असता मराठ्यानी ती पकडली. शिवाजी महाराजानी व्हिसेरेइकडे त्याचा जाब मागितला असता, त्याने उडवाउडवीचे उत्तर दिले. महाराजानी पोर्तुगीजाना धडा शिकविण्याचे ठरविले. त्यानी साष्टी प्रांतातील कुकळ्ळी आणि वेरडे या दोन गावात सैन्य पाठवून त्या गावची लुटालूट केली. त्याचा योग्य तो परिणाम झाला. व्हिसेरेइ चौथचा कर भरण्यास अखेर तयार झाला. परंतु हा कर पोर्तुगीजानी नियमीतपणे भरला असावा असे वाटत नाही. तथापि चौथचा कर जरी पोर्तुगीजानी नियमीतपणे भरला नसला तरी 'ग्राव कांदील' (Grao Candil) या नावाचा कर मात्र ते मराठ्याना नियमितपणे भरत असत. हा कर शेतकऱ्यांकडून मराठे घरोघर हिंडून वसूल करीत असत. धान्याच्या दर खंडीमागे हा ठराविक कर धान्य रुपानेच बांधून देण्यात आला; परंतु हा कर वसूल करताना मराठा सैनिक शेतकऱ्यांच्या इतर वस्तूही घेऊन जाऊ लागले, म्हणून पोर्तुगीजांनी हा कर मराठ्याना दमणच्या हद्दीवर देण्याचा उपक्रम सुरू केला.

शिवाजी महाराजानी इ. स. १६७५ च्या ८ मेस फोंड्याचा किल्ला घेतला. त्यामुळे फोंड्याच्या अंकित असलेले तिसवाडी, चंद्रमहल, केपे, बाळ्ळी, आणि काणकोण हे आदिलशाही महाल त्यांच्या अमलाखाली आले. त्यानंतर त्यानी दक्षिणेकडे चाल करून सांप्रतच्या कारवार प्रांतातील सिवेश्वर, कडवाड, कद्रा आणि अंकोला हा गंगावळी अथवा गंगावती नदीपर्यंतचा आदिलशाही प्रदेश काबीज केला. त्यांनी फोंडे येथे आपला सुभेदार नेमला व दक्षिणेकडील प्रदेशाचा कारभार बघण्यासाठी बाळ्ळी येथे एक हवालदार नेमला.

अनुक्रमणिका

गोव्याच्या व्हिसेरेइने शिवाजी महाराजाना 'चौथ'चा कर देण्यास नेहमीच टाळाटाळ केली हे मागे आलेच आहे. परंतु त्यांच्या सैन्याचा उपसर्ग गोव्यापेक्षा दमण आणि साष्टी येथील पोर्तुगीज प्रदेशाला अधिक पोचत होता. म्हणून चौथचा कर नियमितपणे भरून त्यांची मैत्री टिकवावी असे दमण आणि साष्टी प्रदेशातील पोर्तुगीज अधिकाऱ्याना वाटत होते. या संदर्भात पोर्तुगीजांच्या वसई प्रांताचा कॅप्टन जनरल मानुएल लोबु द सिल्वैरा याने दि. २८ मे १६७७ रोजी पाठविलेले पुढील पत्र बोलके आहे :

'...दमणचे कॅप्टन मानुएल फुर्ताद यानी शिवाजीशी संदर्भ लावून कोळी राजास शासन करण्याची त्याला विनंती केली. त्या विनंतीनुसार शिवाजीची आणि आमची जी बोलणी झाली त्यास अनुसरून शिवाजीने कोळी राजाच्या राज्यात १६७२ च्या एप्रिल अथवा मे महिन्यात सैन्य घुसविले.

'......शिवाजीचा चौथवर दावा आहे. परंतु तो आमचा शेजारी असून देखील आमच्या प्रदेशात त्याने चोऱ्यामाऱ्या किंवा आक्रमणाचे प्रकार केलेले नाहीत. इतकेच नव्हे, तर चौतियाच्या राजाप्रमाणे त्याने खिंडी आणि रस्ते रोखून चोर दरोडेखोरांचा बंदोबस्त केला आहे. त्यामुळे त्याला चौथचा कर देण्यास हरकत नसावी. शिवाजीने कोळी राजा आणि चौतिया राजा या दोघानाही गप्प बसविले आहे, इतकेच नव्हे तर बलसाड पावेतो मोगल प्रदेशात पाचर मारली आहे. तो श्रीमंत आणि बलाढ्य आहे. त्याच्या सामर्थ्याच्या मानाने आमचे सामर्थ्य मर्यादित आहे. आमचा अधिकार शहर आणि किल्ला या पलिकडे जात नसल्याने आम्हाला सगळीकडे धावाधाव करणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीत शिवाजीने इकडचा सर्व प्रदेश घेतला तर आश्चर्य करण्याचे कारण नाही. तो ज्याअर्थी आमची कोणतीच नुकसानी करीत नाही त्याअर्थी त्याला चौथचा कर देण्यास हरकत नाही. शिवाजी आमच्याकडे जीवनोपयोगी वस्तूची मागणी करीत आहे. तो या शहराचा आणि किल्ल्याचा प्रामाणिक मित्र असल्याने त्याला थोडे धान्य पुरविण्यास हरकत नसावी. नाहीतरी मागच्या काळात आपण खंबायत, सुरत, वगैरे बंदराना जीवनोपयोगी वस्तू विकत होतोच. परंतु शिवाजीने भाताची जी मागणी केली आहे ती आमची परीक्षा पाहाण्यासाठी की काय न कळे...'

शिवाजी महाराजाना पोर्तुगीज कसे वचकून होते व त्यांच्याशी संघर्षाचे प्रसंग उद्‌भवले असता ते कसे टाळीत होते, ते पुढील काही घटनावरून सिद्ध होते.

इ. स. १६६९ सालच्या जानेवारी महिन्यात अरबांच्या काही नौकांचा पोर्तुगीज युद्धनौकानी पाठलाग केला असता त्या संगमेश्वर नदीच्या आश्रयास जाऊन राहिल्या. ही नदी शिवाजी महाराजांच्या राज्यातून वाहात असल्याने त्या नदीत शिरून अरब नौका पकडण्यास अथवा त्या जाळून टाकण्यास पोर्तुगीज आरमाराधिकारी धजले नाहीत. त्यानी त्या बाबतीत गोव्याच्या व्हिसेरेइचा कौल मागितला.

दि. ८ मार्च १६७९ या दिवशी अरब नौकासंबंधी कोणते धोरण पत्करावे त्याचा विचार करण्यासाठी गोव्याचा गव्हर्नर आणि कॅप्टन जनरल आंतोनियु पाइश द सांद याने राज्य सल्लागार मंडळाची बैठक बोलविली. त्याने निवेदन केले की, अरबांची पाच जहाजे झंझिगार (संगमेश्वर) नदीच्या आश्रयास जाऊन राहिली आहेत. आमच्या युद्धनौका नदीत शिरून आपल्या नौकांवर हल्ला करतील या भीतीने अरबानी नदीच्या मुखात दोन गलबते बुडवून रस्ता रोखून धरला आहे. दुसरी अडचण ही की, आमच्या संभाव्य हल्ल्यास तोंड देण्यासाठी त्यानी नदीच्या दोन्ही काठावर खंदक खणून बचावाची तयारी केली आहे, तोफांचे मोर्चे उभारले आहेत. त्यांच्यापाशी मनुष्य बळ अवघे चारशेच्या जवळपास असले तरी त्याना आणखी चारशे मुसलमान येऊन मिळाले आहेत. तसेच शिवाजीने त्या भागातील लोकाना आज्ञा दिली आहे

अनुक्रमणिका

की, अरबांवर कुणी हल्ला केला तर तुम्ही त्यांच्या मदतीला गेले पाहिजे. आमच्या दर्यासारंगानी आपल्या पत्रात म्हटले आहे की, अशा परिस्थितीत अरबांवर हल्ला करणे हे कठीण काम होऊन बसले आहे. तरी मान्यवर सल्लागारानी या परिस्थितीवर इलाज सुचवावा.

बहुसंख्य सल्लागारानी दृष्टिकोण व्यक्त केला की, दर्यासारंग जोसेफ मेलु द काश्त्रू यानी आपल्या शेवटच्या पत्रात लिहिल्याप्रमाणे अरबांच्या नौका जाळून टाकणे हे अवघड काम आहे. अरबाना मुसलमानांची कुमक आली आहे आणि त्यानी खंदक खणून तोफांचे मोर्चे उभारून प्रतिकाराची तयारी केली आहे हे तर खरेच, परंतु सर्वात चिंतेची बाब ही म्हणजे शिवाजीचे त्याना संरक्षण मिळाले आहे. त्याला डावलून अरबांवर हल्ला करणे म्हणजे त्याला युद्धास आव्हान देण्यासारखे आहे. कारण आम्ही अरबांवर हल्ला केल्यास तो त्यांच्या मदतीला आल्यावाचून राहाणार नाही. त्याच्याशी युद्ध खेळण्याइतकी तरी आमची परिस्थिती आज नाही. अशा परिस्थितीत इलाज एकच उरतो अन् तो म्हणजे अरबांची कोंडी चालू ठेवणे. त्याना मस्कतला जाऊ न देणे.

शिवाजी महाराज पोर्तुगीजांशी डावपेचांचेही युद्ध खेळत होते. मस्कतच्या इमामाची आणि त्यांची तशी गाढ मैत्री नव्हती. परंतु मस्कतच्या इमामाची आणि पोर्तुगीजांचे हाडवैर असल्याने पोर्तुगीजांना शह देण्यासाठी त्यानी इमामाशी मैत्रीचे संबंध ठेवले होते. इमामालाही पोतुगीजांना तोंड देण्यासाठी शिवाजी महाराजांच्या मैत्रीची जरूरी भासत होती. असाच कचखाऊपणा शिवाजी महाराजानी इ. स. १६७९ साली खांदेरी उंदेरी बेटांची तटबंदी करण्याचे काम हाती घेतले, तेव्हा पोर्तुगीजांकडून झाला.

दि. १६ सप्टेंबर १६७९ या दिवशी राज्य सल्लागार मंडळाची बैठक भरली तेव्हा व्हिसेरेइने बैठकीसमोर पुढील ठराव मांडला :

शिवाजी राजे यानी आमच्या चौल बंदरासमोर असलेल्या खांदेरी उंदेरी बेटांची तटबंदी करण्याचे काम हाती घेतले असून त्यासाठी वरच्या चौलमध्ये तीन हजार माणसे येऊन दाखल झाली आहेत. या तटबंदीला सिद्दीचाही विरोध आहे, त्याने त्यासाठी बारा गलबते सज्ज केली आहेत. असे कळते की सिद्दीप्रमाणे आम्हीही जर ह्या तटबंदीस विरोध केला, तर आमच्याशी युद्ध पुकारण्याचा बेत शिवाजीने केला आहे. तरी या बाबतीत काय करायचे ते सल्लागार मंडळाने ठरवावे.

राज्य सल्लागार मंडळाच्या सदस्यानी मत प्रकट केले की, शिवाजी राजे यानी खांदेरी उंदेरी बेटाची तटबंदी केली तर आमच्या जहाजाना त्याचा उपद्रव सहन करावा लागेल. तरी सदरहू तटबंदीस प्रतिबंध करावा. परंतु राज्य सल्लागार मंडळाने संमत केलेला ठराव अमलात आणण्याचे धाडस व्हिसेरेइला झाले नाही. पोर्तुगीजांच्या ह्या कचखाऊपणाचा उल्लेख एका इंग्रजी पत्रात आढळतो. ते दि. २५ मे १७७६ चे असून त्यात म्हटले आहे : 'त्याची त्यानी एवढी दहशत घेतली आहे की आपल्या प्रदेशांतून ते त्याला खुशाल वाट देतात. त्याला नकार देण्याचे धाडस त्याना होत नाही.'

आपल्या असाह्यतेवर पांघरूण घालण्यासाठी गव्हर्नर आंतोनिक बाइश द सांद याने दि. १५ नवंबर १६७९ रोजी पोर्तुगालच्या राजास लिहिले :

अनुक्रमणिका

‘...शिवाजीने या राज्याला लागून असलेला दमणपर्यंतचा सर्व प्रदेश जिंकला आहे. या शहरापासून पाच दिवसांच्या अंतरावर त्याचे मोगल फौजांशी युद्ध चालू आहे. तसेच चौलपासून दोन कोसांवर असलेल्या खांदेरी उंदेरी बेटाचीही तटबंदीही तो करीत आहे. त्याचा शेजार आम्हाला चांगला नाही. इंग्रजानी त्याला विरोध करण्याचे ठरविले असून आमचे सहकार्य या कामी मागितले आहे. मी आमच्या उत्तरेकडील प्रदेशाच्या सेनापतीस कळविले आहे की, शिवाजीशी आमचा शांततेचा करार झाला असल्याने त्या कराराचा भंग करून त्याच्याशी आम्हाला युद्ध करता येत नाही, असे इंग्रजाना कळवावे. ही सबब सांगण्याचे कारण की, शिवाजीपेक्षा इंग्रजांचा शेजार वाईट आहे, असे आमचे मत आहे.’

उपर्युक्त पत्रात व्हिसेरेइने शिवाजी महाराजांची तुलना हुणांचा सेनापती ॲटिल (Atila) याच्याशी केली आहे. त्याने त्याना हिंदी ‘ॲटिला’ संबोधिले आहे व ते चढाईचे आणि बचावाचे युद्ध तेवढ्याच म्हणून कुशलतेने खेळतात असे म्हटले आहे.

पोर्तुगीजानी खांदेरी उंदेरी बेटांच्या तटबंदीस विरोध करण्याचे कामी इंग्रजाना मदत केली नसली, तरी इंग्रजानी माघार घेतली नाही. त्यानी खांदेरी उंदेरी बेटावर आरमारी चढाई केली. शिवाजी महाराजांच्या युद्धनौकानी त्यांचा प्रतिकार केला. इंग्रज लढाई हरले.

शिवाजी महाराजानी आपल्या राज्याची सुरक्षितता बळकट करण्यासाठी पुष्कळ किल्ले आणि जलदुर्ग बांधिले हे मशहूरच आहे. असाच एक जलदुर्ग त्यानी पोर्तुगीजांच्या साष्ट प्रांताच्या सीमेवर साळ नदीच्या संगमावर बाळ्ळी महालात बेतुल येथे बांधावयास घेतला. तो बांधून झाला तर पोर्तुगीजांच्या अमलाखाली असलेल्या साष्ट प्रांताला त्याचा उपसर्ग पोहोचणार होता. म्हणून गोव्याचा गव्हर्नर आंतोनियु पाईश द सांद याने बलप्रयोग करून त्याला प्रतिबंध करण्याच्या इराद्याने दि. १५ मे १६७९ या दिवशी राज्य सल्लागार मंडळाची बैठक बोलविली. यावेळी केलेल्या प्रास्ताविक भाषणात तो म्हणाला :

‘रासई किल्लयाचे कॅप्टन फ्रान्सिश्कु सिमांइश द लैताव यानी पत्र पाठवून कळविले आहे की, बाळ्ळीच्या हवालदाराने असोळणे नदीच्या पलीकडच्या किनाऱ्यावर एक किल्ला बांधावयास घेतला आहे. तो बांधून पूर्ण झाला तर आमच्या राज्यास त्या किल्ल्यापासून उपद्रव पोहोचणार आहे. आदिलशाही अमदानीत त्या ठिकाणी किल्ला बांधण्याचा प्रयत्न कुणी केला नव्हता. तरी सन्मानीय सभासदानी या बाबतीत आपले मत प्रकट करावे.’

सभासदानी सल्ला दिला की, बाळ्ळीच्या हवालदारास किल्ल्याचे बांधकाम पाडून टाकण्याची ताकीद करावी. पण त्याने जर ते काम पाडून टाकले नाही तर रासईच्या किल्लेदाराने माणसे नेऊन ते काम बळजबरीने पाडून टाकावे.

गोव्याच्या व्हिसेरेइच्या आदेशावरून रासईचा कॅप्टन फ्रान्सिश्कु सिमांइश द लैताव याने बाळ्ळीच्या हवालदारास पुढील पत्र पाठविले :

‘मला बातमी कळली आहे की, साळ नदीच्या संगमावर पूर्वी जेथे एक दुकान होते, तेथे आपल्या आज्ञेवरून एक किल्ला बांधण्यात येत आहे. मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की हे कृत्य शिवाजी राजे आणि हे राज्य यांच्या मधल्या शांततेच्या कराराला बाध आणणारे आहे. असा प्रकार आदिलशहाची राजवट

आपल्या अमलाखालच्या प्रदेशात होती, तेव्हा कधीच झाला नाही. एकादी पक्की इमारत देखील साळ नदीच्या मुखावर तेव्हा नव्हती. मला या राज्याच्या गव्हर्नरकडून हुकूम झाला आहे की, हा जो किल्ला तुम्ही बांधावयास घेतला आहे त्याचे बांधकाम पाडून टाकण्याची ताकीद तुम्हाला करावी. तरी हे ताकीद पत्र मिळताच किल्ल्याचे बांधकाम जे झाले आहे ते पाडून टाकावे. तुम्ही बांधकाम चालू ठेवले तर तुमच्याकडून शांततेच्या कराराचा भंग होत आहे असा त्याचा अर्थ होईल. तुम्ही सुज्ञ आहात. मला आशा आहे की, तुम्ही विचारपूर्वक वागाल व पुढील हानी टाळाल.'

वरील ताकीद पत्राप्रमाणे बाल्लीच्या हवालदाराने किल्ल्याचे बांधकाम बंद ठेवले नाही की पाडूनही टाकले नाही. पोर्तुगीजानाही बलप्रयोग करून ते काम जमीनदोस्त करण्याचे धाडस झाले नाही. बाल्लीच्या हवालदाराने किल्ला बांधून पूर्ण केला. किल्ल्यास खोलगड हे नाव ठेवण्यात आले. सांप्रत तो शाबूद स्थितीत आहे.

खोलगडच्या किल्ल्याखेरीज शिवाजी महाराजानी कारवार प्रांताच्या किनाऱ्यावर कूर्मगड आणि मादालिंग गड हे किल्ले व कद्रे आणि अंकोला येथे दोन भुईकोट बांधिले. वरील किल्ल्यांखेरीज शिवाजी महाराजानी डिचोली तालुक्यातील नार्वे येथील सप्तकोटीश्वराचा जीर्णोद्धार केला. गोव्यातील कदंबांचे हे कुलदैवत. पूर्वी मुसलमानानी आणि नंतर पोर्तुगीजानी सप्तकोटीश्वराचे मंदिर भग्न केले होते. त्याच्या भक्तानी आणि महाजनानी हा देव नार्वे येथे नेऊन त्याची प्राणप्रतिष्ठा केली होती. शिवाजी महाराजानी सन १६६८ साली डिचोली घेतल्यावर सप्तकोटीश्वराचे दर्शन घेतले, तेव्हा सप्तकोटीश्वराने रात्री त्यांच्या स्वप्नात येऊन आपल्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचा दृष्टांत दिल्याची आख्यायिका आहे.

शिवाजी महाराज आणि पोर्तुगीज या दोघांमध्ये मोठे आणि प्रदीर्घ युद्ध कधी झाले नाही हे जरी खरे असेल, तरी त्यांच्या अमलाखालचा प्रदेश मुक्त करण्याचा त्यांचा बेत होता. त्यासाठी ते युद्धाची तयारी करीत होते. त्याचा सुगावा पोर्तुगीजाना लागल्याने त्यानीही त्याना तोंड देण्याची तयारी सुरू केली होती. त्यानी ७००० सैन्य कुकळ्ळी येथे गोळा केले होते. कारण महाराजांचा हल्ला दक्षिणेकडून होणार असल्याची बातमी त्यांच्या गुप्तहेरानी आणली होती. त्या बातमीने घाबरून गेलेला व्हिसेरेइ गडबडून जाऊन आपल्या सेनापतीना जागरूक राहाण्याबद्दल वरचेवर पत्रे पाठवीत होता, त्याना खिंडी रोखण्याचा इशारा देत होता. परंतु त्याचे नशिब बलवत्तर होते. शिवाजी महाराजांचे दि. ३ एप्रिल १६८० या दिवशी रायगडी निधन झाल्याची बातमी आली. ती बातमी कानी पडताच व्हिसेरेइने सुटकेचा श्वास सोडला. तो उद्‌गारला : 'आमच्या काळजीचे निवारण झाले आहे. युद्धकालापेक्षा शांततेच्या काळातच त्याची आम्हाला अधिक भीती वाटायची.'

अनुक्रमणिका

# ८. संभाजी

संभाजी पन्हाळ्यावर नजरकैदेत होता, तेव्हा रामजी ठाकूर या नावाचा आपला एक विश्वासू दूत गोव्याच्या व्हिसेरेइकडे पाठवून त्याच्याशी त्याने संधान जुळविले होते. या संदर्भात व्हिसेरेइ आंतोनियु पाईश द सांद हा रामजी ठाकूर यास दि. ८ मे १६८० या दिवशी लिहितो :

‘संभाजी राजे यानी आपला दूत म्हणून आमच्याकडे पाठविण्यासाठी आपली निवड केल्याचे पाहून मला आनंद झाला. आपण चतुर आहात असे ऐकतो. शिवाजी राजे यांच्या सरदारानी आमच्याविषयी जे धोरण अवलंबिले होते, त्यावरून शिवाजी राजे यांच्याशी युद्ध करणे आम्हास सोयीचे वाटत होते. कारण, खोट्या शांततेपेक्षा युद्ध केलेले बरे, असा आमचा दृष्टिकोण होता. मला बातमी कळली होती की सरदार महादजी अनंत हे फोंडा येथे होते व शिवाजी राजे यांचे आणखी काही सरदार सरहद्दीवर सैन्याची जमवाजमव करीत होते. मी आमच्या सैन्याला फोंड्यामध्ये घुसण्याचा हुकूम केला होता. तोच शिवाजी राजे यांच्या निधनाची बातमी आली. ती बातमी कळताच मी आमच्या सैन्याला दिलेला हुकूम मागे घेतला. आता नवीन सरकार अधिकारावर आले असल्याने जुन्या सरकाराच्या आगळिकेबद्दल त्याला जबाबदार धरणे इष्ट नाही.

‘आपले आगमन इकडे होणार असल्याने संभाजी राजे यांचे विचार आणि त्यांच्या सोयी आम्हाला आपणाकडून कळतील व आमचेही विचार आम्ही आपणास विदित करू.’

व्हिसेरेइ आंतोनियु पाईश द सांद याने संभाजीचा खास दूत रामजी ठाकूर याला पत्र लिहिले, त्याच दिवशी त्याने कोकणचा सरसुभेदार रायाजी पंडित यालाही पुढील पत्र पाठविले :

‘शिवाजी राजे यांच्या निधनाची बातमी कळताच मी आमच्या साष्टी प्रांतच्या कॅप्टन जनरलला युद्धबंदीची आज्ञा दिली होती. फोंड्याच्या हद्दीवरही हीच व्यवस्था करण्यात आली आहे. मी युद्धबंदीचा निर्णय एकतर्फी घेतला त्याचे कारण हे की, जो नवीन राजा सिंहासनावर येईल त्याला आमच्याशी युद्ध चालू ठेवावे की ठेवू नये तत्संबंधीचा निर्णय घेणे सोपे जावे. मी आपणाला वचन देतो की, गत गोष्टी विसरून जाऊन नवीन परिस्थितीशी जुळते घेण्याचा मी प्रयत्न करीन. मात्र तुमच्या बाजूच्या अधिकाऱ्यांकडून आमच्या प्रजाजनाना जो उपद्रव होत आहे तो मी सहन करणार नाही. आपण लिहिता की, आमच्याशी कायमचा टिकावू तह करण्याची संभाजी राजे यांची इच्छा आहे व त्यांचा एक दूत त्यांचे पत्र घेऊन इकडे येणार आहे. त्याची आणि माझी भेट झाली की माझे विचार मी त्याला विदित करीन.’

संभाजीचा खास दूत रामजी नाईक ठाकूर हा व्हिसेरेइशी बोलणे करून निघून गेला. दि. २५ मे १६८० रोजी कोकणचा सरसुभेदार रायाजी पडित यास व्हिसेरेइने लिहिले :

‘...आपण संभाजी राजे यांच्या भेटीस जात असल्याचे कळले. त्यांचे दूत रामजी नाईक ठाकूर यांच्याशी माझी जी मुलाखत झाली तिच्यातून संभाजी राजे यांच्या विषयीची व आपणाविषयीची माहिती मला कळली.

अनुक्रमणिका

‘रामजी नाईक ठाकूर यानी माझ्यासमोर जी तहाची कलमे मांडिली त्यांची उत्तरे मी त्यांच्याकडे पाठवून दिली आहेत. त्यावर संभाजी राजे यानी काय तो निर्णय घ्यायचा आहे. त्यानी माझ्या उत्तराना संमती दिली की तहाच्या करारावर मी माझे स्वामी पोर्तुगालचे राजे यांच्या वतीने सही करीन.

‘संभाजी राजे यांच्या दूताने बरोबर एक नजराणा आणला होता. परत भेट म्हणून मी त्याच्याबरोबर संभाजी राजे याना नजराणा पाठविला आहे.’

रामजी नाईक ठाकूर हा गोव्यास येऊन व्हिसेरेइशी बोलणी करून गेल्यावर व्हिसेरेइने शिवाजी महाराजांच्या निधनाबाबत दि. २९ मे १६८० या दिवशी संभाजीस दुखवट्याचा संदेश धाडला त्यात तो म्हणतो :

‘आपले दूत रामजी नाईक ठाकूर यांच्याबरोबर पाठविलेले आपले पत्र मिळाले. आपले पिते शिवाजी राजे यांच्या निधनाबद्दल आम्हाला फार दुःख झाले.त्याबद्दलच्या आमच्या भावना प्रस्तुतच्या पत्राचे द्वारा आपणास कळवीत आहे. मृत्यु कुणालाच चुकत नाही. दैवी इच्छेसमोर कुणाचीच मात्रा चालत नाही. आपणासारखा शांततेने राज्य करणारा राजा आपल्या प्रजेस लाभला याबद्दल आपली प्रजा अभिनंदनास पात्र आहे. प्रजेच्या दृष्टीने न्याय आणि शांतता यासारखे सुख दुसरे कोणते नसते.

‘आपण लिहिले आहे की, आमचीशी मैत्रीचे आणि शांततेचे संबंध प्रस्थापित करण्याची आपली इच्छा आहे. या बाबतीत आमच्याशी आपला जो करार व्हायचा आहे, त्यातील काही कलमे रामजी नाईक ठाकूर यानी मला सादर केली. त्या कलमांची उत्तरे मी आपणाकडे पाठविली आहेत. ती आपल्या अवलोकनात येतीलच. हा होऊ घातलेला करार कायम टिकावा अशी माझी इच्छा आहे. आपल्या निर्णयाची मी वाट पाहात आहे. आपण आपला दूत खास अधिकारपत्रे देऊन तहावर सही करण्यासाठी आमच्याकडे पाठवावा. माझे स्वामी पोर्तुगालचे राजे यांच्या वतीने मी करारावर सही करीन.

‘आपण रामजी नाईक ठाकूर यांच्याबरोबर पाठविलेला नजराणा मिळाला. मी त्यांच्याबरोबर आपणासाठी एक नजराणा पाठविला आहे. तरी आपण त्याचा स्वीकार करावा.’

व्हिसेरेइच्या सूचनेनुसार संभाजीने आपला दूत तहाच्या करारावर सही करण्यासाठी गोव्यास पाठविला. पण त्याने आणलेली प्रमाणपत्रे व्हिसेरेइला विश्वासार्ह न वाटल्याने त्याने त्या दूतास परत पाठविले. या बाबतीत दि. २० जून १६८० रोजी संभाजीस पाठविलेल्या पत्रात व्हिसेरेइ म्हणतो :

‘...आपल्या दूताने आणलेली प्रमाणपत्रे आम्हाला विश्वासार्ह वाटली नाहीत. दुसरी गोष्ट म्हणजे त्याला तहाच्या करारावर सही करण्याचे अधिकार तुम्ही दिले नव्हते. त्यामुळे तुमच्याकडून नवीन हुकूम येईतोवर तहाचा करार तहकूब ठेवावा लागत आहे.’

व्हिसेरेइच्या उपरिनिर्दिष्ट पत्रात उल्लेख करण्यात आलेला दूत रामजी नाईक ठाकूर हाच असावा. हा मनुष्य सोयराबाईच्या पक्षातील होता, असे नंतर सिद्ध झाले. त्याचा विश्वासघातकीपणा उघडकीस आल्याने तो गोव्यास पळून गेला. परंतु अशा दगलबाज मनुष्यास आश्रय देण्यास व्हिसेरेइने नकार दिल्याने

अनुक्रमणिका

त्याने कर्नाटकात पलायन केले. तेथे त्याला आदिलशहाचा आश्रय मिळाला. त्याच्यासंबंधी गोव्याचा व्हिसेरेइ डिचोलीचा सुभेदार मोरो दादाजी यास दि. ९ डिसेंबर १६८० रोजी लिहितो :

'...रामजी ठाकूर याच्याविषयी आपण तक्रार केली आहे. खरे तर ही तक्रार मीच करायला हवी होती. संभाजी राजे यानी एका दगलबाज मनुष्यास वकील म्हणून अधिकारपत्रे देऊन माझ्याकडे पाठविले. मी त्याच्यावर विश्वास ठेवून राज्याच्या गुप्त गोष्टी त्याला सांगितल्या. संभाजी राजे यानी तहाच्या वाटाघाटी करण्याच्या बाबतीत सुरुवातीला घाई केली. आपल्या वकिलावर आपला विश्वास नाही, सबब त्याच्याशी गुप्त गोष्टीची खलबते करू नयेत असा इशारा मला त्यानी दिला नाही. दुसरा वकीलही अधिकारपत्रे देऊन त्यानी माझ्याकडे पाठविला नाही...'

संभाजी आणि पोर्तुगीज याच्यामध्ये होऊ घातलेला तह पार न पडल्याने परस्परांमध्ये कटकटी सुरू झाल्या असाव्यात असे वाटते. उदाहरणार्थ, गोव्याचा व्हिसेरेइ कोकणचा सुभेदार तानाजी राम यास दि. ३०जानेवारी १६८१ रोजी लिहितो :

'...संभाजी राजे व आमचे राज्य यांच्यामध्ये शांतता आणि सलोखा नांदावा अशी इच्छा आपण पत्रातून व्यक्त केली आहे. परंतु संभाजी राजे यांची अरेरावी असह्य होत चालली आहे. त्यामुळे त्यांच्याशी युद्ध सुरू करावे की काय असा विचार माझ्या मनात सुरू झाला आहे. माझी अशी समजूत आहे की, मिळमिळीत तहापेक्षा ढळढळीत युद्ध बरे...'

वरील पत्रात व्यक्त केलेल्या विचारास अनुसरून १६८१ च्या जानेवारीत पोर्तुगीजानी मराठ्यांकडील व्यापार बंद करून राजनैतिक संबंधही गोठून टाकले. त्याच वर्षीच्या मे महिन्यात संभाजीचे डिचोली येथे काही दिवस वास्तव्य होते. औरंगजेबाचा पुत्र शाहाजादा अकबर हा आपल्या बापाशी भांडून संभाजीच्या आश्रयास आला तेव्हा संभाजीने त्याला डिचोली शहरात एक वाडा बांधून दिला होता. डिचोली हे त्यावेळी गजबजलेले शहर होते. संभाजीच्या डिचोली शहरातील वास्तव्याची संधी साधून गोव्याच्या व्हिसेरेइने त्याला एक पत्र पाठवून त्याच्या अधिकाऱ्यांविरूद्ध त्याच्यापाशी तक्रार केली. सदरहू पत्रात व्हिसेरेइ म्हणतो :

'......आपला डिचोलीचा सुभेदार हा चोर आणि जुलमी आहे. तो आपल्या प्रजेचा छळ तर करतोच, पण आपल्या दोन्ही राज्यांमधील संबंध बिघडविण्यासारखी कृत्येही त्याच्या हातून घडत आहेत. त्याच्याविरूद्ध मी आपणाकडे कधी तक्रार केली नव्हती. त्याच्या छळास कंटाळून आमच्या राज्यात येऊन राहिलेले देसाई आता तिकडे परत जाण्यास तयार नाहीत.

'रामजी नाईक ठाकूर याच्याविषयी बोलायचे झाल्यास मीच फिर्यादी असायला पाहिजे. तो आपली प्रमाणपत्रे घेऊन आपला वकील म्हणून इकडे आला. तो आपला विश्वासू मनुष्य असल्याचे गृहीत धरून त्याच्याशी अनेक गुप्त प्रश्नाबाबत खलबते केली. नंतर तुम्ही आम्हाला कळविले की तो दगलबाज आहे. असा मनुष्य तुम्ही आपला वकील म्हणून आमच्याकडे कसा पाठविला?

'आमच्याविषयी बोलायचे झाल्यास तहाचा भंग होण्यासारखे एकही कृत्य आमच्या हातून घडलेले नाही. आपल्या सरदाराने इकडून जी तहाची कलमे नेली ती आपणास मान्य आहेत की नाही ते आपण

आम्हाला अद्याप कळविलेले नाही. आपल्या मंत्र्यानी काहीदा तह रद्द करण्याची इच्छा मला व्हावी असे प्रसंग माझ्यावर आणले आहेत. परंतु मी हे सर्व सहन केले. कारण आपल्या अधिकाऱ्यांकडून होणारी दुष्कृत्ये आपणास माहीत नसावी असे मला वाटले. आता मी आपणास कळवितो की ह्या प्रश्नात आपण लक्ष घालण्याची वेळ आली आहे. आपण सुज्ञ असल्याने आपणास अधिक लिहिण्याची आवश्यकता नाही.'

असे वाटते की, व्हिसेरेइने डिचोलीचा सुभेदार मोरो दादाजी याच्याविरूद्ध संभाजीपाशी जी तक्रार केली त्यात तथ्य होते. हा सुभेदार अण्णाजी दत्तो यांच्या मर्जीतला असल्याने मग्रुरीने वागत होता. पुढे अण्णाजी दत्तो सोयराबाईच्या पक्षात असल्याचा सुगावा संभाजीस लागून त्याला त्याने ठार मारल्यावर येसाजी गंभीर या नावाच्या मुत्सद्यास संभाजीने डिचोलीस धाडून सुभेदार मोरो दादाजी याच्यावरील आरोपांची चौकशी केली. ते आरोप सिद्ध होताच त्याला नोकरीतून अर्धचंद्र देण्यात येऊन त्याचे जागी जिवाजी विनायक याची डिचोलीचा सुभेदार म्हणून नेमणूक करण्यात आली. व्हिसेरेइच्या चिकाटीचा अखेर विजय झाला. मोरो दादाजीस शासन करण्यात तो यशस्वी झाला.

इ. स. १६८२ च्या प्रारंभी संभाजीने आंजेदिव बेटाची तटबंदी करण्याचा बेत आखून आपला एक सुभेदार तिकडे रवाना केला. गोव्याचा व्हिसेरेइ कौंट द आल्व्होर याला संभाजीच्या हालचालीचा सुगावा लागल्याने आंजेदिव बेट त्वरीत व्यापण्याचा विचार करून आपल्या कार्यकारी मंडळाची बैठक त्याने दि. २७ एप्रिल १६८२ या दिवशी पणजीच्या किल्ल्यात बोलविली. बैठकीसमोर भाषण करताना तो म्हणाला :

'संभाजी राजे यानी आंजेदिव बेट व्यापून त्याची तटबंदी करण्याची तयारी केली असल्याची बातमी एका खास गोटातून कळली आहे. हे बेट आमच्या राज्याच्या जवळ म्हणजे या शहरापासून बारा कोसांवर आहे. संभाजी राजे आणि आमचे शत्रू अरब यांचे सूत जमले आहे. अरबानी संभाजी राजे याना दांड्याच्या सिद्दीविरूद्ध मदत करण्याचे आश्वासन दिले असून, त्या बदली संभाजी राजे अरबाना आपल्या राज्यात व्यापार करण्याची सवलत देणार आहेत. असे जर झाले, तर आंजेदिव बेट अरबांच्या व्यापारी मार्गावरील बंदर बनून आमच्या प्रजाजनाना त्यांचा उपसर्ग पोचेल. आमच्या शहराला कर्नाटकातून जीवनोपयोगी वस्तूचा पुरवठा होतो. याच मार्गावर आंजेदिव बेट आहे. अरबांकडून आमच्या शहराच्या तटबंदीलाही धोका पोहोचण्याचा संभव आहे.

'आंजेदिव बेट हिंदुस्थानच्या जलमार्गाच्या शोधाचेवेळी पोर्तुगीज नावाड्यानी व्यापिले होते. पुढे त्या बेटापेक्षा अधिक महत्त्वाची ठाणी पोर्तुगीजांच्या हातात पडल्याने ते बेट सोडून देण्यात आले. परंतु ज्या ज्यावेळी समुद्रात तुफान होई त्या त्या वेळी आमची जहाजे या बेटाच्या आश्रयास जात असत. मला बातमी लागली आहे की, संभाजी राजे यांनी तटबंदीचा नकाशा तयार करून घेतला असून त्या कामास ते लवकरच प्रारंभ करणार आहेत. आमच्या उत्तरेकडील चौलच्या किल्ल्यासमोर संभाजी राजे यांची जी तटबंदीची बेटे आहेत, त्या बेटांपासून आमच्या जहाजाना उपद्रव पोहचत असतो हे आपणाला माहीत आहेच. ह्या दोन्ही तळांवरील जहाजांकडून आमच्या जहाजांवर हल्ले होतात. आता जर संभाजी राजे यानी आंजेदिव बेटाची तटबंदी केली, तर आमच्या दक्षिणेकडील सागरी वाहतुकीला त्या तटबंदीचा उपसर्ग होणार आहे. दुसरी गोष्ट म्हणजे आंजेदिव बेट संभाजी राजे यानी व्यापिले नसल्यास ते सिद्दी दांडा व्यापण्याची भीती आहे. संभाजी राजे यांच्या राज्यावर हल्ले करण्यासाठी त्याला या राज्याच्या किनाऱ्यावर एक तळ हवा आहे. परंतु संभाजी राजे यांच्याप्रमाणे सिद्दीचाही शेजार आम्हाला चांगला नाही. म्हणून ते बेट

आपण ताब्यात घेऊन त्याची तटबंदी करावी व तिच्यावर सहा तोफा बसवाव्या आणि हे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावे असा माझा बेत आहे. कारण पावसाळा सुरू झाला की तिकडे सामग्री नेता येत नाही.'

व्हिसेरेइच्या वरील ठरावाला राज्य सल्लागार मंडळाने मान्यता देऊन त्यावर सह्या केल्या.

उपर्युक्त ठरावाप्रमाणे व्हिसेरेइ कौंट द आल्व्होर याने चार गुराब, दोनशे सैनिक आणि तटबंदीला लागणारे सामान आंजेदिव बेटाकडे त्वरीत रवाना केले. शिबंदीचे नेतृत्व सिमाँएश पेरैरा नावाच्या अनुभवी आणि वयोवृद्ध अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आले.

पोर्तुगीजानी आंजेदिव बेट व्यापल्याची बातमी पोर्तुगीज दरबारातील मराठ्याचा वकील येसाजी गंभीर व अंकोल्याचा सुभेदार या दोघाना कळली तेव्हा त्यानी व्हिसेरेइला पत्र पाठवून आंजेदिव न व्यापण्याबद्दल बजावले. त्या दोघाना व्हिसेरेइच्या चिटणीसने उत्तर धाडले की, 'आमच्या अधिकाराच्या कक्षेत आम्ही वाटेल ते करू. त्याचा हिशेब कुणाला देण्याचे आमच्यावर बंधन नाही.'

पोर्तुगीजानी आंजेदिव बेटाची तटबंदी केल्याने संभाजीस गप्प बसावे लागले. औरंगजेबाचा पुत्र शाहाजादा अकबर ह्याला संभाजीने आश्रय दिला तेव्हा औरंगजेबाचा संभाजीवर रोष झाला होता. त्याचा क्रोध एवढ्या पराकोटीला पोचला होता की, 'संभाजीला कैद अथवा ठार केल्याखेरीज आपण आपला मंदील डोक्यावर चढविणार नाही', असे त्याने म्हटल्याचे सरजदुनाथ सरदार यानी औरंगजेबाच्या चरित्रात निर्दिष्ट केले आहे. औरंगजेबाने संभाजीवर सैन्य रवाना केल्याचा उल्लेख गोव्याच्या व्हिसेरेइने दि. २४ जानेवारी १६८३ या दिवशी पोर्तुगालच्या राजास लिहिलेल्या पत्रात आढळतो. तो म्हणतो :

'मोगलांचे सैन्य शिवाजीच्या (संभाजीच्या) प्रदेशात तीन बाजूने शिरले आहे. या सैन्याचे सरदार जिंकलेल्या मुलुखात तटबंदी उभारीत आहेत. तटबंद्या उभारण्याचे कारण की, संभाजीचे राज्य खालसा करण्याचा मोगल बादशहाचा हेतु पूर्वी नव्हता.

'मराठ्यांचे राज्य जिंकण्याच्या उद्देशाने सुरतेहून निघालेले एक मोगलांचे आरमार मुंबई बेटानजिक येऊन दाखल झाले आहे. त्यात असंख्य नौका आहेत. पैकी बऱ्याचशा पुरवठा घेऊन आल्या आहेत.

'मोगल सैन्य आमच्या प्रदेशातून संभाजीच्या राज्यात शिरले. आमच्या प्रदेशात प्रवेश करताना त्याने आमची परवानगी घेतली नाही. आमच्या राज्याची त्याने काही नुकसानी केली नाही खरी; परंतु मुसलमानावर विश्वास ठेवणे इष्ट नाही. ते जसे दगलबाज आहेत, तसेच बेशरमही आहेत. त्याना आपली स्वतःची प्रतिष्ठा राखता येत नाही. म्हणून महाराज, माझी आपणाला विनंती आहे की, आपण हिंदुस्थानला (गोव्यास) मदत पाठवावी. मुसलमानाविषयी गैरसावध राहाणे धोक्याचे आहे. मोगलांचा आमच्यावर केव्हा हल्ला होईल त्याचा नेम नाही. केवळ मोगलांचाच हल्ला येईल म्हणून नव्हे तर ह्या राज्याच्या सुरक्षितेच्या दृष्टीनेही मदत हवी आहे.

'संभाजीच्या आश्रयास आलेला बादशहाचा पुत्र सांप्रत कर्नाटकात असावा. त्याने आपले जडजवाहीर आमच्या राज्यात विकू देण्याची परवानगी आमच्याकडे मागितली असता आम्ही त्याला ती

अनुक्रमणिका

दिली आहे. आपल्या बापाचे आणि आपले वाकडे का आले तेही त्याने पत्रातून लिहिले आहे. त्याच्या पत्राला मी मोघम उत्तर धाडले आहे...'

गोव्याच्या व्हिसेरेइने मोगल सैन्यास संभाजीच्या राज्यावर स्वारी करण्यासाठी पोर्तुगीज हिंदुस्थानमधून वाट दिली, तत्पूर्वी औरंगजेबाच्या एका दूताने गोव्याची वारी करून व्हिसेरेइशी या प्रश्नाबाबत वाटाघाटी केल्या होत्या. या संदर्भात व्हिसेरेइ कौंट द आल्व्होर हा पोर्तुगालच्या राजास दि. १६ जानेवारी १६८३ रोजी लिहिलेल्या पत्रात म्हणतो की, मोगल बादशहाच्या एका दूताने इकडे येऊन माझी भेट घेतली व माझ्याकडे पुढील मागण्या केल्या :

१. सुरतेहून मुंबईपर्यंत येणाऱ्या मोगल आरमाराला आमच्या आरमाराने अडथळा करू नये.

२. मोगल आरमारी नौकाना आमच्या नद्यांतून अनिर्बंध वाहतूक करण्याची परवानगी असावी.

३. मोगल सैन्याला आमच्या राज्यात जीवनोपयोगी वस्तू खरेदिण्यास मूभा असावी.

बादशहाच्या दूताचे म्हणणे मी शांतपणे ऐकून घेतले. त्याला मी सौजन्यपूर्ण शब्दात सांगितले की, संभाजीचा आणि आमचा तह असल्याने त्या तहाचा भंग होण्यासारखे कृत्य आमच्या हातून होऊ न देण्याची दक्षता आम्हाला बाळगणे आवश्यक आहे. मात्र मोगल आरमाराला आमच्या आरमाराकडून कोणताच प्रतिबंध होणार नाही. तसेच मोगल सैन्याला आमच्या राज्यात जीवनोपयोगी वस्तु विकत घेता येतील.'

औरंगजेबाचा दूत गोव्यास आला तत्पूर्वी त्याचा बंडखोर पुत्र शाहाजाहा अकबर याने आपला दूत गोव्यास धाडला होता. औरंगजेबाचा दूत शेख महमद याला ती बातमी गोव्यास आल्यावर कळली. ती त्याने औरंगजेबास त्याच्या सरदाराना व त्याचा दर्यासारंग सिद्दी याकुतखान यालाही कळविली. याकुतखानाने व्हिसेरेइला निरोप धाडला की, शाहाजादा अकबर याने आपल्या बापाविरुद्ध बंड केले असल्याने त्याला कोणत्याच प्रकारची मदत करू नये. इतकेच नव्हे, तर त्याला कैद करण्याची आज्ञा तुमच्या अधिकाऱ्याना द्यावी.

औरंगजेबाचा दूत गोव्यास येऊन व्हिसेरेइशी वाटाघाटी करून गेल्यावर दि. १७ फेब्रुवारी १६८३ रोजी व्हिसेरेइने संभाजीचा कोकणातील सुभेदार अण्णाजी पंडित याला पत्र लिहिले. त्याचा आशय असा :

'संभाजी राजे यांचे वकील येसाजी गंभीर हे इकडे आले असून ते माझ्याशी तहाची बोलणी करीत आहेत. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, संभाजी राजे यानी या शिष्टमंडळाला तहाच्या करारावर सह्या करण्याचे अधिकार दिलेले नाहीत. हे काळकाढूपणाचे धोरण संभाजी राजे यांच्या फायद्याचे नाही. त्याचे कारण हे की, बादशहाचे प्रचंड सैन्य आणि आरमार संभाजी राजे यांच्यावर चालून येत असून या सैन्याला आणि आरमाराला आमच्या राज्यातून जाण्यास मी वाट दिली आहे.

'संभाजी राजे यांचा वकील इकडे आहे खरा, परंतु त्याला स्वतंत्रपणे वागण्याचे अधिकार देण्यात आलेले नाहीत. तर मग तो इकडे राहून काय फायदा. त्याला माघारा बोलविलेला बरा असे मला वाटते.

संभाजी राजे यांची ही बेफिकीर आणि उदासीन वृत्ती त्याना मारक ठरल्यावाचून राहाणार नाही. आमच्या मैत्रीची त्याना मातब्बरी वाटत नाही. त्यांची ही चूक काळच त्यांच्या नजरेस आणील.

'आपण संभाजी राजे यांचे विश्वासू सेवक आहात. आपण त्याना आमच्याशी तहाच्या वाटाघाटी करण्यास प्रवृत्त कराल अशी आशा आहे. हा तह मोगल बादशहाचा आणि आमचा मैत्रीचा करार होण्यापूर्वी झाला तर संभाजी राजे याना तो फायद्याचा ठरेल.'

गोव्याचे पोर्तुगीज संभाजी आणि औरंगजेब या दोघाना खुश ठेवण्याचे संधिसाधूपणाचे राजकरण कसे खेळत होते त्याचा प्रत्यय व्हिसेरेइ कौंट द आल्होर याने दि. १२ एप्रिल १६८३ रोजी औरंगजेबास लिहिलेल्या प्रदीर्घ पत्रावरून येतो. त्याचा आशय असा आहे :

'आपल्या प्रजेला उपद्रव देणाऱ्या 'नापाका'ला (संभाजीस) शासन करण्यासाठी आपण युवराज अहमद अझमशाह याना मोठे सैन्य देऊन इकडे पाठविले आहे व नबाब कर्तलबखान हेही मोठे आरमार घेऊन येत आहेत हे आपल्या पत्रावरून कळले. आपण माझ्याकडे मागणी केली आहे की, आपल्या पुरवठ्याच्या नौकाना मी आमच्या आरमारी जहाजांचे संरक्षण द्यावे व 'नापांकां'चे निर्दालन करण्यासाठी आपले जे सरदार इकडे येत आहेत त्याना मदत करावी. एक काब्रा घोडा आणि टेहेळणीच्या सहा तोफा आपण मला नजराण्यादाखल पाठविल्या आहेत. मोठ्या प्रेमाने पाठविलेल्या ह्या नजराण्याची मला अप्रुकता वाटते.

'आपले पत्र येण्यापूर्वी माझे स्वामी पोर्तुगालचे महाराज यानी मला पत्र पाठवून आपणास मदत करण्याची आज्ञा केली होती. त्या आज्ञेस अनुसरून मी आमच्या उत्तरेकडील प्रदेशाचे कॅप्टन जनरल दों मानुएल लोबु द सिल्व्हैरा, तसेच चौल, वसई आणि दमण या तिन्ही ठाण्यांच्या कॅप्टनना पत्रे पाठवून आपल्या सैन्याला आमच्या ठाण्याच्या हद्दीतून वाट देण्यास व ह्या सैन्याला आमच्या राज्यात जीवनोपयोगी वस्तू खरेदिण्यास परवानगी देण्याबाबत लिहिले होते. तसेच आपल्या नैकाना आमच्या नद्यातून वाहतूक करू देण्यासही आमच्या अधिकाऱ्याना सूचना पाठविल्या होत्या. शिवाय आपल्या आरमाराच्या सामोरा जाण्यासाठी दारूगोळ्याने भरलेल्या सहा नौकाना हुकूम केला होता.

'आपल्या शत्रूच्या निर्दालनासाठी आमच्या प्रदेशातून आपल्या सैन्याला वाट देण्याचा हुकूम मी आमच्या अधिकाऱ्याना केला असल्याचे 'नापाकाला' कळले, तेव्हा याने मला पत्र पाठवून निषेध नोंदविला. मला लिहिलेल्या पत्रात तो म्हणतो की, मी जर आपल्या सैन्याला मदत केली नसती, तर त्याच्या सैन्याने आपल्या सैन्याचा धुव्वा उडविला असता. त्याने मला विनंती केली आहे की, आम्ही आपली मैत्री सोडू नये व आपणाला मी मदत करू नये. त्याचे असे म्हणणे की आम्ही त्यांचे शेजारी असून त्याच्या राज्याच्या सीमा आमच्या राज्याला भिडल्या आहेत. आम्ही आपणाला मदत करण्याचे बंद केले, तर माझ्याशी मैत्रीचा आणि शांततेचा करार करण्यास आपण तयार असल्याचे त्याने कळविले आहे. परंतु माझा कल आपल्याकडे असल्याने त्या नापाकाशी मैत्री करण्यास व त्याच्या प्रलोभनास बळी पडण्यास मी तयार नाही. मला आशा आहे की, आपणाकडून या राज्याला उदार सवलती प्राप्त होतील. माझी आपणाला विनंती आहे की आपण कोकणात जो प्रदेश काबीज कराल तो या राज्याला देऊन टाकावा. माझी आपणापाशी दुसरी मागणी आहे ती आपल्या राज्यात ते ख्रिश्चन लोक राहतात त्याना भरावा लागणारा 'मक्का' कर कमी व्हावा. हा कर हिंदूना आणि मुसलमानाना भरावा लागत नाही.

अनुक्रमणिका

‘आपल्या निदर्शनास मला आणायचे आहे की, आपल्या सैन्याची प्रगति फार संथ गतीने होत आहे. आपण ही लष्करी मोहीम नापाकाविरूद्ध इरेस पडून केली असल्याने ती यशस्वी झाली पाहिजे. आपल्या सैन्याची चालढकल आपणाला मारक ठरेल, अशी मला भीती वाटते.

‘दुसरी एक गोष्ट मला आपल्या कानावर घालायची आहे ती ही की, आमच्या राज्यातून आपले जे सैन्य रसद नेत आहे, त्याच्याकडून आमच्या राज्यात चोऱ्यामाऱ्यासारखे प्रकार घडत असल्याच्या तक्रारी माझ्याकडे येत आहेत. आपण ह्या गोष्टीना आळा घालण्याचा हुकूम आपल्या सेनाधिकाऱ्याना करावा. शिस्त पालनाच्या दृष्टीने ही गोष्ट अत्यंत आवश्यक आहे.

‘मला आणखी एका गोष्टीची आठवण आपणास करून द्यायची आहे. आपल्या आरमाराच्या मदतीसाठी मी जी सहा फ्रिगेटस सज्ज केली, त्यासाठी मला बरीच मोठी रक्कम खर्च करावी लागली आहे. ती रक्कम आम्हाला चुकती करण्याची आज्ञा आपण काढावी. ही रक्कम आम्हास मिळाली तर आम्हाला युद्धनौका सज्ज करण्याचे काम पुनः सुरू करता येईल.’

शाहाजादा अकबर याच्याविषयी लिहिताना व्हिसेरेइ असे समर्थन करतो तो राजपुत्र आणि पुनः औरंगजेब बादशहाचा पुत्र असल्याने त्याच्या उपयोगी आपण पडलो. औरंगजेबाने शाहाजादा अकबरचे प्रमाद पोटात घालून त्याला आपणाकडे नेण्याचीही सूचना त्याने पत्रातून केली आहे.

औरंगजेबाचा एक दूत व्हिसेरेइशी वाटाघाटी करण्यासाठी गोव्यास आला तेव्हा व्हिसेरेइ त्याला म्हणाला होता की, संभाजीशी पोर्तुगीजांचा तह झालेला असल्याने त्याचा भंग होण्यासारखे कृत्य आपण होऊ देणार नाही. परंतु वरील पत्र वाचल्यावर संभाजीशी असलेल्या तहास हरताळ फासून पोर्तुगीजांनी मोगलाना मदत केल्याचे दिसून येते.

पोर्तुगीजांच्या ह्या विश्वासघातकी कृत्याचा संभाजीस राग आल्याने त्याना धडा शिकविण्यासाठी त्याने आपले सैन्य पोर्तुगीज प्रदेशात घुसविले. ठाणे जिल्ह्यातील डहाणू, असेरी, सैबाण आणि तारापोर ह्या तीन ठाण्यावर मराठ्यानी हल्ले चढविले. तारापोरचे ठाणे पोर्तुगीजांनी आठ दिवस लढविले. मराठ्यानी अनेक खेड्यांची जाळपोळ केली व अनेक नौका हस्तगत केल्या. त्याचप्रमाणे एका जेसुईट व दुसरा फ्रान्सिस्कन असे दोन पाद्री त्यानी धरून नेले. मराठ्यानी पोर्तुगीज प्रदेशात केलेल्या आक्रमणाचा बदला म्हणून संभाजीचा गोव्यातील वकील येसाजी गंभीर याला व्हिसेरेइने नजरकैदेत ठेवले. ह्या अपमानाबद्दल येसाजी गंभीरने व्हिसेरेइला पत्र पाठवून निषेध नोंदविला. ह्या निषेध पत्राला दि. १६ मे १६८२ रोजी धाडलेल्या उत्तरात गोव्याचा राज्य सचिव म्हणतो :

‘......आपले पत्र कौंट व्हिसेरेइ यांच्या अवलोकनास आणून देण्यात आले. आपल्या घरावर पहारा का बसविण्यात आला, त्याची पृच्छा आपण पत्रातून केली आहे. नामदार व्हिसेरेइ यानी आपल्या पृच्छेला उत्तर करण्यास सांगितले आहे की, आपले स्वामी संभाजी राजे यांच्या सैन्याने आमच्या उत्तरेकडील प्रदेशात जी जाळपोळ आणि लुटालूट केली त्याचे उत्तर म्हणून तुम्हाला नजरकैदेत ठेवणे आम्हाला भाग पडले. मोगल सैन्याने कल्याण भिवंडीतून माघार घेतल्यावर संभाजी राजे यांच्या सैन्याने आमच्या उत्तरेकडील प्रदेशात शिरून लुटालूट आणि जाळपोळ केली. या सैन्याने डहाणू, असेरी, साबाज, सिरिगाव आणि तारापूर ह्या ठाण्यावर हल्ले चढविले. त्याने या राज्यातून त्या प्रदेशांत जाणारे आमचे मचवे व गलबते

पकडली आणि दोघा पाद्र्याना कैद केले. आमच्या साष्ट आणि बार्देश प्रांतात जाणारे गोणीचे बैलही त्यानी पकडले. या घटना म्हणजे शांततेच्या कराराचा भंग असून युद्धाची सुरूवात आहे. आपणास कळविण्यात येत आहे की, आमच्या पाद्र्यांची मुक्तता झाल्याखेरीज आणि गोणीचे बैल सोडल्याखेरीज आपणास डिचोलीस जाऊ दिले जाणार नाही...'

संभाजीच्या सैन्याने ठाणे जिल्ह्यातील पोर्तुगीज ठाण्यावर केलेल्या हल्ल्याचा बदला म्हणून व्हिसेरेइने येसाजी गंभीर याला नजरकैद तर केलेच; पण पोर्तुगीजांच्या चौल येथील कॅप्टनने संभाजीच्या वरच्या चौलच्या ठाण्यावर तोफा डागून त्याचा काही भाग उद्ध्वस्त केला.

१६८३ च्या जुलै महिन्यात संभाजी गोव्यावर हल्ला करणार असल्याची हूल उठल्याने पोर्तुगीजांची भयंकर तारांबळ उडाली. संभाजी मोठी फौज घेऊन गोव्याकडे निघाला होता. परंतु हा बेत स्थगित करून त्याने आपले काही सैन्य चौलकडे रवाना केले. ह्या सेन्यात दोन हजार घोडदळ आणि सहा हजार पायदळ होते, त्याने पोर्तुगीजांच्या हाती असलेल्या चौलच्या ठाण्यास वेढा घातला. १० ऑगष्टपासून १८ ऑगष्टपर्यंत मराठ्यानी चौलच्या तटबंदीवर अविरत हल्ले चढविले. आतील शिबंदी लढून लढून थकून गेली. ते पाहून शहरातील भिक्षू आणि इतर नागरिक लढावयास आले. त्या दरम्यान मराठ्यांचे हल्ले विफल व्हावे म्हणून पोर्तुगीजानी 'मेरी व्हर्जिन' आणि 'सेंट स्टीफन' यांची करुणा भाकण्यास प्रांरभ केला होता. ठाण्याच्या कॅप्टनने तर सेंट अँथनीची आळवणी करून त्याच्या चरणाजवळ साठ अश्रफी ठेवल्या. मराठे मागे हटेनात हे पाहून शिबंदीच्या सैन्याने तटबंदीवर तोफा आणल्या. त्या प्रचंड होत्या खऱ्या, परंतु त्या नेम साधिनात. एका तोफेने तर पहिलाच गोळा सोडताना तिचा गाडा मोडल्याने जमिनीवर लोळवण घेतली. तोफांची अवस्था अशी होण्याचे कारण की, त्यांची व्यवस्था बघण्याचे काम संघाच्या पाद्र्यांकडे होते. गोलंदाजाना सोडाच परंतु गव्हर्नरलादेखील पाद्र्यांच्या परवानगीशिवाय तोफा डागता येत नसत. पाद्री तोफा डागू देत नसत, कारण, तोफा डागल्या तर दारू खर्च होत असे. आणि दारू खर्च होणे म्हणजे पैसा खर्च होणे. दारूचा पैसा ते खुशाल आपल्या खिशात घालीत असत. चौल शहराचे नगरपिते पाद्र्यांच्या कलाने वागत असल्याने पाद्र्यांच्या कारभारात ते लक्ष घालीत नसत.

मराठ्यानी चौलला वेढा घालून सहा महिने झाले, तरी पोर्तुगीजाना तो वेढा उठविता आला नाही. त्याच वेळी इंग्रज आणि संभाजी यांचा मैत्रीचा एक करार झाला. संभाजीपाशी एवढे बलाढ्य सैन्य होते की, पोर्तुगीजांच्या सर्व ठाण्यावर हल्ले करणे त्याला शक्य होते. परंतु तो गोव्याच्या वाटेस गेला नाही. गोव्यावर स्वारी करण्यास त्याला भाग पाडले ते पोर्तुगीजानीच.

अनुक्रमणिका

# ९. संभाजीची गोव्यावर स्वारी

दि. १६ डिसेंबर १६८३ या दिवशी चौलच्या युद्धाचा आढावा घेऊन पोर्तुगालच्या राजास व्हिसेरेइने पत्र पाठविले :

'चौलला वेढा पडल्यास सहा महिने झाले. या कालावधीत शत्रूने त्या ठाण्यावर अनेक हल्ले चढविले. परंतु ते आम्ही परतवून लावले. एका हल्ल्यात तर शत्रूची फार प्राणहानी झाली. परंतु आम्हाला जे यश आले ते दैवी चमत्काराने अशी माझी भावना आहे. कारण, ह्या राज्यावर शत्रूने सर्व बाजूनी हल्ले चढविल्याने त्याला तोंड देणे हे मानवी कोटीबाहेरील काम होते. आम्ही उत्तरेकडील आणि इकडील शत्रू प्रदेशात शिरून त्याची पुष्कळ हानी केली. परंतु चौलच्या वेढ्यावर त्याचा काहीच परिणाम झाला नाही. ते पाहून शत्रूचे लक्ष दुसरीकडे वेधण्याचा मी एक प्रयत्न केला. मी पायदळ, समुद्रावरील माणसे व ज्यांचा कशासाठीच उपयोग होऊ शकत नाही त्या साष्टी प्रांतातील देशी लष्करातील दोन हजार सैनिक घेऊन नदी (बोरीची) ओलांडून पैलतडीस गेलो व दुर्भाटमार्गे जाऊन मी फोंड्याच्या किल्ल्यास वेढा घातला. हा हल्ला सतत नऊ दिवस चालला, परंतु पाऊस अतोनात झाल्याने आम्हाला फार त्रास सोसावा लागला. आमचे काम समाधानकारक झाले नाही. त्याचा फायदा संभाजीस मिळाला. तो जातीने सैन्य घेऊन फोंड्याच्या मदतीस आला. आपल्या सुसज्ज घोडदळांसह तो आमच्याशी लढण्यास सिद्ध झाला. आम्हाला कुमक येण्याची शक्यता नसल्याने आम्ही माघार घेण्याचे ठरविले. आम्ही शत्रूशी लढत लढत माघार घेतली. आम्ही सर्व बाजूनी लढत होतो. वाटेत आम्हाला दोन दिवस मुक्काम करावा लागला. दोन दिवस आम्ही चालत होतो. मी जे काय बरोबर नेले होते ते आणि तोफखाना माघारा आणला.'

व्हिसेरेइच्या उपरिनिर्दिष्ट पत्रात फोंड्याच्या लढाईचा तपशील नाही. तो नुसता सारांश आहे. त्या लढाईचा तपशील अन्य पोर्तुगीज साधनात आढळतो तो असा :

'दि. २७ अक्टोबर रोजी कौंट व्हिसेरेइ शहरातील घोडदळ घेऊन सां लौरेंसूला निघाले. त्या एकूण चाळीस गाड्या होत्या. सां. लौरेंसहून व्हिसेरेइ फोंड्याला रवाना झाले.

'दि. २८ अक्टोबर रोजी सकाळी सैन्याची हजेरी घेण्यात आली. सैन्याची वर्गवारी अशी : सहाशे पगारी सैनिक. पैकी पुष्कळशी तरूण मुले, अंदाजे तीनशे खलाशी. तीनशे इतर माणसे. पैकी काही जणापाशी घोडे होते तर उरलेले पायी जात होते. एकूण सर्व माणसे एक हजार दोनशे सहा होती. शिवाय साष्टी प्रांतातून अडीच हजार देशी शिपायी व्हिसेरेइनी बरोबर नेले होते. त्यांच्यापैकी दोन हजार बंदुकधारी तर पाचशे पिकावधारी होते. साष्टीच्या ह्या देशी शिपायांच्या हातावर व्हिसेरेइनी एक कपर्दीदेखील ठेवली नाही, ती नाहीच; पण त्याना दारुगोळा देखील पदरच्या पैशातून विकत घ्यावा लागला. त्यांच्याबरोबर वेगवेगळ्या माऱ्याच्या सहा तोफा होत्या.

'व्हिसेरेइ महाराज आपल्या सैन्यासह दुर्भाटला येऊन दाखल झाले. शत्रूकडून त्याना कोणताच प्रतिकार झाला नाही. या ठिकाणी दुलबा नाईक या नावाचा संभाजीचा प्रजाजन आपल्या साठ सैनिकांसह व्हिसेरेइना येऊन मिळाला.

अनुक्रमणिका

‘आमच्या आगमनाची वार्ता शत्रूस कळली असावी. त्याबरोबर शत्रुचे तीनशे सैनिक आमच्याशी लढण्याकरिता आमच्या समोरून आले. त्याच्यात पाच घोडेस्वार होते. आमच्या सैन्यातील कॅ. दियोगु फोगैरा नावाचा अधिकारी आपल्या हाताखालची तुकडी घेऊन शत्रूशी दोन हात करण्यास पुढे सरसावला. त्याने शत्रूला पिटाळून लावले. त्याने शत्रुचे दोन घोडेस्वार कैद केले. ह्या चकमकीनंतर आमच्या सैन्याने फोंड्याच्या दिशेने कूच केले. फोंड्यास आम्ही सर्वसंतांचे दिवशी पहाटेस पोहोचलो. एका टेकडीवर तोफा चढवून लगेच फोंड्याच्या किल्ल्यावर आम्ही सरबत्ती सुरु केली. सर्वसंताचा दिवस एक नवंबरला आला. त्यादिवसापासून आमच्या तोफा आग ओकू लागल्या. आमच्या तोफानी शत्रुच्या तीन तोफा निकाम्या करण्यात यश मिळविले. एक तुळईही मोडून टाकली. तुळईवर एक यंत्र ठेवण्यात आले होते. ते टेहेळणीच्या बुरुजासारखे होते. त्याच्यावर अनेक गोळे टाकण्यात आल्यावर ते मोडून पडले. तीन दिवसानी तोफा टेकडीवरून खाली उतरवून त्या किल्ल्याच्या तटासमोर आणण्यात आल्या.

फोंड्याचा किल्ला भरभक्कम आहे. त्याच्या एका तटाची रूंदी पंचवीस विते असून त्याला बुरुजांचा आधार आहे. तटाबाहेर खंदक आहे. परंतु त्याच्या एकाच भागात पाणी आहे. आमच्या तोफानी अविरत भडिमार करून त्या तटास एक खिंडार पाडले. ते पाहाताच व्हिसेरेइनी पोर्तुगीज सैन्याच्या तीन कंपन्याना त खिंडार रूंद करण्यासाठी पुढे जाण्याचा हुकूम केला. या कामी प्राणहानी विशेष होऊ नये म्हणून जनरल दों रुद्रिगु द कॉश्त यानी शत्रूला दुसरीकडे गुंतवून ठेवण्यासाठी आपल्या हाताखालचे सैन्य तिकडे पाठविले. व्हिसेरेइच्या आज्ञेप्रमाणे जे सैनिक पुढे सरसावले त्याना खिडांराच्या जवळपास एकही शत्रू सैनिक न दिसल्याने ते खिडारातून सरळ किल्ल्यात शिरले. त्यानी मुख्य तटाच्या दरवाजा फोडण्यासाठी त्याच्यावर कुऱ्हाडीचे घाव घालण्यास प्रांरभ केला. परंतु दाराच्या फळ्या भयंकर चिवट निघाल्या. त्या लोखंडी नावाच्या लाकडाच्या होत्या. शिवाय त्याना आतून लोखंडी अस्तर होते.

आमच्या सैनिकानी किल्ल्याच्या दरवाजावर कुऱ्हाडीचे घाव घालताच तो आवाज ऐकून शत्रूचे काळे सैनिक धावून आले. त्यानी आमच्या सैनिकावर इतका खचून मारा केला की तो सहन न झाल्याने त्याना आठ मृतदेह व सत्तावीस जखमी सैनिकासह माघार घ्यावी लागली.

किल्ल्यात शत्रूचे सहाशे बंदुकधारी सैनिक होते. शिवाय किल्ल्याबाहेर दोनशे सैनिक टेहेळणीच्या कामावर होते. ते आमच्यावर हल्ला करण्याची वाट पाहात होते.

किल्ल्यावर सतत पांच दिवस तोफांचा भडिमार करून देखील तो पडण्याची चिन्हे दिसेनात, तेव्हा व्हिसेरेइ भयंकर निराश झाले. त्याना संघाच्या पाद्र्यानी धीर दिला. ते त्याना म्हणाले की, किल्ला पडल्यावाचून राहणार नाही. पाद्र्यांच्या ह्या मताशी जनरल दों रुद्रिगु द कॉश्त सहमत झाले नाहीत. ते म्हणाले, शत्रूचा प्रतिकार दिवसेंदिवस तीव्र होत आहे. शिवाय त्याला कुमकही येत आहे. अशा परिस्थितीत माघार घेणे शहाणपणाचे ठरेल. परंतु हा सल्ला पाद्र्यांनी मानला नाही. त्यानी तोफांची सरबत्ती चालू ठेवण्याचा हुकूम गोलंदाजाना केला. त्यानी आपल्या गोलंदाजीची करामत करून किल्ल्याच्या तटास एक खिंडार पाडण्यात यश मिळविले.

दि. २० नवंबर रोजी किल्ल्याच्या तटाच्या खिंडारांतून आत घुसण्याचा बेत ठरला. परंतु त्याच दिवशी शत्रूस मोठी कुमक आली. त्यात आठशे घोडदळ आणि पुष्कळ पायदळ होते. शत्रूला कुमक आल्याने किल्ल्यावर हल्ला करण्याचा बेत डळमळीत झाला.

अनुक्रमणिका

या ठिकाणी एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे तो हा की, व्हिसेरेइ फोंड्याला येऊन दाखल झाले, तेव्हापासून माघार घेईस्तोवर आम्हाला पावसाने झोडपले, आणि तेही पावसाळ्याचे ते दिवस नसताना. शेवटच्या दिवसात तर पावसाबरोबर थंडीनेही आमचा पिच्छा पुरविला. पाऊस आणि थंडी यामुळे सैनिकांचे भयंकर हाल झाले. त्याना निवारा असा कुठेच मिळाला नाही. जवळपास एकादे झाड देखील नव्हते की ज्याच्या फांद्या कापून एकादी झोपडी बांधावी. आणि झाड आढळले तरी सैन्याबरोबर असलेले संघाचे पाद्री त्याला हात लावू देत नसत. त्यांच्या मते ते झाड पोर्तुगालच्या महाराजांच्या मालकीचे अथवा संघाच्या मालकीचे असल्याने ते तोडण्यास विरोध करणे हे आपले कर्तव्य आहे. त्यांची अशी समजूत झाली होती की, व्हिसेरेइ जिथे आहेत तो भूप्रदेश पोर्तुगालच्या महाराजांचे अधिसत्तेखाली येतो. अखेर व्हिसेरेइनी माघार घेण्याचा निर्णय घेतला. त्यानी आपल्या सल्लागारांची बैठक घेऊन आपला मनोदय व्यक्त केला. ते म्हणाले की, ‘मला जर मृत्यू आला असता तर माघारीचा ठराव आपणासमोर मांडण्याचा प्रश्नच उद्भवला नसता. शत्रूला मोठी कुमक आली असल्याने फोंड्याचा किल्ला आपल्या हातात पडत नाही हे निश्चित. आमच्यापाशी जे थोडेबहुत सैन्य आहे ते येथे ठार झाले, तर आम्ही हिंदुस्थानला मुकू. शत्रू आमच्यासमोर आपल्या सर्वसामर्थ्यानिशी उभा ठाकला आहे. आम्ही येथे आणखी काही दिवस राहिलो तर तो आमची कोंडी केल्यावाचून राहाणार नाही. आणि तसे झाले तर आम्ही येथून जिवानिशी सुटण्याची सुतराम आशा नाही. म्हणून आपण त्वरीत माघार घेतलेली बरी. आपणांपैकी पुष्कळजण कुटुंबवत्सल आहेत. त्याना येथे मृत्यू येऊन त्यांची बायकामुले निराधार व्हावी अशी माझी इच्छा नाही.’

व्हिसेरेइनी भावविवश होऊन केलेल्या भाषणाचा बैठकीतील लोकांवर इष्ट तोच परिणाम झाला. दोघे वगळता इतर सगळ्यानी व्हिसेरेइच्या ठरावास मान्यता दिली.

युद्ध मंडळाने फोंड्याहून माघार घेण्याचा ठराव संमत केल्याची वार्ता सैन्यामध्ये पसरण्यास विलंब लागला नाही. त्याबरोबर सर्वत्र एकच घबराट माजला. जो तो धक्क्याकडे पळत सुटला. ते पहाताच पळ काढणाऱ्या सैनिकाना रोखून धरण्यासाठी व्हिसेरेइनी काही बंदुकधारी सैनिक त्यांच्यासमोर पाठविले. नंतर माघारीचा हुकूम जारी करण्यात आला.

आम्ही माघार घेत असल्याचे शत्रूच्या निदर्शनास येताच किल्ल्यातून काही शत्रू सैनिक बाहेर पडले व आमच्या तोफा हस्तगत करण्याच्या इराद्याने त्यानी आमच्यावर हल्ला चढविला. परंतु तोफखान्याचे रक्षण करणाऱ्या कंपनीने शत्रूचा कसून प्रतिकार केल्याने तोफा शत्रूच्या हाती पडल्या नाहीत. सैनिकानी तोफा पाळण्यात घालून नेल्या. पिछाडीच्या सैनिकानी दारूची पिंपे खांद्यावर वाहून नेली. वाटेत एक टेकडी लागली. ती काबीज करण्याचा हुकूम नामदार व्हाइसरॉय यानी दिला. त्या हुकुमाप्रमाणे आमचे सैनिक टेकडी चढू लागले, तेव्हा तेथे दबा धरून बसलेल्या शत्रूंच्या सैनिकांची आणि आमची लढाई झाली. शत्रूचे घोडेस्वार त्यांच्या घोड्यांवर आडवे होऊन आमच्याशी लढले. त्यांची ही करामत खरोखर वाखाणण्यासारखी होती. त्यांची सरशी होऊन त्यानी आमच्यावर चाल केली. त्या पळापळीत आमचे बरेच सैनिक घोड्यांच्या टाचांखाली सापडून चिरडले गेले. परंतु त्याना तुडविणारे घोडे शत्रूचे होते की आमचे ते त्या वेळच्या घाईगर्दीत कळू शकले नाही. आणि आमच्या सैन्यातील पन्नास निग्रो सैनिकानी भाले घेऊन शत्रू सैनिकांवर हल्ला केला नसता तर आमचा एक सैनिक देखील औषधाला जिवंत उरला नसता. ह्या हातघाईच्या लढाईत नामदार व्हिसेरेइ मृत्यूच्या दाढेतून दोनदा बचावले. शत्रूच्या दोन मुसलमान सैनिकांनी त्यांच्यावर दोनदा जवळून हल्ले केले. त्यांच्यापाशी दोन पिस्तुले होती. पण एकही उडाले नाही.

अनुक्रमणिका

दुसऱ्या हल्ल्यात तर ते मरता मरता वाचले. त्यांच्या मदतीला एक शिपाई धावून आला नसता, तर त्यांचा मृत्यू अटळ होता. तरीही त्यांना तलवारीचा एक वार लागलाच.

टेकडीवरील लढाईत आमचा पराभव होताच टेकडीच्या खाली असलेल्या सैनिकांची पळापळ सुरू झाली. काहीनी तर जीव बचावण्यासाठी नदीत उड्या टाकल्या. ज्याना पोहायला येत नव्हते ते गटांगळ्या खाऊ लागले. नामदार व्हिसेरेइ टेकडीवरून उतरून धक्क्याकडे गेले तेव्हा त्याना तेथे काही घाबरलेले सैनिक आढळले. काहीजण चिखलाने लडबडलेले होते. त्याना पाहून नामदार महाशयांचा क्रोध अनावर झाला. त्यानी त्यांची खूप निर्भत्सना केली व त्याना काठ्यानी मारले असे म्हणतात.

सैन्याने त्याच दिवशी संध्याकाळी नदी पार करण्यास प्रारंभ केला. हे काम दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजेपर्यंत चालले. सगळे सैन्य नदी पार करून गेल्यावर नामदार व्हिसेरेइ व जनरल दों रुद्रिगु द कॉश्त या दोघानी नदी ओलांडली.'

व्हिसेरेइ कौंट द आल्व्होर हा फोंड्याचे लाजिरवाणे अपयश घेऊन दि. ११ नवंबर १६८३ या दिवशी राजधानीस परतला. तो थेट जेसुइटांच्या मठात जाऊन तब्बल चार दिवस राहिला. त्या कालात त्याने कुणाचीच भेट घेतली नाही.

व्हिसेरेइची समजूत होती की, फोंड्याचा वेढा उठवून आपण माघार घेतल्यावर संभाजी परस्पर रायगडला निघून जाईल, परंतु संभाजी रायगडला गेला नाही. त्याने गोव्याच्या साष्टी आणि बार्देश या प्रांतावर स्वारी करण्याचा हुकूम आपल्या सरदाराना केला. त्या हुकूमाप्रमाणे मराठा घोडदळ त्या दोन्ही प्रांतात शिरले.

दि. २४ डिसेंबर १६८३ रोजी व्हिसेरेइने गोव्याच्या राज्य सल्लागार मंडळाचे सदस्य, गोवा शहरातील खानदानी लोक, भिक्षु आणि रयत यांची एक सभा गोवा शहराच्या किल्ल्यातील शाही सभागृहात बोलविली. राज्य सचिव लुईज गोंसाल्विज द कोत याने व्हिसेरेइच्या सुचनेवरून सभेच्या आयोजनामागील हेतु सभेस विदित केला. तो म्हणाला की, 'संभाजीचे घोडदळ आणि पायदळ या राज्याच्या सर्व प्रदेशात घुसले आहे. शत्रूच्या आक्रमणाला चौल, वसई, दमण वगैरे आमची ठाणी बळी पडलीच आहेत. चौलचा वेढा शत्रूने आवळीत आणला आहे. गोव्यामध्ये शत्रू साष्टी व बार्देश प्रांतात आणि या शहरालगतच्या टापूत 'सां इश्तेव्हांव' बेटात शिरला आहे. त्याने सगळीकडे लुटालूट आणि जाळपोळ सुरू केली आहे धर्ममंदिरे देखील या लुटीतून सुटलेली नाहीत. शत्रूला आम्ही परिणामकारकपणे तोंड देऊ शकलो नाही, त्याचे कारण म्हणजे आमच्यापाशी सैन्य अपुरे आहे. मायदेशाहून मागविलेली सैन्याची कुमक अद्याप आलेली नाही. सैन्याबरोबरच पैशाचेही पाठबळ आम्हाला नाही. तरी सगळ्यानी आपल्या ऐपतीप्रमाणे युद्ध निधीस हातभार लावावा.'

वरील सभा ज्या दिवशी झाली त्याच दिवशी संभाजीचे सैन्य 'सां इश्तेव्हांव' ऊर्फ 'सेंट स्टिफन' ऊर्फ 'जुवे' बेटात ओहोटीची संधि साधून शिरले. हे बेट तिसवाडी तालुक्यात धावजी गावच्या पैलतिरास असून ओहोटीच्या वेळी या बेटावर पायवाटेने जाता येते. मराठ्यांनी पहिले काम कोणते केले असेल, तर त्या बेटावरील किल्ला काबीज करण्याचे. किल्ल्यात शिबंदी फार थोडी असल्याने व ती गैरसावध असल्याने मराठ्याना हा किल्ला लीलेने घेणे शक्य झाले. (एका फ्रेंच प्रवाश्याने आपल्या हिंदुस्थानच्या प्रवास वर्णनात

म्हटले आहे की, संभाजीने जुवे बेटावरील किल्ला पाडून त्याचे दगड आणि इतर सामान नेऊन फोंडे येथे मर्दनगड या नावाचा लहानसा किल्ला बांधला). जुवे बेटाला लागूनच संभाजीच्या अमलाखाली असलेल्या अंत्रुज महालाची सीमा लागत होती तर दुसऱ्या बाजूस मांडवी नदीच्या पलिकडे गोवा शहराचा भरभक्कम तट होता.

संभाजीच्या सैन्याने जुवे बेट घेतल्याची बातमी लगेच गोवा शहरात पसरली. त्याबरोबर सगळीकडे एकच धावपळ सुरू झाली. कारण ते बेट गोवा शहराला लागून असल्याने तेथून मराठे गोवा शहरावर केव्हा हल्ला करतील त्याचा नेम नव्हता. व्हिसेरेइने लगेच हुकूम काढून शहराच्या रक्षणासाठी काही हत्यारबंद शिपाई शहराच्या तटाकडे धाडले. पण त्या तात्पुरत्या उपाय योजनेमुळे शहराचे शत्रूच्या हल्ल्यापासून रक्षण होण्याची शाश्वती नव्हती. म्हणून मराठ्याना जुवे बेटावरून हुसकून लावण्यासाठी स्वतःच तिकडे जाण्याचा बेत व्हिसेरेइनी केला. दि. २५ नवंबर १६८३ या दिवशी सकाळी व्हिसेरेइ चारशे लोकांसह जुवे बेटावर उतरला. त्याला कुणीच प्रतिकार केला नाही. त्यामुळे तो थेट सेंट स्टिफनच्या चर्चपर्यंत गेला. जनरल रुद्रिगु द कॉश्त याने सल्ला दिला की पुढे जाऊ नये. तेथेच तोफांचे मोर्चे उभारून किल्ल्यावर तोफा डागून तो उध्वस्त करून टाकावा. पण हा सल्ला व्हिसेरेइने मानला नाही. त्याने जनरल द कॉश्त याला उपरोधिकपणे प्रश्न केला की, तुम्हाला व्हिसेरेइ व्हायचेय का? आणि आपल्या इच्छेप्रमाणे व्हिसेरेइने किल्ल्याचे दिशेने चाल केली. किल्ला टेकडीवर एका कड्याच्या काठाला होता. त्यात मराठ्यांची आठशे शिबंदी होती. व्हिसेरेइने आपल्या सैन्यास हल्ल्याचा हुकूम दिला. त्याबरोबर त्याने मारा सुरू केला. मराठ्यानी किल्ल्यांतून बाहेर पळ काढण्यास प्रारंभ केला. पण त्याचवेळी त्याना तीनशे घोडेस्वारांची कुमक आली. ते पहाताच व्हिसेरेइने आपल्या सैन्यास माघार घेण्याचा हुकूम केला. तो हुकूम निघण्याचाच अवकाश, पोर्तुगीज सैन्याने धुम पलायन केले. व्हिसेरेइने पळ काढणाऱ्या सैन्यास रोखून धरण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. त्याच वेळी मराठ्यांच्या घोडदळाने पळ काढणाऱ्या पोर्तुगीज सैन्याचा पाठलाग सुरू केला. चार घोडेस्वारानी नंग्यातलवारीसह व्हिसेरेइवर आपले घोडे घातले. व्हिसेरेइने आपल्या जोडनळीच्या पिस्तुलाने दोघाना ठार केले. नंतर त्याने आणखी एक पिस्तुल काढून दुसऱ्या दोघांवर नेम धरून पिस्तुलाचे दोन्ही चाप एकदमच ओढले. त्या दोन्ही गोळ्या एका घोडेस्वारास लागून तो जखमी झाला. आता व्हिसेरेइपाशी त्याची तलवार तेवढी उरली. नंतर जी हातघाईची लढाई झाली तीत दीडशे पोर्तुगीज सैनिक ठार झाले. उरलेल्यापैकी बहुतेक सर्व जखमी झाले. व्हिसेरेईला एक गोळी लागून तोही जखमी झाला. त्याचा घोडा मराठ्यांच्या हातास लागला.

पोर्तुगीज सैनिक होड्यानी आले होते. त्यावेळी ओहोटी होती; पण आता ते नदी किनाऱ्यावर जाऊन पोहोचले तेव्हा भरती असल्याने होड्या नदीच्या पात्रात तरंगत होत्या. त्यांच्यापर्यंत आता पोहत जाणे आवश्यक होते. ओहोटीपर्यंत थांबणे शक्य नव्हते. कारण मराठे त्यांचा पाठलाग करीत होते. पुष्कळानी जीव बचावण्यासाठी नदीत उडी घेतली. त्यांच्यापैकी ज्याना पोहता येत होते ते बचावले. उरलेले बुडून मेले. नदीत उडी घेणारांमध्ये बहुतेक सर्व मोठे अधिकारी होते. काहीजण दलदलीत सापडले. त्याना शत्रूने कापून काढले. व्हिसेरेइ व जनरल दों रुद्रिगु द कॉश्त हे दोघे मोठ्या मुश्किलीने व्हिसेरेइचा मचवा गाठू शकले.

वरील शोकांतिका बघण्यासाठी जुवे बेटावरील बहुतेक सर्व रहिवाशी नदी किनाऱ्यावर गोळा झाले होते, तर पलिकडच्या बाजूला गोवा शहरातील नागरिकाना ती शोकांतिका तटाच्या बाजूने दिसत होती. असे सांगतात की, पळ काढणाऱ्या पोर्तुगीजांचा पाठलाग संभाजी जातीने करीत होता. तो इतका बेभान

झाला होता की, व्हिसेरेइची नौका पकडण्यासाठी त्याने आपला घोडा नदीत घातला होता. खंडोबल्लाळ चिटणीस याने प्रसंगावधान राखून घोड्याचा लगाम पकडून त्याला मागे खेचले नसते, तर संभाजीचे काय झाले असते ते सांगणे कठीण आहे.

जुवे बेटात पोर्तुगीजांची वाताहात झाल्याची वार्ता गोवा शहरात पसरली. हूल उठली की, व्हिसेरेइ आणि जनरल दों रूद्रिगु द कॉश्त हे दोघे ठार झाले. नागरिकानी 'जेरोनिमु द मेंदोसा' याची गव्हर्नर म्हणून घोषणा करण्याची तयारी केली. पण नंतर व्हिसेरेइचे आगमन झाल्याने नवीन गव्हर्नरच्या घोषणेचा प्रसंग टळला.

व्हिसेरेइ जुवे बेटातून पळून आला त्याचवेळी संभाजीने गोवा शहरावर चाल करण्याचे ठरविले होते; पण नदीला भरती आल्याने त्याला सैन्य पैलतीरास नेणे शक्य झाले नाही.

इकडे व्हिसेरेइने जुवे बेटातून पळून येऊन शहरात प्रवेश केला तेव्हा शहरात सर्वत्र घबराट माजल्याचे त्याला आढळून आले. सैनिकांचा धीर खचला होता. ते मराठ्यांशी लढण्याच्या मनःस्थितीत नव्हते. ते पाहाताच व्हिसेरेइही गर्भगळीत झाला. त्याला काहीच सुचेना. अखेर शेवटचा उपाय म्हणून त्याने सेंट झवियरला शरण जाण्याचे ठरविले. तो सेंट झवियरच्या चर्चकडे गेला. त्याच्यामागे लोकांचा एक मोठा घोळका होता. त्यानी सेंट झवियरची करुणा भाकली. नंतर सगळेजण मशाली पेटवून सेंट झवियरची पेटी ज्या तळघरात ठेवली होती तेथे गेले. त्यानी शवपेटी उघडली. व्हिसेरेइने आपला राजदंड आणि इतर राजचिन्हे झवियरच्या पायापाशी ठेवली. त्या राजचिन्हांबरोबर व्हिसेरेइच्या सहीचा एक कागद होता. त्या कागदात त्याने पोर्तुगालच्या राजाच्यावतीने गोव्याचे राज्य सेंट झवियरला अर्पण केले होते व त्याने चमत्कार करून शत्रूला माघारा परतवून लावावे अशी याचना केली होती. व्हिसेरेइ मग झवियरच्या डोक्याजवळ गेला व डोळ्यात अश्रु आणून त्याने त्याची करुणा भाकली.

सेंट झवियरने चमत्कार केल्याने म्हणा अथवा अन्य काही कारणाने म्हणा, पण संभाजीने गोवा बेटावर स्वारी केली नाही. ते पाहून पोर्तुगीजांची समजूत झाली की, सेंट झवियरने चमत्कार करून संभाजीला माघार घ्यावयास लावले. तेव्हापासून सेंट झवियर हा गोव्याचा रक्षणकर्ता (Patron Saint) म्हणून समजला जाऊ लागला व गोव्याला येणाऱ्या नवीन व्हिसेरेइने त्याच्या पायापाशी आपला राजदंड ठेवण्याची प्रथा पडली. गोवा शहर संभाजीच्या स्वारीच्या संकटापासून मुक्त झाले. परंतु व्हिसेरेइने मराठ्यांची एवढी दहशत खाल्ली की, त्याने गोव्याची राजधानी मुरगाव बंदरात नेण्याचे ठरविले. यदाकदाचित मराठ्यानी गोवे घेतले, तर मुरगाव बंदरांतून पळून जाणे शक्य व्हावे म्हणून त्याने हा निर्णय घेतला. दि. १० जानेवारी १६८४ रोजी राज्य सल्लागार मंडळाची बैठक बोलवून हा ठराव तीत संमत करून घेण्यात आला.

दि. २५ जानेवारी १६८४ रोजी व्हिसेरेइ गोव्याच्या दयनीय अवस्थेचे वर्णन करून पोर्तुगालच्या राजास लिहितो :

'आमच्या राज्याची अवस्था शोचनीय आहे. मोगलांमुळे आमचे रक्षण झाले. परंतु त्यानी हे राज्य घेण्याचे ठरविले तर आमची अवस्था अतिशय वाईट होईल आणि मोगल निघून गेले तरी देखील संभाजीच्या स्वारीचा धोका पुनः आहेच.

अनुक्रमणिका

‘आमच्या आरमारात माणसे नाहीत. विश्वासू अधिकारी नाहीत. किल्ले निरुपयोगी झाले आहेत. तंत्रज्ञाची, गोलंदाजांची आणि दारूगोळ्याची कमतरता आहे. द्रव्याची टंचाई तर पाचवीलाच पुजलेली आहे. हे राज्य आमच्या हातून निसटण्याची भीती आहे.’

संभाजीने गोवे शहर घेण्याचा प्रयत्न केला नाही. परंतु गोव्याच्या साष्टी आणि बार्देश प्रांतात आणि ठाणे जिल्ह्यातील पोर्तुगीज वसाहतीत मराठ्यांच्या फौजा होत्या. पोर्तुगीजांच्या हाती असलेल्या चौल शहराचा वेढाही चालूच होता. त्या दरम्यान औरंजेबाचा पुत्र शाहआलम हा मोठ्या सैन्यानिशी मराठ्यांच्या प्रदेशात शिरला होता.

औरंगजेबाचा पुत्र शाहाजादा अकबर हा आपल्या बापाशी भांडून संभाजीच्या आश्रयास येऊन राहिला होता हे मागे आलेच आहे. तो संभाजीचा तसाच पोर्तुगीजांचाही मित्र होता. त्याचा भाऊ शाहआलम याने संभाजीच्या प्रदेशात शिरून आक्रमणे सुरू करताच शाहाजादा अकबरने संभाजी आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये तह घडवून आणण्याचा प्रयत्न सुरू केला. संभाजीला एकाच वेळी दोन आघाड्यांवर लढणे अशक्य झाल्याने तो पोर्तुगीजांशी तह करण्यास तयार झाला. तहाच्या वाटाघाटी कुठे झाल्या त्याचा उल्लेख पोर्तुगीज साधनात आढळत नाही. परंतु मराठी साधनावरून त्या भीमगडच्या पायथ्याशी एका जंगलात दि. २५ जानेवारी ते ४ फेब्रुवारी १६८४ या दरम्यानच्या काळात झाल्या. संभाजीच्या विद्यमाने त्याचा मंत्री छंदोगामात्य कवि कलश ह्याने त्यात भाग घेतला.

तहाची बोलणी आठदहा दिवस झाली. परंतु ती अपूर्ण राहिली असावीत. कारण, १६८४ च्या फेब्रुवारीत पोर्तुगीजांचे एक शिष्टमंडळ रायगडला गेल्याचा उल्लेख पोर्तुगीज साधनात आढळतो.

तहाच्या वाटाघाटीत संभाजीच्या मुख्य अटी पुढीलप्रमाणे होत्या :

१. पोर्तुगीजानी आंजेदिव बेट खाली करणे.

२. एक लक्ष होनांचा नजराणा देणे.

तहाच्या वाटाघाटीत भाग घेणाऱ्या पोर्तुगीज शिष्टमंडळाचा प्रमुख मानुएल द साराइव्ह याने कवि कलश यास आश्वासन दिले होते की, पोर्तुगीज सरकार वरील दोन्ही अटी पूर्ण करील. परंतु व्हिसेरेइला ह्या अटी मान्य झाल्या नसल्याने त्याने त्या बदलून घेण्यासाठी रायगडला शिष्टमंडळ पाठविले. वरील शिष्टमंडळ गोव्याहून १६८४ सालच्या मार्च महिन्यात रायगडला रवाना झाले. त्यावेळी संभाजीचा मुक्काम रायगडलाच होता.

व्हिसेरेइचे म्हणणे होते की आंजेदिव बेट खाली करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. कारण, पोर्तुगीजानी हिंदुस्थानच्या जलमार्गाचा शोध लावला तेव्हा ते बेट पोर्तुगीज नावाड्यानी व्यापिलेले होते. ते नंतर ओस पडले ती गोष्ट अलाहिदा. यापुढेही ते ओस पडण्याची शक्यता आहे.

नजराणा आम्ही देऊ; पण तो केवढ्याचा द्यायचा ते आम्ही ठरवू. नजराणा ठराविक रक्कमेचा असावा अशी सक्ती असू नये.

अनुक्रमणिका

पोर्तुगीज शिष्टमंडळाने व्हिसेरेइचे म्हणणे कवि कलश याला विदित केले. परंतु संभाजी, त्याचा पेशवा आणि त्याचे इतर सरदार याना व्हिसेरेइचा दृष्टिकोण पटला नाही. ते त्यानी वरील दोन्ही मागण्या पूर्ण झाल्याखेरीज तहाच्या पक्क्या मसुद्याला मान्यता मिळणार नाही असे पोर्तुगीज शिष्टमंडळाला निक्षून सांगितल्याने त्याला हात हलवित माघारा परतावे लागले. व्हिसेरेइने शिष्टमंडळाला वरील दोन्ही मुद्यांवर तडजोड करण्याचे अधिकार दिले नव्हते.

रायगडहून माघारा परतताना शिष्टमंडळाने संभाजी व त्याचा छंदोगामात्य कवि कलश या दोघाना पुढील लेखी निवेदन सादर केले :

'संभाजी राजे यानी आपल्या मंत्र्यासमवेत आमचे चांगले स्वागत केले. पोर्तुगीज आणि मराठे यांच्यामध्ये फोंडे येथे झालेल्या तहाच्या कराराविषयी त्यानी संशय घेतला नाही. मात्र त्या करारातील दोन कलमे वगळता उरलेली सर्व कलमे अमलात आणण्याचे वचन त्यानी दिले. त्यानी ज्या कलमाना आक्षेप घेतला ती कलमे म्हणजे आंजेदिव बेट खाली करणे व एक लक्ष पागोडांचा नजराणा संभाजी राजे याना नजर करणे ही होत. या दोन्ही मुद्यांबाबत आणखी वाटाघाटी करण्याची जरुरी नव्हती. आम्हाला कौंट व्हिसेरेइ यांचा हुकूम होता की ह्या दोन मुद्यांबाबत तडजोड झाली नसल्यास आम्ही गोव्यास माघारा परतावे. 'तुम्हाला युद्ध जाहीर करण्याचा अधिकार देण्यात आलाय का?' असा प्रश्न कवि कलश यानी केला असता, आम्ही त्याला उत्तर दिले की, आम्ही तहाच्या वाटाघाटी करण्यासाठी आलो असल्याने युद्ध जाहीर करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तदनंतर कवि कलश यांची व आमची वरील मुद्यांवर आणखी चर्चा झाली. कवि कलश आम्हाला म्हणाले की, या मुद्यावर कौंट व्हिसेरेइ यांच्याशी आणखी चर्चा करण्यासाठी संभाजी राजे तुमच्याबरोबर आपले वकील गोव्यास पाठविणार आहेत. परंतु या मुद्यांवर तडजोड निघाली नाही, तर संभाजी राजे यांचे वकील गोव्याहून रायगडाला पोचेपर्यंत युद्धास सुरुवात होऊ नये, असे आश्वासन तुम्ही द्यावे. ते आश्वासन त्याना आम्ही दिले व त्यासंबंधींची पत्रे आमचे उत्तरेकडील प्रदेशाचे सेनापती झुजे द मेलु द काश्त्रू व त्या प्रदेशातील इतर अधिकारी याना रवाना केली. यासंबंधी कवि कलश यांचा आणि आमचा समझौता झाल्याने आम्ही प्रस्तुतचे लेखी निवेदन दि. ६ सप्टेंबर १६८४ या दिवशी दिले.'

वरील निवेदनाप्रमाणे संभाजीचे वकील पोर्तुगीज शिष्टमंडळाच्या सदस्यांबरोबर रायगडहून गोव्यास रवाना झाले. परंतु ते गोव्यास न जाता वाटेत वसई येथे व्हिसेरेइच्या पत्राची मार्गप्रतिक्षा करीत थांबले. त्यानी वसईहून व्हिसेरेइला पत्र पाठवून त्याची भेट घेण्याची इच्छा दर्शविली. परंतु व्हिसेरेइने त्यांचे स्वागत करण्यास नकार दिला.

रायगडहून गोव्यास व्हिसेरेइच्या भेटीस निघालेल्या शिष्टमंडळात रंगाजी लक्ष्मीधर व सिदोजी फर्जद ह्या दोन मुत्सद्यांच्या अंतर्भाव झालेला होता. त्यांच्यापैकी रंगाजी लक्ष्मीधर याला पोर्तुगीज भाषा अवगत होती. व्हिसेरेइने आंजेदिव बेट खाली करणे आणि एक लक्ष होनांचा नजराणा पाठविणे ह्या संभाजीच्या दोन्ही अटी शेवटपर्यंत मान्य न केल्याने उभय पक्षामधील तह अमलात येऊ शकला नाही. उलट संभाजीला शह देण्यासाठी व्हिसेरेइने वाडीकर सावंताना हाताशी धरून संभाजीला उपद्रव देण्यास सुरुवात केली.

पोर्तुगीज आणि संभाजी या दोघांचे युद्ध संभाजीच्या मृत्युपर्यंत चालू राहिले. तोपर्यंत मराठ्यानी पोर्तुगीज अमलाखालचा जो प्रदेश काबीज केला होता त्याचा पुष्कळसा भाग मराठ्यांच्या हाती होता.

अनुक्रमणिका

गोव्याचा गव्हर्नर दों रुद्रिगु द कॉश्त हा दि. २४ जानेवारी १६८८ रोजी पोर्तुगालच्या राज्यास लिहितो :

'...संभाजीशी चालू असलेल्या युद्धास अजून विराम पडलेला नाही. ते व्हिसेरेइ कौंट द आल्व्होर यांच्या कारकीर्दीत सुरू झाले होते. आम्हाला आता या भागातील देसायांचा संभाजीच्या राज्यात अशांतता माजविण्याच्या कामी उपयोग होत आहे. जोपर्यंत त्याचा आम्हाला उपयोग होईल तोपर्यंत त्याना आम्ही दिलेल्या सवलती चालूच राहतील. महाराजाना जर ही उपाययोजना पसंत नसेल तर महाराजानी मला वेगळी आज्ञा करावी.'

पोर्तुगीजाना जे देसाई संभाजीविरुद्ध सामील झाले होते त्यात कारवार प्रांतातील देसायांचाही अंतर्भाव होता. शिवाजी महाराजांनी कोकणातील देसायांच्या ज्या देसगती काढून घेतल्या त्यात कारवारच्या देसायांच्याही देसगती होत्या. संभाजीने शिवाजी महाराजांचे देसाई, देशमुखांबाबतचे धोरण चालू ठेवल्याने त्यांचे शत्रूत्व त्याना पत्करावे लागले होते. देसायांप्रमाणेच पोर्तुगीजानी सोंधेच्या राज्यालाही संभाजीविरुद्ध चिथावणी दिली होती. हा राजा मोगलांशी हात मिळवणी करून संभाजीशी लढत होता.

इ.स. १६८८ सालच्या डिसेंबर महिन्याअखेर संभाजी मोगलाना हस्तगत झाला. ही बातमी गोव्यास येताच पोर्तुगीजाना फार आनंद झाला. गोव्याचा व्हिसेरेइ दि. ३१ जानेवारी १६८९ या दिवशी पोर्तुगालच्या राजास लिहिलेल्या पत्रात संभाजीस उद्देशून म्हणतो :

'...आम्ही चोर संभाजीपासून आता मुक्त झालो आहोत. मोगलानी संभाजीचा कोकणातील सर्व प्रदेश काबीज केला असून आमच्या राज्याला लागून असलेले फोंडे शहरही घेतले आहे. मोगल बादशहा आणखी काही वर्षे जगला तर तो संभाजीचा पुरता नाश केल्यावाचून राहाणार नाही. मोगलांशी आमचे मैत्रीचे संबंध आहेत.'

मोगलानी मराठ्यांचा कोकणातील मुलुख काबीज केल्याबद्दल पोर्तुगीजाना आनंद झाला. परंतु मोगल जेव्हा त्यांच्या राज्याच्या सीमेवर त्यांचे शेजारी म्हणून आले, तेव्हा त्यांची खरी ओळख त्याना पटली. या बाबतीत गोव्याचा व्हिसेरेइ १६८९ च्या मे महिन्यात पोर्तुगालच्या राजास लिहिताना म्हणतो की, 'मोगल हे धोकेबाज आहेत. ते आमच्या राज्यावर केव्हा हल्ला करतील त्याचा नेम नाही.'

संभाजीच्या वधानंतर पोर्तुगीज आणि मराठे यांच्यामधील युद्ध जवळ जवळ संपुष्टात आले. परंतु संभाजी जिवंत असता पोर्तुगीजाना त्याचा एवढा वचक वाटत होता की, ते त्याला सार्वभौम राजा म्हणून मानीत होते. त्याच्या वकिलास ते सार्वभौम राजाच्या वकिलाप्रमाणे वागवीत असत. शिवाजी महाराजाना ते नुसते 'शिवाजी राजे' म्हणून संबोधित, तर संभाजीच्या नावामागे 'छत्रपती' हे अभिधान ते लावीत.

शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत त्यांचे जे दूत गोव्यास जात असत त्याना सार्वभौम राजाच्या दूतांप्रमाणे वागविण्यात येत नसे. तो मान मिळाला तो संभाजीच्या दूताना. संभाजीचा दूत गोव्यास निघाल्याचे कळले की, त्याला गोवा शहरी आणविण्यासाठी सजविलेली खास नौका पाठविण्यात येई. गोवा शहरात त्याच्यासाठी घर बघून ठेवले जाई. घराच्या खिडक्याना व दाराना भारी किमतीच्या कापडाचे पडदे व खोल्यांमध्ये उंची फर्निचर ठेवले जाई. वकिलाला आणण्यासाठी पाठविण्यात येणाऱ्या नौकेला

मखमलीची कमान व रेशमी पडदे असत. कॅप्टनच्या दर्जाचा एक लष्करी अधिकारी आणि त्याचा एक मदतनीस वकिलाचे स्वागत करण्यासाठी नौकेबरोबर जात.

वकील व्हिसेरेइच्या भेटीस जाई तेव्हा त्याला नेण्यासाठी व्हिसेरेइचे दोन ए. डी. सी. घोड्यावर बसून येत. व्हिसेरेइच्या वाड्यावर वकील पोहोचला की व्हिसेरेइ त्याच्या स्वागतासाठी बाहेर येई. तत्कालिन रीतीरिवाजाप्रमाणे मुलाखत उभ्या उभ्याच होई. दूत परत निघताना व्हिसेरेइचा निरोप घेण्यासाठी त्याच्या वाड्यावर जाई. त्यावेळी राज्य सचीव मराठ्यांच्या राजास लिहून ठेवलेला खलिता आणि नजराणा त्याचे हाती देई. तो त्या खलित्याचा स्वीकार औपचारिकपणे करी. व्हिसेरेइ मग त्याला औपचारिकपणे निरोप देई. त्याला जलमार्गे जायचे असल्यास त्याला खास नौकेने पाठविण्याची व्यवस्था करण्यात येई. त्याच्या सोबतीला दोन ए. डी. सी. असत; पण ते पाठवायचे की न पाठवायचे ते व्हिसेरेइच्या इच्छेवर औलंबून असे. राजदूतास खुष्कीचे मार्गे जायचे असले तर पोर्तुगीज हद्दीपर्यंत हे ए. डी. सी. जात.

संभाजीने पोर्तुगीजाना नरमाईचे धोरण स्वीकारावयास लावले ते तलवारीच्या बळावर. तो जर आणखी काही वर्षे जगता, तर पोर्तुगीजाना ठाणे जिल्ह्यातून आणि गोव्यातून हाकलून लावण्यात यशस्वी झाला असता. परंतु पोर्तुगीजांचे नशीब बलवत्तर होते हेच खरे.

अनुक्रमणिका

# १०. छत्रपती राजाराम

इ.स. १६८९ सालच्या मार्च महिन्यात औरंगजेबाकडून संभाजीची निर्घृण हत्त्या झाल्यावर मराठ्यांच्या राज्याची धुरा वाहण्याची अवघड कामगिरी अल्पवयीन आणि अननुभवी राजारामास पार पाडावी लागली. परंतु सगळ्यांशी समन्वय साधण्याच्या धोरणाचा अवलंब केल्याने तो आपली कामगिरी पार पाडण्यात यशस्वी झाला.

संभाजी आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये रक्तरंजित प्रदीर्घ युद्ध झाल्याने उभय पक्षामधील राजनैतिक संबंध विकोपास गेले होते. राजारामास औरंगजेबासारख्या बलाढ्य शत्रूशी सामना द्यायचा असल्याने पोर्तुगीजांशी मिळते धोरण पत्करावे लागले. संभाजीचे पोर्तुगीजांशी युद्ध चालूच होते तेव्हा पोर्तुगीजानी त्याला शह देण्यासाठी औरंगजेबाचे लांगुलचालन सुरू केले होते. परंतु संभाजीच्या मृत्युनंतर किंवा तत्पूर्वीच मोगल मराठ्यांचा मुलुख घेऊन पोर्तुगीजांचे शेजारी म्हणून आले, तेव्हा त्यांचे सान्निध्य त्याना तापदायक वाटू लागले.

पोर्तुगीजांप्रमाणे कोकणातील बंडखोर देसाई संभाजीच्या मृत्युनंतर मोगलांविरूद्ध बिथरले. विशेषतः औरंगजेबाने संभाजीला हालहाल करून ठार मारल्याने ते त्याच्यावर क्रोधाविष्ट झाले. मणेरी, साखळी, डिचोली अंत्रूज (फोंडे), चंद्रवाडी वगैरे महालातील देसाई 'स्वामीचे राज्य देव ब्राह्मणांचे विश्रामस्थान' असे मानून मोगलाशी लढण्याकरिता राजारामाच्या सैन्यात भरती झाले. फक्त वाडीकर भोसले हे मात्र पूर्वीसारखे छत्रपती घराण्याचे विरोधक म्हणून राहिले. गोव्याचा व्हिसेरेइ दख्खनमधील राजकीय घडामोडींचा आढावा घेऊन दि. १६ जानेवारी १६९१ रोजी पोर्तुगालच्या राजास लिहितो :

'कोकणात मोगल बादशहाची पकड ढिली पडल्याने व त्याच्या सरदारानी त्याच्याकडे मागितलेली कुमक न आल्याने तिथल्या देसायानी बादशहाची सत्ता झुगारून देऊन राजारामाशी संधान जुळविले आहे. किंबहुना राजारामानेच त्याना बादशहाविरूद्ध चिथावणी दिली असे म्हटले तरी चालेल. त्याचे कारण हे की, हे देसाई आणि राजाराम हे एकाच धर्माचे आहेत. त्यांत पुनः मुसलमानांच्या अरेरावीने आणि उर्मटपणाने ते चिडून गेले आहेत. मुसलमानानी हिंदु स्त्रिया आणि हिंदु मंदिरे भ्रष्ट केल्याने त्यांच्याविरूद्ध त्यानी उठाव केला असल्यास नवल नाही. सर्व देसायानी एकवटून फोंड्याचा सुभेदार सरबजखान व सरदार अब्दुल राजाखान या दोघाविरूद्ध बंड केले. अब्दुल राजाखान हा कुडाळला होता. त्याला तेथून डिचोलीला पळून यावे लागले. त्याला आणि सुभेदार सरबजखान याला राजारामाची भीती वाटते.

'मराठ्यानी फोंड्याच्या जवळपासची खेडी लुटली व फोंड्यास वेढा घातला. मोगलांपाशी घोडदळ नाही. जे काय फार थोडे होते ते मरून गेले आहे. अब्दुल राजाखान याने आपली बायकामुले आणि मौल्यवान वस्तू नदीतील एका बेटावर सुरक्षिततेसाठी पाठवून दिल्या आहेत. या बाबतीत आमच्याकडून त्याला मदत झाली.

'एके बाजूने आम्ही बादशहाच्या प्रजाजनाना आमच्या राज्यातून बाहेर जाण्यास वाट देत आहोत, तर दुसऱ्या बाजूने राजारामाशीही धूर्तपणाने वागत आहो. त्याने व्हिसेरेइ दों रुद्रिगु द कॉश्त व व्हिसेरेइ दों मिगेल द आल्मैद या दोघाना पत्रे पाठवून आपले पिते शिवाजी राजे यांचे आमच्याशी जसे मैत्रीचे संबंध होते

तसे संबंध आम्ही आपणाशी ठेवावे अशी विनंती केली आहे. त्यांच्या पत्रास आम्ही उत्तर धाडले असून त्यांच्याशी मैत्रीचे संबंध ठेवू असे त्याला कळविले आहे.’

‘असे कळते की, राजारामाच्या सैन्याने आणि देसायानी फोंडे आणि डिचोली हे दोन्ही प्रांत फिरून काबीज केले आहेत. आमच्या राज्याला मुसलमानांपेक्षा हिंदूंचा शेजार बरा असे आम्हाला वाटते. मुसलमानावर कधीच विश्वास ठेवू नये. त्याना वचनाची चाड नसते. ते उर्मट आणि भांडखोर असतात. तथापि असे जरी असले तरी दोघांशीही आमचे तटस्थतेचे संबंध आहेत, असा आभास आम्ही निर्माण करतो. त्यांच्याशी असलेले मतभेद आम्ही कधीच उघड केलेले नाहीत. आम्ही नेहमीच जागरूक आणि तयारीने असतो. आम्ही हत्यार बंद असून आमची ठाणी सुरक्षित आहेत.......’

राजारामाने जिंजीस प्रयाण केले, तेव्हा मोगल अधिकाऱ्यानी व्हिसेरेइला इशारा दिला होता की, राजाराम गोव्यामार्गे कर्नाटकात निसटण्याचा संभव आहे. तरी तो तिकडे गेला असल्यास त्याला अटक करावी.

व्हिसेरेइ दों रुद्रिगु द कॉश्त याने मोगल सरदार मातबरखान याला पत्रोत्तरी कळविले की, ‘राजाराम गोव्यामार्गे कर्नाटकात निसटू नये म्हणून सर्वत्र चौक्या पहारे बसविण्यात येत आहेत.’

राजारामाने जिंजीस निघतेवेळी व्हिसेरेइला पत्र पाठवून पोर्तुगीजांशी सलोख्याचे संबंध ठेवण्याची इच्छा दर्शविली होती. पोर्तुगीजानाही राजारामाविषयी सहानभूती वाटत होती. कारण मोगलांचा शेजार त्याना नकोसा वाटत होता. त्यांच्या अरेरावीपणाचे अनुभव त्याना मिळू लागले होते. तर संभाजीच्या कारकीर्दीत पोर्तुगीजांच्या दुटप्पीपणामुळे मराठे दुखावले गेले असल्याने पोर्तुगीजांची कळ काढण्याची संधी ते दवडत नव्हते. यासंबंधी गोव्याचा व्हिसेरेइ १६९० [पत्रावर वर्ष आहे; पण तारीख व महिना नाही.] साली कधी तरी रामचंद्रपंत आमात्य याना लिहिलेल्या पत्रात मराठा सरदारांविरुद्ध तक्रार करताना म्हणतो :

‘...तुमचे लष्करी सुभेदार युद्धनौकांसह आमच्या समुद्रात संचार करीत आहेत. त्यांच्या हालचालीवर आपण नियंत्रण ठेवले पाहिजे. न झाल्यास तुमचा आणि आमचा एकोपा होणे कठीण आहे......’

व्हिसेरेइने १६९१ सालच्या जानेवारी महिन्यात पोर्तुगालच्या राजास लिहिलेल्या पत्रात दख्खनमधील राजकीय घडामोडींचा आढावा घेतला आहे. तो म्हणतो :

‘...मोगल बादशहाचे वास्तव्य सांप्रत विजापूर येथे आहे. मोगलानी जिंजी आणि तंजावर घेतल्याची बातमी आहे. ही राज्ये मराठ्यांची आहेत. परंतु मोगलांचा जोर दक्षिणेत होताच मराठ्यानी कोकणात उचल खाल्ली आहे. कारण कोकणात मोगलांचा विशेष बंदोबस्त नाही. मराठ्यांचा कोकणातील प्रदेश गोव्याच्या हद्दीला भिडलेला आहे. चार वर्षामागे मोगल बादशहाने हा प्रदेश काबीज केला होता. मराठ्यानी कोकणातील प्रदेश फिरून घेतला इतकेच नव्हे तर, त्यानी फोंड्याच्या किल्ल्यावरही कबज केली आहे. आमच्या बाबतीत बोलायचे झाल्यास बलाढ्य मोगल बादशहापेक्षा मराठ्यांचा शेजार बरा असे आम्हाला वाटतो...’

अनुक्रमणिका

वरील धोरणास अनुसरून गोव्याचे पोर्तुगीज मराठ्याना मदत करीत असावेत. त्याचा संशय मोगल सरदार मातबरखान याला आल्याने त्याने ह्या दगलबाजीबद्दल पोर्तुगीजाना धडा शिकविण्यासाठी १६९२ साली पोर्तुगीजांच्या अमलाखालच्या ठाणे जिल्ह्यातील प्रदेशात सैन्य घुसविले. मोगल आणि पोर्तुगीज यांच्या अनेक झटापटी झाल्या. पण मोगलांसमोर निभाव न लागल्याने पोर्तुगीजानी वसईच्या किल्ल्याचा आश्रय घेतला. मोगलानी अनेक पोर्तुगीज स्त्रिया आणि मुले धरून नेली.

मातबरखानाने बादशहाची परवानगी न घेता वरील कारवाई आपल्या अखत्यारीत केल्याने त्याचे हे कृत्य बादशहाला विदित करण्यासाठी व्हिसेरेइने फ्रेइ मातियश या नावाचा दूत बादशहाकडे धाडला.

बादशहाने पोर्तुगीजांची तक्रार ऐकून घेतली व पोर्तुगीज प्रदेशात आक्रमण केल्याबद्दल मातबरखानास दोषी ठरवून त्याला दोन लक्ष रूपयांचा दंड केला. ही रक्कम त्याने नुकसानभरपायी म्हणून पोर्तुगीजाना द्यायची होती. त्याचप्रमाणे मातबरखानाने जी पोर्तुगीज बायकामुले पकडून नेली होती ती सोडून देण्याचाही हुकूम बादशहाने त्याला केला.

दि. १३ नवंबर १६९३ रोजी व्हिसेरेइ कौंट द व्हिलाव्हेर्द हा कोकणचा सुभेदार रायाजी शामराज याला मराठा सैनिकानी बार्देशमध्ये शिरून लुटालूट केल्याबद्दल तक्रार करून पत्र लिहितो :

‘मागे रामचंद्र पंडित व संताजी घोरपडे या दोघानी पत्रे पाठवून आपण आमचे मित्र असल्याचे कळविले होते. परंतु आज चित्र वेगळे दिसत आहे. तुमच्या सैनिकानी घाट उतरून आमच्या राज्यात शिरून लुटालूट केली. हे कृत्य शत्रुत्वाचे असल्याने तुमच्यावर विश्वास कसा ठेवावा ते आम्हाला कळेनासे झाले आहे. मी चौलच्या कॅप्टनला पत्र पाठवून कुलाबा आणि खांदेरी बेट घेण्याची आज्ञा केल्याचे पाहून आपण गडबडून गेला असाल. मला आपणास कळवायचे आहे की, आम्ही पोर्तुगीज लोक सबळ कारणाखेरीज आमच्या मित्रांकडील संबंध तोडीत नाही. तुमच्या सैनिकानी बार्देशमध्ये शिरुन लुटालूट केल्याबद्दल तुम्ही त्याना शासन केले पाहिजे. तुम्हाला युद्ध हवे असल्यास आमची त्याला तयारी आहे. तुम्हाला युद्ध नको असल्यास ते तुम्ही कृतीने सिद्ध केले पाहिजे.’

मराठा सैनिकांनी बार्देश प्रांतात शिरून लुटालूट केल्याचा बदला म्हणून किंवा आणखी काही कारणाने म्हणा पोर्तुगीजांनी मराठ्यांच्या अमलाखालच्या आचरे बंदरात शिरून जाळपोळ केली. त्यानी बंदरातील सात होड्या जाळून टाकल्या व एक हिंदू देवालय मोडून टाकले. ह्या घटनेचा उल्लेख करून व्हिसेरेइ कौंट द व्हिलाव्हेर्द हा पोर्तुगीजांकडील एक जुना मोगल वकील शेख महमद याला दि. २९ नवंबर १६९४ रोजी लिहिताना म्हणतो :

‘...आपणाला माहीत आहेच की शिवाजीशी [मराठे. काही पोर्तुगीज पत्रात मराठ्याना अनुलक्षून शिवाजी म्हणून संबोधण्यात आले आहे.] आमचे युद्ध झाले तेव्हापासून त्यांचा आणि आमचा तह झालेला नाही. त्याना आम्ही आमच्या बंदरात कधीच येऊ दिले नाही. इतकेच नव्हे, तर प्रत्येक ठिकाणी त्यांच्या आणि आमच्या चकमकी उडतात. मग त्या जमिनीवर असोत वा समुद्रावर असोत. गेल्या वर्षी त्यानी आमच्या काही नौका पकडल्या म्हणून त्यांच्या एका बंदरात आमच्या युद्धनौका शिरल्या व त्यानी तेथील अनेक नौका जाळून टाकल्या. शिवाय त्यांचे एक खेडे आणि एक प्राचीन देऊळ त्यानी जाळून टाकले. मी चौलच्या कॅप्टनला त्यांची शक्य ती हानी करण्याची सूचना देत आहे...’

अनुक्रमणिका

उपरिनिर्दिष्ट पत्र व्हिसेरेइने शेख महमद याला लिहिले, तदनंतर मराठे आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये चकमकी झडतच राहिल्या असाव्या असे खालील पत्रावरून वाटते. प्रस्तुतचे पत्र व्हिसेरेइने मराठ्यांचा कोकण प्रांताचा नवीन सुभेदार गणेश रघुनाथ यास दि. १५ जून १६९५ रोजी लिहिले. त्यात तो म्हणतो :

'रामचंद्र पंडित यानी कोकणचा कारभार बघण्यासाठी आपली नेमणूक केल्याचे कळून आनंद झाला. आपली कामगिरी यशस्वी होवो ही शुभेच्छा. आमच्या मैत्रीची आपण अपेक्षा करता. आपणाला मी कळवू इच्छितो की पोर्तुगीजांची मैत्री ज्याना हवी असते ती त्याना मिळाल्यावाचून राहात नाही. आपणालाही ती मिळू शकेल. परंतु आश्चर्याची गोष्ट ही की रामचंद्र पंडित हे या राज्याच्या मैत्रीची अपेक्षा करीत असता दुसऱ्या बाजूने त्यांच्याकडून शत्रुत्वाची कृत्ये कशी घडतात? त्यांच्या सुभेदारांच्या युद्धनौका आमच्या पाण्यात संचार करून आमच्या नौकाना उपद्रव देतात. त्यावरून त्यांची आमच्या मैत्रीची अपेक्षा प्रामाणिक नसावी असा संशय येतो. ज्याला एखाद्याची मैत्री हवी असते त्यांचे शत्रुत्व करून ती मिळते का?'

'रामराजे यानाही आमची मैत्री हवी आहे. पण ते आमच्या शत्रूंशी मैत्रीने वागतात. ही गोष्ट आम्हाला विसंगत वाटते. रामराजे यांच्याशी मी मैत्री करण्यास तयार आहे. पण त्यांच्या सरदारांनी आमचे शत्रूत्व करण्याचे सोडून दिले तरच ते शक्य आहे. त्यानी आमच्या नौकांचा पिच्छा पुरविण्याचे सोडून दिले नाही तर ह्या लुटारूना मी योग्य ते शासन केल्यावाचून राहाणार नाही.'

'सत्याजी राणे याने आमच्या राज्यात शिरून अनुचित कृत्ये केल्याने त्याला कैद करण्याचा हुकूम मी केला. परंतु आमच्या राज्यात लूटमार करण्यामागे त्याचा हात नव्हता हे सिद्ध झाले, तेव्हा तो निरपराध म्हणून त्याला सोडून देण्यात आले. तो आता तुमच्या राज्यात शिरल्याची बातमी आहे. त्याने तिकडे गडबड केली असल्यास तुम्ही त्याला शासन करू शकता.'

व्हिसेरेइ कौंट द व्हिलाव्हेर्द याने रायाजीपंत यास उपरिनिर्दिष्ट पत्र लिहिल्यावर अवघ्याच दिवसानी त्याचे निधन झाले असावे. त्याचा उल्लेख व्हिसेरेइने दि. २५ जून १६९५ रोजी रामचंद्रपंतास लिहिलेल्या खालील पत्रात आढळतो :

'रायाजी पंडित यांच्या निधनाने तुमची आणि आमची मैत्री तुटेल अशी भीती वाटत होती. परंतु तुम्ही ज्या अर्थी आश्वासन देता की मैत्री चालूच राहील त्या अर्थी मला आपणास सुचवायचे आहे की, तुमच्या सुभेदाराची जी गलबते आमच्या पाण्यात धुमाकूळ घालीत आहेत त्याना तुम्ही आवरले पाहिजे. असे घडले तर आमच्या मैत्रीचा तुम्हाला प्रत्यय आल्यावाचून राहाणार नाही. आम्ही ज्याना मित्र मानतो त्यांच्याशी आम्ही कधीच प्रतारणा करीत नाही.'

दि. २ मार्च १७०० रोजी राजारामाचे सिंहगडावर निधन झाले. त्याच्या मृत्यूपूर्वी दोन वर्षे पोर्तुगीज आणि मराठे यांचे संबंध सलोख्याचे होते असे एका दत्तऐवजावरून वाटते.

अनुक्रमणिका

# ११. महाराणी ताराबाई

राजाराम जिंजीस होता तेव्हा त्याच्या अनुपस्थितीत रामचंद्रपंत आमात्याने मराठा सरदारांच्या मदतीने मोगलांशी युद्ध चालू ठेवले होते. राजाराम कालातील राजकीय घडामोडीवरून पोर्तुगीजांचे आणि मराठ्यांचे संबंध विशेष सलोख्याचे नव्हते असे दिसून येते. मराठे–मोगल युद्ध चालू असल्याने पोर्तुगीजांच्या वाटेस जायचे नाही, परंतु त्यांच्याशी मैत्रीचेही संबंध ठेवायचे नाहीत, हे धोरण रामचंद्रपंत आमात्याने अवलंबिले असावे असे वाटते.

राजारामाच्या निधनानंतर महाराणी ताराबाई यांनी आपला पुत्र शिवाजी याला गादीवर बसवून राज्यकारभार हाती घेतला. पोर्तुगीजांशी वागताना त्यानी पूर्वीचेच धोरण अवलंबिले असावे, असे त्यांच्या कारकीर्दीचा आढावा घेतला असता दिसून येते. त्याचा पहिलाच पुरावा म्हणजे व्हिसेरेइ आंतोनियु गोंसाल्विश द कामारा कौतिन्यू याने दि. २३ मार्च १७०० या दिवशी परशुराम त्रिंबक प्रतिनिधी यास लिहिलेले पत्र. त्यात तो म्हणतो :

‘आपले पत्र मिळाले. **झमझिगार** [संगमेश्वर नदी.] नदीत आमचे आरमार शिरल्याबद्दल आपण जी तक्रार केली आहे ती निराधार आहे. आपण म्हणता की रामराजे यानी आमच्याशी सलोख्याचे संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला होता. परंतु ह्या राज्यातील माझ्या कारकीर्दीत तरी मला अनुभव उलटा आला आहे.’

‘गेल्या वर्षी आमच्या उत्तरेकडील प्रदेशातील दोन खेडी लुटण्यात आली. आपल्या लढाऊ गलबतानी आमच्या जहाजांवर हल्ले करून ती लुटली. ही जहाजे अन्नसामुग्री घेऊन या शहराकडे येत होती. आणि वरून आपण म्हणता की, आपण आमच्याशी शांततेने वागत आला आहात. मी आपणास इशारा देऊ इच्छितो की, तुमच्या ह्या कुरापती आम्ही खपवून घेणार नाही. तुम्हाला जर आमच्याशी सलोख्याचे संबंध ठेवायचे असतील तर गेल्या वर्षी लुटण्यात आलेला आमचा माल आम्हास परत करावा.’

वरील पत्रात व्हिसेरेइने मराठा–पोर्तुगीज संबंध सलोख्याचे राहावे म्हणून मराठा गलबतानी लुटलेला पोर्तुगीजांचा माल त्याना परत करण्याची जी अट घातली ती मराठ्यानी पूर्ण केली नसावी. कारण दि. २२ मार्च १७०२ रोजी गोव्याचा हंगामी गव्हर्नर सिंधुदुर्गचा किल्लेदार बुरानजी मोहिते यास लिहितो :

‘आमचे जे एक जहाज तुम्ही तुमच्या बंदरात अटक करून ठेवले आहे ते सोडून देण्याबद्दल मी तुम्हाला पत्र पाठविले होते. तुम्ही पत्रोत्तरी कळविले होते की, तुमचे जहाज सोडून देण्यात येत आहे. सदर्हू जहाजावरील खलाशांना चांगली वागणूक दिल्याबद्दल मी तुमचे आभारही मानले होते. परंतु त्या जहाजाच्या कॅप्टनचे मला जे पत्र आले आहे त्यावरून तुम्ही ते जहाज अद्याप मुक्त केलेले नाही असे दिसून येते. तुम्ही हे जहाज इतके दिवस का पकडून ठेवले आहे तेच आम्हाला कळत नाही. शिवाजी राजे यांचे आणि आमचे संबंध चांगले असता, आपण आमच्याशी असे वागावे याचे आश्चर्य वाटते. ह्या चांगल्या संबंधाचा पुरावा मी आपणाला सादर केलाच आहे. शिवाजी राजे यानी परशुराम पंडित यांच्या विद्यमाने मला जे पत्र पाठविले, ते आम्ही आपल्या निदर्शनास आणलेच आहे. तरीही आपण ज्या अर्थी असे वागता त्यावरून शिवाजी राजे यांचे व आमचे संबंध बिघडून टाकण्याचा आपला हेतु आहे असा संशय आहे.

अनुक्रमणिका

'आपण जर आमचे जहाज त्वरीत मुक्त केले नाही, तर ते मुक्त करण्याचा आम्ही जो उपाय अवलंबू तो आपणाला खचित रुचणार नाही. तरी प्रकरण त्या थरापर्यंत जाऊ न देता जहाज सोडून द्यावे.'

सिंधुदुर्गचा किल्लेदार बुरानजी मोहिते हा महाराणी ताराबाई यांच्या माहेरच्या तळबीडकर मोहिते घराण्यातला होता. त्याची मुलगी पुढे ताराबाई यांचा नातू रामराजा याला दिली. हा शूर असून पोर्तुगीजांशी तो जशास तसे या धोरणाने वागला. त्याच्या नेतृत्वाखाली सिंधुदुर्गच्या मराठा आरमाराने पोर्तुगीज आरमाराशी अनेक लढाया केल्या.

पोर्तुगीजांच्या ठाणे जिल्ह्यातील ठाण्यांचा सेनापती जनरल पेद्रु व्हाज सोआरिश द बालेसार याने त्या भागातील मराठा सेनाधिकाऱ्यांशी तह केल्याची वार्ता पोर्तुगालच्या राजास कळल्याने त्याने गोव्याच्या गव्हर्नरला पत्र पाठवून ह्या घटनेची चौकशी करण्याचा हुकूम केला होता. पोर्तुगालच्या राजाने पत्रात दृष्टिकोण व्यक्त केला होता की, 'उपरिनिर्दिष्ट सेनापतीने स्वतःच्या अखत्यारीत जर मराठ्यांशी तह केला असेल तर शिस्तीच्या दृष्टीने ही गोष्ट गर्हणीय आहेच, पण मुत्सद्दिपणाच्या दृष्टिनेही वाईट आहे. कारण, ही बातमी मोगल बादशहास कळली तर त्याचा पोर्तुगीजांवर रोष होऊन होऊन पोर्तुगीजांच्या आणि त्याच्या मैत्रीत बिघाड होण्यात त्याची परिणती होईल.'

पोर्तुगालच्या राजाच्या आज्ञेप्रमाणे गोव्याचा व्हिसेरेइ कौंट द आल्व्होर याने उपरिनिर्दिष्ट घटनेची चौकशी केली असता, त्यातून निष्पन्न झाले की, उत्तरेकडील प्रदेशाच्या सेनापतीने मराठ्यांशी तह केला नाही, पण काही ठिकाणी युद्धबंदी केली. हे धोरण व्हिसेरेइला पसंत पडले. त्याने उत्तरेकडील सेनापतीस सल्ला दिला की, मराठ्यांशी युद्ध न करता त्यांच्याशी सलोख्याचे संबंध ठेवून युद्ध टाळावे. मात्र ही गोष्ट बादशहाच्या कानावर जाऊ नये म्हणून तिची वाच्यता न होण्याची दक्षता घ्यावी.

गोव्याचा व्हिसेरेइ कौंट द आल्व्होर याने आपला अहवाल पोर्तुगालला दि. ११ डिसेंबर १७०२ या दिवशी पाठविला.

मराठे मोगलांशी युद्धात गुंतले असल्याने पोर्तुगीजांशी त्याना युद्ध नको होते. म्हणून ते पोर्तुगीजांशी शक्यतो सलोख्याचे संबंध ठेवण्याचा प्रयत्न करीत होते. खालील पत्र हा त्या धोरणाचा आणखी एक पुरावा आहे. सेनापती हिंदुराव घोरपडे यानी गोव्याच्या व्हिसेरेइला पत्र पाठवून उभय पक्षांमध्ये मैत्रीचे संबंध प्रस्थापित व्हावेत अशी इच्छा दर्शविली होती. त्याला व्हिसेरेइने पुढील उत्तर धाडले.

'आपली दोन्ही पत्रे मिळाली. आपण म्हणता की माझे पिते या राज्याचे व्हिसेरेइ होते तेव्हा, छत्रपती स्वामी यांचे आणि पोर्तुगीजांचे सलोख्याचे संबंध होते. तसे संबंध उभय राज्यांमध्ये आताही असावेत अशी अपेक्षा आपल्या दोन्ही पत्रांतून आपण व्यक्त केली आहे.

'मी आपणास कळवू इच्छितो आपल्या राज्याशी सलोख्याचे संबंध ठेवण्यास आमची आडकाठी नाही. परंतु आपल्या जमिनीवरील आणि समुद्रावरील सैन्याकडून आमची कुरापत काढण्याचे जे प्रसंग घडतात त्यांना आळा बसला पाहिजे. आमच्या राज्यातील प्रजाजनाना आपल्या लोकांकडून उपद्रव होता कामा नये व आमच्या आरमारावर हल्ले होतात ते थांबले पाहिजेत.

अनुक्रमणिका

'आपल्या पत्रावरून आपण काही विजय मिळविल्याचे कळले. ही बातमी वाचून आम्हाला फार आनंद झाला. आपणाला असेच विजय मिळावेत अशी इच्छा करतो.'

हिंदूराव घोरपडे यांच्याप्रमाणे कुष्टाजी पंत ऊर्फ कृष्णाजी अनंत यानीही व्हिसेरेइला पत्र पाठवून छत्रपती आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये सलोखा नांदावा अशी इच्छा दर्शविली होती. हिंदुराव घोरपडे याना पाठविलेल्या पत्रात व्हिसेरेइने ज्या भावना व्यक्त केल्या त्याच भावना त्यानी कृष्णा अनंत याना पाठविलेल्या उत्तरातही व्यक्त केल्या आहेत. प्रस्तुतचे उत्तर दि. १४ डिसेंबर १७०२ चे आहे. सेनापती हिंदुराव घोरपडे व कृष्णाजी अनंत सभासद यांच्यासारख्या मातबर व्यक्तीनी व्हिसेरेइला पत्रे पाठवून पोर्तुगीजांशी सलोख्याने वागण्याची जी इच्छा व्यक्त केली ती प्रामाणिक होती हे व्हिसेरेइला पटल्याने पोर्तुगालच्या राजास त्याने कोकणातील राजकीय घडामोडीचा आढावा घेऊन जे पत्र पाठविले त्यात त्याचा उल्लेख केला आहे. त्या पत्रात व्हिसेरेइ म्हणतो :

'माझे इकडे आगमन झाले तेव्हा मराठ्यांशी आमचे युद्ध चालू नसल्याचे कळून आले. आमच्याशी सलोख्याने वागण्याची त्यांची इच्छा आहे हे त्यानी सप्रमाण सिद्ध केले आहे.

'आमची दोन गलबते वाईट हवेमुळे मराठ्यांच्या बंदरात शिरली होती. ती त्यानी मुक्त तर केलीच, परंतु चांच्यानी त्यांच्यावर हल्ला करू नये म्हणून त्याना आपल्या युद्धनौकांचे संरक्षण देऊन ती आमच्या बंदरापर्यंत आणून सोडली.

'मराठ्यांच्या आणि आमच्या चकमकी मुख्यत्वे आमच्या उत्तरेकडील प्रदेशात होत होत्या. तिकडे आता कोणत्याही परिस्थितीत युद्धजन्य परिस्थिती निर्माण होता कामा नये.

'मोगलानी मराठ्यांचा जो मुलुख जिंकला होता, तो मराठ्यानी परत घेण्याचा सपाटा सुरू केला आहे. मी इकडे येऊन राज्याची सूत्रे हाती घेतल्यावर मराठ्यानी फोंड्यास वेढा घातला. शहर पडले. पण किल्ला अजून मोगलांच्या हाती आहे. ते कुमकेची वाट पाहात आहेत. परंतु पुरवठ्याअभावी किल्ला पडण्याची चिन्हे दिसत आहेत. फोंड्याच्या नबाबाने आमच्याकडे दारुगोळ्याची आणि मनुष्य बळाची मदत मागितली होती. मी त्याला थोडा दारुगोळा पाठविला; पण आरमार बाहेर गेले ते परत आलेले नाही व बरीच माणसे आजारी आहेत व उरलेली सरहद्दीचे रक्षण करीत आहेत; ही सबब सांगून मनुष्य बळाची मदत पाठविली नाही.

'शिवाजीने फोंडे घेतल्यावर पत्र पाठवून आमच्याशी मैत्रीचे संबंध ठेवण्याची इच्छा व्यक्त केली. ह्या पत्राला राज्य सल्लागार मंडळाच्या सदस्यांचे मत अजमावून उत्तर पाठविले.

'मराठ्याना सांप्रत उत्कर्षाचे दिवस आले आहेत. त्यामुळे त्यांचा दुरावा बाळगणे हिताचे नाही. मी शिवाजीला पाठविलेल्या पत्रात त्यांच्याशी मैत्रीचे संबंध ठेवण्याची इच्छा दर्शविली आहे.'

मराठ्यांशी मैत्रीचा करार केला, तर मोगलांचा आपणावर रोष होईल ह्या भीतीने पोर्तुगीज करार करण्याचे टाळीत होते. परंतु मराठ्याना ते आतून जीवनोपयोगी वस्तूंची आणि दारुगोळ्याची मदत करीत होते. मराठ्यांची जहाजे पोर्तुगीज बंदरे करीत असत. सुरतेच्या नबाबास जेव्हा ही बातमी लागली तेव्हा

अनुक्रमणिका

त्याने व्हिसेरेइला पत्र पाठवून निषेध व्यक्त केला. व्हिसेरेइने नबाबास प्रत्युत्तर धाडले की, असे प्रकार जर ठाणे जिल्ह्यातील पोर्तुगीज वसाहतीत घडत असतील तर त्या वसाहतीच्या सेनापतीस जाब विचारण्यात येईल व त्याला शासन केले जाईल.

व्हिसेरेइने सुरतेच्या नबाबास पाठविलेले वरील उत्तर दि. २१ फेब्रुवारी १७०३ चे आहे.

छत्रपती राजारामाचे कारकीर्दीत कान्होजी आंग्रेस मराठ्यांच्या आरमारांचे अधिपत्य प्राप्त झाले होते. त्यामुळे पोर्तुगीजांचा आणि त्याचा संबंध आला. पोर्तुगीजांशी सलोख्याचे संबंध ठेवण्याची त्याची इच्छा होती व तदनुसार त्याने व्हिसेरेइला पत्र पाठवून आपली इच्छा त्याला कळविली होती. परंतु मोगलांच्या दडपणामुळे मराठ्यांशी मैत्रीचे संबंध उघडपणे ठेवण्यास व्हिसेरेइ धजत नव्हता. या धोरणानुसार व्हिसेरेइने कान्होजी आंग्रे याना दि. ८ जून १७०३ रोजी पत्र पाठवून कळविले की, ‘आमच्या मधल्या मैत्रीची आणि परस्पर सहकार्याची वाच्यता होऊ नये अशी माझी इच्छा आहे. या बाबतीत रामजीपंत व अझमत खान या दोघाशी माझी जी बोलणी झाली आहेत त्यांचा तपशील आपणाला त्या दोघांकडून कळेलच. इकडे आता पावसाळा सुरू झाला असल्याने समुद्रात वादळ सुरू होण्याची भीती आहे. तो धोका नसल्यास त्या दोघाना मी पाठवून देईन.’

रामजीपंत आणि अझमत खान या दोघांना कान्होजी आंग्रे यांनी व्हिसेरेइशी मैत्रीची बोलणी करण्यासाठी गोव्यास पाठविले असावे.

पोर्तुगीज लोक हिंदुस्थानात आले तेव्हा ते आपण हिंदी महासागराचे स्वामी असल्याचा दावा करून एत्तद्देशीय सत्ताधाऱ्यांच्या नौकाना आपले ‘कार्ताज’ अथवा परवाने बाळगावयास भाग पाडीत असत. शिवाजी महाराजांनी त्यांचा हा स्वयंभू अधिकार धुडकावून लावून त्यांचे कार्ताज घेण्यास नकार दिला होता, इतकेच नव्हे तर आपल्या सागरी हद्दीत संचार करणाऱ्या पोर्तुगीज जहाजानी मराठ्यांचे परवाने बाळगले पाहिजेत, अशी सक्ती यांच्यावर त्यानी केली होती. त्यांच्या निधनानंतर मराठ्यानी त्यांचे हे धोरण पुढे चालू ठेवल्याचे पुढील घटनेवरून दिसून येते.

सिंधुदुर्गचे सुभेदार बुरानजी मोहिते यानी पोर्तुगीजाना कळविले होते की, मराठ्यांच्या सागरी हद्दीत संचार करणाऱ्या पोर्तुगीज नौकानी मराठ्यांच्या नौसेनाधिकाऱ्याची तत्सबंधी परवानगी घेतली पाहिजे. बुरानजी मोहिते यांच्या पत्रामुळे व्हिसेरेइचा अहंकार दुखावला. त्याने त्याना दि. २० सप्टेंबर १७०३ रोजी पुढील अर्वाच्य पत्र आपल्या राज्य सचिवाकरवी पाठविले.

‘सिंधुदुर्ग येथील अधिकाऱ्यांकडून आमच्या लोकाना वाईट वागणूक मिळत आहे. ते आमची जहाजे तर अडवितातच; परंतु त्या जहाजातून प्रवास करणाऱ्या लोकानाही अटक करून त्यांची चीजवस्तु लुबाडतात. ह्या अत्याचारातून बिचारे पाद्री देखील सुटत नाहीत. आता तुम्ही लिहिता की, तुमच्या सागरी हद्दीतून प्रवास करणाऱ्या आमच्या जहाजानी तुमचे परवाने घेतले पाहिजेत. ही तुमची दंडली म्हणजे तुमच्या आणि आमच्यामध्ये झालेल्या मैत्रीच्या कराराचा उघड भंग आहे. तुमचे हे कृत्य तुमच्या स्वामीच्या निदर्शनास आणून आम्ही तुम्हाला त्यांच्याकडून शासन केल्यावाचून राहाणार नाही.

अनुक्रमणिका

'तुमच्या ज्या दोन होड्या आमच्या शापोरा येथील नाविक अधिकाऱ्यानी अडविल्या त्या खेमसावंत यांच्या असतील ह्या गैरसमजुतीने. परंतु त्याना जर त्या तुमच्या म्हणून तेव्हा कळले असते, तर तुमच्या नाविक अधिकाऱ्यानी आमच्या जहाजांना जी वाईट वागणूक दिली त्याचा बदला त्यानी त्या होड्याविरूद्ध घेतला असता. तरी ह्या गोष्टीचा आपण विचार करावा व आपल्या स्वामीच्या आज्ञेनुसार वागावे.

वाडीचे खेमसावंत भोसले यांचे आणि पोर्तुगीजांचे संबंध बिघडले होते. त्यांच्यामध्ये समझौता घडवून आणण्याचा प्रयत्न हिंदुराव घोरपडे हे करीत होते. त्याना दि. २८ सप्टेंबर १७०३ रोजी पाठविलेल्या पत्रात व्हिसेरेइने सिंधुदुर्ग येथे घडलेल्या प्रकरणाचा उल्लेख केला आहे. तो म्हणतो :

'मेलुंदी (सिंधुदुर्ग) बंदरात आणि खांदेरी बेटालगत आमच्या लोकांवर हल्ले होऊन त्यांची चीजवस्तु लुटली गेली. ती लूट आम्हाला परत मिळाली पाहिजे व ह्या प्रकाराला जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांची आणि सुभेदारांची डोकी उडविली पाहिजेत.'

व्हिसेरेइने वरील स्वरूपाचे पत्र दि. १४ नवंबर १७०३ रोजी कोकणचे सुभेदार कृष्णाजी अनंत यानाही पाठविले.

मराठ्यांच्या राज्य कारभाराविषयी मराठी कागदपत्रात काही गोष्टी आढळत नाहीत, त्या पोर्तुगीज कागदपत्रातून आढळतात. उदाहरणार्थ, महाराणी ताराबाई यानी कोकणच्या प्रदेशापैकी काही प्रदेशाचा कारभार बघण्यासाठी श्रीनिवास माधवराव या नावाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करून त्याची दखल घेण्याबद्दल गोव्याच्या व्हिसेरेइला पत्र पाठविले होते. त्या पत्राची नोंद व्हिसेरेइने शिवाजी राजे याना दि. १८ मार्च १७०४ या दिवशी पाठविलेल्या पत्रात आढळते. सदहू पत्रात सिंधुदुर्ग बंदरात पोर्तुगीज जहाजांवर जो हल्ला झाला, त्याला जबाबदार असलेल्या अधिकाऱ्याना शिक्षा करण्याची विनंती शिवाजी राजे याना करण्यात आली आहे.

श्रीनिवास माधवराव या अधिकाऱ्याचा उल्लेख मराठी कागदपत्रातही आढळत नाही. व्हिसेरेइ आपल्या पत्रात ज्या अर्थी म्हणतो की काही जिल्ह्यांचा कारभार त्याच्याकडे सोपविण्यात आला आहे, त्याअर्थी त्याचा हुद्दा मोठा असला पाहिजे.

कान्होजी आंग्रे यांच्या आरमारातील काही लोकांना पोर्तुगीज नाविक अधिकाऱ्यांनी कैद केले होते. सिंधुदुर्गचे सुभेदार बुरानजी मोहिते यांनी गोव्याच्या व्हिसेरेइकडे रदबदली करून त्यांची मुक्तता केली. त्याबद्दल बुरानजी मोहिते यानी व्हिसेरेइला पत्र पाठवून त्याचे आभार मानले असता व्हिसेरेइने त्याना उत्तर पाठवून त्यांच्या पत्राची दखल घेतली.

रामचंद्रपंत आमात्य यानी व्हिसेरेइला पत्र पाठवून कळविले होते की, आपल्या दरबारात पोर्तुगीज राजदूत नाही म्हणून छत्रपती शिवाजी राजे याना विषाद वाटतो. व्हिसेरेइ रामचंद्रपंत आमात्य यांना दि. ३० डिसेंबर १७०४ रोजी पाठविलेल्या उत्तरात शीण काढतो की, त्याचे गोव्यात व्हिसेरेइ म्हणून आगमन झाले, तेव्हा बहुतेक राजेरजवाड्यांनी पत्रे पाठवून त्याचे स्वागत केले होते. परंतु त्या पत्रात शिवाजी राजे यांचे अभिनंदनपर पत्र नव्हते. राजदूताविषयी तो म्हणतो की, शिवाजी राजे आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये सलोखा नांदत असल्याचा सुगावा मोगल बादशहास लागू नये म्हणून शिवाजी राजे यांच्या दरबारात राजदूत न

पाठविण्याचा निष्काळजीपणा आपल्या हातून घडला असावा. ज्याप्रमाणे आपले अभिनंदन न करण्याचा निष्काळजीपणा शिवाजी राजे यांच्याकडून घडला त्याप्रमाणे पोर्तुगीजांनी आपला वकील शिवाजी राजे यांच्या दरबारात पाठविला नाही म्हणून बुरानजी मोहिते आणि कान्होजी आंग्रे या दोघानीही व्हिसेरेइला पत्रे पाठवून तक्रार गुदरविली होती. त्या दोघानाही व्हिसेरेइने वरच्यासारखेच उत्तर धाडले.

पोर्तुगीजांचा आणि मराठ्यांचा शांततेचा करार व्हावा अशी महाराणी ताराबाई व रामचंद्रपंत आमात्य यांची इच्छा होती. परंतु औरंगजेबाच्या भयामुळे पोर्तुगीजानी मराठ्यांशी शांततेचा करार केला नाही. एकदा तर मराठ्यांचे दोन दूत तहाच्या वाटाघाटी करण्यासाठी गोव्यास आले होते. पण व्हिसेरेइने त्याना मुलाखत न दिल्याने ते हात हलवित परत गेले. १७०७ साली औरंगजेबाचे निधन होईस्तोवर पोर्तुगीजांचे हे धोरण चालू राहिले.

अनुक्रमणिका

# १२. छत्रपती शाहू

दि. २० फेब्रुवारी १७०७ या दिवशी औरंगजेबाचे अहमदनगर येथे निधन झाले व सत्तावीस वर्षाचे मोगल—मराठा प्रदीर्घ युद्ध संपुष्टात आले.

औरंगजेबाच्या मृत्युनंतर त्याच्या मुलांमध्ये गादीसाठी यादवीयुद्ध सुरू झाले. त्यात बहादुरशहाचा विजय झाल्याने तो गादीवर आला. त्याने महाराणी ताराबाई यांच्या मोगलविरोधी आक्रमक चढाईला आळा घालण्यासाठी व मराठ्यांमध्ये यादवीयुद्ध सुरू व्हावे म्हणून आपल्या बापाचा ज्येष्ठ आणि अनुभवी सरदार झुल्फिकार खान याच्या सल्ल्याने शाहूची मुक्तता करून त्याला दक्षिणेत धाडले.

बहादुरशहा व झुल्फिकार खान या दोघांचा डाव यशस्वी झाला. त्यांच्या अंदाजाप्रमाणे मराठ्यांमध्ये दुही माजली. शाहू मोगलांच्या कैदेतून मुक्त होऊन मराठ्यांचे तख्त काबीज करण्यासाठी दक्षिणेत येत असल्याची बातमी महाराष्ट्रात पसरताच बाळाजी विश्वनाथ, खंडो बल्लाळ चिटणीस वगैरे मुत्सद्दी शाहूच्या पक्षास जाऊन मिळाले. महाराणी ताराबाई यानी शाहूस विरोध करण्यासाठी सेनापती धनाजी जाधव व परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी या दोघाना सैन्य देऊन धाडले. धनाजी जाधवांना शाहूविषयी आधीच जिव्हाळा वाटत होता. त्यातच बाळाजी विश्वनाथ आणि खंडो बल्लाळ चिटणीस या दोघानी त्याला शाहूच्या पक्षात आणण्यात यश संपादन केले. धनाजी जाधव आपल्या सैन्यासह शाहूच्या पक्षास येऊन मिळाला. तरीही ताराबाईंशी एकनिष्ठ असलेल्या सरदारानी शाहूशी लढाई देण्याचे ठरविले. त्यांचे नेतृत्व परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी करीत होता.

दि. १२ अक्टोबर १७०७ या दिवशी ही लढाई खेड येथे होऊन तीत शाहूच्या सैन्याचा विजय झाला.

शाहू साताऱ्यास येताच महाराणी ताराबाई यानी पन्हाळ्याकडे कुच केले. तेथेच त्यानी आपली नवी राजधानी सुरू केली.

शाहूने दि. १२ जानेवारी १७०८ या दिवशी सातारच्या किल्ल्यावर राज्याभिषेक करून घेऊन आपण मराठ्यांचा राजा झाल्याची सर्वत्र द्वाही फिरविली. गोव्याच्या व्हिसेरेइलाही त्याने आपण सत्तेवर आल्याचे अधिकृतपणे कळविले; परंतु शाहूचे हार्दिक अभिनंदन करण्याच्या बाबतीत त्याने कोणतीच हालचाल केली नाही.

इ. स. १७०८ साली शाहूने कोकणातील रांगणा किल्ल्यास गादीवर आल्यावर भेट दिली. त्या प्रसंगी आजूबाजूच्या परिसरातील पुष्कळ लोक त्याला भेटावयास आले. परंतु त्यात गोव्याच्या व्हिसेरेइचा प्रतिनिधी नव्हता. ते छत्रपती शाहूस खटकल्याने बाळाजी महादेव या नावाचा एक दूत पत्र देऊन त्याने गोव्यास रवाना केला.

आपल्या पत्रात छत्रपती शाहू महाराजानी म्हटले होते :

अनुक्रमणिका

'मी सैन्यासह कोकणात आल्याची बातमी तुम्हाला कळूनही तुम्ही माझ्या स्वागतासाठी तुमचा प्रतिनिधी माझ्याकडे पाठविला नाही. तुमचे हे कृत्य मराठे आणि पोर्तुगीज यांच्यामधील स्नेहाच्या संबंधाच्या विरुद्ध आहे.'

व्हिसेरेइ दों रुद्रिगु द कॉश्त व शाहू महाराजांचा दूत बाळाजी महादेव या दोघांची मुलाखत झाली, तेव्हा व्हिसेरेइच्या विनंतीवरून बाळाजी महादेव याने शाहू महाराजांच्या मागण्या व्हिसेरेइला लेखी सादर केल्या. त्या अशा होत्या :

१. मोगल बादशहाचे कोकण प्रांतावर अधिपत्य होते, तेव्हा कोकणचे सुभेदार आणि गोव्याचा व्हिसेरेइ यांची चांगली मैत्री होती. यापुढे कोकणचा कारभार चालविण्यासाठी शाहू महाराजांचे जे अधिकारी कोकणात येतील त्यांच्याशी व्हिसेरेइने पूर्वीसारखेच मैत्रीचे संबंध ठेवावे.

२. छत्रपती शिवाजी महाराज आणि पोर्तुगीज यांची चांगली मैत्री होती. या मैत्रीमुळे उभय पक्षांमधील व्यापार वृद्धीस चांगली चालना मिळाली. शाहू महाराजांशी पोर्तुगीजानी मैत्री ठेवून उभय पक्षांमध्ये व्यापार वृद्धी होईल ते करावे.

३. मोगल बादशहाने कोकणप्रांत शाहू महाराजाना जहागीर म्हणून दिला आहे. या प्रांतातील बांदे, पेडणे, साखळी, मणेरी आणि साखळी हे महाल खेमसावंत भोसले यानी, तर फोंडे आणि पंचमहाल हे दोन प्रांत सोंधेच्या राजाने बळकावले आहेत. या दोघांविरुद्ध कारवाई करण्यासाठी शाहू महाराजांचा एक सरदार सैन्य घेऊन येणार आहे. त्याला पोर्तुगीजानी दारूगोळा, दाणागोटा आणि इतर आवश्यक वस्तूंचा पुरवठा करावा.

४. डिचोली महालात पूर्वी खोर्जुवे आणि पानेली या दोन्ही बेटांचा अंतर्भाव होत होता. पोर्तुगीजानी ही दोन्ही बेटे वाडीकर सावंताकडून घेतली. तरी ती त्यानी शाहू महाराजाना परत करावी.

५. शाहू महाराजांच्या खासगी उपयोगासाठी व त्यांच्या लष्करासाठी, कापड, मखमल व चिनी रेशमी कापड खरेदी करायचे आहे. हे कापड गोव्यातून नेण्यासाठी परवानगी देण्यात यावी.

व्हिसेरेइ दों रुद्रिगू द कॉश्त याने शाहू महाराजांच्या मागण्याचा विचार करण्यासाठी राज्यसल्लागार मंडळाची बैठक बोलाविली.

सल्लागार मंडळाच्या बहुतेक सर्व सदस्यानी खोर्जुवे व पानेली ह्या दोन्ही बेटासंबंधीचे कलम वगळता शाहू महाराजांच्या इतर सर्व मागण्या मान्य कराव्या असा सल्ला व्हिसेरेइला दिला.

शाहू महाराजांच्या वरील मागण्याबाबत व्हिसेरेईने काय कारवाई केली त्याची माहिती पोर्तुगीज कागदपत्रात आढळत नाही. मात्र खोर्जुवे आणि पानेली ही दोन्ही बेटे शाहू महाराजाना परत करण्यास पोर्तुगीजानी नकार दर्शविल्याने शाहू महाराज आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये मैत्रीचे संबंध प्रस्थापित होऊ शकले नाहीत. उलट त्या दोन्ही बेटांवरून उभय पक्षांमध्ये तेढ निर्माण झाली.

अनुक्रमणिका

छत्रपती शाहू महाराज मोगलांच्या कारावासातून सुटून १७०७ साली महाराष्ट्रात आले तेव्हा बहुतेक सर्व मराठा सरदार त्यांच्या पक्षास जाऊन मिळाले. पण त्यांच्यात कान्होजी आंग्रे नव्हते. ते महाराणी ताराबाई यांच्याशी एकनिष्ठ राहिले. त्यांच्या प्रमाणेच वाडीकर सावंत आणि सोंधेचा राजा हे दोघेही ताराबाईंच्या पक्षात होते. त्या दोघानी ताराबाईंचे लांगुलचालन करून आपला स्वार्थ साधला होता. खेमसावंताने इ. स. १७०८ साली ताराबाईंना निष्ठा व्यक्त करून कुडाळ, बांदे, डिचोली, पेडणे, मणेरी आणि साखळी हे महाल वतन म्हणून ताराबाईंकडून मिळविले.

शाहूमहाराजांचा जोर होताच पुढे सोंधेच्या राजाची महाराणी ताराबाई यांच्यावरील निष्ठा ढळून शाहूमहाराजांशी त्याने सख्य केले. त्या बदली छत्रपती शाहू महाराजांनी त्याला अंत्रुज आणि पंचमहाल हे दोन महाल सालीना पंचवीसहजार रुपये खंडणी देण्याच्या कराराने दिले.

कान्होजी आंग्रे यानी आपले आरमार भरभक्कम करून अरबी समुद्रात पोर्तुगीजांचा मुलाहिजा न बाळगता स्वतंत्रपणे वागण्यास प्रारंभ केल्याने पोर्तुगीजांचा आणि त्यांचा संघर्ष निर्माण होणे स्वाभाविक होते. त्याची परिणती अखेर पोर्तुगीज–आंग्रे युद्धात झाली. या युद्धाचा अहवाल गोव्याहून पोर्तुगालच्या राजाकडे जात होता. दि. २४ ऑक्टोबर १७०९ रोजी पोर्तुगालच्या राजाने व्हिसेरेइला सूचना केली की, आंग्यांना पिटल्याखेरीज त्यांच्याशी तहाचा करार करू नये. परंतु सातासमुद्रापलिकडे राहाणाऱ्या पोर्तुगालच्या राजाला आंग्र्यांच्या सामर्थ्याची कल्पना नव्हती. ती कल्पना त्याला व्हिसेरेइने दि. २७ डिसेंबर १७१२ रोजी पाठविलेल्या पत्रातून करून दिली. व्हिसेरेइ प्रस्तुतच्या पत्रात म्हणतो :

'आंग्र्यांनी सांप्रत उत्तर समुद्र किनाऱ्यावर लुटालुटीची मोहीम सुरू केली आहे. त्याना ते शक्य झाले आहे, कारण त्याना त्यांच्या बंदराचा आश्रय मिळतो. केवळ हिंदुस्थानातील सत्तांशीच नव्हे, तर युरोपियन सत्तांशीदेखील त्यांच्या कुरापती चालू आहेत. त्यानी एवढे मोठे सामर्थ्य संपादन केले आहे की, सगळीकडे त्यानी दरारा निर्माण केला आहे.

'..........त्यांच्याशी युद्ध करून त्याना जर नेस्तनाबूद केले नाही तर ते काही दिवसानी सर्व राष्ट्रांना भारी होऊन राहिल्यावाचून राहाणार नाहीत. त्यांच्याशी तह करण्याचा विचार सोडून दिलेला बरा, असे माझे मत आहे.'

स. १७१३ साली जुना व्हिसेरेइ जाऊन नवीन व्हिसेरेइ आला. हिंदुस्थानातील राजकीय घडामोडींचा आढावा घेऊन त्याने जे पत्र आपल्या राजास लिहिले त्यात आंग्र्यांविषयी तो म्हणतो :

'..........गतसाली सबंध काफिल्याचा काफिला नष्ट होण्याचे दुर्दैव आमच्यावर ओढवले. यंदाचे वर्षी जुन्या संकटाची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून काळजी घेतली. काफिल्याच्या रक्षणासाठी दहा युद्धनौका त्याच्याबरोबर पाठविल्या. शत्रु आंग्रे गत सालाप्रमाणे यंदाही भक्षावर झडप घालण्यासाठी काफिल्याच्या मागावर होता. काफिला दृष्टिपथात येताच त्याच्या युद्धनौकानी काफिल्यावर हल्ला केला. आमच्या युद्धनौकानी या हल्ल्यास तोंड दिले. ही आरमारी लढाई सतत दोन दिवस चालू राहिली. तीत शत्रुचे पुष्कळ ठार आणि जखमी झाले. त्याने अखेर लढाईतून माघार घेतली.

अनुक्रमणिका

'गतसाली दों पेद्रु द कॉश्त यानी आपणाबरोबर काही हलक्या युद्धनौका घेतल्या असत्या तर त्यांच्यावर काफिला आणि त्यांचे कप्तानपद गमावण्याची पाळी आली नसती.

'सांप्रत आंग्रे हा आमचा सगळ्यात मोठा शत्रू आहे. तो धनवान, बलाढ्य आणि समृद्ध आहे. त्याने आतापर्यंत अनेक श्रीमंत सावजांची शिकार केली असल्याने त्याची मला भीती वाटते...'

पोर्तुगीजांना स्वसामर्थ्यांवर आंग्र्याचा पराभव करणे अशक्य झाल्याने त्यांना अखेर मोगल बादशाहाची कास धरावी लागली. आंग्र्याविरुद्ध बादशाहाला चिथावणी देण्यासाठी पाद्री झुजे द सिल्वा या नावाचा दूत व्हिसेरेइने मोठा नजराणा देऊन बादशहाकडे पाठविला. त्या दरम्यान आंग्र्याच्या युद्धनौकांकडून मोगल व्यापारी जहाजांवरही हल्ले होत होते. आंग्र्यानी बादशहाचीही कळ काढल्याचे तीन पोर्तुगीज पत्रावरून कळते. ही तिन्ही पत्रे अनुक्रमे दि. २९-४-१७१५ व दि. १५-५-१७१५ ह्या तारखांची आहेत. पहिल्या पत्रात म्हटले आहे की, सुरतेची दोन जहाजे आंग्र्यानी दमणनजीक पकडली. दुसऱ्या पत्रात व्हिसेरेइ सुरतेच्या पोर्तुगीज प्रतिनिधीस लिहितो की, 'आंग्र्यांच्या आक्रमणामुळे सुरतेचा व्यापार बंद पडत चालला आहे. बादशहाचे सरदार त्याच्या आज्ञेप्रमाणे वागत नाहीत. चालू हंगामात सुरतेहून 'स्ट्रेट' (मलाया जावा सुमात्रा)कडे व बंगालकडे जहाजे गेली नाहीत...आंग्र्याविरूद्ध लवकर इलाज केला नाही, तर परिस्थिती फार कठीण आहे. आपण ह्या प्रकरणात लक्ष घालावे.'

तिसऱ्या पत्रात म्हटले आहे की, 'ह्या चांच्याने बादशहाच्या प्रजाजनाना लुटण्याचे व त्यांचा छळ करण्याचे अजून सोडलेले नाही. त्याने सुरतेच्या बंदराचा पुरता नाश केला आहे.'

अखेर आंग्र्याचे पारिपत्य करण्यासाठी मोगल बादशहाने असगरअली खान या नावाच्या सरदाराची रवानगी केली. ही बातमी व्हिसेरेइला कळताच त्याला मोठा आनंद झाला. परंतु असगरअली खानाने आंग्र्याचे पारिपत्य केल्याची माहिती पोर्तुगीज कागदपत्रात आढळत नाही. उलट हा सरदार लांचलुचपतीला बळी तर पडणार नाही ना अशी शंका व्हिसेरेइने दि. ३० नवंबर १७१५ रोजी सुरत येथील पोर्तुगीज प्रतिनिधीला पाठविलेल्या पत्रात व्यक्त केली आहे. तो म्हणतो :

'लांचलुचपतीला बळी पडणे हे मानवी स्वभावाला अनुसरून आहे. त्यामुळे सरदार असगरअली खान हा आंग्र्याच्या लांचेस बळी पडणार नाही असे सांगता येत नाही. त्याच्यापाशी सोने विपूल आहे. त्याच्या बळावर तो मोगल सरदाराला वश करून घेऊन त्याला बादशहाचे हुकूम तहकूब करून ठेवावयास लावण्यास कमी करणार नाही.'

कान्होजी आंग्रे महाराणी ताराबाई यांच्याशी एकनिष्ठ राहिला होता. परंतु इ. स. १७१४ सालच्या ऑगष्ट महिन्यात पन्हाळा येथे महाराणी ताराबाई आणि त्यांचा पुत्र शिवाजी राजे याच्या विरूद्ध एक राजकीय कट शिजून त्या दोघांना पदभ्रष्ट करण्यात आले. या कटामागे छत्रपती शाहू आणि त्यांचा पेशवा बाळाजी विश्वनाथ या दोघांचा हात होता. त्यानी रामचंद्रपंत आमात्य याना फितवून राजारामाचा दुसरा पुत्र संभाजी याला कोल्हापूरच्या गादीवर आणले.

महाराणी ताराबाई व त्यांचा पुत्र शिवाजी यांच्या हातून सत्ता जाऊन त्यांच्यावर कारावासात जाण्याची पाळी आल्यावर कान्होजी आंग्रे यानी स्वतंत्रपणे वागण्यास प्रारंभ केला. ते छत्रपती शाहू

महाराजाचे अधिपत्य मानीत नव्हतेच; आता त्यानी कोल्हापूरच्या संभाजीचेही अधिपत्य झुगारून दिले. ते पोर्तुगीजांच्या पथ्यावर चांगलेच पडले. त्यानी छत्रपती संभाजीचे कारभारी रामचंद्रपंत आमात्य याना कान्होजी आंग्रे यांच्याविरूद्ध चिथावणी दिली. परंतु कान्होजीस वठणीवर आणण्याचे सामर्थ्य कोल्हापूरच्या छत्रपतीपाशी नसल्याने रामचंद्रपंत आमात्य कान्होजी आंग्रे यांच्या वाटेस जाण्यास धजले नाहीत.

पोर्तुगीज लोक कान्होजी आंग्रे यांच्याशी एकाकी लढत होते. त्याना दोस्त असा कुणीच नव्हता. मोगल बादशहाला आपल्या मदतीस आणण्याचा त्यांचा प्रयत्नही बादशहाच्या सरदारांच्या कचखाऊ आणि लांचखाऊ वृत्तीमुळे अयशस्वी झाला होता. आता त्यांच्यासमोर फक्त एकच पर्याय उरला होता अन् तो म्हणजे इंग्रजांशी आंग्र्याविरुद्ध दोस्ती करण्याचा. तो त्यांचा प्रयत्न सफल झाला.

पोर्तुगीजांप्रमाणे इंग्रजांचेही शत्रूत्व कान्होजी आंग्रे यानी संपादन केले होते. त्यानी त्यांच्या अनेक जहाजावर हल्ले करून ती लुटली होती. त्यामुळे इंग्रज त्यांच्यावर चिडून गेले होते व त्याना धडा शिकविण्याच्या संधीची ते वाट पहात होते.

इ. स. १७१८ सालच्या डिसेंबर महिन्यात मुंबईचा गव्हर्नर काही युद्धनौका आणि सैन्य घेऊन आंग्र्याविरुद्धच्या मोहिमेवर मुंबईहून निघाला. त्याने आंग्र्यांच्या ताब्यात असलेल्या अंदेरी-चंदेरी बेटावर सैन्य उतरविले. इंग्रजाना आंग्र्याकडून कोणताच प्रतिकार झाला नाही; इतकेच नव्हे तर त्या बेटावरील किल्ल्याचा मुख्य दरवाजाही जाळून टाकण्यात ते यशस्वी झाले. त्याना वाटले की, ज्या अर्थी आपणाला कुणाकडूनच प्रतिकार झाला नाही, त्या अर्थी किल्ल्यात शिबंदी नसावी. म्हणून ते बेधडकपणे आत शिरले. त्याबरोबर त्यांच्यावर बंदुकीच्या गोळ्यांचा एकच पाऊस पडला.

किल्ल्यात फक्त साठ शिपायांची शिबंदी होती. इंग्रज लोक मोठ्या संख्येने बेटावर उतरले तेव्हा आपण त्यांचा प्रतिकार केला तर ते आपणास कापून काढतील हे लक्षात घेऊन शिबंदीचे लोक किल्ल्यात दबा धरून बसले होते. इंग्रजानी आत प्रवेश करताच त्यांच्यावर अचानकपणे बंदुकीच्या फैरी झाडून त्याना जास्तीत जास्त ठार करण्याचा त्यानी बेत केला होता. त्यांचा तो बेत यशस्वी झाला. आंग्र्यांच्या सैन्याकडून हल्ला होताच इंग्रजानी किल्ल्यातून काढता पाय घेतला. ते आपल्या नौकांवर चढले व त्यानी आपला मोहरा कुलाब्याकडे वळविला. परंतु कुलाब्यात सैन्य उतरविण्याचे धाडस त्याना झाले नाही. कुलाब्यावर तोफांचे काही गोळे टाकून ते मुंबईला परतले.

पोर्तुगीज आणि इंग्रज या दोघाना आता पूर्णपणे पटले होते की आंग्र्यांचा पराभव आपण संयुक्त फळी उभारल्याखेरीज करू शकणार नाही. त्यांच्या ह्या फळीने इ. स. १७२१ च्या ऑगष्ट महिन्यात मूर्त स्वरूप धारण केले. ह्या संदर्भात दि. २१ ऑगष्ट १७२१ रोजी त्यांच्यामध्ये पुढील करार झाला :

१. इंग्लंड आणि पोर्तुगाल ह्या दोन्ही राष्ट्रानी आशिया खंडातील मोगल, पर्शिया अरेबिया आणि चीन ही राष्ट्रे वगळता आशिया खंडातील इतर सर्व राष्ट्रांविरूद्ध बचावात्मक आणि आक्रमक अशी एक फळी उभारावी. त्यानी आंग्र्यांचा नाश होईस्तोवर त्याच्याशी युद्ध करावे. त्यानी तहाची मागणी केली तरी देखील तह करू नये.

अनुक्रमणिका

२. कुलाब्याचा किल्ला व त्याच्या आजूबाजूचा मुलुख पोर्तुगीजाना मिळावा. कुलाब्याला जर इंग्रज प्रजाजनांची राहाण्याची इच्छा असेल तर त्यांच्यासाठी एक घर असावे. घेरियाचा किल्ला व त्याच्या आजूबाजूचा प्रदेश इंग्रजाना मिळावा. पोर्तुगीज प्रजाजनांची जर तिकडे रहाण्याची इच्छा असेल तर त्यांच्यासाठी एक घर असावे.

३. इंग्रजाना जर घेरियाचा किल्ला पाडून टाकायचा असेल तर त्याना उभयतांच्या संमतीने तसे करता येईल. किल्ला पाडण्यात आला, तर तिथला दारूगोळा आणि तोफखाना उभय देशानी विभागून घ्यावा.

४. कुलाब्याचा किल्ला पाडून टाकण्यात आला तर त्यातील निम्मे सामान आणि खांदेरी बेट इंग्रजाना मिळावे.

उपरिनिर्दिष्ट करारान्वये उभयदेशांची आरमारे सज्ज होऊन कुलाब्याकडे निघाली. पोर्तुगीज आरमाराचे नेतृत्व व्हिसेरेइ फ्रान्सिश्कु झुजे द सांपायु इ काश्त्रु हा स्वतः करीत होता.

दि. २४ जानेवारी १७२२ रोजी व्हिसेरेइ फ्रान्सिश्कु झुजे सांपायु इ काश्त्रु याने आंग्र्यांविरुद्धच्या मोहिमेचा बोजवारा कसा उडाला त्याचा सविस्तर वृत्तांत जो पोर्तुगालच्या राजास सादर केला त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे आहे :

'दि. २२ नवंबर १७२१ रोजी पोर्तुगीज आरमार गोव्याहून उत्तरेकडे निघाले. दि. १ डिसेंबर रोजी त्याने कुलाब्याच्या बाहेर नांगर टाकले. २ डिसेंबरला इंग्रज आरमाराचे आगमन झाले. त्याच दिवशी व्हिसेरेइच्या ध्वजनौकेवर पोर्तुगीज आणि इंग्रज अधिकाऱ्यांची बैठक होऊन कुलाबा बंदरात सैन्य उतरविण्याची योजना आखण्यात आली. या मोहिमेत भाग घेण्यासाठी इंग्रजानी इंग्लंडहून चार 'फ्रिगेटस' खास मागविली होती.

दि. १६ डिसेंबरला सैन्य उतरविण्यास प्रारंभ झाला. दि. १८ डिसेंबरला या सैन्याने कुलाब्याच्या दिशेने चाल केली. ३० डिसेंबर रोजी बातमी आली की, शत्रुचे सर्व घोडदळ आणि पायदळ अलिबागच्या रोखे चाल करून येत आहे. त्याच दिवशी आणखी बातमी आली की, शत्रुला सहा हजार घोडदळाची कुमक येत आहे.

दुसऱ्या दिवशी उभय फौजांमध्ये तोफांचे द्वंद्वयुद्ध सुरू झाले. त्याच दिवशी शत्रुकडून निरोप आला की, आंग्र्यांना आलेली कुमक शाहूराजे यांचे पंतप्रधान आणि सेनापती बाजीराव यांची असून ते स्वतः त्या सैन्याचे नेतृत्व करीत आहेत. कान्होजी आंग्रे यानी शाहू राजे यांचे मांडलिकत्व पत्करल्याने त्यानी बाजीराव याना आंग्र्यांच्या कुमकेस धाडले आहे.

परिस्थिती मोठी कठीण होती. आंग्र्यांचे बळ पुष्कळच वाढले होते. त्यांच्याशी लढाई देणे म्हणजे जुगार होता. कारण, शाहू राजे यांच्या सैन्याशी लढणे म्हणजे सबंध हिंदुस्थानला लढाईचे आव्हान देण्यासारखे होते. व्हिसेरेइ कौंट द आल्व्होर यांच्या कारकीर्दीत याच शाहूराजांच्या पित्याने (संभाजी महाराजानी) एकेच वेळी गोवा बेट, साष्टी आणि बार्देशवर प्रचंड घोडदळानिशी हल्ले चढविले होते.'

अनुक्रमणिका

कान्होजी आंग्रे यानी इंग्रज आणि पोर्तुगीज यांची जरी कुरापत काढली असली तरी ते आपणावर संयुक्तपणे हल्ला करतील याची त्याना कल्पना नव्हती. त्यांच्या स्वारीचा सुगावा त्याना लागला तेव्हा त्यांच्याशी आपण एकटा लढू शकणार नाही याची जाणीव झाल्याने त्यानी छत्रपती शाहू महाराज यांच्याशी मदतीची याचना केली होती. त्या बदली त्यानी शाहू महाराजांचे स्वामीत्व पत्करण्याची तयारी दर्शविली होती. शाहू महाराजानी कान्होजी आंग्रे याची कठीण परिस्थिती लक्षात घेऊन बाजीराव पेशवे याना त्यांच्या मदतीस धाडले होते.

बाजीराव सैन्य घेऊन कान्होजीच्या मदतीस आल्याचे कळताच व्हिसेरेइचे अवसान गळाले. तो आजारी पडला अथवा आजारीपणाचे त्याने ढोंग केले. आपली ध्वजनौका युद्धक्षेत्रातून बाहेर काढून त्याने ती समुद्रात दूरवर नेऊन उभी केली. बाजीरावाने त्याला निरोप धाडला की, मी आंग्र्याच्या मदतीला सैन्य घेऊन आलो आहे तरी माझ्याशी तह करून इकडून निघून जा.

बाजीरावाशी युद्ध करून आपण विजय संपादन करू शकणार नाही याची जाणीव झाल्याने व्हिसेरेइने तहाचा प्रस्ताव मान्य करून युद्धातून अंग काढून घेतले. हे जेव्हा इंग्रजाना कळले, तेव्हा त्यानी व्हिसेरेइचा निषेध केला. युद्ध चालू ठेवले तर ते आपण निश्चित जिंकू हे त्यानी व्हिसेरेइला पटवून देण्याचा प्रयत्न केला. परंतु व्हिसेरेइचा आत्मविश्वास डळमळला होता. बाजीरावाशी तह करण्याचा आपला निर्णय त्याने बदलला नाही.

तहाच्या वाटाघाटी चालू असता इंग्रज रागारागाने आपले आरमार घेऊन मुंबईहून निघून गेले. त्यांच्या मागोमाग व्हिसेरेइही आरमार घेऊन गोव्यास माघारा परतला.

बाजीराव आणि व्हिसेरेइ यांच्यामध्ये जो तह झाला त्याची कलमे पुढीलप्रमाणे होती :

१. मराठ्यानी पोर्तुगालच्या राजाचा मुलुख व त्यांच्या नौका यांवर खंडणी आकारू नये. हेच कलम मराठ्यांच्या बाबतीत पोर्तुगीजानाही लागू असावे.

२. मराठे अथवा पोर्तुगीज ह्या दोघाना समुद्रावर अथवा जमिनीवर एकमेकांची मदत जर हवी असेल, तर ती त्यानी एकमेकाना द्यावी. मात्र ह्या राज्याचा ज्या देशाशी शांततेचा करार असेल त्या राज्याच्या बाबतीत हे कलम अमलात येऊ नये. हीच गोष्ट मराठ्यांच्या बाबतीतही असेल. म्हणजे मराठ्यांचा ज्या शत्रूशी पोर्तुगीजांचा तह असेल, त्या देशाविरूद्ध पोर्तुगीज मराठ्याना मदत करणार नाही.

३. पोर्तुगीज बंदरात मराठे जो महसूल वसूल करतील त्याच्यावर पोर्तुगीज सरकारने प्रत्यक्ष कर आकारू नये. त्याचप्रमाणे महाराज छत्रपती यांच्या बंदरात पोर्तुगीज जो महसूल वसूल करतील त्याच्यावर छत्रपतीच्या सरकारने प्रत्यक्ष कर आकारू नये.

४. मराठ्यांच्या शत्रूच्या जहाजाना पोर्तुगीज आरमाराधिकाऱ्यांकडून संरक्षण मिळते. ते मराठ्यांच्या हितसंबंधाना बाधक असल्याने यापुढे नामदार व्हिसेरेइ यानी मराठ्यांच्या शत्रूच्या नौकाना संरक्षण न देण्याची ताकीद पोर्तुगीज आरमाराधिकाऱ्याना करावी.

अनुक्रमणिका

५. ज्या अर्थी हा शांततेचा करार उभयपक्षामध्ये झालेला आहे, त्या अर्थी उभयपक्षानी परस्परांशी व्यापार अनिर्बंधपणे करावा. दोन्ही राज्यांच्या जहाजाना एकमेकांच्या बंदरात जाऊन व्यापाराची देवाण घेवाण करता येईल. व्यापारामध्ये दारूगोळा, तोफा, औषधे वगैरे गोष्टींचा अंतर्भाव असावा. ह्या वस्तूंची उभयपक्षानी योग्य ती किमत घ्यावी.

६. या राज्यांतील व्यापाऱ्याना आपल्या नौका त्याना हव्या त्या बंदरात व्यापार देऊन पाठविता येतील. परंतु ज्या बंदरांशी ह्या राज्याचा संबंध नसेल, त्या बंदराशी त्याना व्यापार करता येणार नाही.

७. मराठ्यानी पोर्तुगीजांची जहाजे पकडली, तर ती सोडून द्यावी. त्याचप्रमाणे पोर्तुगीजानीही मराठ्यांची जहाजे पकडली असल्यास ती सोडून द्यावी.

८. ज्या अर्थी कुलाब्याच्या युद्धनौका मोहिमेवर निघाल्या आहेत, त्या अर्थी त्यांच्याकडून पोर्तुगीज जहाजे पकडली जाण्याची शक्यता निश्चितच आहे. त्यानी पोर्तुगीज जहाजे पकडली असल्यास त्यांच्यावरील मालासह ती मराठ्यानी सोडून द्यावी.

९. ह्या तहाची कलमे पाळण्याचे बंधन नामदार व्हिसेरेइ व पंडित प्रधान बाजीराव या दोघांवर आहे. जी कलमे ज्या पक्षाला लागू आहेत त्यांचे पालन त्यानी काटेकोरपणे केले पाहिजे.

कुलाब्याच्या मोहिमेचा पुरता फज्जा उडाला. परंतु पडला तरी नाक वरच ह्या म्हणीप्रमाणे व्हिसेरेइने आपल्या पराभवाचे समर्थन करण्याकरिता युक्तीवाद लढविला की तह आपण बाजीरावाशी केला आहे, आंग्र्याशी नव्हे. आंग्र्याशी पोर्तुगीजांचे युद्ध चालूच आहे. परंतु ह्या युक्तिवादाने पोर्तुगीजाचा पराभव झाकला गेला नाही.

वरील तह दि. ९ जानेवारी १७२२ रोजी पार पडला. इंग्रजानी पोर्तुगीजांचे दोस्त या नात्याने तहाला मान्यता दर्शविली, परंतु तहावर सही मात्र केली नाही. या तहाची एक मराठी प्रतही उपलब्ध आहे. परंतु तिच्यावर हा करार दि. १२ जानेवारी १७२२ या दिवशी चौल जिल्ह्यातील वार्सोळी गावी पार पडला असे म्हटले आहे. बहुदा प्रस्तुत कराराचे मराठी भाषांतर १२ जानेवारीस होऊन त्याच्यावर पोर्तुगीज आणि मराठे यांच्या प्रतिनिधीनी सह्या केल्या असाव्या. मराठ्यांच्या वतीने महादजी कृष्ण व पोर्तुगीजांचे वतीने त्यांचा ठाणे जिल्ह्यातील फौजांचा सेनापती आंतोनियु कार्दिम फ्रॉइश यानी करारावर सह्या केल्या.

वरील तह झाल्यावर पोर्तुगीज आणि मराठे यांच्यामधला व्यापार खुला झाला. तत्संबंधी व्हिसरेइने पुढील प्रकटन जाहीर केले :

'कान्होजी आंग्रे आणि हे राज्य यांच्यामध्ये युद्ध सुरू झाल्यावर दोन्ही बाजूचे संबंध तुटले व व्यापार बंद पडला. मी कान्होजी आंग्रे यांच्याविरूद्ध लष्करी कारवाई केली असता शाहूराजे यानी या युद्धात कान्होजी आंग्रे यांचा स्वामी या नात्याने कान्होजी याना मदत करण्यासाठी युद्धात प्रवेश केला. आपला प्रधान आणि सेनापती बाजीराव याना मोठे सैन्य देऊन त्यांनी पाठविले. बाजीराव याना आमच्याशी तह करण्याचे अधिकार त्यानी दिले होते. त्याचे कारण हे की, त्यांचे आजोबा शिवाजी राजे यांचे आमच्याशी मैत्रीचे संबंध होते. ते पुढे चालू राहावे अशी त्यांची इच्छा होती. दुसरी गोष्ट म्हणजे कान्होजी आंग्रे यानी

त्यांचे स्वामीत्व पत्करले असल्याने हे राज्य आणि बाजीराव यांच्यात तह झाला त्यात कान्होजी आंग्रे यांचाही अंतर्भाव झाला.

'या तहास अनुसरून मी या राज्याच्या प्रजाजनाना शाहू राजे यांच्या बंदरात व्यापार करण्याची परवानगी देत आहे. शाहू राजे व कान्होजी आंग्रे या दोघांच्याही प्रजाजनाना आमच्या राज्याच्या बंदरात व्यापार करता येईल.

'युद्धापूर्वी उभय राज्यातील लोकांना एकमेकांच्या राज्यात जाण्यायेण्याची मुभा होता. ती मुभा आता परत देण्याची आज्ञा मी आमच्या उत्तरेकडील प्रदेशाच्या ठाणेदाराना देत आहे. असाच हुकूम मी उत्तरेकडच्या सेनापतीस आणि युद्धनौकांच्या कॅप्टनना करीत आहे. त्याना मी सूचना देत आहे की, कान्होजी आंग्रे व शाहू राजे यांच्या व्यापारी अथवा युद्धनौका आमच्या बंदरात आल्या तर त्यांच्याशी मैत्रीने वागावे.'

वरील जाहीरनामा सर्वत्र दवंडी पिटून जाहीर करण्यात यावा व त्याच्या प्रती नगरपालिकांच्या व श्रवणगृहांच्या (auditorios) भिंतींवर चिकटविण्यात याव्यात, असे वरील प्रकटणात म्हटले आहे.

वरील प्रकटण व्हिसेरेइने आपल्या ध्वजनौकेवरून दि. १४ जानेवारी १७२२ या दिवशी काढले.

पोर्तुगीज–आंग्लो–आंग्रे युद्धाचा अहवाल व्हिसेरेइने पोर्तुगालच्या राजाकडे दि. २४ जानेवारी १७२२ रोजी पाठविला. युद्धशास्त्राच्या दृष्टीने हा तपशीलवार वृत्तांत अत्यंत महत्त्वाचा आहे. परंतु विस्तार भयास्तव तो येथे देण्यात येत नाही. परंतु त्याचा मुख्य आशय असा की, शाहू राजे यानी बाजीराव याना मोठे सैन्य देऊन आंग्र्याच्या मदतीस पाठविल्याने नाईलाज म्हणून पोर्तुगीजाना बाजीराव यांच्याशी तह करावा लागला.

व्हिसेरेइ आपल्या राजास लिहिलेल्या पत्रात म्हणतो की, 'इंग्रजानी तहात कोलदांडा घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. आणि आम्ही आपला सल्ला मानीत नाही असे पाहून तह आपणास फायदेशीर व्हावा म्हणूनही युक्त्या लढविल्या. त्यांचा असा दावा होता की, आंग्र्याकडून आपली फार हानी झाली. ती भरून निघाली पाहिजे. परंतु मी त्याना बधलो नाही.'

पोर्तुगीज आणि मराठे यांच्यामध्ये तह होऊन उभयबाजूंचा व्यापार खुला झाला खरा, परंतु दोघांची चित्तशुद्धि न झाल्याने अढी कायम राहिली.

छत्रपती शाहू महाराज गादीवर आले, तेव्हा त्यानी व्हिसेरेइला कळविले होते की त्याने नजराणा देऊन एक पोर्तुगीज वकील आपल्या दरबारात पाठवावा. खरे तर ही मागणी नवीन नसून जुनीच होती. छत्रपती संभाजी महाराजानीही पोर्तुगीजांकडे ही मागणी केली होती. व त्यानी १६८४ साली जे शिष्टमंडळ तहाची बोलणी करण्यासाठी रायगडाला पाठविले होते त्याने नजराणा नेला नव्हता म्हणून त्याला माघारा पाठविले होते. शाहू महाराजानी तीच मागणी आता केली तेव्हा व्हिसेरेइ म्हणू लागला की, शाहू महाराज हे मोगल बादशहाचे मांडलिक असल्याने पोर्तुगालसारख्या स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्राने त्यांच्या दरबारात नजराणा देऊन वकील पाठविणे म्हणजे आपली प्रतिष्ठा कमी करून घेण्यासारखे आहे. हे जेव्हा छत्रपती

शाहू महाराजांच्या कानी गेले तेव्हा ते पोर्तुगीजांवर संतप्त झाले. त्यातच पोर्तुगीज मिशनरी हिंदूचे सक्तीने धर्मांतर करतात अशीही कागाळी त्यांच्याकडे गेली त्याबद्दल पोर्तुगीजांना धडा शिकविण्यासाठी सरदार पिलाजी जाधव व सरदार दावलजी सोमवंशी या दोघाना ठाणे जिल्ह्यातील पोर्तुगीज ठाण्यावर हल्ले करण्याचा त्यानी हुकूम केला.

परंतु सरदार पिलाजी जाधव यानी पोर्तुगीज प्रदेशावर अचानकपणे हल्ला केला नाही. आपणास वसईवर स्वारी करण्याचा हुकूम आपले स्वामी छत्रपती शाहू महाराज यांच्याकडून झाल्याचे त्यानी वसईच्या गव्हर्नरला कळविले. त्याने त्या पत्राचे उत्तर सरदार पिलाजी जाधव याना दि. २० नवंबर १७२३ रोजी पाठविले. त्यात तो म्हणतो :

'आपले वद्य चतुर्दशीला पाठविलेले पत्र माझ्या अवलोकनात आले. माझ्या स्वामीचा मुलुख जाळून बेचिराख करण्यासाठी म्हणून आपण आला आहात हे कळले. आपण माझ्या स्वामीच्या मुलुखावर हक्क सांगता. ह्या बाबतीत मी आपणास कळवू इच्छितो की, हा मुलुख माझ्या स्वामीचा असल्याने त्याचे रक्षण करणे हे माझे कर्तव्य आहे. मला राहून राहून एका गोष्टीचे आश्चर्य वाटते ते हे की, आपले स्वामी शाहू राजे यांच्याशी आमचे मैत्रीचे संबंध असता त्यानी तुम्हाला आमच्या प्रदेशावर स्वारी करण्यासाठी कसे पाठविले. माझी अशी समजूत आहे की, शाहू राजे यांनी तुम्हाला आमच्या प्रदेशात घुसण्यासाठी पाठविलेले नाही. माझी आपणाला विनंती आहे की, आपण आमच्या प्रदेशात सैन्य घुसवून कुणब्यांचे जीवन उद्‌वस्त करू नये.'

दि. २८ नवंबर १७२३ रोजी सरदार पिलाजी जाधव यानी वसईच्या गव्हर्नरच्या वरील पत्रास उत्तर पाठवून त्याला कळविले की, 'माझे स्वामी छत्रपती शाहू महाराज यानी मला वसईवर स्वारी करण्यासाठी पाठविले आहे. तरीही मी संयम करतो. तुम्ही तुमचा एकदा दूत वाटाघाटी करण्यासाठी आमच्याकडे पाठवावा.'

सरदार पिलाजी जाधव हे ज्येष्ठ आणि अनुभवी सरदार असल्याने त्यानी वसई प्रांतावर एकदम हल्ला केला नाही. छत्रपती शाहू महाराज यांच्या मागण्या पोर्तुगीजानी मान्य केल्यास वसईवर हल्ला न करता ते परत जाणार होते व म्हणून त्यानी वाटाघाटीसाठी एकादा दूत पाठविण्याची सूचना वसईच्या गव्हर्नरला केली होती. परंतु ती सूचना त्याने लक्षात घेतली नसल्याने सरदार पिलाजी जाधव याना वसईवर स्वारी करणे भाग पडले. त्यांच्यानंतर सरदार दावलजी सोमवंशी यांच्याही फौजा पोर्तुगीजांच्या अमलाखालच्या प्रदेशात घुसल्या.

वसई प्रांतात पोर्तुगीज सैन्य फार थोडे होते. मराठ्यांच्या घोडदळासमोर त्याचा निभाव न लागल्याने पोर्तुगीज लष्कराधिकाऱ्यानी नरमाईचे धोरण पत्करले. ते तह करण्यास राजी आहेत असे दिसताच सरदार पिलाजी जाधव व दावलजी सोमवंशी या दोघानी तहाचा पुढील प्रस्ताव मांडला :

१. पोर्तुगीजानी आपला एक दूत महाराजा छत्रपती व श्रीमंत बाजीराव प्रधान याना भेटण्यासाठी त्यांच्याकडे पाठवावा. तो छत्रपतीच्या दरबारातून परत येईस्तोवर आम्ही आपल्या प्रदेशात आक्रमण करणार नाही.

अनुक्रमणिका

२. आमच्या सरकारचे सामान भिवंडी आणि कल्याणहून पोर्तुगीज प्रदेशातून जाईल त्याला पोर्तुगीजानी अडथळा आणू नये व त्यावर कोणताच हक्क शाबीद करू नये.

३. आपल्या प्रदेशात शिरून आमच्या सैन्याने जी माणसे कैद केली आहेत व तोफा काबीज केल्या आहेत त्या मुक्त केल्या जातील.

४. कल्याण व भिवंडी बंदरांतील जी जहाजे वसई व मुंबई बंदरात व्यापारासाठी जातील त्यांच्या वाहतुकीच्या मार्गात अडथळा आणू नये.

५. भिवंडी आणि कल्याण येथील जी माणसे पोर्तुगीज प्रदेशात जातील त्याना वेठबिगारीला धरू नये.

६. उभय राज्यातील निग्रो गुलाम परस्परांच्या प्रदेशात पळून गेल्यास त्याना एकमेकांच्या राज्यात परत पाठवावे.

७. आमचा जो माल मुंबईला जाईल आणि तिकडून येईल त्याला अडथळा करू नये व त्यावर कर आकारू नये.

वरील कलमे पोर्तुगीजानी साताऱ्यास पाठवून ती छत्रपती महाराजांकडून मंजूर करून आणावी. तोपर्यंत त्यांच्या प्रदेशाला उपद्रव केला जाणार नाही.

वरील कलमे पोर्तुगीजाना १० जानेवारी १७२४ रोजी सादर करण्यात आली. गोव्याच्या व्हिसेरेइने वरील कलमे राज्य सल्लागार मंडळाच्या दि. १८ मार्च १७२४ रोजी भरलेल्या बैठकीसमोर मत अजमावणीसाठी ठेवली. त्यानी पुढील दृष्टिकोण व्यक्त केला :

'पोर्तुगीज वकील एका मांडलिक राजाकडे जाता कामा नये. तसे झाले तर पोर्तुगीज हिंदुस्थानला एका मांडलिक राजाचे मांडलिकत्व पत्करावे लागेल. शाहू राजे यांच्या सरदारांचा हेतु देखील हाच आहे. म्हणजे आमच्या उत्तरेकडील प्रदेशाने त्यांच्या अंकित राहाण्याचे. दुसरी गोष्ट आम्ही जर हे मांडलिकत्व पत्करले तर मोगल बादशहाशी आम्ही बेइमान ठरू.'

राज्य सल्लागार मंडळाने घेतलेल्या वरील ठरावामुळे पोर्तुगीज आणि मराठे यांच्यामधील युद्ध अटळ झाले.

अनुक्रमणिका

# १३. वसईचा पाडाव

गोव्याचे राज्य सल्लागार मंडळ एकीकडे व्हिसेरेइला छत्रपती शाहू महाराज यांच्याकडे नजराणा देऊन वकील पाठवू नये म्हणून सल्ला देत होते, तर दुसरीकडे बाजीराव पेशवे यांच्याकडे व्हिसेरेइ तहाचा संदर्भ लावीत होता. त्यावेळी बाजीरावाचा तळ औरंगाबादेस होता. व्हिसेरेइने पाठविलेल्या पत्रास बाजीरावाने दि. ४ नवंबर १७२४ रोजी पुढील उत्तर धाडले :

'आम्ही इकडे ईश कृपेने सुखरुप आहो. आपणाकडून सुवार्ता ऐकण्याची इच्छा करतो. आपण साबाजी परबु आणि पीर महमद या दोघांबरोबर पाठविलेले पत्र मिळाले. वाचून आनंद झाला. अशाच रीतीने वरचेवर पत्रे पाठवावी. आपण पत्रामध्ये तिकडील प्रदेशात शांतता प्रस्थापित करणे व परस्परांमध्ये सलोखा साधने या दोन गोष्टींवर भर दिला आहे. मी आपणाला आश्वासन देतो की, या बाबतीत आमच्यात आणि आपणात मतभेद नाही.

'नबाब निजाम उल्मुल्क यांच्या मदतीने आम्ही अमानत खानाचा पराभव करून औरंगाबादेस आलो. इकडून आम्ही महाराजांच्या दर्शनासाठी साताऱ्यास जाणार आहो. तिकडे आपण आपला वकील नजराणा देऊन पाठवावा. मी दरबारात असता आपल्या वकिलांचे साताऱ्यास आगमन झाले, तर दावलजी सोमवंशी, रुस्तुमराव समशेर बहादुर, सरदार पिलाजी जाधव व रामचंद्रपंत या तिघांशी आपला जो तह झाला आहे, त्याला मंजुरी देण्याची विनंती मी महाराजाना करीन. तिकडच्या प्रदेशात शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून मी शक्य ते करीन. तोपर्यंत आपण आपला वकील नजराणा देऊन साताऱ्यास ताबडतोब पाठवा.'

गोव्याचा व्हिसेरेइ आणि त्याचे सल्लागार मंडळ छत्रपती शाहू महाराज यांच्याकडे नजराणा देवून वकील पाठविण्यास तयार नव्हते, हे व्हिसेरेइने दि. १३ डिसेंबर १७२४ रोजी आपल्या राजास पाठविलेल्या पत्रावरून सिद्ध होते. सदर्हू पत्रात तो म्हणतो :

'मराठा सरदारानी उत्तरेकडून वसईमध्ये व दक्षिणेकडून गोव्यामध्ये सैन्य घुसविण्याची तयारी केली आहे. परंतु या स्वारीला तोंड देण्याची आमची तयारी नाही. उत्तरेकडील प्रदेशाच्या सेनापतीने मराठ्यांशी हंगामी तह केला होता. तो कायम करून घेण्यासाठी आम्ही शाहू राजे यांच्याकडे नजराणा देऊन वकील पाठवावा अशी मागणी आमच्याकडे मराठा सरदारानी केली होती. परंतु ती मान्य करणे आमच्या दृष्टीने लांच्छनास्पद असल्याने वकील पाठविण्यात आला नाही.'

पोर्तुगीजांच्या मनात छत्रपती शाहू महाराजांकडे नजराणा देऊन वकील पाठवायचा नाही, त्यांचे हे धोरण काळकाढूपणाचे आहे हे मराठ्यांच्या ध्यानी आल्यावाचून राहिले नाही. म्हणून त्यानी ठरलेल्या योजनेप्रमाणे ठाणे जिल्ह्याप्रमाणे गोव्याकडेही सैन्य धाडले. ती बातमी गोव्याच्या हंगामी गव्हर्नरला साष्टीच्या सेनापतीकडून कळताच त्याने त्याला दि. १७ डिसेंबर १७२४ रोजी पत्र धाडून पुढील सूचना केल्या :

'कुकळ्ळी आणि मडगाव येथील बालेकिल्ले आणि रासईचा किल्ला लढविण्याची तयारी करावी. परंतु सैन्य थोडे असल्याने उघड्या मैदानात लढाई देण्याचे टाळावे.

अनुक्रमणिका

'मडगावला ज्या दोन लष्करी तुकड्या आहेत, ज्या ज्या ठिकाणी सैन्याची आवश्यकता असेल तिकडे पाठवाव्या.

'सोंधेच्या राजाच्या सहाय्याने मराठ्यांना तोंड देण्याची आपली योजना व्यवहार्य वाटत नाही. एकतर सोंधेच्या राजाचे सैन्य थोडे आहे, आणि दुसरी गोष्ट म्हणजे त्याचा दर्जाही चांगला नाही.

'चर्चमधील चांदीच्या वस्तु आणि नागरिकांच्या मौल्यवान वस्तू गोळा करून त्या सुरक्षित ठिकाणी ठेवल्या असतीलच. सीमेवरील खेड्यात एकही ढोर ठेवू नये.'

पोर्तुगीजांनी छत्रपती शाहू महाराज यांच्याकडे वकील आणि नजराणा पाठविण्याचे कबूल करून सरदार पिलाजी जाधव, सरदार दावलजी सोमवंशी व रामचंद्रपंत चासकर या तिघांशी जो हंगामी तह केला होता तो पोर्तुगीजानी छत्रपती शाहू महाराज यांच्याकडून मंजुर करून आणावा म्हणून त्यांच्यावर दडपण आणण्यासाठी मराठी सरदारानी वसईच्या आणि गोव्याच्या सीमेवर सैन्याच्या हालचाली सुरू केल्या. गोव्याच्या व्हिसेरेइला पत्रे पाठवून त्याला सातार्‍यास वकील पाठविण्यासही त्यानी प्रवृत्त केले. परंतु व्हिसेरेइने मराठ्याना दाद दिली नाही. त्याने आपल्या हाताशी असलेल्या अपुर्‍या सैन्यासह आणि मर्यादित लष्करी सामग्रीसह मराठ्यांना तोंड देण्याची तयारी सुरू केली.

इ. स. १७३० च्या नवंबर महिन्यात व्हिसेरेइने मोगल दरबारातील पोर्तुगीज वकिलास पत्र पाठवून मराठ्याविरुद्ध मोगलांची मदत मिळविण्याबाबत प्रयत्न करण्याची सूचना केली. पोर्तुगीज वकिलाने तो प्रयत्न केला की काय तत्संबंधीची माहिती उपलब्ध नसली, तरी मोगलांकडून पोर्तुगीजाना मराठ्यांविरुद्ध मदत मिळाली नाही हे खरे. त्या दरम्यान मराठे आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये वसई प्रांतात चकमकी झडत होत्या. मराठ्यानी पोर्तुगीजांचा काही मुलुख काबीज केला होता. तरीही व्हिसेरेइ छत्रपती शाहू महाराज यांच्याकडे वकील पाठविण्यास तयार नव्हता.

दि. २४ मे १७३१ रोजी सरदार पिलाजी जाधव यानी पोर्तुगीजांची 'कांब' या नावाची तटबंदी हल्ला करून घेतली. या तटबंदीतील पोर्तुगीज सैन्याचे नैतिक धैर्य खचल्याने वसईच्या गव्हर्नरने मराठ्यांशी फिरून तहाचा संदर्भ लावला.

दि. २० ऑगष्ट १७३१ रोजी व्हिसेरेइने वसईच्या गव्हर्नरला कळविले की, तहाची कलमे आपणाला पसंत आहेत. पोर्तुगीज तह करण्यात तयार असल्याचे कळताच मराठा सरदारानी चढाई थांबविली, परंतु तहाच्या वाटाघाटीचा घोळ घालून काळकाढूपणा करण्याची पोर्तुगीजांची जुनी क्लृप्ति मराठा सरदारांच्या ध्यानी आली नाही. या क्लृप्तीचा अवलंब त्यानी अनेकदा केला होता आणि प्रत्येक वेळी मराठे फशी पडले होते. तहाचे आमिष दाखवून वेळ काढायचा आणि त्याचा उपयोग युद्धाची तयारी करण्यासाठी करायचा हे ते जुने तंत्र होते.

तह लांबणीवर पडताच मराठ्यानी पोर्तुगीज ठाण्यावर पुनः हल्ले चढविण्यास प्रारंभ केला. व्हिसेरेइचे मनोधर्य खचले. त्याने निराशेच्या भरात दि. १० जानेवारी १७३२ रोजी पोर्तुगालच्या राजास लिहिले :

‘...दैवी कृपेविना मराठ्यांच्या हल्ल्याना आम्ही यशस्वीपणे तोंड देऊ शकत नाही. मराठे इतके बलाढ्य आहेत की मोगल सैन्य देखील त्यांच्यासमोर पळ काढते. ते आमच्याशी तह करण्यास तयार आहेत. परंतु त्याच्या अटी पुढीलप्रमाणे आहेत :

‘आमच्या अमलाखालच्या प्रदेशात आम्ही त्याना मंदिरे बांधावयास परवानगी दिली पाहिजे.

‘राजा चौतिया आणि कोळी राजा यांना आम्ही कर भरतो तसा कर आम्ही त्याना भरला पाहिजे.

‘परंतु ह्या अटी आम्हाला मान्य नाहीत.’

शेवटी पोर्तुगीजांचे जुने दोस्त इंग्रज त्यांच्या मदतीला आले. मुंबईचा गव्हर्नर सर रॉबर्ट कोइव्हन याने पोर्तुगीज आणि मराठे या दोघांमध्ये तह घडवून आणण्यासाठी मध्यस्थीची इच्छा दर्शविली. ती दोन्ही पक्षाना मान्य झाली. हा तह एकूण सोळा कलमाचा असून त्याचा आराखडा फोर्ट, मुंबई येथे दि. १० जानेवारी १७३२ या दिवशी तयार करण्यात आला. मराठ्यांच्या वतीने त्याच्यावर शिवरामपंत व रायाजी नाईक या दोघानी तर पोर्तुगीजांचे वतीने वसईच्या दोघा लष्करी अधिकाऱ्यानी व इंग्रजांच्या वतीने मुंबईचा गव्हर्नर सर रॉबर्ट कोइव्हन यानी सह्या केल्या.

उपर्युक्त तहातील कलमे मराठ्यांच्या दृष्टीने फायद्याची नव्हती. मोगल व मराठे यांच्यामध्ये युद्ध पेटले होते. त्यामुळे दोन अथवा तीन आघाड्यांवर युद्ध चालू ठेवणे कठीण झाल्याने मराठ्यांना हा तह करावा लागला.

बाजीरावाच्या मनात वरील तहाचा भंग करून पोर्तुगीजांशी युद्ध सुरू करायचे होते. तदनुसार इ. स. १७३३ च्या मार्च महिन्यात साष्टीवर हल्ला करण्याचा बेत मुक्रर झाला होता. परंतु त्याचवेळी छत्रपती शाहू महाराज यानी बाजीरावास जिंजिऱ्याच्या सिद्दीचे पारिपत्य करावयास सांगितले.

मराठे आणि सिद्दी यांच्यामधले युद्ध इ. स. १७३६ च्या एप्रिलपर्यंत चालू राहिले. मराठे सिद्दीला नामोहरम करू शकले नाहीत. त्याचे प्रमुख कारण म्हणजे पोर्तुगीज आणि इंग्रज यांच्याकडून सिद्दीस होणारी मदत. व्हिसेरेइ कौंट द सांदोमिल हा दि. २५ जानेवारी १७३५ रोजी पोर्तुगालच्या राजास लिहिलेल्या पत्रात सिद्दी आणि मराठे यांच्यामधील युद्धाचा उल्लेख करून म्हणतो :

‘मी या युद्धात वरकरणी तटस्थता स्वीकारली होती. पण आतून सिद्दीस मदत करीत होतो. कारण, मराठ्यांसारखा बलाढ्य शेजारी इकडच्या बंदरांचा धनी झालेला मला नको होता. मराठ्यांपासून आमच्या हितसंबंधाना धोका पोहोचण्याची भीती होती.’

सिद्दीसारख्या छोट्या शत्रूला इंग्रज आणि पोर्तुगीज यानी मदत केल्याने त्याचा आपण पराभव करू शकलो नाही हे शल्य मराठ्यांच्या मनात सलत राहिले. आणि त्यातूनच फिरून पोर्तुगीज आणि मराठे यांच्यामधील युद्ध पेटले.

पोर्तुगीजानी आपल्या अंकित असलेल्या ठाणे जिल्ह्यातील प्रदेशात हिंदूचा छळ करून त्यांची मोठ्या प्रमाणात बाटाबाटी सुरू केल्याने मराठ्यानी वसईची मोहिम सुरू केली, असे मराठी साधनावरून वाटते. वसईच्या मोहिमेचे ते एक सबळ कारण होते, हे जरी खरे असले तरी, सिद्दीसारख्या सामान्य शत्रूला पोर्तुगीजांकडून मदत झाल्याने तो आपणावर कुरघोडी करतो, असे वाटल्याने पोर्तुगीजाना ठेचण्यासाठी म्हणून छत्रपती शाहू महाराज आणि त्यांचे पेशवे बाजीराव यानी तडकाफडकी वसईवर हल्ला करण्याचा निर्णय घेतला.

दि. ६ एप्रिल १७३७ रोजी मराठ्यांनी कळव्यानजीकच्या 'सां जेरोनिमु' नावाच्या जलदुर्गावर हल्ला करून ठाण्यात प्रवेश केला. दि. ७ एप्रिलला मराठ्यांचे सैन्य साष्टी बेटात सर्वत्र पसरले. पोर्तुगीजांच्या ताब्यात आता बांद्रे, वर्सोवा, उरण बेट आणि वसईचा किल्ला एवढीच काय ती ठाणी उरली.

मराठ्यानी साष्टी बेट घेताच पोर्तुगीजानी मुंबईकर इंग्रजाना मदतीचे आवाहन केले. व्हिसेरेइ कौंट द सांदोमिल याने दि. १२ एप्रिल १७३७ या दिवशी मुंबईच्या गव्हर्नरला लिहिले :

'माझी अशी धारणा आहे की, मराठ्यांचा शेजार मुंबई बेटाला चांगला नाही. त्यामुळे साष्टी बेटाचे रक्षण करण्यासाठी आपण आम्हाला मदत कराल अशी आशा आहे. माझी आपणाला विनंती आहे की, आमच्या उत्तरेकडील प्रांताच्या सेनापतीशी सल्लामसलत करून आवश्यक ती उपाय योजना करावी. निदान साष्टी बेटातील बंदराचे जरी तुम्ही रक्षण केले तरी मोठे काम होईल. कारण ही बंदरे जर तुमच्या हाती राहिली तर, आम्हाला तिकडे सैन्य आणि रसद धाडून शत्रूला हुसकून लावणे शक्य होईल.'

जेसुईट पाद्र्यानी ठाणे जिल्ह्यातील पोर्तुगीज अमलाखालच्या प्रदेशात सुरू केलेली धर्मांतराची मोहीम हे वसईच्या मोहिमेचे एक प्रमुख कारण होते हे वर आलेच आहे. यासंबंधी व्हिसेरेइ कौंट द सांदोमिल हा दि. १९ एप्रिल १७३७ रोजी इंक्विझिशनच्या कार्यकारी मंडळास लिहितो :

'साष्टी बेटाचे गव्हर्नर ज्युआंव द सौज फेरराज यांच्याकडून मला आलेल्या पत्राची नक्कल मी तुमच्याकडे धाडत आहे. ते म्हणतात की, साष्टी घेण्यासाठी तेथील हिंदूनी मराठ्याना सर्वतोपरी मदत केली. हे बेट मराठ्यांच्या हातचे जाऊ नये अशी त्यांची इच्छा आहे. ज्युआंव द सौज फेरराज यांच्या पत्रावरून 'सांतु ओफिसियु' (इंक्विझिशन) च्या ध्यानी येईलच की तिच्याकडून हिंदूचा जो छळ झाला ते हिंदूच्या बंडाचे प्रमुख कारण होते. या गोष्टीचा 'सांतु ओफिसियु' ने गंभीरपणे विचार केला पाहिजे. मला आशा वाटते की, सांतु ओफिसियुने हिंदूवरील निर्बंध उठविले तर ते साष्टी बेट परत घेण्यास आम्हाला मदत केल्यावाचून राहाणार नाहीत. मला असेही कळले आहे की, आमच्या उत्तरेकडील प्रांतातील सगळेच हिंदू सांतु ओफिसियुवर खवळले आहेत. मला असे वाटते की, उघडपणे जरी नसले तरी बंद घरांमध्ये हिंदूना त्यांचे धार्मिक विधी पार पाडण्यास परवानगी असावी. तसेच त्यांच्या हातून त्यांच्यावरील निर्बंधाचा भंग झाला तर त्या गुन्ह्याचा निवाडा सांतु ओफिसियुने न करता ते गुन्हे सरकारी न्यायालयाना सादर करावे.

'माझ्या पत्राचा विचार सांतु ओफिसियु दूरदृष्टीने करील अशी आशा बाळगतो.'

व्हिसेरेइचे वरील पत्र इंक्विझिशनच्या काळ्याकुट्ट इतिहासावर विदारक प्रकाश टाकते. परंतु त्या पत्राचा त्याने विचार केला नाही.

अनुक्रमणिका

त्या दरम्यान ठाणे जिल्ह्यातील मराठ्यांच्या स्वारीला कसे तोंड देता येईल त्याची चिंता पोर्तुगीज अधिकाऱ्याना पडली होती. ते मुंबईच्या इंग्रजांना मदत करण्याबद्दल वरचेवर पत्रे लिहीत होतेच; परंतु जिंजिऱ्याचा सिद्दी, पाँदिचेरीचे फ्रेंच, आणि कर्नाटकचा राजा यांच्याकडेही त्यानी मदतीची याचना केली होती.

दि. २५ मे १७३७ रोजी गोव्याच्या व्हिसेरेइने पाँदिचेरीच्या गव्हर्नरला पुढील आशयाचे पत्र पाठविले.

'मराठ्यानी वसईवर दगलबाजीने हल्ला केल्याने मला आपणाला मदतीची याचना करून प्रस्तुतचे पत्र पाठवावे लागत आहे. ह्या कठीण प्रसंगी आपण आम्हाला मदत करण्यात मागे राहाणार नाही अशी मी आशा करतो. माझे स्वामी पोर्तुगालचे राजे याना आपले आभार मानण्यासाठी पत्र पाठवीत आहे.'

व्हिसेरेइने पाँदिचेरीच्या व माहेच्या राज्य सल्लागार मंडळाना उद्देशूनही केविलवाणी पत्रे पाठविली.

वसईचे युद्ध लांबत चालल्याने पोर्तुगीजाना आर्थिक तंगी येणे क्रमप्राप्तच होते. युद्धाचा खर्च भागविण्यासाठी त्याना गोव्यातील 'चर्चेस'च्या मालकीच्या चांदीच्या आणि इतर मौल्यवान वस्तू विक्रीस काढाव्या लागल्या.

त्या दरम्यान तह घडवून आणण्यासाठी इतर गोटांशी संपर्क साधण्याचे पोर्तुगीजांचे प्रयत्न चालूच होते. व्हिसेरेइने दि. ६ डिसेंबर १७३७ रोजी उत्तरेकडील प्रदेशाच्या गव्हर्नरला लिहिले की, बाजीराव पेशवे यांचे मित्र जयपूरचे महाराज सवाई जयसिंग याना तह घडवून आणण्याबद्दल विनंती पत्र पाठविण्यात येत आहे. हे पत्र त्याने एका बहुमोल नजराण्यासह महाराजा सवाई जयसिंग याना पाठविले. परंतु त्यांनी मध्यस्थी केली की काय तत्संबंधीची माहिती उपलब्ध नाही.

दि. १ मे १७३७ रोजी गोव्याचा मुख्य सचिव बिंदनूर अथवा कर्नाटकाच्या राजाच्या दरबारातील पोर्तुगीज वकील पेद्रुद आगियार यास लिहितो :

'...आपणास कळलेच असेल की, मराठ्यानी उत्तरेकडील प्रांतावर स्वारी करून साष्टी बेट घेतले. दि. ६ एप्रिल रोजी त्यानी ठाण्यात प्रवेश करून तेथे नुकताच बांधण्यात येत असलेला आमचा किल्ला घेतला. दुसऱ्या दिवशी लगेच त्यानी वसईच्या कसब्यात प्रवेश केला व वसईला वेढा घालून त्यावर तोफांचा भडीमार सुरू केला. शत्रूचा उत्साह इतका दांडगा आहे की, संबंध प्रांत काबीज करण्याची त्याची महत्त्वाकांक्षा आहे. अशा परिस्थितीत त्यांच्याशी लढण्याकरिता मिळेल ते सैन्य जमविणे आम्हाला भाग असल्याने आमच्या शेजारी देशाशी आम्हाला फटकून वागून चालत नाही. आम्हाला त्यांच्याशी कोणत्याही परिस्थितीत मैत्रीचे संबंध ठेवले पाहिजेत. विशेषेकरून कर्नाटकाच्या राजाशी तर आमचे संबंध ताणले जाणे आमच्या दृष्टीने धोक्याचे आहे. कारण, अन्नधान्याच्या बाबतीत आम्ही कर्नाटकावर औलंबून आहोत. तिकडून आयात केलेले धान्य आम्हाला उत्तरेकडील प्रांतात पाठवावे लागते. म्हणून आपणाला आमचा सल्ला आहे की, कर्नाटकाच्या राजाविषयी आपल्या मनात कितीही प्रतिकूल ग्रह असला तरी तो उघड न करता वरकरणी त्याच्याशी मैत्रीने वागण्याचा बहाणा करावा. कारण, त्या लोकांच्या मदतीची आम्हाला सांप्रत नितांत आवश्यकता आहे. त्यांच्याविषयी अविश्वास प्रकट न करण्याची दक्षता घ्यावी.

'नामदार व्हिसेरेइ यानी आपणाला सूचना करावयास सांगितले आहे की, तिकडच्या भागात आपला ज्या ज्या ठिकाणी परिचय आहे त्या त्या ठिकाणी माणसे गोळा करण्याचा प्रयत्न करावा. जे लोक सैन्यात भरती होण्यास तयार असतील त्यांची नावे आणि त्यांच्या विषयींची इतर माहिती इकडे पाठवावी. त्याचप्रमाणे ती माणसे इकडे येण्यासाठी कुठल्या बंदरात गोळा होतील तेही कळवावे.

'नामदार व्हिसेरेइ यानी आपणाला धान्यही खरेदी करण्याबद्दल कळविले आहे.

ता. क. पत्राचे उत्तर सांकेतिक भाषेत करावे.'

वसईच्या मोहिमेत मराठ्यांचे सुमारे पंचवीस हजार सैन्य गुंतले असल्याचा पोर्तुगीजांचा अंदाज होता. ह्या अफाट सैन्यासमोर आपला निभाव लागणे कठीण आहे, अशी अटकळ जरी पोर्तुगीज लष्करी अधिकाऱ्यानी केली असली तरी पावसाळा सुरू होताच मराठ्यांच्या हालचाली थंडावतील व आपणाला प्रतिकाराची तयारी करण्यास उसंत मिळेल, असे त्याना वाटले होते. परंतु त्यांचा होरा सपशेल चुकला. पोर्तुगीजांना प्रतिकाराची तयारी करण्यास उसंत मिळू न देण्याचा जणू मराठ्यानी चंगच बांधला होता. आणि या धोरणानुसार पावसाळा सुरू होण्याच्या सुमारास दि. ९ जून १७३७ या दिवशी मराठ्यानी वसईच्या किल्ल्यावर हल्ला चढविला. त्यात चार हजार सैनिकानी भाग घेतला होता. किल्ल्यातील शिबंदी जागरूक असल्याने तिने हा हल्ला परतवून लागला. या हल्ल्यात मराठ्यांचे बरेच सैनिक कामास आले.

दुसरा हल्ला पहिल्या हल्ल्यानंतर तीन महिन्यांनी दि. १५ सप्टेंबर १७३७ या दिवशी झाला. त्यात आठ हजार सैनिकानी भाग घेतला होता. हाही हल्ला आतून जबरदस्त मारा करून पोर्तुगीजानी परतवून लावला. त्यांच्या अंदाजाप्रमाणे मराठ्यांचे दोन हजार सैनिक ठार आणि पांचशे जखमी झाले. मराठी कागदपत्रांप्रमाणे या हल्ल्यात चारशे पाचशे ठार आणि चारशे पाचशे जखमी झाले.

वसईचा वेढा तब्बल दोन वर्षे दीड महिना चालू राहिला. तो किल्ला पडत नाही हे पाहून मराठ्यांच्या फौजांचा सेनापती चिमाजी आप्पा फार हवालदिल झाला. 'किल्ला पडत नसल्यास आपले शिर तोफेने किल्ल्यात उडवा' असे निराशेचे उद्गार त्याने मराठा सरदारांसमोर काढल्याचे सांगतात.

वसईचा किल्ला पडत नाही, हे पाहून शिंदे, होळकर, पवार आदि मराठा सरदारही हट्टास पेटले व कोणत्याही परिस्थितीत किल्ला काबीज करण्याचा त्यानी निर्धार केला. पण त्याचबरोबर पोर्तुगीजाना नामोहरम करण्यासाठी गोव्यात दुसरी आघाडी उघडण्याचा निर्णय बाजीरावाने घेतला. या मोहिमेचे नेतृत्व बाजीराव आणि चिमाजी आप्पा यांचे मेहुणे इचलकरंजीकर व्यंकटराव घोरपडे यांच्याकडे देण्यात येऊन त्यांचे सहाय्यक म्हणून दादाजीराव भावे नवलगुंदकर यांची नेमणूक करण्यात आली.

गोव्याच्या मोहिमेसाठी नेमस्त करण्यात आलेल्या सैन्यात चार हजार घोडदळ, सहा हजार पायदळ आणि दोन हजार पेंढारी होते. पोर्तुगीजांच्या मते या सैन्यात तीन हजार घोडेस्वार, सहा हजार पायदळ आणि दोन हजार निःशस्त्र पेंढारी होते. आणखी एका पोर्तुगीज दस्तऐवजात या सैन्यात दोन हजार घोडेस्वार आणि चार हजार पायदळ होते असे म्हटले आहे.

अनुक्रमणिका

मराठा सैन्य गोव्यात 'दिगी' घाटातून दि. २३ जानेवारी १७३९ या दिवशी साष्टी प्रांतात उतरले. परंतु प्रत्यक्षात ही मोहिम दोन वर्षापूर्वी निश्चित करण्यात आली होती, हे गोव्याच्या व्हिसेरेइने दि. २३ डिसेंबर १७३७ रोजी साष्टी प्रांताच्या सेनापतीस लिहिलेल्या पत्रावरून सिद्ध होते. या पत्रात व्हिसेरेइ म्हणतो की, बाजीरावाचे मेहुणे व्यंकटराव घोरपडे हे मोठे सैन्य घेऊन कोल्हापूरहून इकडे निघाले असल्याचे कित्तुर येथील संघाचे पाद्री गोंसालु पिंतु यानी पत्र घालून कळविले आहे.

दि. २५ जानेवारी १७३७ रोजी मडगाव शहर मराठ्यांच्या हाती पडले. तेथेच त्यानी आपल्या सैन्याचा मुख्य तळ केला.

मडगावची तटबंदी मराठ्यानी काबीज करताच कुकळ्ळी येथील ठाण्याचा देशी अधिकारी कॅप्टन तुकू नाईक हा आपल्या सैन्यासह मराठ्याना येऊन मिळाला. ह्यावरून गोव्यातील हिंदू पोर्तुगीजांच्या छळाने किती संत्रस्त झाले होते ते सिद्ध होते. मराठे फोंडे महालात शिरले तेव्हा तेथील हिंदूनी त्याना सर्वतोपरी मदत केली. दुर्भाट येथील हिंदू कोळ्यानी तर पोर्तुगीजांची एक लढाऊ नौका पकडून ती मराठ्यांच्या हवाली केली.

फोंड्याच्या हिंदूनी सहकार्य केल्याने मराठ्याना मर्दनगडचा किल्ला घेणे शक्य झाले. सरदार व्यंकटराव घोरपडे यांचा दिवाण गोविंदा ठाकूर हा सोंधेच्या राजाच्या ताब्यात असलेल्या फोंड्याच्या किल्ल्यावर पांचशे घोडदळासह चालून गेला. किल्लेदार नरसिंगराव याने विना प्रतिकार किल्ला मराठ्यांच्या हवाली केला. फोंड्याहून मराठ्यानी उसगावला जाऊन तेथील गढीही हस्तगत केली.

ह्या घटना दि. १ मार्च १७३९ या दिवशी घडल्या. थोड्याच दिवसानी व्यंकटराव घोरपडे यानी सोंधेच्या राजाच्या अमलाखाली असलेले सुपे आणि सांगे येथील किल्लेही काबीज केले.

वास्तविक सोंधेचा राजा हा छत्रपतींचा मांडलिक; परंतु पुढे तो पोर्तुगीजाना सामील झाल्याने मराठ्याना त्याला वठणीवर आणावे लागले.

फोंडे अथवा अंत्रुज महाल मराठ्यांनी घेताच तिसवाडी अथवा गोवा बेटातील पोर्तुगीजांचे धाबे दणाणले. कारण अंत्रुज महालाची सीमा गोवा बेटाला भिडत असल्याने त्या बेटावर स्वारी करणे मराठ्यांना सुलभ जाणार होते. असे सांगतात की, गोवे शहर घेतल्यावर तेथील इंक्विझिशनच्या पाद्र्याना आपल्या पालखीला जुंपून त्यांची गोवा शहरातून आपण धिंड काढणार असल्याचे सरदार व्यंकटराव घोरपडे यानी जाहीर केले होते. ती बातमी गोवा शहरात पसरताच पाद्र्यांची घाबरगुंडी उडाली.

मराठ्यांनी साष्टी प्रांत घेतला असला, तरी रायतूर आणि मुरगाव येथील किल्ले त्याना घेता आले नाहीत. पोर्तुगीजानी हे किल्ले प्राणपणाने लढविले. रायतूर, मुरगाव, आग्वाद आणि रेइश मागुश हे चार किल्ले वगळता गोव्याचा इतर सर्व टापू मराठ्यानी घेतला. गोवा शहरातील नागरिकांची तर पाचावर धारण बसली. सगळीकडे पळापळ सुरू झाली. साष्ट आणि बार्देश प्रांतातील झाडून सारे पोर्तुगीज लोक तिसवाडीला पळून गेले. इ. स. १६८३ साली संभाजीच्या स्वारीच्या वेळी जी घबराट माजली तशी घबराट यावेळीही माजली. परंतु त्यावेळी मोगल सैन्य आपल्या मदतीला धावून येईल अशी आशा पोर्तुगीजाना वाटली होती. तशी आशा यावेळी करता येत नव्हती. यावेळी कुणाकडूनच मदत येण्याची शक्यता नव्हती.

अनुक्रमणिका

नाही म्हटल्यास एक डच आरमारी तुकडी गोवा बंदरात आली होती. व्हिसेरेइने त्या आरमारी तुकडीच्या कमांडरपाशी मदतीचा संदर्भ लावला. पण त्याने सपशेल नकार दिला.

कुठूनही मदत येण्याची आशा नसल्याचे पाहून गोव्याचा व्हिसेरेइ कौंट द सांदोमिल याने सरदार व्यंकटराव घोरपडे यांच्याकडे तहाचा संदर्भ लावला. दि. ८ मार्च १७३९ या दिवशी त्याने तशा स्वरुपाचे पत्र व्यंकटराव घोरपडे याना पाठविले. तत्पूर्वी त्याने छत्रपती शाहू महाराजांचे एक मंत्री नारोराम यांच्यामार्फत शाहू महाराजांकडे तहाची याचना केली होती. परंतु शाहू महाराजानी स्वतःच्या अखत्यारीत पोर्तुगीजांशी तह करण्यास नकार दिला. त्यानी व्हिसेरेइला बाजीरावाशी संपर्क साधावयास सांगितले.

शाहू महाराजांच्या नकारामुळे व्हिसेरेइची निराशा झाली असली, तरी त्याने चिकाटी सोडली नाही. त्याने गोव्याच्या स्वारीवर आलेले सरदार व्यंकटराव घोरपडे व दादाजी भावे नरगुंदकर या दोघांशी गोव्यातील काही प्रतिष्ठित हिंदू व्यापाऱ्यांच्या विद्यमाने संधान जुळविले. या व्यापाऱ्यानी दादाजी भावे नरगुंदकर याना मोठी लांच देऊन तह करण्याबाबत व्यंकटराव घोरपडे यांचे मन वळविण्याची त्याना गळ घातली. एकूण सत्तर हजार अश्रफी व्हिसेरेइने व्यंकटी कामत नावाच्या व्यापाऱ्याकरवी दादाजी भावेस देऊ केल्या. त्यापैकी व्यंकटी कामतने दादाजीस इसारा म्हणून बारा हजार अश्रफी दिल्या.

व्यंकटी कामत आणि भाव्यांचा दिवाण महादजी शेणवी या दोघांचे आतून सूत होते. महादजी शेणवीचे गोव्यात काही नातेवाईक होते. त्यांचे आणि पोर्तुगीज अधिकाऱ्यांचे स्नेहाचे संबंध असल्याने दादाजीला लांच देऊन तहास प्रवृत्त करणे त्याना शक्य झाले. या बनावाविषयी पुढील हकीकत उपलब्ध आहे :

‘आमशीचे व्यंकटी कामत यास पाचारण करून त्याला मराठ्यांच्या छावणीत धाडण्यात आले. तेथून बोलणी करून परत आल्यावर व्यंकटी कामतीने पोर्तुगीज अधिकाऱ्याना सांगितले की, रायतूरच्या किल्ल्यावर हल्ला करण्यात दिरंगाई करण्याबाबत मादू शेणवी मार्फत आपण दादारावाशी करार केला आहे. या दिरंगाईचा फायदा घेऊन पोर्तुगीज अधिकाऱ्यानी रायतूरच्या किल्ल्यात मुबलक दारूगोळा आणि कुमक पाठवावी. या दिरंगाईबाबत पोर्तुगीजांनी दादाजीस सत्तर हजार अश्रफी द्याव्यात व इसारा म्हणून अगोदर बारा हजार अश्रफी द्याव्या. त्यापैकी दोन हजार अश्रफी दादाजींचा कारभारी मादू शेणवीस मिळाव्या.’

दादाजी भावेस पोर्तुगीजांकडून भरपूर लांच मिळाल्याने त्याने रायतूरच्या किल्ल्यावर हल्ला करण्यास चालढकल केली. नंतर मराठा सरदारांच्या डोळ्यास पाणी लावण्यासाठी लुटुपूटूचा हल्ला केला. पण त्यात दम नव्हता. दादाजी भावे, व्यंकटराव घोरपडे आणि पोर्तुगीज अधिकारी यांच्यामधील तहाच्या वाटाघाटीचे एरंडाचे गुऱ्हाळ पुष्कळ दिवस चालले. व्यंकटरावांचा दिवाण गोविंदपंत ठाकूर याने एक अट घातली की, पोर्तुगीजानी त्यांच्या अमलाखालच्या हिंदूकडून शेंडी कर वसूल करू नये व त्याना त्यानी संपूर्ण धर्मस्वातंत्र्य द्यावे.

भाव्यांचा दिवाण महादजी शेणवी याने ‘इंक्विझिशनच्या अधिकाऱ्यानी हिंदूच्या वाटेस जाऊ नये’ अशी शर्त घातली. परंतु त्या दोन्हीही अटी पोर्तुगीजानी मान्य केल्या नाहीत. त्यानी सबब सांगितली की हा प्रश्न धार्मिक असल्याने त्यांत ढवळाढवळ करण्याचा आपणास अधिकार नाही. व्यंकटराव घोरपडे आणि

अनुक्रमणिका

दादाजी भावे या दोघानी पोर्तुगीजांकडून लांच घेतल्याने ते त्यांचे मिंधे बनले होते. त्या दोघानी तहाच्या करारावर दि. २ मे १७३९ या दिवशी मुकाट्याने सह्या केल्या.

लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही की ह्या लांच्छनास्पद करारावर छत्रपती शाहू महाराज यानी शिक्कामोर्तब केले नाही.

पोर्तुगीजानी युद्धनुकसानी म्हणून मराठ्याना सात लक्ष रुपये द्यावे अशी अट तहाच्या कलमात होती. ह्या रकमेपैकी एक लक्ष रुपये आपणा स्वतःला मिळण्याची व्यवस्था दादाजीने अगोदरच करून ठेवली होती.

मराठ्यांशी तह करण्यासाठी पोर्तुगीजाना मोठा भुर्दंड भरावा लागला. परंतु हा पैसा त्यानी आपल्या अंकित असलेल्या हिंदू व्यापाऱ्यांवर कर लादून बऱ्याच मोठ्या प्रमाणात वसूल केला.

इकडे गोव्यात मराठे सरदार आणि पोर्तुगीज अधिकारी तहाच्या वाटाघाटी करण्यात गुंतले होते. तर वसईमध्ये मराठे आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये घनघोर लढाई सुरू होती. वसईच्या किल्ल्यास वेढा घालून दोन वर्षे झाली तरी तो काबीज करणे चिमाजी आप्पास शक्य झाले नव्हते. अखेर मोठ्या प्रमाणात कुमक आणि दारूगोळा आणून मराठ्यानी किल्ल्याच्या तटांवर तोफांचा अहोरात्र मारा करून त्यांची चाळण करून टाकली.

दि. १५ एप्रिल १७३९ च्या रात्री वसईच्या शिबंदीचा सेनापती मार्तिन्यूद सिल्व्हैरा हा किल्ल्याच्या तटावर जाऊन बचावाच्या तयारीची पाहाणी करीत असता एका मराठा बरकंदाजाने त्याला अचूक टिपून गोळी झाडून ठार केले. त्याची जागा कायतान द सौझ परैरा या नावाच्या अधिकाऱ्याने घेतली. त्याने दि. १७ एप्रिल १७३९ रोजी व्हिसेरेइला कळविले की, पन्नास हजार मराठा सैन्य वसईच्या किल्ल्यावर अखेरचा हल्ला करण्यास सिद्ध झाले आहे.

शेवटी त्या निकराच्या हल्ल्यास दि. १२ मे १७३९ रोजी प्रारंभ झाला. दि. १३ मे रोजी एकाच दिवसात मराठ्यानी सहा मोठे हल्ले करून पोर्तुगीजाना चकित करून सोडले. युद्धशास्त्राच्या इतिहासातील हा एक विक्रमच म्हटला पाहिजे. त्या दिवशी दुपारी तीन वाजता सुरुंगाचा प्रचंड स्फोट होऊन किल्ल्याच्या तटास एक मोठे भगदाड पडले. त्याबरोबर चार हजार मराठे जिवाची तमा न बाळगता हरहरमहादेवची घोषणा करीत भगदाडातून आत शिरले. तरीही पोर्तुगीज सैन्य लढतच राहिले.

दि. १५ मेस जनरल कायतान द सौझ पेरैरा याने युद्धमंडळाची बैठक बोलविली. मराठ्यांचा पराभव करणे ही अशक्यप्राय गोष्ट असल्याचे सगळ्यानाच कळून चुकले होते. त्यामुळे शरणागती पत्करणे अथवा लढता लढता सगळ्यानी जिवाची कुरबानी करणे, हे दोनच पर्याय त्यांच्यासमोर होते. शेवटी दि. १६ मेला युद्धमंडळाने शरणागती पत्करण्याचा निर्णय घेतला. त्याच दिवशी पोर्तुगीजानी तटावर पांढरे निशाण फडकावून शस्त्रे खाली ठेवली.

वसईच्या युद्धात मराठ्यांकडचे वीस ते बावीस हजार सैनिक व पोर्तुगीजांकडचे गोरे आणि एत्तदेशीय मिळून हजाराच्या जवळपास सैनिक ठार झाले असावेत असा अंदाज पोर्तुगीजांनी केला. या

युद्धातून गोव्याचे युद्ध उद्भवले. ह्या दोन्ही युद्धांमुळे गोव्याचे सरकार दिवाळखोर बनले. म्हणजे जवळ जवळ चाळीस लक्ष रुपयांची हानी झाली. एकूण ५९३ तोफा त्यानी गमावल्या. त्यात लांब पल्ल्याच्या बऱ्याचशा ब्रांझच्या तोफा होत्या. युद्धासाठी त्याना चौतीस लक्ष चाळीस हजार अश्रफी खर्च कराव्या लागल्या. ठाणे जिल्ह्यातील वर्सोवापासून दमणपर्यंतच्या सलग चोवीस कोस लांबीच्या ३४० खेडी असलेल्या प्रदेशावर पाणी सोडावे लागले. वसईसारखा बलाढ्य किल्ला, लहान मोठे आणखी वीस किल्ले, आठ शहरे, दोन तटबंदीच्या टेकड्या, ठाणे शहरासकट साष्टी बेट आणि कारंजा बेट त्याना मराठ्यांच्या हवाली करावे लागले. उत्तरेकडील प्रदेशात त्यांच्या हाती फक्त दमण, चौल आणि दीव ही तीनच ठाणी उरली.

सागरी सत्ता म्हणून पोर्तुगीजांचा बराच दबदबा होता. परंतु वसईच्या युद्धात त्यानी तो गमावला. त्यांची आरमारी हानी अतोनात झाल्याने त्याना कुणी विचारीनासा झाला.

नामुष्कीची गोष्ट ही की, छत्रपती शाहू महाराज हे मोगलांचे मांडलिक म्हणून त्यांच्या दरबारात नजराणा देऊन वकील पाठविण्यास त्यानी हट्टाने नकार दिला तो हट्ट सोडून देऊन त्याना नाक मुठीत धरून शाहू महाराजांच्या दरबारात नजराणा देऊन वकील पाठवावा लागला.

वसईच्या तहाची कलमे मराठ्यानी कसोशीने पाळली. ज्या पोर्तुगीज लोकांची वसईत आणि साष्टी बेटात राहाण्याची इच्छा होती त्याना त्यानी तेथे राहू दिले; इतकेच नव्हे तर त्याना त्यांचे धर्म स्वातंत्र्यही उपभोगू दिले.

अनुक्रमणिका

## १४. पेशवाई : नानासाहेब पेशवा

वसईच्या पाडावानंतर पोर्तुगीज सैन्याला आणि त्यांच्या बायकामुलाना मराठ्यानी गोव्यास जाऊ दिले. परंतु गोव्यातील मराठा सैन्य अजून तिकडे रेंगाळत मागे राहिले होते. ते १९३९ सालच्या मे अखेर माघारा परतू लागले. व्यंकटराव घोरपडे यानी साष्टी प्रांतातून सैन्य २१ मेस काढून घेतले. तत्पूर्वी रायतूरचा वेढा त्यानी १२ मेस उठविला होता.

साष्टी प्रांतातील मराठा सैन्य माघारा परतले, तरी व्यंकटराव घोरपडे त्या सैन्याबरोबर गेले नाहीत. ते सांगे येथे जाऊन राहिले. दाजीराव भावे नरगुंदकर कुकळ्ळीला ठाण मांडून राहिले होते. पोर्तुगीजांकडून ते आणखी काही उपटण्याची अपेक्षा करीत होते. ती रक्कम मिळाल्याखेरीज ते मडगावहून सैन्य हलविणार नाहीत ह्याची जाणीव होताच पोर्तुगीजानी त्यांच्या हातावर देऊ केलेली रक्कम ठेवून त्याना मडगावचा कोट खाली करावयास लावला. दि. १९ जुलै १७३९ या दिवशी पोर्तुगीजानी मडगावच्या कोटाचा ताबा घेतला. परंतु त्यानी तो लगेच पाडून जमीनदोस्त करून टाकला. कुकल्ली गाव, तेथील कोट आणि असोळणे गाव बाजीरावांच्या आज्ञेवरून पुढे आणखी काही दिवस मराठ्यांच्या ताब्यात होते.

बाजीराव आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये तहाच्या वाटाघाटी चालू असता इ. स. १७४० च्या मार्च महिन्यात फोंड्याच्या मराठा सुभेदाराने साष्टी प्रांताच्या महसुलापैकी चाळीस टक्के महसूल वसूल करण्यासाठी पाचशे घोडेस्वार आणि सहाशे पायदळ पाठवून तिकडे लुटालूट केली. पोर्तुगीजांचा आणि मराठ्यांचा जो तह झाला त्यात साष्टी प्रांताच्या महसुलापैकी चाळीस टक्के महसूल पोर्तुगीजानी मराठ्याना द्यावा, असे एक कलम होते. त्या कलमाची अंमलबजावणी न झाल्याने मराठ्यांच्या सैन्याने साष्टीत शिरून लुटालूट केली असावी. तरीही पोर्तुगीज अधिकारी गप्पच राहिले. त्यावरून त्यांच्या मनात मराठ्याना कर भरायचा नाही याची कल्पना साष्टी प्रांतातील सधन लोकाना झाल्याने त्यानी चाळीस हजार अश्रफी गोळा करून त्या मे महिन्याअखेर चार हजार हप्त्यांनी देण्याचा मराठ्यांशी करार केला.

साष्टी प्रांतातील कुकळ्ळी आणि असोळणे ही दोन्ही गावे मराठ्यानी बाजीरावाच्या हुकुमावरून सोडली नव्हती. ती त्यानी सोडावी म्हणून गोव्याच्या व्हिसेरेइने मुंबईच्या जनरलमार्फत बाजीरावापाशी खटपट केली. बाजीरावाने मुंबईच्या गव्हर्नरला पाठविलेल्या पत्रात जे बारा मुद्दे मांडले त्यातील तीन मुद्दे पुढीलप्रमाणे होते :

१. रेवदंडियाचा कोट व कोरलेचा कोट फिरंगीयाने द्यावयाचा करार केला आहे, त्याप्रमाणे दोन्ही कोट द्यावे.

२. आंगरे यांजपासी आम्ही जेव्हा कजीया करू तेव्हा इंगरज फिरंगीयानी आपले आरमारानिसी आमचे साहित्ये करावे.

३. साष्टी बारदेशात महाराष्ट्र धर्म ज्यांचा ते करितील त्यांस फिरंगीयाने चालवावे देखील ‘गोवियांत महाराष्ट्र धर्म चालवावा’.

अनुक्रमणिका

बाजीरावाने ज्या अटी पोर्तुगीजाना घातल्या त्यातील ‘गोवियांत महाराष्ट्र धर्म चालवावा’ ही अट महत्त्वाची आहे. म्हणजे गोवा बेटांतील हिंदूवरील पाद्र्यांचा जुलुम जबरदस्तीची कल्पना बाजीरावास झाल्याने त्या बेटांत हिंदूना मानाने जगता आले पाहिजे, असा बाजीरावाचा आग्रह होता. परंतु गोवा बेटातील हिंदूच्या दुर्दैवाने म्हणा अथवा पाद्र्यांच्या सुदैवाने म्हणा बाजीराव तदनंतर फार दिवस जगला नाही. दि. ९ मे १७४० या दिवशी त्याचे निधन झाले.

बाजीरावास गोव्यातील हिंदूच्या हितसंबंधाविषयी आस्था वाटत होती तशी आस्था चिमाजी आप्पा किंवा पेशव्यांचे सरदार याना वाटत होती असे वाटत नाही. तसे असते तर ह्या प्रश्नाचा पाठपुरावा केल्याशिवाय ते राहिले नसते. त्याचा पुरावा म्हणजे व्हिसेरेइ कौंट द सांदोमिल याने मुंबईच्या गव्हर्नरला दि. ११ मे १७४० या दिवशी लिहिलेले पुढील पत्र :

‘गोव्यातील हिंदूना धर्मस्वातंत्र्य असावे या मुद्यावर मराठे भर देतील असे वाटत नाही. गेल्या वर्षी व्यंकटरावाने येथे केलेल्या तहनाम्यात ह्याविषयी कोणतेच कलम घातले नाही. नारोरामा (मंत्री)शी झालेल्या वाटाघाटीतही ह्या प्रश्नाचा उल्लेख त्याने केला नाही. ह्यावरून मला वाटते की धर्मस्वातंत्र्याच्या मुद्यावरून मराठ्याना फायदेशीर होणारा हा तह ते मोडणार नाहीत.’

नानासाहेब पेशवे आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये जो नवीन तह झाला त्यात पोर्तुगीजाना पाच लक्ष रुपयांची सूट मिळाली; तसेच साष्ट व बार्देश ह्या दोन्ही प्रांताच्या महसुलापैकी चाळीस टक्के महसुल पोर्तुगीजानी मराठ्यास देण्याचे जे कलम जुन्या तहनाम्यात होते ते नवीन तहनाम्यातून गाळून टाकण्यात आले. ह्या बाबतीत व्हिसेरेइने सुटकेचा श्वास सोडून उद्‌गार काढले की, ‘ह्या करमाफीमुळे मराठ्यांच्या वहिवाटदारास साष्ट व बार्देशमध्ये येण्याची बंदी झाली ही विशेष महत्त्वाची गोष्ट होय.’

नवीन असोळणे ही दोन्ही गावे पोर्तुगीजाना परत मिळाली. परंतु रेवदंडा (चौल) आणि कोरलाई हे दोन्ही किल्ले पोर्तुगीजानी मराठ्याना दिले. पोर्तुगीजांचे दमणमधील दोन्ही किल्ले त्यांच्याकडेच राहिले. शिवाय दमणच्या किल्ल्याला लागून असलेला काही मुलुख किल्ल्याच्या सरंजामासाठी मराठ्यानी पोर्तुगीजाना दिला.

चौल आणि कोरलाई हे दोन किल्ले पोर्तुगीजानी नवीन तहनाम्यानुसार जरी मराठ्याना दिले असले, तरी ते किल्ले पोर्तुगीजानी सोडू नये म्हणून मानाजी आंग्रे याने खटपट केली होती. हे दोन्ही किल्ले सांभाळण्यासाठी जो खर्च येणार होता तो पोर्तुगीजाना देण्याची तयारी देखील त्याने दाखविली होती. त्याचे कारण हे की, हे दोन्ही किल्ले पेशव्यांच्या हातात पडल्यास आंग्र्यांचा सुरक्षिततेला त्यांच्यापासून धोका होता.

आंग्रे आणि पेशवे यांचे संबंध सलोख्याचे नव्हते. कान्होजी आंग्रे पेशव्यांचे वर्चस्व मानीत नव्हते, म्हणून पेशव्यांचा आणि त्यांचा संघर्ष चालू होता. पुढे तो विकोपास जाऊन आंग्र्यांचा नाश झाला. या दृष्टीने बाजीरावाने ‘आंग्रे याजपासी कजीया आम्ही करू तेव्हा इंगरज फिरंगी यानी आपले आरमारानिसी आमचे साहित्य करावे,’ ही जी शर्त तहाच्या करारात घातली ती सूचक होती. पुढे आंग्र्यांचा नाश करण्याकरीता नानासाहेब पेशवे यानी इंग्रजांची मदत घेतली, हे सर्वश्रूतच आहे.

अनुक्रमणिका

गोव्याचे पोर्तुगीज आणि वाडीकर सावंत या दोघांमध्ये अधूनमधून हर्षामर्षाचे प्रसंग उद्‌भवत असत. त्यात सावंताना माघार घेऊन पोर्तुगीजांशी तह करावा लागे.

इ. स. १७४६ च्या एप्रिल महिन्यात वाडीकर सावंत आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये युद्ध पेटले. मराठ्यांशी झालेल्या युद्धात पोर्तुगीजांचा जरी पराभव झाला असला तरी वाडीकर सावंताना ते भारी होते. त्यामुळे साहजिकच १७४६ च्या युद्धात वाडीकरांची पिछेहाट होऊ लागली. ते पाहाताच नानासाहेब पेशवे यांचे चुलत भाऊ सदाशिवराव भाऊ यानी सावंतांच्या मदतीसाठी गोव्यावर स्वारी करण्याचा बेत केला. ही बातमी पोर्तुगीजाना त्वरीत कळली. त्यांचे गुप्तहेर पुणे दरबारात तर होतेच; परंतु सदाशिवराव भाऊंच्या सैन्यातही ते होते. ह्या बाबतीत गोव्याचा एक व्हिसेरेइ 'मार्कैज द काश्तेलु नोव्हु' याच्या चरित्रात एके ठिकाणी पुढील अवतरण आढळते. 'मराठ्यांच्या हालचालीच्या बातम्या व्हिसेरेइना दररोज मिळत असत. इतकेच नव्हे तर मराठा सरदारांकडून व्हिसेरेइना सावधगिरीचेही इशारे मिळत.'

सदाशिवराव भाऊ पोर्तुगीजांच्या समाचारासाठी निघाले व आपल्या सैन्यासह ते खानापूर येथे येवून तळ देऊन राहिले. ती बातमी सोंधेच्या राजाच्या कारभाऱ्यास कळताच त्याने खानापूरला जाऊन सदाशिवराव भाऊंची भेट घेतली. भाऊनी सोंधेच्या राजाच्या कारभाऱ्यास समज दिली की, 'मी जरी पोर्तुगीजांच्या पारिपत्यासाठी आलो असलो, तरी सोंधेच्या राजाच्या ताब्यात असलेला अंत्रुज महालातील मर्दनगड किल्ला मला हवा आहे. तरी हा किल्ला तुमच्या राजाने मला एक वर्षाच्या कराराने द्यावा. तसेच तुम्ही आम्हाला घाट उतरण्यासाठी वाटाडेही पुरवावे.'

सोंधेच्या राजास सदाशिवराव भाऊनी घाट उतरून गोव्यावर स्वारी करू नये असे वाटत होते, कारण त्यामुळे गोव्याला लागून असलेल्या सोंधेच्या प्रदेशाला मराठ्यांच्या सैन्याचा उपसर्ग पोहोचणार होता. सोंधेच्या राजाच्या कारभाऱ्याने सदाशिवराव भाऊना गोव्याच्या स्वारीपासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. त्याने त्याना सोंधेच्या राजाकडे फोंडे महालाच्या खंडणीबाबत थकलेल्या रकमेपैकी एक लक्ष रुपये भरण्याचे कबूल केले. सोंधेच्या राजास छत्रपती शाहू महाराज यांच्याकडून फोंडे आणि पंचमहाल हे दोन महाल सालिना पंचवीस हजार रुपये खंडणीला मिळाले होते. परंतु सोंधेच्या राजाने खंडणी नियमीतपणे भरली नव्हती. ती त्याने निम्मी भरल्यावर भाऊ सुपे येथील आपला तळ उठवून दि. १० मार्च १७४७ या दिवशी माघारा परतले.

सदाशिवराव भाऊ तीस हजार घोडदळ आणि असंख्य पायदळ घेऊन गोव्यावर चालून येत असल्याची बातमी गोव्यात पसरताच सगळ्यांच्या तोंडचे पाणी पळाले. साष्टी प्रांतातील लोकानी तर घरादारांचा त्याग करून जंगलांचा आश्रय घेतला. सोंधेच्या राजाच्या सैनिकानी आपली ठाणी सोडून सुंबाल्या केला. परंतु व्हिसेरेइ मार्केज द आलोर्न याने धीर न सोडता घाटातील खिडी रोखून धरण्याची तयारी केली. त्याने पोर्तुगीज लष्करातील देशी शिपायाना इशारा दिला की त्यानी जर पळून जाण्याचा प्रयत्न केला, तर त्याना पकडून त्यांची डोकी उडविण्यात येतील.

दि. १५ डिसेंबर १७४९ या दिवशी छत्रपती शाहू महाराज यांचे निधन झाले. महाराणी ताराबाई यांचा नातू रामराजा हा छत्रपती शाहू महाराज यानी लिहून ठेवल्याप्रमाणे सातारच्या गादीवर आला. परंतु त्याच्या हाती खरी सत्ता न आल्याने तो नुसता नामधारी राजा बनला. दुसरी गोष्ट म्हणजे महाराणी ताराबाई यांचे आणि पेशव्यांचे आधीच पटत नसल्याने ताराबाई आणि नानासाहेब पेशवे यांच्यामध्ये संघर्ष सुरू होऊन

मराठ्यांच्या राज्याची सत्ता नानासाहेब पेशवे यांच्या हाती केंद्रीत झाली. त्या बळावर त्यानी मराठ्यांची सातारा येथील राजधानी पुण्यास हलविली.

मराठ्यांच्या राजाची सत्ता पेशव्यांचे हाती आल्याने पोर्तुगीजांना आता साताऱ्याऐवजी आपला वकील पुण्यात ठेवावा लागला.

मागे उल्लेख आलाच आहे की, सदाशिवराव भाऊनी सोंधेच्या राजाकडे फोंडे महालातील मर्दनगडच्या किल्ल्याची मागणी केली होती. इ.स. १७५९ साली सोंधेच्या राजाने मर्दनगड पेशव्यांकडे साडेपाच लक्ष रुपयाना गहाण ठेवला.

मर्दनगड मराठ्यांकडे गेला तर तेथे मराठ्यांची शिबंदी येणे क्रमप्राप्तच होते. तसे झाल्यास पोर्तुगीजांच्या डोक्यावर ही कायमची टांगती तलवार होती. मर्दनगड साष्टी प्रांताच्या हद्दीपासून जवळ असल्याने तेथून मराठे कोणत्याही वेळी साष्टी प्रांतावर स्वारी करू शकत होते. तसा प्रसंग उद्‌भवणे असंभवनीय नाही हे लक्षात घेऊन व्हिसेरेई कौंट द आल्वा याने मर्दनगड किल्ला मराठ्यानी व्यापण्यापूर्वीच सोंधेच्या राजाकडून घेण्याचे ठरविले. दि. १ जून १७५६ या दिवशी व्हिसेरेइ कौंट द आल्वा मर्दनगड घेण्यासाठी सैन्यासह जातीने निघाला. परंतु पोर्तुगीजांचे आगमन होण्यापूर्वीच मराठ्यानी तो किल्ला ताब्यात घेतला होता. बहुधा पोर्तुगीजांच्या योजनेचा सुगावा मराठ्याना लागल्याने त्यानी तो किल्ला व्यापण्याची घाई केली असावी.

मर्दनगड मराठ्यानी व्यापल्याची बातमी व्हिसेरेइ कौंट द आल्वा याला वाटेतच कळली. तो तसाच मागे परतला. परंतु नंतर त्याला काय दुर्बुद्धि झाली कुणास ठाऊक! त्याने मर्दनगड मराठ्यांकडून घेण्याचे ठरवून सैन्यास फोंड्याकडे जाण्याचा हुकूम केला. २२ जून रोजी भर पावसात त्याने बोरी नदी ओलांडली. त्याची सारी भिस्त त्याने पोर्तुगालहून गोव्यास येताना बरोबर आणलेल्या आधुनिक तोफांवर होती.

दि. २८ जून रोजी पोर्तुगीजानी मर्दनगडावर तोफांचे मोर्चे लावले. परंतु कौंट द आल्व्होर यांच्या दुर्दैवाने त्या दिवशी कधी नव्हता तो धुवांधार पाऊस कोसळू लागल्याने दारूगोळ्यांचा भिजून नुसता कालवा झाला.

पोर्तुगीजांच्या तोफा पावसामुळे निकामी झाल्याचे पाहून मर्दनगडावरील मराठा शिबंदीला नुसता हर्षवायु झाला. किल्लेदार येसाजीराम जोशी हुपरीकर ह्याने तलवार उपसून चारशे सैनिकांना किल्ल्याबाहेर पडून पोर्तुगीजांवर चाल करण्याचा हुकूम केला. तो हल्ला अनपेक्षित होता. मराठ्यानी पोर्तुगीजाना अक्षरशः कापून काढले. या हातघाईच्या लढाईत व्हिसेरेइ कौंट द आल्वा हा त्याच्या हाताखालच्या चौदा वरीष्ठ लष्करी अधिकाऱ्यांसह ठार झाला. त्याचे शव किल्लेदार येसाजीराम जोशी हुपरीकर याने सन्मानपूर्वक गोव्यास पाठवून मराठ्यांचा शिलेदारपणा पोर्तुगीजांच्या निदर्शनास आणून दिला.

फोंड्याच्या मोहिमेचा बोजवारा उडून व्हिसेरेइ कौंट द आल्वा ठार झाला त्याचे खापर पोर्तुगीजानी सोंधेच्या राजाच्या माथी मारले. आपल्या अपयशावर पांघरूण घालण्यासाठी त्यानी बिचाऱ्या सोंधेच्या राजास दोषी ठरविले. त्यानी असा प्रचार सुरू केला की सोंधेच्या राजाच्या कारभाऱ्याने मर्दनगड मराठ्यांच्या ताब्यात दिला नसता तर पोर्तुगीजाना मराठ्यांशी लढाई करावी लागली नसती.

अनुक्रमणिका

ते काही असो; पण एक गोष्ट ही की पोर्तुगीजाना आपल्या शस्त्र सामर्थ्याच्या बढाईचे चांगले प्रायश्चित मिळाले. वसईच्या पराभवानंतर पेशव्यांच्या फौजांकडून झालेला हा त्यांचा दुसरा मोठा पराभव होता. पेशव्यांची कुरापत काढणे आपल्या हिताचे नाही याची जाणीव त्याना आता चांगली झाली. त्यामुळे पेशव्यांशी वागताना त्यानी नरमाईचे धोरण पत्करले.

इ. स. १७५८ साली गोव्याचा नवीन व्हिसेरेइ कौंट द एगा याने हिंदुस्थानातील राजकीय घडामोडींचा आढावा घेऊन पोर्तुगालच्या राजास जे पत्र लिहिले त्यात नानासाहेब पेशव्यांच्या सामर्थ्याविषयी तो म्हणतो :

‘......नानापाशी दोन लक्ष घोडदळ, असंख्य पायदळ आणि दिवसेदिवस वाढत जाणारे आरमार आहे. अशा परिस्थितीत युद्ध टाळण्याचा एकच मार्ग आहे अन् तो म्हणजे त्याच्याशी नमते घेऊन वागणे.’

उपर्युक्त धोरणानुसार इ. स. १७५९ च्या फेब्रुवारीत नानासाहेबाचे विजयदुर्गला आगमन झाले, तेव्हा व्हिसेरेइने त्याच्याकडे एक नजराणा पाठविला. परंतु व्हिसेरेइचा दूत विजयदुर्गला पोहचण्यापूर्वीच नानासाहेब पुण्यास परतला होता. व्हिसेरेइचा दूत तसाच पुण्यास गेला व त्याने नानासाहेबास व्हिसेरेइचा नजराणा सादर केला. नानासाहेबाने त्याचे चांगले स्वागत केले.

व्हिसेरेइचा दूत पुण्याहून गोव्यास परतल्यावर नानासाहेबाने आपले दोन दूत गोव्यास धाडले. दि. २६ जून १७५९ रोजी व्हिसेरेइने या दूताना समारंभपूर्वक मुलाखत दिली. पेशव्यांच्या वकिलानी व्हिसेरेइला पुढील निवेदन सादर केले :

१. तुळाजी आंग्रे हा सरकारचा सेवक. त्याला तुम्ही दोन लक्ष रुपये घेऊन सरकारविरुद्ध सैन्याची मदत केली. परंतु या सैन्याने तुळाजीस मदत न करता ते परत आले. तरी तुळाजीकडून घेतलेले दोन लक्ष रुपये तुम्ही सरकारला परत करावे.

२. वाडीकर सावंतांची हलवर्ण, डिचोली आणि तेरेखोल ही तीन ठाणी तुमच्याकडे गेल्या बारावर्षांपासून आहेत. ती तुम्ही सोडून द्यावी.

३. जांबावली महाल सरकारने सोंधेकरांकडून घेतला. परंतु या महालातील पारोडे, तळवडे आणि मुले ही तीन गावे तुमच्याकडे आहेत. ती गावे तुम्ही सरकारच्या ताब्यात द्यावी.

४. सावंताचा भाऊ कृष्ण सावंताला तुम्ही आश्रय दिला आहे. त्याला तुम्ही तुमच्या राज्याबाहेर घालवावे.

५. मर्दनगड सरकारचा आहे. या किल्ल्याकडे सामान होड्यानी पाठवावे लागते. तरी मुरगाव व आग्वाद येथील तुमच्या अधिकाऱ्यानी सामान घेऊन जाणाऱ्या होड्याना अटकाव करू नये.

६. तुमचा वकील सरकारकडे व सरकारचा तुमच्याकडे असावा. जेणेकरून उभय पक्षात स्नेहवृद्धि होईल.

अनुक्रमणिका

७. लढाईचे वेळी तुम्ही सरकारला जलमार्गे व खुष्कीचे मार्गे कुमक करावी.

दि. ११ सप्टेंबर १७५९ रोजी पेशव्यांचे दूत गोव्याहून पुण्यास परतले. व्हिसेरेइने त्यांच्याबरोबर तहाच्या वाटाघाटी करण्यासाठी आपला वकील पाठविला. पुणे दरबाराने त्याचा चांगला परामर्ष केला. तो पुणे दरबाराशी तहाच्या वाटाघाटी करून गोव्यास परतल्यावर दि. २० मार्च १७६० रोजी पेशवा आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये गोवा शहरी मैत्रीचा करार झाला. त्यातील काही महत्वाची कलमे पुढीलप्रमाणे आहेत:

१. इस्ताद (पोर्तुगीज सरकार) आणि मराठ्यांचा पंतप्रधान यांच्यामध्ये मैत्रीचे संबंध असावे. उभयपक्षानी युद्धप्रसंगी परस्पराना कुमक करावी. पंतप्रधानाचे आणि इतर टोपीकरांचे युद्ध जुंपले तरी देखील पोर्तुगीजानी पेशव्यांस मदत करावी.

२. पंतप्रधान आणि जिंजिऱ्याचा सिद्दी यांच्यामध्ये युद्ध जुंपले तर गोवा सरकारने पंतप्रधानास मदत करावी. एकूण ६०० सैनिक गोवा सरकारने पंतप्रधानाच्या दिमतीस द्यावे.

उपर्युक्त कराराप्रमाणे पेशव्यांच्या सैन्याने सिद्दीच्या ताब्यातील कासा (पद्मदुर्ग) आणि दंडाराजापुरी या दोन ठाण्यावर हल्ले केले तेव्हा पोर्तुगीजानी पेशव्याना सैन्य धाडून मदत केली होती. पेशव्यांच्या सैन्याचे नेतृत्व रामजी महादेव बर्वे याच्याकडे होते. व्हिसेरेइने त्याच्याविषयी पुढील शेरा मारला : 'या सरदारास बढती मिळाली ती त्याच्यामधील अंगभूत गुणामुळे नसून केवळ त्याच्या नशिबाने.'

व्हिसेरेइने सिद्दीविरुद्ध पेशव्यास सैन्याची आणि आरमाराची कुमक केल्याने मुंबईकर इंग्रजांचा जळफळाट झाला. कारण सिद्दी त्यांचा आश्रीत होता.

दि. १५ एप्रिल १७६० रोजी मुंबईच्या गव्हर्नरने नानासाहेबास पत्र पाठवून धमकी दिली की, 'पोर्तुगीज तोफानी सिद्दीच्या किल्ल्यात गोळे टाकले तर आम्ही सिद्दीच्या मदतीस जाऊ.' ही धमकी त्यानी खरी केली.

इ. स. १७६१ च्या फेब्रुवारीत पोर्तुगीज आरमार आणि सैन्य सिद्दीविरुद्ध पेशव्यांच्या कुमकेस गेले, तेव्हा मुंबईकर इंग्रजानी सिद्दीचे किल्ले आपल्या ताब्यांत घेऊन त्यावर आपले ध्वज फडकावले.

मराठी कागदपत्रात पोर्तुगीजांच्या कुमकेच्या बदली पेशव्याने त्याना द्रव्य देण्याचा करार केल्याचा उल्लेख आढळत नाही. परंतु पोर्तुगीज कागदपत्रात तो उल्लेख आढळतो : 'नानासाहेब पेशव्याने पोर्तुगीजाना सिद्दीविरुद्धच्या कुमकेबाबत प्रथम सालिना एक लक्ष रुपये सिद्दीचे किल्ले घेईस्तोवर द्यावे व त्या मोहिमेच्या अखेरीस आणखी पन्नास हजार रुपये द्यावे असे ठरले होते. या करारानुसार पोर्तुगीज आरमार दंडाराजापुरीस गेले, तेव्हा त्या किल्ल्यावर त्याला इंग्रज ध्वज फडकत असलेला दिसला. किल्ल्यानजीकच्या पाण्यात काही इंग्रज युद्धनौकाही नांगर टाकून असलेल्या त्याना आढळल्या. इंग्रज आरमाराच्या कमांडरने पोर्तुगीज आरमाराच्या कमांडरची भेट घेऊन जेव्हा सांगितले की दंडाराजापुरीचा किल्ला सिद्दीने आपणास दिला आहे, तेव्हा पोर्तुगीज आरमारी अधिकारी ते ऐकून माघारा परतले.

स. १७६१ च्या जानेवारीत पानिपतावर मराठ्यांचा दारुण पराभव झाला. उत्तर हिंदुस्थानातील मराठ्यांचा अंमल जवळजवळ संपुष्टात आला. इंग्रज आणि पोर्तुगीज याना आपले घोडे पुढे दामटण्यास ती संधी चांगली मिळाली. पोर्तुगीजांनी मराठ्याना गोवा राज्याच्या लगतच्या प्रदेशातून हुसकून लावण्याचे ठरविले. अंत्रूज महालांतील मर्दनगड हे पोर्तुगीजांच्या काळजातील एक सलते शल्य होते. ते उपटून टाकीस्तोवर त्याना स्वस्थता लाभणे शक्य नव्हते.

स. १७६२ साली वाडीकर सावंत आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये एक गुप्त करार झाला. ह्या कराराप्रमाणे वाडीकर सावंतानी मर्दनगड घेण्यासाठी सोंधेच्या राजास दोन हजार सैन्याची कुमक करावी व त्याबदली पोर्तुगीजानी सावंताना आर्थिक मदत द्यावी असे ठरले. ह्या गुप्त कराराखेरीज पोर्तुगीजानी मर्दनगडावरील मराठा शिबंदीच्या अधिकाऱ्याना लांच चारून तो किल्ला घेण्याचाही प्रयत्न सुरू केला होता. पोर्तुगीजांकडून लांच घेणारे अधिकारी पुढील प्रमाणे होते : बापूजीपंत मुजुमदार, रामजी हरि आणि रघुजी सावंत. ह्या तिघा फितुरानी मर्दनगड पोर्तुगीजांच्या ताब्यात देण्याचे कबूल केले होते. परंतु तत्पूर्वी एक आकस्मिक घटना घडली.

पेशव्यांच्या आरमाराचा दर्यासारंग आनंदराव धुळप याने माकावहून गोव्यास निघालेले एक पोर्तुगीज जहाज पाठलाग करून पकडले. ह्या आगळिकेबद्दल मराठ्याना शासन करण्यासाठी व्हिसेरेइ कौंट द एगा हा सातशे सैनिक घेऊन फोंड्यावर चालून गेला. सावंतांचा कारभारी जिवाजी सबनीस याने मराठ्यांच्या रोषाची पर्वा न करता पोर्तुगीजाना पांचशे सैनिकांची कुमक केली. मर्दनगडावर मराठ्यांची सातशे सैनिकांची शिबंदी होती. तिने आक्रमकांचा कसून प्रतिकार केला. तब्बल तेरा दिवस त्यानी किल्ला लढविला. परंतु नंतर किल्ल्यात पाण्याची टंचाई निर्माण झाल्याने दि. ३१ मे १७६३ रोजी त्यानी शरणागती पत्करली. पोर्तुगीजानी किल्ला ताब्यात घेऊन मराठा सैनिकाना त्यांच्या हत्यारांसह जाऊ दिले. त्यानी किल्ला खाली केल्यावर पोर्तुगीजानी तोफा डागून तो जमीनदोस्त करून टाकला. मर्दनगड गेल्याने अंत्रूज महालही मराठ्यांच्या हातचा गेला. पोर्तुगीजानी तो आपल्या राज्यास जोडला. परंतु तो नंतर त्यानी सोंधेच्या राजास करार करून दिला. मात्र आपल्या सैन्याची एक शिबंदी सोंधेच्या राजाच्या खर्चाने फोंड्यास ठेवण्याची शर्त घातली.

मर्दनगड संभाजी महाराजानी पोर्तुगीजांच्या ताब्यातील सेंट स्टिफन बेटावरील किल्ला पाडून त्याची दगडमाती आणून बांधिला होता. तो पाडून जमीनदोस्त करण्यास पोर्तुगीजाना सत्तावीस दिवस लागले. त्याची नावनिशाणीही त्यानी त्याच्या जागेवर ठेवली नाही.

मर्दनगड घेण्यासाठी वाडीकर सावंतांचा कारभारी जिवबा सबनीस याने पोर्तुगीजाना पाचशे सैनिकांची कुमक केल्याचा उल्लेख वर आलाच आहे. अशी माहिती उपलब्ध आहे की, या किल्ल्यासंबंधीची जी गुप्त माहिती जिवबास होती ती त्याने पोर्तुगीजाना पुरविली. किल्ल्यातील फितुराना पोर्तुगीजानी अठ्ठावीस हजार अश्रफी दिल्या.

अनुक्रमणिका

# १५. पेशवाईची अखेर

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात एकादा धूमकेतू उगवावा त्याप्रमाणे हैदरअल्लीचा उदय कर्नाटकात झाला. म्हैसूरच्या राजाच्या पदरी साधा शिपाई म्हणून असलेल्या ह्या तुर्की मुसलमानाने हा हा म्हणता म्हैसूरचा राजा व त्याचा दिवाण या दोघाना कैद करून म्हैसूरचे राज्य बळकावले. नंतर त्याने कर्नाटकातील पाळेगारांवर आपला वरवंटा फिरविला. त्यात सोंधेचा राजा सापडल्याने त्याला आपल्या कुटुंबियासह पळ काढावा लागला. स. १७६४ च्या जानेवारी महिन्यात त्याने अंत्रुज महालातील बांदोडे गावी येऊन आपला दरबार सुरू केला व पोर्तुगीजांचे संरक्षण घेतले.

सोंधे हे विजयनगरच्या साम्राज्यातील एक छोटे संस्थान. विजयनगरचा पाडाव झाल्यावर सोंधेचा राजा मुसलमान जेत्यांचे मांडलिकत्व पत्करून जगत होता; परंतु हैदरअल्लीच्या राज्यतृष्णेमुळे त्याला आपल्या राज्यावर उदक सोडून देशांतर करावे लागले.

हैदरअल्लीने सोंधे संस्थान घेतल्यावर त्याच्या अमलाखालचे अंकोला, सिवेश्वर, वगैरे महाल व सदाशिवगड हस्तगत करून अडवट अथवा काणकोण महालात सैन्य घुसविले. सन १७६३ च्या डिसेंबर महिन्यात त्याने काणकोण महालातील खोलगड किल्ल्यावर तोफांचे मोर्चे लावले.

सोंधेचा राजा अंत्रुज महालात येऊन राहिला, तेव्हा त्याने पोर्तुगीजांशी मैत्रीचा करार करून त्यांचे संरक्षण घेतले होते. हैदरअल्लीने खोलगडास तोफांचे मोर्चे लावताच त्याने सदहू परस्पर सहाय्याच्या करारान्वये पोर्तुगीजाना काणकोण उर्फ अडवट प्रांतात सैन्य धाडण्यास प्रवृत्त केले. पोर्तुगीजांनी त्वरीत सैन्याची हालचाल करून काणकोण महाल व्यापिला व हैदरअल्लीस खोलगडचा वेढा उठविण्यास सांगितले. त्यादरम्यान माधवराव पेशवे यानी हैदरअल्लीच्या पारिपत्यासाठी कारवार प्रांतात सैन्य धाडले होते.

हैदरअल्लीने पोर्तुगीजांच्या धमकीस भीक घालून खोलगडचा वेढा उठविला नसता. परंतु कारवार प्रांतात मराठ्यांचे आगमन झाल्याने त्याना तोंड देण्यासाठी त्याला खोलगडचा वेढा उठवून काणकोणमधून माघार घ्यावी लागली.

हैदरअल्ली काणकोण महालातून माघारा परतला. तरी पोर्तुगीजानी काणकोणमधून आपले सैन्य मागे घेतले नाही ते नाहीच, उलट कारवारपर्यंत चाल करून त्यानी सदाशिवगड ताब्यात घेतला.

त्या दरम्यान माधवराव पेशवे स्वस्थ बसून नव्हते. त्याना पोर्तुगीजानी घेतलेला मर्दनगडचा टापू हवा होता. त्यानी दि. ३ ऑगस्ट १७६४ रोजी व्हिसेरेइला पत्र पाठवून मर्दनगड व त्याच्या कक्षेतील प्रदेश खाली करून तो मराठा अमलदाराच्या हवाली करावयास सांगितले. तसेच पोर्तुगीज व मराठे यांच्यामध्ये झालेल्या मैत्रीच्या करारान्वये हैदरअल्लीविरूद्ध आपणास मदत करण्याचे आवाहन केले.

गोव्याच्या व्हिसेरेइने माधवराव पेशवे यांच्या पत्राची दखल तर घेतली नाहीच; उलट पोर्तुगीजानी मराठ्यांच्या अमलाखालचा सुपेचा किल्ला घेऊन तिनई व दिघीच्या घाटातून मराठे खाली उतरू नयेत म्हणून त्या दोन्ही खिंडी सैन्य ठेवून रोखून धरल्या.

अनुक्रमणिका

व्हिसेरेइने आपल्या पत्राची दखल घेतली नाही ती नाहीच, उलट सुपेचा किल्ला घेतला म्हणून माधवराव पेशवे यानी पोर्तुगीजांविरुद्ध कोणतीच कारवाई केली नाही. त्यानी जानोजी धुळप आणि मर्दनगडाचा माजी सुभेदार येसाजीराम या दोघाना मोठे सैन्य देऊन कोकणात धाडले. परंतु त्यांना बलप्रयोग करून मर्दनगड व त्याच्या कक्षेतील टापू घेण्याचा हुकूम नव्हता. हे सैन्य हैदरअल्लीचा मुलुख घेण्यासाठी म्हणून पाठविण्यात आले होते. माधवराव जानोजी धुळप यास लिहीत होते की, 'फिरंग्यास मायममतेत घेऊन सरकार कामावर उपयोगी पडे ते करणे.'

इ. स. १७६४ ते १७७२ या दरम्यानच्या काळात माधवराव पेशवे यानी हैदरअल्लीवर चार स्वाऱ्या केल्या. परंतु प्रत्येक वेळी पोर्तुगीज मराठ्याना मदत न करता तटस्थ राहिले.

स. १७७१ साली पेशव्यांचे सैन्य हैदरअल्लीवर चालून जात असता त्याला फोंडे महालातून कर्नाटकात जाण्यास वाट द्यावी म्हणून पेशव्याने व्हिसेरेइला पत्र पाठविले. हे सैन्य सरदार विसाजीपंत लेले यांच्या हाताखाली होते व त्यात दहा हजार सैनिक होते. शिवाय मराठ्यांचे एक मोठे आरमारही मसुरे बंदरात येऊन राहिले होते. त्यात पंच्यायशी लढाऊ गलबते होती. परंतु मराठ्यांच्या दहा हजार सैन्याची किंवा त्यांच्या प्रचंड आरमाराची भीति पोर्तुगीजाना वाटली नाही. त्यानी मराठ्याना फोंडे महालातून कर्नाटकात जाण्यास वाट दिली नाही. वस्तुस्थिती अशी होती की, एकदा सैन्य फोंडे महालात शिरले की, त्याने तेथून न हलता फोंडे महाल हस्तगत करावा व पोर्तुगीजानी पाडून टाकलेला मर्दनगड त्यांच्याकडून बांधून घ्यावा, असा मनसुबा मराठ्यानी केला होता. त्याचा सुगावा पोर्तुगीजाना लागल्याने त्यांनी विसाजीपंत लेले यास फोंडे महालातून कर्नाटकात सैन्य नेण्यास परवानगी दिली नसावी.

पोर्तुगीजांनी फोंडे महालातून आपल्या सैन्यास कर्नाटकात जाऊ देण्यास वाट दिली नाही तर फोंडे महाल बळजबरीने घेण्याचा बेत विसाजीपंतानी केला होता. परंतु यावेळीही माधवराव पेशवे यांचे पोर्तुगीजांविषयींचे नरम धोरण विसाजीपंताच्या निर्धाराच्या आड आले. त्याचे कारणे असे. पेशव्यांच्या कुटुंबाशी 'फादर लेयांद्रु द माद्रि दे देऊश' या नावाच्या पोर्तुगीज डॉक्टराचा घरोबा होता. माधवराव पेशवे यांच्यावर तो डॉक्टर उपचार करीत होता. त्याने पोर्तुगीजांविषयी माधवराव पेशवे यांच्यापाशी रदबदली करून विसाजीपंतानी फोंड्यात सैन्य घुसवू नये म्हणून माधवरावांचा हुकूम मिळविला. माधवराव विसाजीपंतास लिहीत होते : 'हैदरवरील मसलतीस फिरंगी यांच्या तालुक्याखेरीज बाहिरीने जवळच मार्ग आहे, त्यामार्गे जावे. फिरंगीयाच्या बिघाडात जे राजकारण असेल ते न करणे. एकंदर फिरंगी यांजकडे विरोध पडे ऐसा मनसबच न करणे.'

'पाद्रो लेयांद्रु द माद्री द देऊश' हा पोर्तुगीज डॉक्टर माधवराव पेशवे थेऊरास गेले तेव्हा त्यांच्याबरोबर होता. माधवरावांचे थेऊरास निधन झाले तेव्हाही त्याचा मुक्काम थेऊरास होता.

माधवराव पेशवे हे करारी बाण्याचे असल्याने पोर्तुगीजांना शासन करण्यास त्यानी कमी केले नसते. केवळ उपरिनिर्दिष्ट डॉक्टराच्या लोभामुळे ते त्यांच्या वाटेस गेले नसावेत. मात्र पोर्तुगीजानी मर्दनगड पाडून टाकल्याचा विषाद त्याना वाटत होता. हा किल्ला पोर्तुगीजानी स्वखर्चाने पुनः बांधून द्यावा, म्हणून त्यानी त्यांच्यामागे टुमणे लावले होते. आणि त्यांचा रोष नको म्हणून पोर्तुगीजांनी मर्दनगड पुनः उभारण्याचा बेत केला होता. पण तोंपर्यंत माधवरावांचे अकाली निधन झाल्याने मर्दनचा बांधायचा राहून गेला.

स. १७७२ च्या मार्च महिन्यात पेशव्यांच्या आरमाराचा दर्यासारंग जानोजी धुळप याने गोव्याहून मंगळूरकडे जाणाऱ्या एका पोर्तुगीज आरमारी तुकडीवर हल्ला करून 'सांतान' नावाचे फ्रिगेट पकडले. ते वीस तोफांचे असून त्यावर वीस गोलंदाज आणि एकशे वीस बंदुकधारी शिपायी होते. 'सांतान' ह्या मोठ्या युद्धनौकेखेरीज दोन लढाऊ 'स्लूप्स' आणि काही व्यापारी जहाजेही धुळपानी पकडली. ही बातमी गोव्याला कळताच धुळपांच्या पाठलागास काही युद्धनौका पाठविण्यात आल्या. त्यांची धुळपांच्या युद्धनौकांची गाठ पडून मोठी लढाई झाली. पोर्तुगीजांचा दावा आहे की, त्यानी धुळपांकडून दोन 'स्लूप्स' सोडवून घेतली. परंतु 'सांतान' धुळपानी सोडले नाही. ते त्यानी विजयदुर्गला नेले.

नारायणरावाच्या खुनानंतर राघोबादादा पेशवाईवर आला. परंतु बारभाईचे कारस्थान यशस्वी होऊन सवाई माधवरावास पेशवाईची वस्त्रे मिळाली, तेव्हा राघोबाचे मागे भ्रमंती लागली. त्याच्या मनात पोर्तुगीजांच्या आश्रयास दमण येथे जाऊन राहायचे असल्याने त्याने सुरत येथील पोर्तुगीज वखारीचा प्रमुख 'जेरोनिमु रिबॅरू नोव्हिस' याच्यामार्फत दमणच्या कॅप्टनशी संदर्भ लावला. पोर्तुगीजानी सैन्याची मदत केल्यास राघोबादादा त्याना ठाणे जिल्ह्यातील वसई वगैरे पूर्वीचा पोर्तुगीज प्रदेश परत करण्यास तयार होता. परंतु पोर्तुगीजानी लष्करी मदत देण्यास नकार दिला. फक्त काही अटीवर दमण येथे वास्तव्य करण्यास परवानगी दिली. ती पडत्या फळाची आज्ञा घेऊन राघोबादादाने स. १७७६ च्या ऑगष्ट महिन्यात आपल्या परिवारासह दमणला कुच केले. परंतु दमणच्या कॅप्टनने त्याला लगेच आत घेतले नाही. त्याची परवाना मिळेपर्यंत त्याला दमणच्या हद्दीपर्यंत काही दिवस मार्गप्रतिक्षा करावी लागली. राघोबाचा मुक्काम दमणला २५ ऑगष्टपासून अक्टोबर महिन्याअखेरपर्यंत होता. तेथून त्याने तारापूरला व मग मुंबईला प्रयाण केले.

पेशव्यांच्या आरमाराचे प्रमुख जानोजी धुळप यानी पोर्तुगीजांचे 'सांतान' नावाचे 'फ्रिगेट' पकडून विजयदुर्गला नेल्याचा उल्लेख मागे आलाच आहे. हे फ्रिगेट सुस्थितीत पोर्तुगीजांच्या हातास लागले नाही. धुळपानी त्याच्या तोफा आणि इतर उपयुक्त सामान काढून घेऊन फक्त त्याचा सांगाडा तेवढा पोर्तुगीजांच्या हवाली केला. परंतु सांगाडा मिळाल्याने पोर्तुगीजांचे समाधान झाले नाही. त्यानी पुणे दरबाराकडे त्याची नुकसान भरपायी मागितली. पुणे दरबाराने ६६४५४ रुपये, ३००० रुपयांचे लाकूड व बारा हजार रुपये उत्पन्नाची गावे नुकसान भरपायीदाखल देऊ केली. दि. ११ जानेवारी १७८० या दिवशी पुणे दरबार आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये सांतान युद्धनौकेच्या नुकसान भरपायीबाबत करार झाला. तदनुसार पोर्तुगीजाना नगरहवेलीत बारा हजार रुपये उत्पन्नाची ७२ गावे मिळाली. त्यांचा ताबा पोर्तुगीजानी अनुक्रमे दि. १० जून १७८३ व दि. २२ जुलै १७८५ रोजी घेतला.

स. १७८५ साली पोर्तुगीज आणि पुणे दरबार यांच्यामध्ये जो करार झाला त्यात नगरहवेलीतील हिंदूना धर्मस्वातंत्र्य असावे, गोहत्त्येस बंदी, हिंदूंच्या परंपरागत चालीरितींचे व देवालयांचे संरक्षण वगैरे अटींचा समावेश आहे.

तत्पूर्वी स. १७८० मध्ये झालेल्या तहात पोर्तुगीजानी मराठ्यांच्या शत्रूना कोणत्याच प्रकारची मदत करू नये व मराठ्यानीही पोर्तुगीजांच्या शत्रूना मदत करू नये, हे कलम होते. त्याचप्रमाणे एका राज्यातील शिपाई दुसऱ्या राज्यात पळून गेल्यास त्याना परत करणे हेही एक कलम होते. पैकी पहिल्या कलमास अनुसरून राघोबादादास दमणमध्ये आश्रय मिळू शकला नाही. दुसऱ्या कलमान्वये नारायणरावाचा एक

अनुक्रमणिका

मारेकरी तुळ्या पवार हा जो गोव्याला पळून गेला होता, त्याला पोर्तुगीज अधिकाऱ्यानी स. १७८० सालच्या डिसेंबर महिन्यात पुणे दरबाराच्या हवाली केले.

टिपूविरूद्धच्या युद्धात पुणे दरबाराने पोर्तुगीजांकडे मदत मागितली होती. परंतु पोर्तुगीजाना आपल्या झाकल्या मुठीत काय आहे त्याची कल्पना असल्याने टिपूसारख्या मातबर सत्ताधाऱ्याचे शत्रूत्व पत्करण्यास त्यानी नकार दिला.

गोव्यातील पोर्तुगीज सत्ता ही फार जुनी. एकेकाळी पोर्तुगीजांचा सर्वत्र मोठा दरारा होता. हिंदुस्थानात उदयास येणारे नवीन सत्ताधारी त्यांच्याकडे नेहमी मदतीची याचना करीत. परंतु अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात पोर्तुगीजांचे सामर्थ्य पूर्वीसारखे उरले नव्हते. त्यांची अवस्था अत्यंत शोचनीय होती. आर्थिक अडचणीमुळे त्याना लष्कर कपात करावी लागली होती व नोकरांचा पगार नियमीतपणे घालणे मुष्किल होऊन बसले होते.

स. १७८७ साली पोर्तुगीज लष्करात ७१४० लोक असून त्यातील अवघे २५९० गोरे होते. आरमारात तेवीस युद्धनौका होत्या; पण त्यात साठ तोफांचे एकच फ्रिगेट होते. उरलेल्या बावीस युद्धनौका प्रत्येकी ४२ आणि २६ तोफांच्या होत्या. नौदलात ३११८ नौसैनिक होते.

स. १७८० साली गोव्याचा गव्हर्नर दों फ्रेदेरिक गिल्वेर्म द सौज हा गोव्याच्या परिस्थितीचा अहवाल पोर्तुगालच्या राजास सादर करताना म्हणतो :

‘गोवा शहराला अवकळा आली आहे. या शहरातील काही मोठ्या रस्त्यांवर एकही चांगले घर आढळत नाही. काही रस्त्यांवरील घरे मोडकळीस आली आहेत. जुन्या इमारतींची डागडुजी न झाल्याने त्या भकास वाटतात. पैशाअभावी त्या घरांचे मालक आपल्या घराची दुरुस्ती करू शकत नाहीत. गोवा शहरातील जुन्या वैभवशाली इमारतीपैकी एक कॅथेड्रल आणि काही कॉन्व्हेंटस् तेवढी सुस्थितीत आहेत. काहीना फरशा आहेत; परंतु इतरांची जमीन मातीची आहे. नऊ घरे अद्याप अर्धवट आहेत. शहरालगतच्या नारळीच्या बागेत माडाच्या झावळ्यानी शाकारलेल्या ३५० झोपड्या आहेत. त्यातून ‘खाप्री’ (निग्रो), ‘मुलातो’ आणि अन्य गरीब लोक राहातात. स. १७७९ साली या शहराचा महसूल ३९४९३ अश्रफी तर खर्च ३८२५२ अश्रफी होता.

‘गोव्याचा व्यापार डबघाईस आला आहे. व्यापाऱ्याना पोर्तुगालहून येणाऱ्या मालावर औलंबून राहावे लागते. अन्य मालाचा व्यापार करण्याची ईर्षा इथल्या व्यापाऱ्यांत नाही. नारळ, सुपारी, दारु आणि मीठ ह्या वस्तू छोट्या नौकानी उत्तरेकडील बंदरात जातात. इथला व्यापार हा एवढाच. तेव्हा इथल्या व्यापाराला उत्तेजन मिळाल्याखेरीज या राज्याचा तरणोपाय नाही. तसे झाले नाही तर हे राज्य रसातळास गेल्यावाचून राहाणार नाही. टिपू सुल्तान पोर्तुगीजांचा तिरस्कार करीत असे त्याने कर्नाटकातील तेरा पाद्र्याना पकडून गोव्याकडे पाठवून दिले होते व चाळीस हजार कॅथलिकाना हद्दपार केले होते. गोव्यावर टिपू हल्ला करणार म्हणून पोर्तुगीज लोक भीतीच्या दडपणाखाली वावरत होते. फ्रेचांच्या मदतीने टिपू गोवा घेऊ इछितो अशी बातमी पुणे दरबारातील पोर्तुगीजांचा वकील नारायण शेणवी धुमे याने गोव्याच्या राज्य सचिवाला पाठविली होती. गोव्याचे काही एत्तद्देशीय पाद्री या कटात असल्याचा संशय होता. पोर्तुगीजानी टिपूविरूद्ध मराठ्याना

अनुक्रमणिका

मदत करण्याविषयी असमर्थता दर्शविली त्याचे कारण मराठ्याना मदत केल्यास टिपू गोव्यावर खरोखरच हल्ला करील अशी भीती त्याना वाटत होती.

सोंधेचा राजा हैदरअल्लीच्या भयाने अंत्रुज महालात बांदोडे येथे येऊन राहिला होता हे मागे आलेच आहे. हे राजघराणे शिवाजी महाराजांच्यापासून मराठ्यांचे मांडलिक असल्याने परचक्रापासून त्याचे रक्षण करणे हे मराठ्यांचे कर्तव्य होते. पुणे दरबाराने हैदरअल्ली आणि त्याचा मुलगा टिपू या दोघांशी प्रदीर्घ युद्ध केले, त्यामागे त्या दोघानी कर्नाटकात घेतलेला मराठ्यांचा मुलुख मुक्त करणे व सोंधेच्या राजास त्याचे राज्य परत मिळवून देणे हा हेतू होता. परंतु तो सफल झाला नाही.

दि. २९ ऑगष्ट १७८७ या दिवशी नाना फडणिसानी पुणे दरबारातील पोर्तुगीजांचा वकील नारायण शेणवी धुमे यास बोलवून घेऊन त्याच्यापाशी सोंधेच्या राजाची वास्तपूस केली. ते त्याला म्हणाले, 'संवदेकरांचे पोर्तुगीजानी आजपर्यंत काय केले ते कळून आलेच आहे. आता आपण त्याचे बरवे करू इच्छितो. त्याला आपल्या राज्यावर बसविण्यास शक्य झाल्यास पाहातो.'

नाना फडणीस यांचे वरील उद्‌गार सूचक होते. पोर्तुगीजानी सोंधेच्या राजाचे काहीच बरे केले नव्हते. परस्पर मैत्रीच्या कराराखाली त्यानी सोंधेकरांचे महाल सैन्य धाडून आपल्या ताब्यात घेतले; परंतु सोंधेच्या राजाची त्या महालात काडीचीही सत्ता नव्हती.

दि. ३० जानेवारी १७९१ रोजी पोर्तुगीज सैन्याने टिपू सुल्तानाकडून सदाशिवगडचा ताबा घेतला. बहुदा टिपूचे आणि पोर्तुगीजांचे आतून सूत जमल्यामुळे रक्ताचा एक थेंबही न सांडता टिपूने सदाशिवगडावरील आपली कबज सोडली असावी. तत्पूर्वी म्हणजे दि. १७ जानेवारी १७८१ या दिवशी सोंधेचा राजा व पोर्तुगीज यांच्यामध्ये तहाचा करार होऊन सदाशिवगड व कूर्मगड (शिंपी) ह्या दोन्ही किल्ल्यांवरील आपले हक्क सोंधेच्या राजाने पोर्तुगीजांकडे सुपूर्त केले होते.

दि. २४ जानेवारी १७८१ रोजी मराठ्यानी टिपूकडून कूर्मगड घेतला व सदाशिवगडची कबज करण्यासाठी त्या किल्ल्याच्या किल्लेदाराकडे संधान साधले. त्या दरम्यान मराठ्यांची एक आरमारी तुकडी कारवारला आली होती. तीत दोन मोठी पाले, चार गुराब आणि विसांहून अधिक गलबते होती. ह्या आरमारी तुकडीचा दर्यासारंग बाबूराव साळोखे हा होता.

सदाशिवगड पोर्तुगीजानी घेतल्याचे वर्तमान पुण्यास कळले तेव्हा नाना फडणीस भयंकर संतप्त झाले. त्यानी पोर्तुगीजांचा पुणे दरबारातील वकील विठ्ठलराव वालावलीकर याला बोलवून देऊन निषेध व्यक्त केला. त्यानी तंबी दिली की, पोर्तुगीजानी सदाशिवगड बऱ्या बोलाने खाली केला नसल्यास त्याचा परिणाम वाईट होईल. विठ्ठलराव वालावलिकर यानी नाना फडणीसांशी झालेल्या मुलाखतीचा वृत्तांत लगेच गोव्यास कळविला.

सदाशिवगड परत घेण्याबाबत पोर्तुगीजांशी बोलणी करण्यासाठी पुणे दरबाराने प्रभाकरपंत नावाचा दूत गोव्यास धाडला. दि. २४ डिसेंबर १७९१ रोजी गोव्याच्या गव्हर्नरची आणि प्रभाकरपंताची मुलाखत होऊन, पुढील बोलणी प्रभाकरपंताने राज्यसचिवाशी करावीत असे ठरले. त्या दरम्यान कारवार प्रांतात सैन्य घेऊन आलेले पेशव्यांचे सरदार परशुरामभाऊ पटवर्धन यानी आपला एक दूत गोव्यास धाडला

होता. परंतु ह्या दोन्ही वकिलांच्या वाटाघाटीतून काहीच निष्पन्न झाले नाही. त्यांचे वर्तन आढ्यतेखोर होते, असे मत गोव्याच्या गव्हर्नरने व्यक्त केल्याचा पुरावा उपलब्ध आहे.

सदाशिवगड पोर्तुगीजानी मराठ्यांच्या ताब्यात दिलाच नाही. त्यानी तो एक वर्ष आपणाकडे ठेवून घेऊन नंतर टिपू सुल्तानाकडे देण्याचा हुकूम किल्लेदारास केला. परंतु हा हुकूम अमलात येण्यापूर्वीच मराठ्यानी हालचाल केली. परशुरामभाऊ आपल्या सैन्यासह कारवार प्रांती होतेच. शिवाय मराठ्यांचे आरमारही कूर्मगडाजवळ होते. दोन्ही दलानी सदाशिवगडावर हल्ला चढविला. दर्यासारंग बाबूराव साळोखे यानी सदाशिवगडानजीक सैन्य उतरविले. मराठ्यांशी दोन हात करणे पोर्तुगीजाना शक्य नव्हते. गोव्याचा गव्हर्नर फ्रान्सिश्कु द कुन्य सिनेझिरा याने काणकोण महालातील एक वजनदार मराठा गृहस्थ निळू नाईक देसाई यांच्यामार्फत परशुरामभाऊशी तहाचा संदर्भ लावला. निळू नाईक देसाई व परशुराम पटवर्धन या दोघांचे स्नेहाचे संबंध होते. निळू नाईक देसाई यांची शिष्टाई यशस्वी झाली. परशुरामभाऊनी पोर्तुगीज शिबंदीस सदाशिवगड खाली करून गोव्यास माघार घेण्यास परवानगी दिली.

पोर्तुगीज सैन्य सदाशिवगड खाली करून काणकोण व सिवेश्वरला दोन महालांच्या सिवेवर पोळे येथे येऊन राहिले. ते तेथे १८१८ साली पेशवाईची इतिश्री होईपर्यंत होते.

स. १८०८ साली पुणे दरबारांतील पोर्तुगीजांचा वकील विठ्ठलराव वालावलीकर याचे पुण्यात निधन झाले. त्याच्यामागे त्याचा मुलगा लक्ष्मीनारायण वालावलीकर याची पुणे दरबारातील पोर्तुगीजांचा वकील म्हणून नेमणूक झाली. परंतु १८११ साली पोर्तुगीजानी आपली पुण्यातील वकीलात बंद केली. तेव्हापासून मराठे आणि पोर्तुगीज यांचे संबंध तुटले ते कायमचे.

अनुक्रमणिका

# १६. वाडीकर सावंत

वाडीकर सावंतांचा पोर्तुगीजांशी सबंध आला तो पोर्तुगीजानी गोवा घेतल्यावर. आदिलशाहीच्या अमदानीत सावंत कुडाळ परगण्यात आदिलशहाचे मांडलिक म्हणून राहात होते. इ. स. १५५४ साली मांग सावंत भोसले याने विजापूरची सत्ता झुगारून देऊन आपण स्वतंत्र झाल्याचे जाहीर केले. परंतु हे स्वातंत्र्य फार दिवस टिकले नाही. विजापूरकरानी सावंतावर आपले अधिपत्य पुनः प्रस्थापित केले. फिरून स. १६२७ साली खेम सावंत भोसले याने वाडी संस्थान असल्याचा दावा केल्याचा उल्लेख आढळतो.

इ. स. १६५७ साली शिवाजी महाराजानी दक्षिण कोकण आपल्या अमलाखाली आणले, तेव्हा वाडी संस्थानात लखम सावंत भोसले राज्य करीत होता. शिवाजी महाराजानी त्याला आपले अधिपत्य स्वीकारण्यास भाग पाडले. त्यानी त्याला सरदेसाई हा किताब बहाल केला. या बाबतीत असाही उल्लेख आढळतो की सरदेसाई हा किताब सावंताना विजापूरच्या आदिलशहाने दिला होता. कारण सरदेसाई ही किताबत आदिलशाहीत सुरू झाली.

स. १६५९ साली लखम सावंताने आपल्या राज्याचा निम्मा महसूल शिवाजी महाराजाना देण्याचे कबूल करून तीन हजार पायदळ किल्ल्याच्या रक्षणासाठी ठेवण्याची शिवाजी महाराजांची शर्त मान्य केली. परंतु ह्या अटी लखम सावंतास कडक वाटल्याने त्याने विजापूरच्या सुल्तानाचे मांडलिकत्व फिरून पत्करून शिवाजी महाराजांच्या राज्यास उपद्रव देण्यास प्रारंभ केला. खरे सांगायचे तर वाडीकर सावंत हे स. १४९८ सालापासून विजापूरच्या बादशहाचे मांडलिक होते.

शिवाजी महाराज आणि पोर्तुगीज हे परस्परांपासून दूर होते, तेव्हा त्यांचे संबंध सलोख्याचे होते. परंतु शिवाजी महाराजानी सावंताना आपल्या अधिपत्याखाली आणल्याने त्यांच्या राज्याची सीमा पोर्तुगीजांच्या अमलाखालच्या प्रदेशाला भिडली तेव्हा त्यांच्यामध्ये तेढ निर्माण होण्यास सुरुवात झाली. शिवाजी महाराजांसारख्या समर्थ आणि महत्वाकांक्षी शेजाऱ्यापेक्षा सावंतांसारख्या सर्व सामान्य दुर्बल शेजाऱ्याचे सानिध्य त्याना निरुपद्रवी वाटणे स्वाभाविक होते.

शिवाजी महाराजांचे अधिपत्य सावंताना जाचक वाटत आहे व ते झुगारून देण्यास ते उत्सुक आहेत हे पोर्तुगीजाना माहीत होते. म्हणून ते त्यांना शिवाजी महाराजांविरुद्ध चिथावणी देत असत, द्रव्य सहाय्य देत आणि शस्त्रास्त्रांची आणि दारूगोळ्याची चोरून मदत करीत. शिवाजी महाराजाना पोर्तुगीजांच्या छुप्या शत्रूत्वाची कल्पना असल्याने ते जशास तसे या धोरणानुसार पोर्तुगीजांना टोला हाणण्यास कमी करीत नसत. तरीही पोर्तुगीजानी शिवाजी महाराजांविरुद्ध सावंताना मदत करण्याचे सोडले नाही.

कुडाळचे सावंत यांच्याप्रमाणेच पेडण्याचे काही देसाईही पोर्तुगीजांच्या चिथावणीने शिवाजी महाराजांच्या मुलुखास उपद्रव देत असत. महाराजांच्या सैन्याने त्यांचा पाठलाग केला की ते पोर्तुगीज हद्दीत शिरत. अखेर स. १६६७ च्या नवंबर महिन्यात लखम सावंत, केशव प्रभु, खळू शेवणी आदि देसायांचा पाठलाग करण्याच्या मिषाने पोर्तुगीजाना धडा शिकविण्यासाठी शिवाजी महाराजानी बार्देश प्रांतावर स्वारी केली. ती यशस्वी झाली. व्हिसेरेइ कौंट द सां व्हिसेंत याने शिवाजी महाराजांशी तहाचा संदर्भ लावला. महाराजानी फार ओढून ताणून न धरता तह करण्याची तयारी दर्शविली; परंतु पोर्तुगीजानी बंडखोर देसायाना आपल्या अमलाखालच्या प्रदेशांतून ताबडतोब बाहेर घालवावे ही प्रमुख अट घातली. ती

व्हिसेरेइला मान्य करावी लागली. तहावर स. १६६७ च्या डिसेंबर महिन्यात सह्या झाल्या. तदनुसार स. १६६८ च्या जून महिन्यात पोर्तुगीजानी लखम सावंत व केशव प्रभू या दोघाना गोव्याबाहेर हाकलून लावले. परंतु शिवाजी महाराजानी त्याना काही शासन न करता दयाबुद्धीने वागविले. तरीही वाडीकर सावंताचे आणि शिवाजी महाराजांचे संबंध सुधारले नाहीत.

शिवाजी महाराजांच्या निधनानंतर संभाजी महाराज गादीवर आले. वाडीकर सावंतांचे आणि छत्रपती घराण्याचे हेवेदावे कमी झाले नाहीत. शिवाजी महाराजाप्रमाणे संभाजी महाराजांचाही शेजार पोर्तुगीजाना नको होता. म्हणून त्यानी वाडीकर सावंताना त्यांच्याविरूद्ध चिथावणी देण्याचे आपले जुने धोरण पुढे चालू ठेवले.

संभाजी महाराजांचे आणि पोर्तुगीजांचे युद्ध चालू असता व्हिसेरेइ कौंट द आल्व्होर याने दि. २० जानेवरी १६८५ रोजी पोर्तुगालच्या राजास जे पत्र लिहिले त्यात तो म्हणतो :

‘.........संभाजीशी आमचे युद्ध चालूच आहे. आम्ही कुडाळचा सरदेसाई खेम सावंत याच्याशी मैत्रीचा करार करून त्याला संभाजी विरूद्ध उठविले आहे.’

दि. ८ फेब्रुवारी १६८५ रोजी गोव्याचा व्हिसेरेइ आणि वाडीकर सावंत यांच्यामध्ये संभाजी विरोधी करार झाला. त्यात व्हिसेरेइने सावंताना संभाजीविरूद्ध सर्व प्रकारची मदत करण्याचे कबूल केले. सावंतानी जर पोर्तुगीजांचे मांडलिकत्व पत्करले तर ते आदिलशाहीत आणि शिवाजी महाराजांच्या अमलाखाली ज्या सवलती उपभोगीत होते त्या त्याना देण्यात येतील असे अभिवचन सदहू करारात देण्यात आले.

खेम सावंताने पोर्तुगीजांची मदत घेण्यास मान्यता दर्शविली. तिचा उपयोग करून त्याने संभाजीच्या अमलाखालच्या कुडाळ आणि साखळी महालात बंडाळी माजवायची होती. परंतु त्याने तसे न करता फोंडे महालात पोर्तुगीज प्रदेशातून जाण्याची परवानगी मागितली. ती परवानगी व्हिसेरेइने त्याला नाकारली, पण पोर्तुगीजांच्या आश्रयास येऊल राहिलेल्या देसायाना मोगल सैन्यात नोकरी मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यासंबंधीचा एक ठराव राज्य सल्लागार मंडळाच्या बैठकीत संमत करून घेतला. प्रस्तुतच्या ठरावात म्हटले आहे : ‘गोव्याच्या आश्रयास येऊन राहिलेले कोकणातील देसाई आमच्यामार्फत सैन्यात नोकरी मिळवू इच्छितात. त्यानी तसा अर्ज मला केल्याने हा ठराव मांडण्यात येत आहे.’

खेम सावंत भोसले आणि गोव्याचे व्हिसेरेइ यांच्यामध्ये दि. ८ फेब्रुवारी १६८५ रोजी जो गुप्त करार झाला, त्यातील कलमे पुढीलप्रमाणे आहेत :

१. ते (देसाई) कुडाळपासून अंकोलापर्यंतचा जो मुलुख घेतील त्याची विभागणी तीन भागामध्ये करण्यात यावी. पैकी दोन भाग आम्हाला आणि एक भाग त्याना (सावंताना). सदहू मुलुखात ज्या टेकड्या, किल्ले आणि सुपीक जमीन असेल त्याची विभागणी उत्पन्नानुसार करण्यात यावी.

अनुक्रमणिका

२. जो कुणी कुडाळपासून चौलपर्यंतचा मुलुख घेण्याचा प्रयत्न करील, त्याला आम्ही आरमारी मदत करू. ह्या मदतीबद्दल त्याने आम्हास जिंकलेल्या मुलुखाचा एक तृतीयांश भाग द्यावा. अशीच विभागणी त्या मुलुखातील किल्ले आणि जमीन यांचीही व्हावी.

३. आमचे आरमार त्यांच्या शत्रूच्या केवढ्याही बलाढ्य आरमारापासून त्यांचे रक्षण करील . ते ज्या ज्या ठिकाणी मुलुखगिरीवर जातील त्या त्या ठिकाणी हे आरमार त्यांच्या मदतीला जाईल. या आरमारातील माणसांचा खर्च आमचे राज्य करील व त्याना शस्त्रे व दारूगोळाही पुरवील.

४. या आरमाराचे हवाली ते (देसाई) जो कपडालत्ता, पैसाअडका अथवा कोणत्याही प्रकारचे कापड करतील, ते गोव्याला त्यांच्या ओलीस ठेवण्यात आलेल्या माणसांच्या स्वाधीन करण्यात येईल. या पैशातून त्यांच्या सैन्यात लढणाऱ्या लोकांचा पगार घातला जाईल.

५. आरमाराच्या मदतीखेरीज हे राज्य त्याना दारूगोळा पुरवील. त्याची किंमत त्याना द्यावी लागणार नाही अथवा त्या प्रकारचा दारूगोळा परत करावा लागणार नाही.

६. त्याना मोगल बादशहाचे मांडलिकत्व पत्करायचे असल्यास तत्संबंधीच्या वाटाघाटी त्यांच्यावतीने कौंट व्हिसेरेइ मोगल बादशहाकडे आपली माणसे पाठवून करील.

७. हे युद्ध सुरू होण्यापूर्वी देसायानी एक वजनदार मनुष्य गोव्यास ओलीस म्हणून पाठवावा.

८. ते युद्धात विजयी झाले, तर मोगल राजवटीत त्याना जे स्वातंत्र्य होते आणि संभाजीच्या राजवटीत ते जे स्वातंत्र्य उपभोगीत आहेत ते स्वातंत्र्य त्याना हे राज्य देईल. त्याना त्यांच्या चालीरीती, आचारविचार आणि मूर्तिपूजा यांचे स्वातंत्र्य मिळेल.

९. हे राज्य संभाजीशी तह करणार नाही. त्याचप्रमाणे त्यानीही (देसायानी) संभाजीच्या राज्यात वखारी घालून असलेल्या इंग्रज, डच, फ्रेंच वगैरे लोकांशी संधान जुळवू नये.

१०. हे युद्ध सुरू करण्यासाठी त्याना पैशाची आवश्यकता असल्यास हे राज्य त्याना तो पैसा कर्ज म्हणून देईल. पण युद्ध सुरू झाल्यावर ते कर्ज मिळेल.

११. ही कलमे अमलात यावी म्हणून त्यानी कौंट व्हिसेरेइ यांच्या पसंतीस उतरेल असा एक वजनदार मनुष्य ओलीस म्हणून पाठवावा.

सावंत मंडळीने पोर्तुगीजाना संभाजीच्या राज्यात दंगेधोपे माजविण्याचे वरील करारान्वये कबूल केले होते. तसेच त्यांची इच्छा असल्यास त्याना मोगल बादशहाच्या सैन्यात नोकरी मिळवून देण्याची तयारी व्हिसेरेइने दर्शविली होती. त्याप्रमाणे सावंतानी संभाजीच्या राज्यात बंडाळी माजविली व मग ते मोगल सरदार बहादुरखान याच्या सैन्यात भरती झाले. आपली बायकामुळे अर्थातच त्यानी गोव्यास ठेवली.

अनुक्रमणिका

छत्रपती संभाजी महाराजांच्या वधानंतर छत्रपतींची कोकणातील सत्ता ढिली पडली. ती संधी साधून खेम सावंताने आपली सत्ता बळकट करण्याच्या इराद्याने कुडाळ येथे एक किल्ला बांधण्याचे ठरविले. तसेच पोर्तुगीजांच्या अमलाखालच्या बार्देश प्रांतात त्याची बायका मुले होती त्याना भेटण्यासाठी त्याने व्हिसेरेइची परवानगी मागितली. ती व्हिसेरेइने त्याला दिली. औरंगजेबाच्या स्वारीच्या भयाने छत्रपती राजाराम कर्नाटकात निसटला, तेव्हा कोकणातील बहुतेक सर्व देसायानी त्याला आपली निष्ठा वाहिली. औरंगजेबाने संभाजीची निर्घृण हत्त्या केल्याने महाराष्ट्रात संतापाची जी लाट उसळली ती कोकणातही पसरली. परंतु आश्चर्याची गोष्ट ही की, खेम सावंत भोसले याने मोगलांचा पक्ष सोडला नाही; इतकेच नव्हे तर, छत्रपतीच्या सैन्याशी लढण्याकरिता त्याने पोर्तुगीजांकडे मदत मागितली.

खेम सावंताच्या विनंतीचा विचार करण्यासाठी व्हिसेरेइने दि. १३ ऑगष्ट १६९५ रोजी राज्य सल्लागार मंडळाची बैठक बोलाविली. या प्रसंगी त्याने जे भाषण केले त्याचा तर्जुमा असा :

‘पोर्तुगीज हिंदुस्थानचे माजी व्हिसेरेइ कौंट द आल्व्होर यानी खेम सावंत भोसले याना जरूर लागेल तेव्हा मदत करण्याचे वचन दिले होते. त्या वचनाप्रमाणे त्यानी आमच्याकडे मदतीची याचना केली आहे. त्यानी सूचना केली आहे की, त्यांच्या आठ गलबतानी आणि आमच्या आरमाराने मराठ्यांच्या बंदरावर आणि आरमारावर संयुक्तपणे हल्ले चढवावे.’

सल्लागार मंडळाच्या सदस्यानी दृष्टिकोण व्यक्त केला की, ‘आमच्या आरमाराने खेम सावंताच्या आरमाराशी मराठ्यांच्या बंदरावर आणि आरमारावर हल्ला करण्यासाठी सहकार्य करू नये. मात्र सावंताच्या आरमाराला उत्तरेकडे अथवा दक्षिणेकडे जायचे झाल्यास संरक्षण अवश्य द्यावे.’

हा सल्ला व्हिसेरेइला मान्य झाल्याने त्याने तदनुसार वागण्याचे ठरविले. उपरिनिर्दिष्ट ठरावावरून पोर्तुगीज लोक केवढे धोरणी होते त्याची कल्पना करता येते. ते सावंताना उघडपणे मदत करण्यास तयार नव्हते. मात्र मदत गुप्तपणे मदत करण्याच्या त्यांच्या धोरणात बदल झाला नव्हता.

खेम सावंताने कुडाळचा किल्ला घेतल्याचे व्हिसेरेइला कळले, तेव्हा त्याने दि. १७ ऑगष्ट १६९६ रोजी पत्र घालून त्याचे अभिनंदन केले. स. १६९६ साली खेम सावंताने मोगलांच्या ताब्यात असलेल्या धारगडच्या किल्ल्यावर हल्ला केला. त्याचा उल्लेख फोंड्याचा मोगल सुभेदार रफीखान याने गोव्याच्या व्हिसेरेइला पाठविलेल्या पत्रात आढळतो. रफीखानाने प्रस्तुतच्या पत्रात आपण सावंताविरुद्ध लष्करी मोहीम सुरु करणार असल्याचे म्हटले आहे व पोर्तुगीजानी दारूची पिंपे आणि तोफांचे गोळे पाठविल्याबद्दल आभार मानले आहेत.

खेम सावंताने मोगलांच्या ताब्यात असलेले साखळी आणि डिचोली हे दोन किल्ले घेतले व फोंड्याच्या किल्ल्यास वेढा घातला. फोंड्याच्या नबाबाने पोर्तुगीजांकडे दारुगोळ्याची मदत मागितली व त्या मदतीबद्दल त्याना बार्देशच्या हद्दीवरील काही मुलुख देण्याचे कबूल केले. आपल्या राज्याच्या हद्दीला लागून असलेले सत्ताधारी आपल्याहून वरचढ होऊ द्यायचे नाहीत, हे पोर्तुगीजांचे धोरण असल्याने खेम सावंताविरुद्ध त्यानी फोंड्याच्या नबाबास दारू गोळ्याची मदत केली. ह्याविषयी दि. १५ डिसेंबर १६९८ रोजी गोव्याचा व्हिसेरेइ पोर्तुगालच्या राजास लिहिलेल्या पत्रात म्हणतो :

अनुक्रमणिका

खेम सावंत भोसले यानी फोंड्याच्या नबाबाविरूद्ध बंड करून मोगल बादशहाचे साखळी आणि डिचोली हे दोन किल्ले घेतले. फोंडाच्या नबाबापाशी दारूगोळा आणि माणसे यांची कमतरता असल्याची माहिती मिळाल्याने त्यानी ही संधी साधून वरील दोन्ही किल्ले घेतले व नंतर फोंड्याच्या किल्ल्यास वेढा घातला. आमच्याकडून नबाबास मदत झाली नसती तर खेम सावंत भोसले हे फोंड्याचा किल्ला घेतल्याशिवाय राहिले नसते.

'मोगल बादशहाला मदत करणे आम्हाला क्रमप्राप्तच होते. त्याच्या बंदरांत आमच्या जहाजाना चांगली वागणूक मिळते. दुसरी गोष्ट म्हणजे खेम सावंतानी फोंड्याचा किल्ला घेतला असता तर तो परत घेण्यासाठी मोगल बादशहा फोंड्याकडे मोठे सैन्य पाठविल्यावाचून राहिला नसता. ह्या सैन्याचा उपसर्ग केवळ खेम सावंत भोसले आणि मराठे यानाच पोहोचला नसता तर आम्हालाही तो पोहोचला असता. आमच्यावर ह्या सैन्याच्या सानिध्यामुळे उपासमारीची पाळी आली असती. तिसरी गोष्ट, फोंड्याच्या नबाबाने त्याला केलेल्या मदतीबद्दल आम्हाला बार्देश प्रांताच्या हद्दीला लागून असलेली चोवीस खेडी देण्याचे कबूल केले आहे. ह्या खेड्यांचा महसूल आम्हाला चांगला मिळेल. परंतु ह्या सौद्याला मोगल बादशहाची संमती मिळाली पाहिजे. त्याची आम्ही वाट पाहात आहो.'

खेम सावंताने मोगल बादशहाविरूद्ध बंडखोरी केल्याने बादशहा त्याच्यावर क्रोधाविष्ट झाला. तो आपले पारिपत्य करणार आहे हे कळताच खेम सावंताने पोर्तुगीजांकडे आश्रयाची मागणी केली. ती मागणी व्हिसेरेइने मान्य केली. दि. २ सप्टेंबर १६९९ या दिवशी खेम सावंताने पोर्तुगीजांचे मांडलिकत्व पत्करले. व्हिसेरेइने त्याच्यावर पुढील अटी लादल्या :

'सरदेसाई खेम सावंत भोसले यानी पोर्तुगीज—मराठा युद्धात ज्या कळकळीने आणि इमाने-इतबारे पोर्तुगीजाना मदत केली, त्याबद्दल त्याना ह्या राज्याकडून वांरवार आश्रय मिळत आला आहे. त्यांच्या हातून पीरखान ह्याची हत्त्या घडली म्हणून त्यांच्या सर्व सवलती काढून घेण्यात आल्याने त्याला ह्या राज्याचा आश्रय घ्यावा लागत आहे. त्यांनी आता पोर्तुगालच्या अति प्रशांत महाराजांचे मांडलिकत्व पत्करून त्यांची सेवा करण्याचे कबूल केले आहे.

'त्यांच्या हातून जो अपराध घडला तो हेतु पुरस्सर नसून भावनेच्या भरात घडला. त्यांच्या इमानीपणाबद्दल शंका घेण्यास जागा नाही. त्यानी आपला ध्वज माझ्या पायाशी ठेवून माझ्या स्वामीचे मांडलिकत्व पत्करले आहे. त्यांनी आमच्या स्वामीची आणि ह्या राज्याची सेवा करण्याचे वचन दिले असल्याने त्यांच्या हातून घडलेले अपराध त्याना माफ करण्यात येत आहेत.

'मराठे, अरब आणि मलबारी ह्यांच्याविरुद्ध खेम सावंताना आमचे संरक्षण मिळेल. इतकेच नव्हे तर त्यांच्या विरुद्ध लढण्यासही आम्ही त्याना मदत करू. मात्र मोगल बादशहाविरुद्ध त्याना आमची मदत मिळणार नाही. त्याचे कारण म्हणजे मोगल बादशहाशी आमचे मैत्रीचे संबंध आहेत.

'खेम सावंत भोसले यांचे वास्तव्य पूर्वी बार्देशमध्ये होते. आताही त्याना तेथे राहावयास परवानगी देण्यात येत आहे.

अनुक्रमणिका

'ज्याअर्थी त्यानी आमच्या स्वामीचे मांडलिकत्व पत्करले आहे त्याअर्थी ते त्यांचे सेवक बनले आहेत. त्यामुळे त्याना ह्या राज्याच्या रक्षणार्थ आमच्या शत्रूशी लढावे लागेल. मात्र त्यांच्या माणसांचा खर्च त्याना स्वतःच करावा लागेल.'

फोंड्याच्या मोगल सुभेदाराने बार्देश प्रांताच्या हद्दीवर एक किल्ला बांधून सिद्दी नावाच्या माणसाची नेमणूक केली होती. हा किल्लेदार तिकडून येणाऱ्या जाणाऱ्या लोकांकडून भरमसाट जकात वसूल करीत असे. खेम सावंताने मोगलांविरूद्ध बंडाळी सुरू केली, तेव्हा पोर्तुगीजाना अन्नधान्याची वा इतर वस्तूंची मदत धाडण्याच्या मार्गात प्रस्तूतच्या किल्ल्याचा अडसर येऊ लागला. ही मदत पोर्तुगीज अधिकारी खेम सावंतास चोरून करीत असत. कारण मोगल बादशहाशी त्यांचे मैत्रीचे संबंध असल्याने व खेम सावंत बंडखोर असल्याने त्याना त्याला उघडपणे मदत करता येत नसे. अशा परिस्थितीत त्या किल्ल्याचा अडसर दूर केल्याखेरीज पोर्तुगीजाना खेम सावंतास मोठ्या प्रमाणात मदत पाठविता येत नव्हती. म्हणून त्यानी एक शक्कल लढविली. त्यानी फोंड्याच्या सुभादारास पटवून देण्याचा प्रयत्न केला की, त्यानी बार्देशच्या हद्दीवर बांधलेला किल्ला खेम सावंताच्या हाती पडला तर त्याचा उपसर्ग आपण दोघानाही पोहोचेल. म्हणून तो पाडून टाकलेला बरा. बिचाऱ्या भोळ्या भाबड्या मोगल सुभेदारास पोर्तुगीज अधिकाऱ्यांचे म्हणणे पटले व त्याने तो किल्ला पाडून जमीनदोस्त करण्याचा हुकूम आपल्या लोकाना केला.

किल्ल्याचा अडसर दूर झाल्याने खेम सावंतास पोर्तुगीजाकडून मोठ्या प्रमाणात मदत मिळू लागली. त्या मदतीच्या बळावर मोगलानी त्याचा जो प्रदेश घेतला होता तो त्याला फिरून घेणे शक्य झाले. परंतु पोर्तुगीजांकडून खेम सावंतास मदत झाल्याचा सुगावा मोगलाना शेवटपर्यंत लागला नाही.

मोगल आणि खेम सावंत भोसले यांची फोंडा येथे लढाई होऊन तीत फोंड्याचा किल्लेदार सय्यद गुलाम इब्राहिम हा प्राणांतिक जखमी झाला. त्याला पोर्तुगीजानी उपचारासाठी गोव्यास पाचारण केले. परंतु गोव्यास निघण्यापूर्वीच तो मरण पावला. त्याच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी बेळगावचा मोगल सुभेदार बसालतखान याने आपल्या बंधूस सैन्य देऊन खेम सावंताच्या पारिपत्यास फोंड्यास पाठविले. त्याने गोव्याच्या व्हिसेरेइला पत्र पाठवून आपल्या भावास दारुगोळ्याची व इतर वस्तूची मदत करण्याबद्दल पत्र पाठविले. व्हिसेरेइने बसालतखानास उत्तर धाडून कळविले की, त्याच्या भावास मदत पाठविण्याची आपण कोशिस करू; परंतु पोर्तुगीज लोक मोगलाना त्यांच्या शत्रूविरूद्ध मदत करतात तशी मदत मोगल अधिकारी पोर्तुगीजांना त्यांच्या अरबांसारख्या शत्रूविरूद्ध मदत करीत नाहीत.

बसालतखानाप्रमाणे त्याचा भाऊ इसाकखान, व फोंड्याचा नवीन किल्लेदार रसूलखान या दोघानीही गोव्याच्या व्हिसेरेइकडे भोसल्याविरूद्ध दारूगोळ्याची मदत मागितली. ती मदत त्याने त्याना पाठविली. पण बसालतखानाने पोर्तुगीजांच्या न कळत खेम सावंताशी समझौता केला. हे जेव्हा व्हिसेरेइला कळले तेव्हा त्याला विषाद वाटून त्याने बसालतखानाला निषेधपर पत्र पाठविले.

मोगलांशी समझौता झाल्यावर खेम सावंताने पोर्तुगीजांच्या प्रदेशात लुटालूट करण्यास प्रारंभ केला. गोव्याच्या व्हिसेरेइने त्याला पत्र पाठवून त्याचा निषेध केला.

दि. २८ सप्टेंबर १७०३ रोजी व्हिसेरेइ कायतानु द मेलु द काश्त्रू हिंदुराव घोरपडे याना लिहिलेल्या पत्रात खेम सावंताविषयी म्हणतो :

अनुक्रमणिका

'.........खेम सावंत हा एक बदमाश मनुष्य आहे. आम्ही त्याच्यासाठी जे काय केले ते सर्व विसरून जाऊन तो कृतघ्न बनला. आम्ही त्याचे अनेक संकटातून रक्षण केले व मातबर शत्रुपासून त्याला आश्रय दिला. परंतु ते सर्व तो आपल्या महत्वाकांक्षेपायी विसरून गेला. त्याच्या हातून जी आगळीक घडली आहे त्याबद्दल त्याला शासन झाले पाहिजे.'

वरील पत्रात खेम सावंतने मराठ्याची कुरापत काढल्याबद्दल त्याला शासन करण्याची चिथावणी व्हिसेरेइने हिंदुराव घोरपडे याना दिली आहे. व्हिसेरेइने हिंदुराव घोरपडे याना लिहिल्याप्रमाणे खेम सावंताविरूद्ध हत्यार उपसले. पोर्तुगीज सैन्याने सावंतांच्या ताब्यात असलेली खोर्जुवे आणि पनाळे ही दोन्ही बेटे घेतली. डिचोली येथील किल्ला पाडून जमीनदोस्त केला व तीन कोसांच्या प्रदेशाची जाळपोळ केली.

खेम सावंताने पोर्तुगीजांविरूद्ध महाराणी ताराबाई यांच्याकडे मदतीची याचना केली. ताराबाईनी सावंतांचे जुने अपराध पोटात घालून त्याना मदत करण्याचे ठरविले. कारण त्याचवेळी म्हणजे स. १७०७ साली शाहू मोगलांच्या कारावासातून सुटून दक्षिणेकडे यायला निघाला असल्याने त्याच्याशी संघर्ष करण्यासाठी ताराबाईना दोस्त हवे होते. खेम सावंत भोसले याने ताराबाईना निष्ठा वाहिली. त्या बदली त्याने ताराबाईकडून परगणा कुडाळ, बांदे, डिचोली, पेडणे, साखळी, आणि मणेरी ह्या सात महालांची सनद स. १७०८ साली मिळविली.

त्याच वर्षी म्हणजे स. १७०८ साली नवीन व्हिसेरेइ दों रुद्रिगु द कॉश्त याचे गोव्यास आगमन झाले. खेम सावंताने आपल्या संधिसाधू राजकीय धोरणास अनुसरून नवीन व्हिसेरेइला पत्र पाठवून त्याचे स्वागत केले व पोर्तुगीजाशी मैत्रीने वागण्याची आपली इच्छा आहे असे त्यास कळविले.

व्हिसेरेइने खेम सावंताच्या पत्राची दखल घेऊन त्याला उत्तर धाडले की, पोर्तुगीजांशी असलेली जुनी मैत्री त्याला दृढ करायची असल्यास त्याने वाटाघाटी करण्यासाठी आपला एक दूत गोव्यास धाडावा. अखेर चार पांच वर्षानी म्हणजे स. १७१२ साली पोर्तुगीज आणि बाबू सावंत यांच्यामध्ये शांततेचा आणि मैत्रीचा करार झाला.

इ. स. १७१६ साली पोर्तुगीज आणि मराठे यांच्यामध्ये एक तह झाला. त्यात वाडीचा नारबा सावंत हा पोर्तुगीजांचा मांडलिक आहे, असा उल्लेख आहे. त्यावरून सावंतानी पोर्तुगीजांचे मांडलिकत्व पत्करले असावे असा निष्कर्ष निघतो.

फोंड सावंताच्या कारकीर्दीत वाडीकरांचे आंग्रे आणि मराठे यांच्याशी चांगले संबंध नव्हते. त्यामुळे त्याना पोर्तुगीजांशी मैत्रीचे संबंध ठेवून आपल्या राज्याचे रक्षण करावे लागले. पोर्तुगीजाना सावंतासारखा दुबळा शेजारी हवा असल्याने त्यांचे अपराध पोटात घालून त्यांचे राज्य टिकवून ठेवण्याचा त्यानी प्रयत्न केला. आंग्रे आणि मराठे यांचे शत्रूत्व पत्करूनही त्यानी दुबळ्या सांवंताना मदत केली. त्याचे इंगित वरच्या प्रमाणे आहे.

स. १७२६ साली फोंड सावंताचा मुलगा नागोबा सावंत हा आपल्या बापाशी भांडून गोव्यास पोर्तुगीजांच्या आश्रयास येऊन राहिला. त्याला पोर्तुगीजांच्या मदतीने आपल्या बापास पदच्यूत करून वाडी

संस्थानच्या गादीवर यायचे होते. व्हिसेरेइ ज्युआंव द साल्दान्य द गामा ह्याने फोंड सावंताशी असलेल्या मैत्रीच्या करारास हरताळ फासून नागोबा सावंत यास आश्रय दिला व त्याला एका अकरा कलमी करारावर सही करण्यास लावून त्याला पोर्तुगीजांचे मांडलिकत्व पत्करावयास भाग पाडले. मुलगा पोर्तुगीजांच्या मदतीने आपणास पदच्यूत करू पहातो आहे हे पाहून फोंड सावंताने आपल्या मुलाचा डाव उधळून लावण्यासाठी पोर्तुगीजाना आपल्या मुलापेक्षा अधिक सवलती देण्याचे आमिष दाखवून त्यांच्याशी नवीन करार करण्याची इच्छा दर्शविली. आणि व्हिसेरेइने सर्व नैतिक तत्वे पायदळी तुडवून फोंड सावंताशी नवीन करार करून नागोबा सावंताचा विश्वासघात केला. मात्र फोंड सावंताने ८०० अश्रफींचा मासिक तनखा चालू करावा, असे कलम करारात अंतर्भूत करून घेतले.

आपल्या बापाने पोर्तुगीजांशी मैत्रीचा करार करून आपणास उघड्यावर टाकले म्हणून नाग सावंताचा संताप झाला व बापास अद्दल घडविण्यासाठी त्याने डिचोलीचा किल्ला पाडण्याचे ठरविले. त्याने जेव्हा हे काम करण्यासाठी माणसे जमा केली तेव्हा व्हिसेरेइने त्याला तंबी दिली की, जोपर्यंत तो पोर्तुगीजांच्या आश्रयास राहील तोपर्यंत त्याच्या फोंड सावंतविरोधी कारवाया गोवा सरकार सहन करणार नाही.

परंतु नाग सावंताने व्हिसेरेइच्या इशाऱ्याची दखल घेतली नसावी. त्याने पोर्तुगीजांचा आश्रय सोडून डिचोलीचा किल्ला पाडण्याचा आपला उपद्व्याप सुरू केला असावा, असे व्हिसेरेइच्या एका पत्रावरून वाटते. या पत्रात व्हिसेरेइ म्हणतो की, ‘नागोबा सावंत याचा बाप फोंड सावंत याने देऊ केलेला ८०० अश्रफीचा मासिक तनखा स्वीकारायला तयार नाही. त्याला डिचोली प्रांत आणि तेथील किल्ला हवा असून त्यासाठी आपल्या बापाशी लढण्याची त्याची तयारी आहे.’

नाग सावंत आणि त्याचा बाप फोंड सावंत यांच्यामधील भांडणात दोघांचे भांडण आणि तिसऱ्याचा लाभ ह्या म्हणीप्रमाणे पोर्तुगीजांचा फायदा झाला. नागोबा सावंत डिचोलीचा किल्ला घेईल या भीतीने फोंड सावंताने तो किल्ला पोर्तुगीजांच्या हवाली करण्याचे ठरविले.

फोंड सावंत आणि पोर्तुगीज यांच्यामधील संबंध फार दिवस सलोख्याचे राहिले नाहीत. फोंड सावंताने चीनला निघालेल्या एका पोर्तुगीज जहाजावर हल्ला चढविला व त्याच्या राज्यात पळून गेलेल्या काही निग्रो गुलामाना त्याने इंग्रजाना विकले; तसेच थकलेली खंडणी भरली नाही ह्या कारणावरून पोर्तुगीजांचे आणि त्याचे संबंध बिघडले. त्याची परिणीती अखेर युद्धामध्ये झाली. या युद्धाचा अहवाल व्हिसेरेइने पोर्तुगालच्या राजास सादर केला असता, तो दि. २८ एप्रिल १७२८ रोजी व्हिसेरेइला उत्तरादाखल लिहिलेल्या पत्रात त्याला सल्ला देतो :

‘तुम्ही फोंड सावंत याला धडा शिकविण्याच्या हेतूने त्याच्याशी युद्ध सुरू केलेत ते चांगले केलेत. परंतु डिचोलीचा किल्ला फोंड सावंताच्या मुलाच्या ताब्यात देण्याऐवजी तो पाडून टाकलेला बरा. कारण, फोंड सावंताचा मुलगा आपल्या बापासारखा निघाला तर डिचोलीच्या किल्ल्याचा उपयोग त्याला या राज्याशी लढताना चांगला होऊ शकेल.’

अखेर फोंड सावंत आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये चालू असलेली युद्धमान परिस्थिती स. १७२६ साली झालेल्या एका तहान्वये संपुष्टात आली. हा तह म्हणजे जुन्या तहाची सुधारलेली आवृत्ती होती. ह्या

तहान्वये पोर्तुगीजानी दहा वर्षांची थकलेली खंडणी फोंड सावंतास माफ केली व उरलेली बाकी वर्षास एक हजार अश्रफीप्रमाणे फेडण्याची सवलत त्याला दिली. फोंड सावंताने प्रस्तुतच्या तहातील कलमे प्रामाणिकपणे पाळण्याचे कबूल केले.

बहुधा वसई प्रांतात पोर्तुगीजांचे आणि मराठ्यांचे जे युद्ध जुंपले, त्यामुळे व्हिसेरेइला हा तह पडती बाजू घेऊन करावा लागला असावा.

दि. १४ जानेवारी १७२७ रोजी गोव्याचा व्हिसेरेई महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींचा आढावा घेऊन पोर्तुगालच्या राजास लिहिलेल्या पत्रात फोंड सावंत व त्याचा मुलगा यांच्यामधील भांडणाचा उल्लेख करून म्हणतो :

'फोंड सावंत आणि त्याचा मुलगा या दोघांचा समझौता अद्याप झालेला नाही. त्या दोघानी मला कळविले आहे की डिचोलीचा किल्ला आम्ही आमच्याकडे ठेवावा. या किल्ल्यात आमचे सैन्य असल्यास त्यांची हरकत नाही. त्यांच्यामधले भांडण मिटेपर्यंत डिचोलीचा किल्ला आमच्याकडे असावा अशी दोघाही बापलेकाची मागणी आहे. तसेच मी आपल्या भांडणात मध्यस्थी करावी अशीहि त्यानी इच्छा दर्शविली आहे. परंतु ही जबावदारी पत्करण्याची माझी इच्छा नाही. कारण उद्या ते दोघे माझ्याकडे किल्ला खाली करण्याची मागणी करतील. मी त्याना नकार दिला तर ते आमच्याशी युद्ध करण्यास कमी करणार नाहीत.

'डिचोलीचा किल्ला बलाढ्य आहे यात संदेह नाही. परंतु ह्या किल्ल्यास शत्रुने वेढा घातला तर आत रसद पाठविणे कठीण जाईल. तरी ह्या बाबतीत महाराजानी आज्ञा करावी.

'फोंड सावंताशी झालेल्या तहाची कलमे मी महाराजांच्या अवलोकनार्थ पाठवीत आहे....'

फोंड सावंत आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये स. १७२६ साली जो नवीन तह झाला त्या तहामध्ये फोंड सावंत पोर्तुगीजांशी सलोख्याने वागत नसल्याची तक्रार गोव्याचा व्हिसेरेइ ज्युआंव द साल्दान्य द गामा हा पोर्तुगालच्या राज्य सचिवास दि. ३० एप्रिल १७२७ रोजी पाठविलेल्या पत्रात करतो.

गोव्याच्या व्हिसेरेइने दि. १४ जानेवारी १७२७ रोजी पोर्तुगालच्या राजास जे पत्र पाठविले त्याचे उत्तर पोर्तुगालच्या राजाच्या सल्लागार मंडळाच्या सचिवाने व्हिसेरेइला दि. ८ एप्रिल १७२८ रोजी पाठविले. त्यात तो म्हणतो की, 'डिचोलीचा किल्ला पाडून टाकावा अशी आज्ञा महाराजानी केली आहे.'

वसईच्या युद्धात वाडीकर सावंतानी तटस्थतेचे धोरण पत्करले असावे. कारण, पेशव्यांशी त्यांचे सलोख्याचे संबंध होते. त्यातच कुलावेकर आंग्र्यांशी त्यांच्या कटकटी चालू होत्या.

दि. २३ जानेवारी १७३९ रोजी व्यंकटराव घोरपडे इचलकरंजीकर यानी गोव्यावर स्वारी केली, तेव्हा बाजीरावाकडून सावंताना बार्देशमध्ये सैन्य घुसविण्याबद्दल पत्रे गेली होती. त्यावेळी पोर्तुगीजानी आपले बळ वसईच्या युद्धात केंद्रीत केले असल्याने गोव्याची सुरक्षितता कमकुवत बनली होती. ही संधी साधून सावंताना बार्देश प्रांत सहज घेता आला असता. परंतु त्यानी बार्देश घेण्याचा प्रयत्न केला नाही, कारण स. १७३६ साली फोंड सावंतांचा आणि पोर्तुगीजांचा एक सुधारित मैत्रीचा करार झाला होता.

दि. २ मे १७३९ रोजी पोर्तुगीज आणि व्यंकटराव घोरपडे यांच्यामध्ये तह झाला. त्यात खोर्जुवे आणि पनाळे ही पोर्तुगीजानी घेतलेली सावंतांची दोन्ही बेटे त्यानी सावंताना परत करावी, असे कलम होते. परंतु ती दोन्ही बेटे पोर्तुगीजानी सावंताना परत केली नाहीत. तत्पूर्वी पोर्तुगीजांच्या संगनमताने सावंतानी बार्देश व्यापिले होते. कारण, मराठे बार्देश घेतील अशी भीती पोर्तुगीजाना वाटल्याने त्यानीच सावंताना बार्देश घेण्यास सांगितले होते. ह्या संदर्भात दि. १३ एप्रिल १७३९ रोजी जयराम सावंत व रामचंद्र सावंत या दोघानी गोव्याच्या गव्हर्नर जनरलला पाठविलेले पत्र बोलके आहे. त्यात ते दोघे म्हणतात : 'व्यंकटराव याची फौज वरघाटी जाईस्तोवर बार्देश आम्हाकडे असावा. तदनंतर ते तुमचे स्वाधीन करू.'

पेशव्यांचे सैन्य गोव्याहून माघारा परतल्यावर दि. २८ फेब्रुवारी १७४० रोजी वाडीकर सावंत आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये एक करार झाला. तदनुसार सावंतानी बार्देश महाल आणि पनाळे बेट पोर्तुगीजाना परत केले, तर पोर्तुगीजानी खोर्जुवे बेट आणि पीर्ण हे गाव सावंतांच्या ताब्यात दिले.

वरील तह छत्रपती शाहू महाराजांचे एक मंत्री नारोराम यांच्या विद्यमाने पार पडला. तो घडवून आणल्याबद्दल नारोराम याना चांगली कमाई झाली. तहाच्या वाटाघाटीच्या वेळी सावंतानी मागणी केली होती की, बार्देशमधील हिंदूना जी अपमानास्पद वागणूक मिळते ती दूर होऊन हिंदूना मानाची वागणूक मिळावी. परंतु ही मागणी पोर्तुगीजानी मान्य केली नाही. ते म्हणाले की हा प्रश्न 'इंक्विझिशन'च्या कक्षेत येत असल्याने गोवा सरकारला त्यात ढवळाढवळ करण्याचा अधिकार नाही.

वरील करार वाडीकर सावंताना समाधानकारक वाटला नाही. म्हणून त्यानी स. १७४१ साली फेब्रुवारी महिन्यात बार्देशवर स्वारी केली. 'आग्वाद' आणि 'रेइश मागुश' हे दोन किल्ले वगळता बार्देश महालाचा ऊर्वरित टापू सावंतानी अवघ्या एका दिवसात घेतला. आग्वाद आणि रेइश मागुश हे किल्लेही त्यानी घेतले असते. परंतु पोर्तुगीजांच्या वतीने वाडी संस्थानात हेरगिरी करणाऱ्या काही हिंदूनी सावंताच्या स्वारीचा बेत पोर्तुगीजाना आगाऊ कळविल्याने त्याना सावंताना तोंड देण्यास अवसर मिळाला. पोर्तुगीजांच्या वतीने हेरगिरी करणारे हिंदू विठोजी शेणवी धुमे व विठोजी प्रतापराव सरदेसाई हे होते. विठोजी शेणवी धुमे ह्या सधन व्यापाऱ्याच्या मुलास छत्रपती शाहू महाराजांचा एक मंत्री घनःशाम नारायण याची मुलगी दिली होती. त्याला सातारच्या दरबारात वावरता येणे शक्य झाल्याने तेथे शिजणारे राजकीय मनसुबे कळत असत. ते तो पोर्तुगीजाना कळवीत असे.

बार्देश प्रांतावर सावंतांचा उणा पुरा तीन महिने अमल होता. त्या दरम्यान पोर्तुगीज सेनाधिकारी तो प्रांत घेण्याची तयारी करीत होते. त्यानी दि. १३ जून १७४१ रोजी बार्देशमध्ये सैन्य घुसवून सावंतांच्या सैन्याला पिटाळून लावले. पोर्तुगीजाना सावंतावर सुलभपणे विजय मिळविणे शक्य झाले. त्याचे कारण म्हणजे गोव्याच्या नवीन व्हिसेरेइने पोर्तुगालहून येताना बरोबर आणलेल्या नवीन पद्धतीच्या प्रभावी तोफा. त्या दर मिनिटास ३२० गोळे टाकीत असत. त्या तोफांच्या माऱ्यासमोर सावंताच्या जुन्या पुराण्या तोफा टिकाव धरू शकल्या नाहीत यात नवल नाही.

बार्देश घेतल्यावर सावंताच्या कुडाळ परगण्यावर चाल करण्याची योजना पोर्तुगीजानी आखली होती. त्याचा सुगावा जयराम सावंत याला लागताच त्याने पेशव्यांकडे धाव घेतली. पुणे दरबाराने पोर्तुगीजाना बार्देशच्यापुढे चाल न करण्याचा इशारा दिल्याने त्याना चढाई थांबवावी लागली.

अनुक्रमणिका

दि. ११ सप्टेंबर १७४१ रोजी सावंत आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये तह होऊन सावंताना बराच प्रदेश गमवावा लागला. त्यात खोर्जुवे आणि पनाळे ही दोन बेटे व मये आणि आराबा या गावातील शेतजमिनींचा अंतर्भाव होत होता. त्या शिवाय पीर्ण हा गाव जो सावंताना पोर्तुगीजांकडून मिळाला होता, तोही त्याना पोर्तुगीजाना परत करावा लागला. वरील प्रदेश घालविण्याखेरीज दरसाल एक हजार अश्रफींची खंडणी देण्याचे सावंताना कबूल करावे लागले.

थोडक्यात सांगायचे म्हणजे दीड वर्षामागे झालेल्या तहान्वये सावंतानी जे मिळविले होते ते सर्व वरील तहान्वये घालविले. वाडीकर सावंत जून १७४१ च्या युद्धात हरल्याने पोर्तुगीजांचा सूड घेण्याची भावना त्यांच्या मनात धुमसतच राहिली. त्यातूनच कटकटी सुरू होऊन त्याची परिणती १७४६ सालच्या युद्धात झाली.

दि. ५ मे १७४६ रोजी पोर्तुगीजानी सावंताचा 'हलर्ण' हा किल्ला घेतला. ह्या लढाईत सदर्हू किल्ल्याचा किल्लेदार गोमा सावंत याने मोठा पराक्रम गाजविला. हलर्णहून पोर्तुगीज सैन्याने डिचोलीच्या किल्ल्यावर चाल केली. तो किल्ला पोर्तुगीज घेतल्याशिवाय राहाणार नाहीत हे जाणून सावंतानी त्याची मोडतोड करून तो निकामी करून टाकला. तरीही पोर्तुगीजानी तो किल्ला दि. १८ मे रोजी घेऊन त्याची डागडुजी सुरू केली.

डिचोली घेतल्यावर पोर्तुगीज सैन्याने साखळी, मणेरी, वगैरे प्रांताकडे आपला मोहरा वळविला. पोर्तुगीजानी साखळीचे राणे, मणेरीचे गावस, डिचोलीकर रघुनाथ प्रभू, अडवईकर कुष्टोबा देसाई, आदी देसायांशी संधान जुळवून वाडीकर सावंतांची राजवट झुगारून देऊन आपल्या अमलाखाली येण्याचे त्यांना आवाहन केले. देसायानी गोव्याच्या व्हिसेरेइच्या आवाहनास प्रतिसाद देण्यास अनुकूलता दर्शविली. परंतु त्याना पोर्तुगीज अमलाखाली धर्म स्वातंत्र्याची हमी हवी होती. ते स्वातंत्र्य देण्याचे अभिवचन व्हिसेरेइने देसायाना दिले. त्या अभिवचनास अनुसरून सर्व देसायानी पोर्तुगीज राजवट तर पत्करलीच; परंतु संत्रोजी राणे याने सावंताचे आवडो, मोर्ले आणि सातारे हे तीन किल्ले घेऊन ते पोर्तुगीजांच्या ताब्यात दिले.

दि. २३ नवंबर १७४६ रोजी व्हिसेरेइने सावंताच्या ताब्यातील तेरेखोल किल्ल्यावर आरमारी हल्ला करून तो घेतला. ह्या लढाईत भोसल्यांचे बहुतेक सर्व आरमार नष्ट झाले. भोसल्यांच्या आरमारात १५ ते २० तोफा असलेली दहा पाली, सतरा गलबते तीन बतेले, एक लढाऊ मचवा, चार पारांगी आणि बऱ्याच होड्या होत्या.

तेरेखोलचा किल्ला घेतल्यावर व्हिसेरेइ रेडीच्या किल्ल्याकडे निघाला. तो किल्ला दि. ३ डिसेंबर १७४६ रोजी पडला.

रेडीचा किल्ला पोर्तुगीजांनी तहाच्या वाटाघाटी चालू असता सावंताना गाफील ठेवून घेतल्याचा आरोप त्यानी पोर्तुगीजांवर केला.

पोर्तुगीजानी सावंतावर एकामागून एक असे विजय मिळविल्याने पुणे दरबाराला चिंता वाटली. त्याने पोर्तुगीजाना सबुरीने वागण्याचा सल्ला आपला एक दूत गोव्यास पाठवून दिला. परंतु पोर्तुगीज अधिकाऱ्यानी पेशव्यांच्या वकिलास दाद दिली नाही. ते पाहून पुणे दरबारातील मुत्सद्यांना पोर्तुगीजांचा राग

आला व त्यांच्या पारिपत्यास सैन्य देऊन सदाशिवराव भाऊस पाठविण्याचे त्यानी ठरविले. ही बातमी पुणे दरबारातील पोर्तुगीजांच्या गुप्तहेरांनी त्वरीत गोव्यास कळविण्याची तत्परता दाखविली. त्या बरोबर व्हिसेरेइने घाटातील खिंडी रोखून धरण्याची तयारी केली. पोर्तुगीजांचे हस्तक केवळ पुणे दरबारातच नव्हे, तर पेशव्यांच्या सैन्यातही होते. त्यांच्याकडून पोर्तुगीजाना सावधगिरीचे इशारे मिळत असत.

पोर्तुगीजानी सदाशिवराव भाऊच्या संभाव्य स्वारीपासून गोव्याचे रक्षण करण्यासाठी बचावाची तयारी जरी केली असली, तरी भाऊंच्या प्रचंड सैन्याला आपण कितपत तोंड देऊ शकू याचा त्याना अंदाज लागत नव्हता. म्हणून त्यानी सोंधेच्या राजाच्या कारभाऱ्याला सदाशिवराव भाऊकडे शिष्टाईला पाठविले. त्यावेळी सदाशिवराव भाऊच्या सैन्याचा तळ सुपे येथे पडला होता.

सदाशिवराव भाऊकडे शिष्टाई करण्याविषयी सोंधेकरानी पुढाकार घेतला, त्याचे कारण म्हणजे भाऊचे सैन्य घाट उतरून खाली उतरल्यास त्या सैन्यापासून सोंधेच्या राजाच्या अमलाखालच्या पंचमहालास उपसर्ग पोहोचणार होता.

सोंधेकरांच्या कारभाऱ्याची आणि सदाशिवराव भाऊची मुलाखत झाली तेव्हा भाऊने त्याला सांगितले की, आपण गोव्यावर स्वारी करणारच. त्यासाठी आपणाला सोंधेकरांच्या ताब्यात असलेला मर्दनगड किल्ला हवा आहे. तरी तो त्यानी वर्षाच्या कराराने आपणास द्यावा. तसेच सैन्य उतरविण्यासाठी वाटाडेही द्यावे. त्यावर सोंधेच्या राजाच्या शिष्टमंडळातील हनगल म्हणून सरदार होता त्याने सदाशिवराव भाऊस विनंती केली की त्यानी आपल्या सैन्यासह घाट उतरू नये. त्यानी आपला निर्णय बदलल्यास त्याना एक लक्ष रुपये देण्यास सरदार हनगल तयार झाला.

छत्रपती शाहू महाराजांकडून सोंधेच्या राजास अंत्रुज आणि जांबावली पंचमहाल हे महाल सालिना पंचवीस हजार रुपयाना पुष्कळ वर्षामागे मिळाले होते. हा करार सोंधेच्या राजाने तोपर्यंत पाळला होता. तो पुढेही पाळला जाईल अशी हमी सरदार हनगल याने सदाशिवराव भाऊस दिली. त्याने मराठा सरदारांपैकी अनेकाना लांच चारून सदाशिवराव भाऊस गोव्याच्या स्वारीपासून परावृत्त केले.

सदाशिवराव भाऊने सोंधेच्या राजाकडे थकलेल्या खंडणीपैकी अर्धी खंडणी घेऊन दि. १० मार्च १७४७ रोजी सुपे येथील आपली छावणी उठविली.

सदाशिवराव भाऊनी गोव्यावरील स्वारी तहकूब केली त्याची प्रमुख कारणे दोन आहेत : भाऊपाशी पोर्तुगीजांच्या तोफांसारख्या शीघ्र माऱ्याच्या आधुनिक तोफा नव्हत्या. भर उन्हाळ्यात गोव्यात उतरल्यास जनावराना दाणा वैरण व सैन्यास अन्नधान्य मिळण्यास पंचाईत पडणार होती.

पेद्रु व्हिसेंत व्हिदाल या नावाचा पोर्तुगीज सेनाधिकारी व्हिसेरेई मार्किस द आलोर्न याला सदाशिवराव भाऊच्या संभाव्य स्वारीविषयी लिहिताना म्हणतो :

'शत्रु घाटातून खाली उतरेल असे मला वाटत नाही. परंतु त्याने जर तसा प्रयत्न केला तर त्याला त्याबद्दल पश्चाताप झाल्यावाचून राहणार नाही. कारण त्याला घाटापासून रायतूरच्या किल्ल्यापर्यंत एक शेर

अनुक्रमणिका

तांदूळ अथवा घोड्यांसाठी गवताची एक मोळी देखील मिळणार नाही. त्याचे कारण हे की, आम्ही रणक्षेत्रातील सर्व धान्य गोळा केले असून गवत वैरण जाळून टाकली आहे.'

पुणे दरबाराच्या मनात गोव्यावर स्वारी करायचे नव्हते. केवळ धाकधपटशा दाखवून वाडीकर सावंताना फायदेशीर असा करार पोर्तुगीजाना करावयास लावायचे होते, असे ह्या प्रकरणावरून एकंदरीत वाटते. तसे नसते तर सदाशिवराव भाऊ गोव्याच्या नजीक येऊन गोव्यावर स्वारी केल्याशिवाय राहिला नसता.

या ठिकाणी एका गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे तो हा की, पोर्तुगीजांकडून सावंतांचा सतत तीन वर्षेपर्यंत पराभव होत राहिला तरी त्यांनी पोर्तुगीजाना शरण चिठ्ठी लिहून दिली नाही. त्यांचे मनोधैर्य कायम टिकले. त्याना अनेक शत्रू होते, सोंधेचा राजा, आंग्रे, करवीरचे छत्रपती आणि त्यात पोर्तुगीज. परंतु ह्या सर्व शत्रूंची परवा न करता त्यानी पोर्तुगीजांशी युद्ध चालू ठेवले. त्याना फक्त एकच दिलासा होता आणि तो म्हणजे पेशव्यांच्या सहानुभूतीचा. पेशव्यांपाशी सैन्य अफाट होते. परंतु त्यानी ते सावंतांच्या मदतीस पाठविले नाही. फक्त अधूनमधून पैशाची मदत केली तेवढीच. पोर्तुगीजानी सावंताच्या धैर्याविषयी कौतुकोद्‌गार काढल्याचे पोर्तुगीज कागदपत्रात आढळतात.

स. १७४८ ते १७४९ या दरम्यानच्या काळात वाडीकर सावंत आणि पोर्तुगीज यांच्यामधील संबंध नरम गरम होते. दोघानीही एकमेकांविरूद्ध मोठ्या चढाया केल्या नाहीत. त्याचे श्रेय सावंतांचा कारभारी पांडुरंग विश्राम याच्याकडे जाते.

वाडीकर सावंतांच्या दरबारात पोर्तुगीजांसाठी हेरगिरी करणारे काही लोक होते व त्याना पांडुरंग विश्राम याचा आश्रय होता. सावंताच्या दरबारात पेशव्यांचे वजन वाढू नये म्हणून पांडुरंग विश्राम नेहमी जागरूक असायचा. सावंताचे आणि पोर्तुगीजांचे एवढे शत्रूत्व, पण पांडुरंग विश्राम आणि पोर्तुगीज यांचे संबंध स्नेहाचे होते. त्याचा पुरावा म्हणजे मर्दनगडच्या मोहिमेत पोर्तुगीजांचा फजितवडा उडाला तेव्हा पांडुरंग विश्रामने त्याना पाठविलेले सहनुभूतीपर पत्र.

रेडीचा किल्ला पोर्तुगीजानी घेतला म्हणून सावंताना दुःख होत असे. त्यानी तो परत घेण्याचे दोनतीनदा प्रयत्न केले. स. १७४७ च्या जुलै महिन्यात त्यानी रेडीच्या किल्ल्यात पोर्तुगीजांनी नेमलेला हिंदू कॅप्टन रघुजी नाईक याला फितूर करून किल्ला हस्तगत करण्याचा पहिला अयशस्वी प्रयत्न केला. परंतु रेडी येथे राम कामत म्हणून पोर्तुगीजांचा हस्तक होता त्याला ह्या गोष्टीचा सुगावा लागल्याने त्याने गोव्यास जाऊन व्हिसेरेइची गाठ घेऊन त्याला ही बातमी कळविली. शिवाय किल्ल्यातील शिबंदीत पोक्या नाईक नावाचा एक शिपाई होता. त्यालाही रघुजी नाईकाच्या फितुरीची बातमी कळल्याने त्यानेही ती आपल्या वरीष्ठांच्या कानावर घातली. रघुजी नाईकास पकडण्यात येऊन त्याच्यावरील गंभीर आरोपाची चौकशी झाली. तो गुन्हेगार ठरल्याने त्याला फांशी देण्यात आली. राम कामत आणि पोक्या नाईक या दोघाना रघुजी नाईकाची फितुरी उघडकीस आणल्याबद्दल पोर्तुगीजांकडून पारितोषिके मिळाली.

स. १७४७ च्या ऑगष्ट महिन्यात सावंतानी रेडीचा किल्ला घेण्याचा दुसरा प्रयत्न केला. सुक्या मासळीत विषारी औषध घालून त्यानी ती किल्ल्यातील पोर्तुगीज सैनिकाना आपल्या हस्तकांमार्फत पुरविली. ती मासळी खाल्याने सैनिक आजारी पडताच सावंतानी किल्ल्यावर हल्ला चढविला; परंतु

अनुक्रमणिका

किल्ल्यातील जे सैनिक सावध स्थितीत होते त्यानी सावंतांचा कसून प्रतिकार करून तो हल्ला परतवून लावला. गोव्याचा व्हिसेरेइ मार्किस द आलोर्न याने सावंताचा हलर्णचा किल्ला घेतला म्हणून त्याला 'मार्किस द आलोर्न' हा किताब पोर्तुगालच्या राजाने बहाल केला. त्याची कारकीर्द स. १७५० सालच्या सप्टेंबर महिन्याअखेर संपून तो पोर्तुगालला निघून गेला.

फोंडेचा किल्ला पेशव्याना आपले हाती हवा होता व तो घेण्याकरिता पुणे दरबाराने सोंधेच्या राजाशी बोलणी केली होती. अखेर ही बोलणी यशस्वी होऊन सोंधेच्या राजाने तो किल्ला पेशव्यांकडे साडेपाच लक्ष रुपयाना गहाण ठेवला. त्या वाटाघाटींचा सुगावा व्हिसेरेइला लागला तेव्हा त्याने सैन्य धाडून तो किल्ला ताब्यात घेण्याचा बेत केला; परंतु तत्पूर्वीच पेशव्यानी तो किल्ला व्यापिला. फोंड्याचा किल्ला घेण्याकरिता व्हिसेरेइ कौंट द आल्व्हा याने जे धाडस केले आणि त्यात तो ठार झाला, तेव्हा वाडीकर सावंतांचा कारभारी पांडुरंग विश्राम याने पोर्तुगीजाना सांत्वनपर पत्र पाठवून दुःख व्यक्त केले होते.

गोव्याचा नवीन व्हिसेरेइ कौंट द एगा ह्याला जेव्हा कळले की नानासाहेब पेशवे यांचे विजयदुर्गला आगमन होणार आहे, तेव्हा त्याने नजराणा देऊन आपला एक दूत विजयदुर्गला पाठविला. परंतु या दूताचे विजयदुर्गला आगमन होण्यापूर्वीच नानासाहेब पेशवे पुण्यास परतले. पोर्तुगीजांच्या दूताने पुण्यास जाऊन व्हिसेरेइचा नजराणा नानासाहेबास अर्पण केला. नानासाहेब खुष झाले व त्यानी पोर्तुगीजांच्या दूताचा मानसन्मान करून त्याला निरोप दिला. तो गोव्यास परतल्यावर पुणे दरबारचे दोन दूत गोव्यास आले. त्यांच्यापैकी एकाच नाव महादजी केशव फडके असे होते. व्हिसेरेइ कौंट द एगा याने दि. २६ रोजी दरबार भरवून पेशव्यांच्या वकिलाना मुलाखत दिली. पेशव्यांच्या वकिलांचा मुक्काम महिनाभर गोव्यात असावा. कारण, महादजी केशव फडके याच्या मध्यस्थीने गोव्याच्या व्हिसेरेइ आणि वाडीकर सावंत यांच्यामध्ये दि. २६ जुलै १७५९ या दिवशी तह झाल्याची माहिती उपलब्ध आहे. बहुधा पोर्तुगीज आणि वाडीकर सावंत यांचा समेट घडवून आणण्यासाठी म्हणून पुणे दरबाराने आपले वकील गोव्यास पाठविले असावे. उपरिनिर्दिष्ट तहान्वये पोर्तुगीजानी पेडणे, डिचोली (भवग्राम) आणि साखळी (सत्तरी) हे तीन महाल सावंताना खोतीने दिले.

स. १७६० साली पोर्तुगालच्या सरकारने आपल्या सागरोत्तर वसाहतीबाबतच्या धोरणात बदल केला. सागरोत्तर वसाहतीत जैसे थे परिस्थिती असावी असे त्याला वाटले व तदनुसार गोव्याच्या व्हिसेरेइला सूचना पाठविली की, वाडीकर सावंत, सोंधेचा राजा आदि शेजाऱ्यांशी त्याने सलोख्याने वागावे, राज्य विस्तार करण्याच्या फंदात पडू नये. मात्र हे शेजारी आपले बळ वाढविणार नाहीत याबद्दल जागरूक असावे.

पोर्तुगालच्या धोरणात झालेल्या बदलाचा फायदा घेऊन वाडीकर खेम सावंत दुसरा याने पोर्तुगालच्या राजास अर्ज केला की, पोर्तुगीजानी आपले पेडणे, डिचोली आणि साखळी हे जे महाल आणि तेरेखोलचा किल्ला घेतला आहे तो आपणास परत मिळावा. या अर्जाचा विचार पोर्तुगालच्या राजाने सहानुभूतीने केला व उपरिनिर्दिष्ट तिन्ही महाल व तेरेखोलचा किल्ला सावंताना परत करण्याबाबत नवीन तह करण्याची आज्ञा व्हिसेरेइला धाडली. या आज्ञेप्रमाणे व्हिसेरेइ कौंट द एगा याने दि. २४ डिसेंबर १७६१ रोजी सावंतांशी नवीन तह करून त्याना पेडणे, साखळी आणि डिचोली हे तिन्ही महाल व तेरेखोलचा किल्ला परत केला.

अनुक्रमणिका

उपरिनिर्दिष्ट तह झाल्यावर गोव्याचे पोर्तुगीज आणि वाडीकर सावंत यांच्यामध्ये मैत्रीचे संबंध प्रस्थापित झाले. तदनुसार स. १७६३ साली पोर्तुगीजानी पेशव्यांच्या ताब्यात असलेल्या मर्दनगड किल्ल्यावर स्वारी केली तेव्हा सावंतानी पोर्तुगीजाना मदत केली.

पोर्तुगीज आणि वाडीकर सावंत यांच्यामधले सलोख्याचे संबंध फार काळ टिकून राहिले नाहीत. कर्नाटकात हैदरअल्लीचा उदय झाला आणि दक्षिण भारतातील राजकीय घडी पार विस्कटून गेली. हैदरअल्लीने सोंधे संस्थान घेतल्यावर सोंधेचा राजा पोर्तुगीजांच्या आश्रयास बांदोडे येथे येऊन राहिला. हैदरअल्ली आणि पेशवे यांच्यामध्ये युद्ध जुंपल्याने त्याची झळ गोव्यालाही पोहोचली. पोर्तुगीजाना आपल्या प्रदेशाच्या सुरक्षिततेविषयी काळजी वाटू लागली. त्यामुळे सावंताच्या ताब्यात असलेले पेडणे, साखळी, मणेरी आणि डिचोली हे महाल बार्देश प्रांताच्या सुरक्षिततेसाठी आपणाकडे असावेत असे त्याना वाटू लागले. त्यातच सावंतांकडे बऱ्याच वर्षाची खंडणी थकलेली होती.

स. १७८१ साली वाडीकर सावंत आणि कोल्हापूरचे छत्रपती यांचे संबंध बिघडताच पोर्तुगीजाना आपले घोडे पुढे दामटण्यास संधी मिळाली. खेम सावंत तिसरा याने कोल्हापूरच्या छत्रपतींशी लढण्याकरिता पोर्तुगीजांकडे सैन्याची आणि दारुगोळ्याची मदत मागितली. या मागणीनुसार पोर्तुगीजानी सावंतांच्या मदतीस सैन्य रवाना केले. परंतु ह्या सैन्याने सावंताना मदत करण्याऐवजी डिचोलीस जाऊन तेथील किल्ल्यावर हल्ला करून तो घेतला.

डिचोलीचा किल्ला हस्तगत झाल्यावर पोर्तुगीज सैन्याने साखळीवर चाल केली. सावंतांच्या सैन्याने पोर्तुगीजांचा तीव्रपणे प्रतिकार केला. अखेर चौदा तासांच्या प्रतिकारानंतर साखळीचा कोट पडला. यावेळी वाडीकर सावंत आणि कोल्हापूरचे छत्रपती यांच्यात युद्ध चालू असल्याने सावंताना पोर्तुगीजांचा समाचार घेता आला नाही. परंतु एक वर्षाने त्यानी गुळेली हे गाव परत घेऊन दि. २ नवंबर १७८२ या दिवशी साखळीच्या कोटास वेढा घातला. कोट पडला; परंतु पोर्तुगीज सैन्याला कुमक आल्याने त्याने तो फिरून काबीज केला.

दि. २४ मार्च १७८३ रोजी पोर्तुगीज सैन्य पेडणे महालात घुसले. दि. २ एप्रिल रोजी पोर्तुगीजांनी हलर्णचे दोन्ही किल्ले घेतले, पैकी एक किल्ला पाडून जमीनदोस्त केला. बार्देशच्या सुरक्षिततेसाठी पोर्तुगीजाना सबंध पेडणे महाल हवा होता, कारण हा महाल म्हणजे बार्देशची उत्कृष्ट नैसर्गिक भिंत असल्याचे पोर्तुगीजांचे मत होते. तसा अभिप्राय गोव्याचा एक व्हिसेरेइ दों फ्रेदेरिक गिल्वेर्म द सौझ याने लिहून ठेवला आहे.

पेडणे महालाचा बराच मोठा भाग पोर्तुगीजानी व्यापिला. उरलेला व्यापण्यास त्याना विलंब लागला नसता. त्याची कल्पना झाल्याने खेम सावंत तिसरा याने पोर्तुगीजांकडे तहाचा संदर्भ लावला. त्याचवेळी सावंत—पोर्तुगीज युद्धाने पुणे दरबाराचे लक्ष वेधून घेतले. काही झाले तरी सावंत हे पेशव्याना जवळचे वाटणे स्वाभाविक होते. एक परकी सत्ता त्यांचा नाश करणार म्हटल्यावर त्यानी सावंतांचा पाठपुरावा करण्याचे ठरविले. त्यानी आपला एक दूत पोर्तुगीजांकडे पाठविला. त्याने व्हिसेरेइकडे शिष्टाई केली. परंतु ती निष्फळ ठरली. बार्देशच्या संरक्षणासाठी आपणाला पेडणे महाल हवा आहे, असा हट्ट व्हिसेरेइ धरून बसला. त्या दरम्यान वाटाघाटी चालू असतानाच पुण्याच्या वकीलाचे गोव्यात निधन झाले. व्हिसेरेइने पेडणे महालाचा पोर्तुगीजानी घेतलेला भाग बार्देशमध्ये समाविष्ट करून घेण्याचा एक आदेश

पोर्तुगालच्या राजाने आपणाला पाठविला आहे, अशी सबब पुढे करून तो भाग बार्देश महालाला जोडून टाकला.

स. १७८५ साली करवीरचे छत्रपती आणि वाडीकर सावंत यांच्यामधील संबंध विकोपास जाऊन युद्धप्रसंग उद्भवला. खेम सावंतास दिल्लीच्या बादशहाकडून मोर्चेलांचा बहुमान मिळाला होता. वाडीकर सावंत हे आपले मांडलिक आहेत, सबब त्यानी मोर्चेलांसारखा बहुमान वाहवू नये, असा करवीरच्या छत्रपतीचा आक्षेप होता. तो वाडीकर सावंतानी झिडकारल्याने त्याना वठणीवर आणण्यासाठी करवीरच्या छत्रपतीनी त्यांच्याविरुद्ध हत्यार उपसले.

सावंतानी पोर्तुगीजांकडे मदतीची याचना केली. पोर्तुगीजाना करवीरच्या छत्रपतीसारखा बलाढ्य शेजारी नको होता म्हणून त्यानी वाडीकराना मदत करण्याचे ठरविले. त्या दरम्यान करवीरच्या छत्रपतीनाही पोर्तुगीजांकडे सावंताविरुद्ध मदत मागितली. त्यानाही त्यानी मधाचे बोट लावले. त्यांचा कल सावंतांकडे होता हे जरी खरे असले तरी मदतीच्या बदली त्याना सावंताकडून चांगले घबाड हवे होते. त्यानी पेडणेचा शेष भाग सावंताकडे मागितला. त्यानी संकट प्रसंग लक्षात घेऊन पेडणे महालाच्या शेष भागाचे पोर्तुगीजांच्या हातावर उदक सोडण्याचा निर्णय घेतला. ह्या सौद्याबाबतचा करार उभयपक्षांमध्ये दि. २९ जानेवारी १७८८ या दिवशी पार पडला.

पुणे दरबाराला वरील सौद्याची जाग फार उशीरा आली. पेशव्यानी हालचाल केली. महादजी शिंदे यांनी पुणे दरबाराला ह्या प्रकरणी हस्तक्षेप करण्यास प्रवृत्त केले. पण त्याचा उपयोग झाला नाही. पेडणे महाल सावंतांच्या हातचा गेला तो गेलाच. तरीही महादजी शिंदे हयात असेस्तोवर ते पोर्तुगीजाना अद्दल घडवून ते गेलेला मुलुख आपणास परत मिळवून देतील, अशी सावंताना आशा वाटत होती.

महादजी शिंदे यांचे थोरले बंधू जयाप्पा शिंदे यांची मुलगी खेम सावंत तिसरा यास दिली असल्याने महादजीना सावंताविषयी आस्था वाटणे स्वाभाविक होते. ते दिल्लीच्या बादशहाचे कारभारी असल्याने त्यांच्याच शिफारसीवरून बादशहाने खेम सावंतास मोर्चेलांचा बहुमान आणि राजे बहाद्दर हा किताब बहाल केला होता.

स. १७९४ साली महादजी शिंदे यांचे पुण्यात वानवडी येथे निधन झाले आणि सावंतांचा आधार तुटला. तरीही त्यानी आपला गेलेला मुलुख परत मिळविण्याची आशा सोडली नाही.

स. १८०० साली वाडीकर सावंतानी पेडणे महालात बंडाळी माजविली. तिचा मोड करण्यासाठी गव्हर्नर जनरल फ्रान्सिश्कु द व्हैग काब्राल याने ४०० सैनिक पेडण्याकडे रवाना केले. या सैन्याने सावंतांच्या सैन्याचा मोड करून पेडणे महालात शांतता प्रस्थापित केली. सदहू मोहिमेत पोर्तुगीजांच्या हाताला सावंताचे तीन अधिकारी लागले. त्याना गिरफदार करून आग्वादच्या किल्ल्यात साधे कैदी म्हणून पाठविण्यात आले.

खेम सावंत भोसले तिसरे यांचे निधन झाले, तेव्हा वाडी संस्थानात भाऊबंदकी माजली. खेम सावंतास तीन राण्या होत्या. पैकी पट्टराणीस एकच कन्या होती. तर दोघीना संतान नव्हते. त्याचा परिणाम असा झाला की, खेम सावंताचे दोन चुलत बंधू श्रीराम सावंत आणि फोंड सावंत ह्या दोघांमध्ये गादीसाठी

भांडणे सुरू झाली. त्यातच खेम सावंताची पट्टराणी दुर्गाबाई हिच्या हाती संस्थानचा कारभार असल्याने ती दत्तक पुत्र घेऊन संस्थानचा कारभार चालविण्याचे मनसुबे करीत होती.

वाडी संस्थानच्या राजघराण्यात सुरू झालेल्या यादवीची संधी साधून करवीरच्या छत्रपतीनी वाडीत सैन्य घुसवून भरतगड आणि यशवंतगड हे दोन किल्ले घेतले. करवीरच्या सैन्यास प्रतिकार न झाल्याने संस्थानच्या राजधानीस धोका निर्माण झाला. ह्या आणीबाणीच्या प्रसंगी राणी दुर्गाबाई हिने आपल्या दिवंगत पतीकडून मिळालेल्या अधिकारांनुसार गोव्याच्या पोर्तुगीजांकडे करवीरच्या सैन्याविरूद्ध मदत मागितली.

वाडीकर सावंताचे आणि पोर्तुगीजांचे संबंध सलोख्याचे नसले तरी वाडी संस्थान करवीरच्या छत्रपतींच्या भक्षस्थानी पडून एक बलाढ्य शत्रू आपल्या हद्दीवर आलेला पोर्तुगीजाना नको होता. म्हणून राणी दुर्गाबाईच्या हांकेस ओ देऊन गोव्याच्या गव्हर्नर जनरलने सावंताच्या मदतीस सैन्य धाडण्याची त्वरा केली. पोर्तुगीज सैन्य मदतीला येत असल्याचे कळताच वाडीकरांच्या सैन्याला चेव आला. त्याने करवीरच्या सैन्यावर फेर हल्ले चढवून भरतगड आणि इतर बरीच गेलेली ठाणी परत घेतली.

पोर्तुगीजानी वाडी संस्थानचा बराच मुलुख लाटला असल्याने सावंताच्या मनात पोर्तुगीजांविषयी आकस निर्माण होणे स्वाभाविक होते. पोर्तुगीजानी गिळंकृत केलेला मुलुख परत मिळविण्याची ईर्षा ते मनात बाळगून होते. तरीही वाडी संस्थानवर ज्या ज्या वेळी परचक्राचे संकट आले त्या त्या वेळी त्यानी पोर्तुगीजांकडे मदतीची याचना केली. पोर्तुगीजानीही सावंताना मदत केली. कारण, त्यांच्यासारखा दुबळा शेजारी असणे त्याना हितकारक वाटत होते.

अनुक्रमणिका

# १७. करवीरचे छत्रपती

कोल्हापूरचे छत्रपती आणि पोर्तुगीज यांच्यामधील संबंध करवीर राज्याच्या संस्थापिका महाराणी ताराबाई यांच्यापासून सुरू झाला. छत्रपती राजाराम महाराजांचे निधन झाल्यावर महाराणी ताराबाई यानी आपला पुत्र शिवाजी यास राज्याभिषेक करून त्याच्या नावाने त्या मराठी राज्याचा कारभार हांकीत होत्या. परंतु मराठ्यांच्या राज्याच्या खऱ्या राणी त्याच आहेत, हे गोव्याच्या पोर्तुगीजाना माहीत होते. पोर्तुगीज कागदपत्रात तसा उल्लेख आढळतो.

महाराणी ताराबाई यानी सर्वसाधारणतः स. १७०० ते १७१४ या दरम्यानच्या काळात राज्य केले. या कालावधीत त्यानी औरंगजेबाशी सामना देऊन शिवाजी महाराजानी स्थापन केलेल्या स्वराज्याचे शर्थीने रक्षण केले, तशाच त्या पोर्तुगीजांशीही कणखरपणाने वागल्या. उदाहरणार्थ, पोर्तुगीज लोक अरबी समुद्रात संचार करणाऱ्या बिगर पोर्तुगीज जहाजाना आपली दस्तके बाळगण्याची सक्ती करीत. त्यातून मोगल बादशहाची जहाजेही सुटत नसत. शिवाजी महाराजानी आपले आरमार सिद्ध केल्यावर पोर्तुगीजाना ठणकावून सांगितले की, आपल्या व्यापारी नौका त्यांची दस्तके बाळगणार नाहीत. ते तेवढ्यावरच थांबले नाहीत, तर त्यानी पोर्तुगीज नौकाना आपली दस्तके बाळगण्यास भाग पाडले. त्यांचे हे कडक धोरण संभाजी महाराजानी पुढे चालू ठेवले आणि महाराणी ताराबाईनीही त्या धोरणाचा अवलंब केला. उदाहरणार्थ, गोव्याचा राज्यसचिव फ्रान्सिश्कु द आझावेद द सांद हा सिंधुदुर्गचा सुभेदार बुरानजी मोहिते याला पत्र पाठवून तक्रार करतो की, 'सिंधुदुर्गच्या जवळपास संचार करणाऱ्या आमच्या नौकाना तुम्ही सिंधुदुर्गची दस्तके बाळगण्याची सक्ती करता ही व्हिसेरेइ आणि छत्रपती यांच्यामध्ये झालेल्या कराराची उघड पायमल्ली आहे.'

या ठिकाणी एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे ती ही की, बुरानजी मोहिते हा पोर्तुगीजाना सिंधुदुर्गची दस्तके बाळगण्याची सक्ती स्वतःच्या अखत्यारीत करीत नव्हता, तर महाराणी ताराबाई यांच्या हुकुमाची तो अंमलबजावणी करीत होता.

स. १७०३ साली दि. ११ डिसेंबर रोजी गोव्याचा व्हिसेरेइ पोर्तुगालला आपल्या राजास लिहितो की, 'गोव्यात आणि ठाणे जिल्ह्यात मराठे आणि पोर्तुगीज यांच्या मध्ये युद्ध चालू आहे.' यावेळी मराठे आणि मोगल यांच्यामधील युद्ध ऐन रंगात आले होते. तरीही महाराणी ताराबाई यानी पोर्तुगीजांसमोर नमते न घेता त्यांच्याशी युद्ध चालू ठेवले होते.

गोव्याचा गव्हर्नर दि. ३ अक्टोबर १७०५ रोजी शिवाजी राजे (म्हणजेच महाराणी ताराबाई) याना लिहितो की, 'खांदेरी उंदेरी बेटातील मराठ्यांच्या आरमाराकडून पोर्तुगीज जहाजांवर होणारे हल्ले थांबले नाहीत, तर गोव्याची फार नुकसानी होणार आहे.' याच पत्रात त्याने खालच्या आवाजात मराठे आणि पोर्तुगीज यांच्यामधील सलोख्यावर भर दिला आहे.

स. १७०६ साली वाडीकर सावंत आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये युद्ध चालू होते, तेव्हा खेम सावंताच्या विनंतीवरून महाराणी ताराबाई यानी सावंतांच्या मदतीला जांबावली येथे सैन्य धाडले होते. त्यामुळे मराठे आणि पोर्तुगीज यांच्यामधील सलोख्याच्या संबंधाना बाध आला अशी तक्रार करून गोव्याच्या गव्हर्नरने महाराणी ताराबाई याना निषेधपर पत्र पाठविले होते.

अनुक्रमणिका

स. १७०७ साली छत्रपती शाहू महाराज यांचे महाराष्ट्रात आगमन झाले तेव्हा त्याच्याशी लढण्यासाठी महाराणी ताराबाई यानी व्हिसेरेइ दों रुद्रिगु द कॉश्त याला पत्र पाठवून तहाचा संदर्भ लावला होता. व्हिसेरेइने पत्रोत्तरी महाराणी ताराबाई याना कळविले होते की, तहाच्या वाटाघाटी करण्यासाठी त्यांचे दूत आपणाकडे पाठवावे. परंतु ह्या वाटाघाटी पूर्ण होण्यापूर्वीच छत्रपती शाहूकडून महाराणी ताराबाई यांचा पराभव झाल्याने त्याना कोल्हापूरला जाऊन पन्हाळ्याच्या किल्ल्याचा आश्रय घ्यावा लागला. पोर्तुगीजांकडून आपणाला संकटप्रसंगी मदत झाली नाही हे महाराणी ताराबाई यांच्या मनात राहिले व पन्हाळ्याला स्थिरस्थावर झाल्यावर त्यानी पोर्तुगीजांशी शत्रूत्वाचे धोरण अवलंबिले.

दि. ३ जानेवारी १७११ रोजी व्हिसेरेइ पोर्तुगालच्या राजास लिहितो की, 'राणीचे सैन्य गोव्याच्या सीमेवर गोळा झाले आहे. हे सैन्य केव्हा गोव्यात घुसेल त्याचा नेम नसल्याने 'कोंगो' येथील ठाण्याच्या मदतीला आरमार पाठविता आले नाही.'

स. १७१४ सालच्या ऑगस्ट महिन्यात केव्हातरी पन्हाळ्यावर राज्यक्रांती होऊन महाराणी ताराबाई व त्यांचे पुत्र शिवाजी राजे याना कारावासात जावे लागले. ह्या राजकीय उलथापालथीमागे रामचंद्रपंत आमात्य यांचा हात असल्याची विश्वनीय बातमी पोर्तुगीजाना कळल्याने व्हिसेरेइने रामचंद्रपंताना पत्र पाठवून राज्यक्रांती घडवून आणल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. परंतु करवीरचे नवीन छत्रपती संभाजी महाराज यानी पोर्तुगीजासंबंधीच्या धोरणात बदल केला नाही. त्याचा पुरावा म्हणजे सिंधुदुर्ग येथील करवीरच्या आरमाराकडून पोर्तुगीज जहाजावर हल्ले होतात म्हणून व्हिसेरेइने रामचंद्रपंत आमात्य याना दि. १७ जानेवारी १७१६ रोजी पाठविलेले निषेधपर पत्र.

अखेर करवीरचे छत्रपती आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये दि. २३ मार्च १७१६ रोजी एक तह झाला. या तहाच्या वाटाघाटी करण्यासाठी करवीरच्या छत्रपतीचा हरिपंत या नावाचा वकील गोव्यास गेला होता. हा तह ९ कलमी असून पहिल्याच कलमात म्हटले आहे की, करवीरचे छत्रपती आणि कान्होजी आंग्रे यांच्यामध्ये जे युद्ध चालू आहे त्यात पोर्तुगीजानी करवीरच्या छत्रपतीना आंग्र्यांविरुद्ध मदत करावी. दुसऱ्या कलमाच्या शेवटी म्हटले आहे की, 'गोव्याच्या वरीष्ठ कोर्टाचे न्यायाधीश दोमिगुश दोइरादु द ओलिव्हैरा यांच्या गलबतावरील ज्या दहा तोफा सिंधुदुर्गच्या आरमाराने जप्त करून नेल्या त्या परत करण्यात याव्यात.'

करवीरचे संभाजी राजे यांचे दूत हरिपंत यांनी प्रस्तुतच्या तहावर शेरा मारला की, 'तोफांचे कलम वगळता इतर कलमाना मी मंजुरी देत आहे. तोफांच्या कलमाला राजेश्री (संभाजी) यांची परवानगी लागेल. हे मी स्वदस्तरीने लिहिले—हरिपंत हुजूर.'

कान्होजी आंग्रे हा छत्रपती घराण्याचा निष्ठावंत सेवक होता. छत्रपती राजाराम महाराज यानी जिंजीला स्थलांतर केले तेव्हा आंग्र्यांनी मोगलाना कोकणच्या समुद्र किनाऱ्यावर पाय ठेवू दिला नव्हता. छत्रपती राजाराम महाराजांच्या निधनानंतर कान्होजीने महाराणी ताराबाई याना निष्ठा वाहून मोगलांशी युद्ध चालू ठेवले होते. परंतु कोल्हापुरात सत्तासंक्रमण झाल्यावर त्याने रामचंद्रपंताना धाब्यावर बसवून आपला सवतासुभा स्थापन केला होता. रामचंद्रपंताना कान्होजीचा मनमानी कारभार सहन होणे शक्य नव्हते म्हणून त्यांनी कान्होजीस वठणीवर आणण्यासाठी पोर्तुगीजांशी वरील तह केला होता.

अनुक्रमणिका

कुलाबेकर आंग्रे आणि करवीरचे छत्रपती यांच्यामधील संघर्ष दीर्घकाल टिकला.

आंग्र्यांप्रमाणेच वाडीकर खेम सावंत हाही करवीर राज्याशी शत्रुत्वाने वागत होता. त्याला आपल्या पक्षात आणण्यासाठी महाराणी ताराबाई यानी त्याला परगणा कुडाळ, बांदे, डिचोली, पेडणे, साखळी आणि मणेरी ह्या सहा महालांची सनद स. १७०८ साली दिली होती. परंतु नंतर छत्रपती शाहू महाराजांचा पक्ष वरचढ झाल्यावर त्याने महाराणी ताराबाई यांच्याशी बेइमानी करून शाहूचा पक्ष धरला होता. तेव्हापासून करवीरचे छत्रपती आणि वाडीकर सावंत यांचे संबंध जे बिघडले ते कधीच सुधारले नाहीत.

करवीरचे छत्रपती संभाजी महाराज यानी पोर्तुगीजांकडे तहाचा संदर्भ लावला तो त्यांची मदत घेऊन वाडीकर सावंताना शासन करण्याच्या इराद्याने. परंतु वाडीकर सावंतासारखा दुबळा शेजारी पोर्तुगीजाना हवा असल्याने त्यानी करवीरच्या वकिलास सबब सांगितली की, सावंताचा आणि आपला मैत्रीचा करार असल्याने त्याचा भंग करून आपण त्यांच्याविरुद्ध करवीरच्या छत्रपतीस मदत करून शकत नाही.

पोर्तुगीजांचे उपर्युक्त धोरण करवीर दरबाराला माहीत असून देखील स. १७१६ त उंभयपक्षांमध्ये तहाचा करार घडून आला. परंतु दुसऱ्याच वर्षी म्हणजे १७१७ त करवीरचे दोन सरदार पिलाजी घोरपडे आणि रामराव या दोघानी गोव्यात आक्रमण करून काही खेड्यांची लुटालूट केली. या आक्रमणाबद्दल तक्रार करून गोव्याच्या व्हिसेरेइने छत्रपती संभाजी महाराज याना दि. १६ मे १७१७ रोजी जो खलिता धाडला त्यात तो म्हणतो, ‘सरदार रामराव यानी साष्टी प्रांतात घुसून सोन्याचांदीच्या वस्तूंची मोठी लूट केली.’

वरील आशयाचा निषेधपर खलिता गोव्याच्या राज्य सचिवाने करवीरचे सेनापती हिंदुराव घोरपडे यांच्याकडेही पाठविला. त्यात त्याने विनंती केली आहे की, ‘गुन्हेगाराना कडक शासन करावे व त्यानी लुटलेल्या वस्तू परत करण्यात याव्या.’ राज्य सचिव खलित्यात म्हणतो की, ‘लुटलेल्या वस्तूंची किंमत १० लक्ष पार्दाव म्हणजे पांच लक्ष रुपये आहे.’

गोव्याचा व्हिसेरेइ दि. २१ जानेवारी १७१८ रोजी पोर्तुगालच्या राजास लिहिलेल्या पत्रात वरील घटनेचा उल्लेख करून म्हणतो की, ‘कोल्हापूरच्या सरदारानी साष्टी प्रांतात घुसताच गोवा बेटातील रहिवाश्यांची नुसती पाचावर धरण बसली. आक्रमकांनी मडगाव, कुकळ्ळी आणि वेरडे ही गावे लुटली. नावेलीचे श्रीमंत चर्च त्यानी साफ धुवून नेले. या चर्चचा भक्तगण फार मोठा आहे.’

करवीरचे छत्रपती आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये आदल्याच वर्षी तह झाला असता, करवीरच्या सैन्याने साष्टी प्रांतात आक्रमण का करावे? बहुधा पोर्तुगीजांकडून वाडीकर सावंताना मदत होत असल्याचे कानावर आल्याने त्याचा बदला म्हणून हे आक्रमण करवीरच्या सैन्याने केले असल्याची शक्यता आहे.

करवीरचे छत्रपती आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये जो ९ कलमी करार झाला त्याचे सातवे कलम असे आहे :

अनुक्रमणिका

'कुडाळचे सरदेसाई नारबा सावंत भोसले हे जरी ह्या (गोवा) राज्याचे मित्र असले, आणि ते जरी ह्या राज्याला खंडणी देत असले तरी, संभाजी राजे आणि भोसले यांचे युद्ध जुंपल्यास प्रस्तुत करारान्वये ह्या राज्याने भोसल्याना मदत करू नये.'

परंतु पोर्तुगीजांचे वर्तन नेहमीच दुटप्पी होते. आपल्या दुबळ्या शेजाऱ्यावर त्याच्या बलाढ्य शत्रूने मात करावी हे त्यांच्या राजकीय धोरणात बसत नव्हते. करवीरच्या छत्रपतीशी अनाक्रमणाचा करार करून देखील ते त्यांचे शत्रू वाडीकर सावंत याना चोरून मदत करीत होते, त्याचे कारण वरच्याप्रमाणे आहे.

स. १७२६ साली करवीरचे छत्रपती संभाजी महाराज हे सोंधेच्या राजाचे पारिपत्य करण्यासाठी गोव्याच्या हद्दीवर ससैन्य आले असता ते गोव्यावर स्वारी करण्याच्या इराद्याने आले असल्याची अफवा गोवा बेटात पसरताच सर्वत्र घबराट माजला. पोर्तुगीज लष्करी अधिकाऱ्यांची धावपळ सुरू झाली. साष्टी प्रांताच्या रक्षणासाठी त्यानी कडेकोट तयारी केली. परंतु पोर्तुगीजांच्या सुदैवाने छत्रपती संभाजी महाराज गोव्यात न उरता परभारेच गोव्याच्या सीमेवरून परत गेले. ते पाहून पोर्तुगीजानी सुटकेचा श्वास सोडला.

तद्नंतरच्या चार पाच वर्षात करवीरचे छत्रपती आणि पोर्तुगीज यांच्यामधील संबंध नरमगरमच राहिले. परंतु मोठ्या संघर्षाचा प्रसंग कधी उद्भवला नाही.

स. १७३१ साली सातारचे शाहू छत्रपती आणि करवीरचे संभाजी छत्रपती यांच्यामध्ये वारणेचा तह होण्यापूर्वी जे हर्षामर्षाचे प्रसंग उद्भवले त्याची झळ पोर्तुगीजांच्या अमलाखालच्या प्रदेशाला पोहोचल्यावाचून राहिली नाही. दोन्ही बाजूच्या सैन्याची आक्रमणे पोर्तुगीज प्रदेशात होत असत. अखेर दोघा छत्रपतीमध्ये 'वारणे'चा तह होऊन त्यांच्यामधली भाऊबंदकी एकदाची संपुष्टात आली.

वारणेच्या तहाविषयी गोव्याचा व्हिसेरेइ पोर्तुगालच्या राजास लिहितो :

'संभाजी राजे यांचे राज्य तुळाजी आंग्रे यांच्या अमलाखालच्या प्रदेशापासून सुरू होते. ते कर्नाटक राज्यास भिडले आहे. सबंध कोंकण प्रांत या राज्यात मोडतो. आंग्रे, वाडीकर सावंत आणि गोवा संभाजी राजे यांच्या राज्यात मोडतो अशी समजूत आहे. परंतु आम्ही संभाजी राजे यांचे मांडलिकत्व पत्करलेले नाही. आम्ही त्याना खंडणी भरत नाही. परंतु सोंधेचा राजा आणि कर्नाटकाचा (बिदनूर) राजा त्याना खंडणी भरतात.'

वारणेच्या तहान्वये शिवाजी महाराजानी निर्माण केलेल्या स्वराजाची विभागणी दोन राज्यामध्ये होऊन सबंध कोंकण प्रांत आणि कर्नाटकाचा पश्चिम भाग करवीरच्या छत्रपतीच्या अधिसत्तेखाली गेला.

छत्रपती शाहू महाराजांच्या आज्ञेवरून सोंधे आणि बिदनूर ह्या दोन्ही संस्थानानी करवीरच्या छत्रपतीस खंडणी भरण्याचे कबूल केले. परंतु पोर्तुगीजानी करवीर राज्याचे मांडलिकत्व पत्करले नाही. तरीही पोर्तुगीज हे आपले मांडलिक आहेत असा दावा करवीरचे छत्रपती करीत असत. त्याचा पुरावा म्हणजे स. १७३९ साली इचलकरंजीचे सरदार व्यंकटराव घोरपडे व सरदार नरगुंदकर भावे या दोघानी गोव्यावर स्वारी केली असता करवीरचे छत्रपती संभाजी महाराज यानी केलेला ह्या स्वारीचा निषेध. पेशव्यांच्या सैन्याने आपल्या अधिसत्तेचा भंग केला म्हणून छत्रपती संभाजी महाराज हे व्यंकटराव घोरपडे व

अनुक्रमणिका

नरगुंदकर भावे या दोघांच्या पारिपत्यास सैन्य घेऊन निघण्याच्या तयारीत होते. परंतु तत्पूर्वीच पोर्तुगीज आणि पेशव्यांचे सरदार या दोघांमध्ये समेट होऊन पेशव्यांचे सैन्य गोव्यातून माघारा परतले होते.

वाडीकर सावंत आणि कुलाबेकर आंग्रे हे वारणेच्या तहान्वये करवीरच्या छत्रपतीचे मांडलिक बनले असले, तरी त्या दोघानी करवीरच्या छत्रपतीचे मांडलिकत्व बऱ्या बोलाने कधीच मान्य केले नाही. कुलाबेकर आंग्रे तर करवीरच्या छत्रपतीचा उघडपणे उपमर्द करीत असत. त्याना शासन करण्यास करवीरचे छत्रपती असमर्थ होते. म्हणून ते त्यांच्याविरूद्ध पोर्तुगीजांकडे मदतीची याचना करीत असत. परंतु आंग्र्याच्या सामर्थ्याची कल्पना पोर्तुगीजाना असल्याने त्यानी करवीरच्या छत्रपतीना कधीच आंग्र्याविरूद्ध मदत केली नाही.

स. १७४२ साली करवीरच्या छत्रपतीचा सरदार गोविंदराम ठाकूर याने साष्टी प्रांतावर हल्ला केला. हा सरदार मूळचा पेशव्यांचा. तो थोड्याच दिवसापूर्वी पेशव्याची नोकरी सोडून करवीरच्या छत्रपतीना येऊन मिळाला होता. तो साष्टी प्रांतावर स्वारी करणार असल्याची पूर्व सूचना नरगुंदकर दादाजी भावे यांच्याकडून पोर्तुगीजाना मिळाल्याने त्यानी गोविंदराम ठाकूर यांच्या प्रतिकाराची तयारी केली.

नरगुंदकर भावे यांच्याप्रमाणेच वाडीकर नागोबा सावंत यांच्याकडून ही उपरिनिर्दिष्ट स्वारीचा इशारा पोर्तुगीजाना मिळाला होता. गोविंदराम ठाकूर दि. १२ मे १७४२ रोजी घाट उतरून सांगे महालात शिरला. त्याच्या सैन्यात तीन हजार घोडदळ आणि तितकेच पायदळ होते. त्याच्या पूर्वी करवीरच्या छत्रपतीचा आणखी एक सरदार रामचंद्र बाबाजी याने सांगे आणि फोंडे येथील किल्ले व्यापिले होते. गोविंदपंत ठाकूर सांगे येथे पोहोचला तेव्हा रामचंद्र बाबाजी फोंडे येथील मर्दनगडच्या किल्ल्यात होता. त्याला गोविंदपंताने सांगे येथून बोलावून घेऊन कैद केले व सांगेचा किल्ला आपल्या ताब्यात घेतला. गोविंदपंत ठाकूर फौजबंद असल्याने रामचंद्र बाबाजीस सांगेचा किल्ला गोविंदपंताच्या ताब्यात रीतसर देणे भाग पडले. किल्ल्याचे हस्तांतर झाल्यावर रामचंद्र बाबाजीची मुक्तता झाली. तो मग फोंडे येथील मर्दनगडावर येऊन राहिला.

गोविंदपंताने गोव्याच्या व्हिसेरेइला कळविले की, आपणाशी बोलणी करण्यासाठी एक मातबर मनुष्य फोंड्यास पाठवावा. परंतु व्हिसेरेइने गोविंदपंताच्या पत्राची दखल घेतली नाही. ते पाहून गोविंदपंताने फोंडे येथील आपल्या सैन्याचा तळ हलवून साष्टी प्रांतात प्रवेश केला. त्याने तेथून व्हिसेरेइला पत्र पाठविले की, ‘करवीरच्या छत्रपतीना पोर्तुगीजानी जी खंडणी द्यायची असते तिच्या पोटी थकलेल्या खंडणीचे चाळीस हजार पार्दाव म्हणजे जवळ जवळ वीस हजार रुपये त्वरीत पाठवून द्यावे.’

गोविंदपंताचा मुक्काम साष्टी प्रांतात चौदा दिवस होता. नंतर तो आपल्या सैन्यासह सांग्यास गेला. त्या दरम्यान व्हिसेरेइने गोविंदपंताशी सामना देण्याची तयारी केली होती. तो सांगेस गेल्याचे कळताच पोर्तुगीज सैन्य त्याच्या पाठलागास सांगेला निघाले. दि. ८ जून १७४२ रोजी पोर्तुगीज सैन्याने गोविंदपंताच्या सैन्यावर हल्ला केला. या लढाईत त्याचा पराभव होऊन तो घाटमाथ्यावर पळून गेला. लढाई एकूण तीन तास झाली. विजय प्राप्त झाल्यावर पोर्तुगीजानी सांगेचा किल्ला लगेच पाडून भुईसपाट केला. तेथून त्यांनी मग फोंड्यावर चाल केली. तेथील किल्ल्यात अवघे शंभर सैनिक होते. पोर्तुगीज सैन्यात सहाशे गोरे आणि दीड हजार एत्तद्देशीय सैनिक होते. त्यांच्या तोफाही आधुनिक होत्या. अशा सुसज्ञ सैन्याशी शंभर सैनिकानी लढणे म्हणजे मृत्यू पत्करण्यासारखे होते. म्हणून रामचंद्र बाबाजी पोर्तुगीजाना

शरण गेला. त्याला कैद करून पोर्तुगीजानी आग्वादच्या किल्ल्यात आणून ठेवले. तेथून तो अठ्ठावीस दिवसानी पळून गेला.

गोविंदपंत ठाकूर प्रकरणी गोव्याचा नवीन व्हिसेरेइ दों लुईज कायतान द आल्मैद हा दि. ३१ ऑगस्ट १७४२ रोजी करवीरचे छत्रपती संभाजी महाराज याना लिहिलेल्या पत्रात म्हणतो :

'....... ठाकूर याना आम्ही जे शासन केले त्याबद्दल आपण समाधान व्यक्त केले आहे. त्यांच्या हातून जो कृतघ्नपणा घडला त्याबद्दल त्याला झालेली शिक्षा योग्यच आहे. आणि मला आशा आहे की, आपणही त्याला शासन केल्याखेरीज राहाणार नाही. सांप्रत तो बालाघाटावर पळून गेला म्हणून आपल्या तावडीतून सुटला. त्याने आमची सुरुवातीला चांगलीच फसवणूक केली. आपण आपला मंत्री असल्याचे त्याने आम्हाला सांगितले. त्याच्या ह्या बनवेगिरीचा आम्हाला बिलकूल संशय आला नाही. परंतु त्याने जेव्हा रामचंद्र बाबाजी याना तुरुंगात टाकले, तेव्हा त्याच्याविषयी आम्हाला संशय आला. त्याने सांगेचा किल्ला हल्ला करून घेतला व फोंडेचा किल्लाही खाली करून घेतला.

'आपला एक पुरातन मांडलिक सोंधेचा राजा याने ठाकुराने दगलबाजीने घेतलेल्या ठाण्याची फिरून कबज केली आहे. त्याचा मंत्री कलपय्या याच्यामार्फत त्याने मला कळविले आहे की आपल्या ज्या मागण्या आहेत, त्या पूर्ण करण्यास तो तयार आहे.'

व्हिसेरेइ आपल्या पत्रात म्हणतो की, सोंधेचा राजा आणि करवीरचे छत्रपती यांच्यामध्ये समेट घडवून आणण्याचा त्याचा प्रयत्न चालला आहे आणि हे सर्व तो सद्‍भावनेने करीत आहे.

पोर्तुगीजानी रामचंद्र बाबाजी याला आग्वादच्या तुरुंगात डांबून ठेवले होते व तेथून तो फरारी झाला हे मागे आलेच आहे. ह्या प्रकरणी गोव्याचा व्हिसेरेई छत्रपती संभाजी राजे यांना दि.९ फेब्रुवारी १७४३ रोजी पाठविलेल्या पत्रात म्हणतो :

'आपल्या पत्रांची उत्तरे पाठविण्याची जी तत्परता आम्ही दाखविली त्यावरून आपली खात्री पटलीच असेल की, रामचंद्र बाबाजी आणि सोंधेचा राजा यांच्यामधल्या वाटाघाटी यशस्वी होऊन रामचंद्र बाबाजी समाधान पावून जावेत ही आमची तळमळीची इच्छा होती. रामचंद्र बाबाजी हे आपले एक विश्वासू मंत्री असल्याने त्यांची बडदास्त आम्ही चांगली ठेवली होती. त्यांच्या सेवेत कोणतीच कमतरता नव्हती. सोंधेच्या राजाने त्यांच्याशी वाटाघाटी करण्यासाठी आपला दूत पाठवावा म्हणून आम्ही खूप खटपट केली. त्याच्याकडून जबाब येण्यास विलंब लागला. नंतर त्याने कळविले की, वाटाघाटी प्रत्यक्ष आपणाशीच व्हाव्यात अशी त्याची इच्छा आहे. त्या दरम्यान आम्ही नौका मायदेशी पाठविण्याची तयारी करीत होतो. त्यांची रवानगी झाली की, रामचंद्र बाबाजी याना आम्ही निरोप देणार होतो. परंतु ज्या दिवशी नौका इकडून निघाल्या त्याच दिवशी रामचंद्र बाबाजी आम्हाला न सांगता न सावरता निघून गेले. ह्यावरून पोर्तुगीज राष्ट्रावर त्यांचा विश्वास नसल्याचे सिद्ध झाले. परंतु त्यांच्या ह्या आकस्मिक प्रयाणाची ही दुसरी खेप आहे हे ही लक्षात घेतले पाहिजे. आम्ही आता सोंधेच्या राजास कळविले आहे की, त्याने आपणाशी वाटाघाटी करण्यासाठी आपले दूत तिकडेच पाठवावे. दुसरी गोष्ट म्हणजे रामचंद्र बाबाजी तिकडे निघून गेले असल्याने त्यांच्या अनुपस्थितीत इकडे वाटाघाटी करण्यात आम्हाला स्वारस्य नाही.'

अनुक्रमणिका

रामचंद्र बाबाजी प्रकरणी करवीर दरबार आणि गोव्याचे पोर्तुगीज यांच्यामध्ये बराच पत्रव्यवहार झाला. परंतु त्यातून काहीच निष्पन्न झाल्याचे जुन्या कागदपत्रातून आढळत नाही.

रामचंद्र बाबाजी ही सर्वसामान्य व्यक्ती नव्हती. छत्रपती संभाजी महाराज यांच्या मंत्रिमंडळात त्यांचा दर्जा सुमंताचा होता. हे परसनीस घराणे शिवाजी महाराजांच्या काळात त्यांच्याच कृपेने उदयास आले होते. करवीरच्या महाराणी जिजाबाई यांच्या विश्वासातील हे घराणे होते. असे असता गोव्याच्या पोर्तुगीजानी छत्रपतीच्या ह्या सुमंताचा तुरूंगात डांबून अवमान केला तरी करवीर दरबाराने या अपमानाबद्दल पोर्तुगीजांविरूद्ध कोणतीच कारवाई करू नये याचे आश्चर्य वाटते.

गोव्याचा व्हिसेरेइ छत्रपती संभाजी महाराज याना दि. ९ फेब्रुवारी १७४३ रोजी पाठविलेल्या पत्रात म्हणतो की, ‘रामचंद्र बाबाजी यांची बडदास्त आम्ही चांगली ठेवली होती. तरीही ते आम्हाला न सांगता न सवरता इकडून गुपचूप निघून गेले.’ परंतु व्हिसेरेइची ही नुसती सारवासारव होती असा संशय त्याने दि. ५ एप्रिल १७४३ रोजी छत्रपती संभाजी महाराज याना लिहिलेल्या पत्रावरून येतो. प्रस्तुतच्या पत्रात तो रामचंद्र बाबाजी यांच्याविषयी म्हणतो : ‘मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, आमच्या शेजारच्या प्रदेशात जर रामचंद्र बाबाजी यांचे वास्तव्य झाले तर ते आम्हाला बिलकूल आवडणार नाही. आणि त्यानी आमच्यावर केलेल्या आरोपांचा आपण पाठपुरावा केला तर त्यालाही आमची हरकत असेल.’

स. १७५० ते १७६० या दहा वर्षांच्या कालावधीत करवीरचे छत्रपती आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये हर्षामर्षाचे प्रसंग कधी उद्‌भवले नाहीत. स. १७६० साली छत्रपती संभाजी महाराज कालवश झाले, तेव्हा व्हिसेरेइने महाराणी जिजाबाई याना सांत्वनपर संदेश धाडला होता. त्यात त्याने म्हटले आहे : ‘श्रेष्ठतम महाराजांच्या निधनाची वार्ता ऐकून आम्हाला फार दुःख झाले. या वैभवशाली राज्याचे (गोव्याचे) आणि त्यांचे संबंध उत्कट मैत्रीचे होते. तथापि ते जरी निघून गेले असले, तरी आपणाशी आमचे संबंध निरंतर मैत्रीचेच राहतील.’

स. १७६३ साली गोव्याचे एक जहाज आफ्रिकेहून गोव्यास येत असता करवीर राज्याच्या सिंधुदुर्ग येथील आरमाराने ते पकडले. पोर्तुगीज अधिकाऱ्यानी सिंधुदुर्गच्या किल्लेदाराकडे त्याबद्दल तक्रार केली असता त्याची दाद फिर्याद कुणी घेतली नाही. त्या बेपर्वा वृत्तीमुळे पोर्तुगीजांचे पित्त खवळले व त्याचा बदला घेण्यासाठी त्यानी सिंधुदुर्गविरुद्ध आरमार धाडले. दि. १० नवंबर १७६३ रोजी मालवण बंदरात पोर्तुगीज सैन्य उतरले. त्याने शहरात घुसून लुटालूट आणि जाळपोळ करून किल्ल्यावर तोफा डागल्या. परंतु करवीरच्या सैन्याने आक्रमकांवर प्रतिहल्ला केल्याने त्याना माघार घ्यावी लागली. या हल्ल्यात आपले १९ लोक मरण पावले व पुष्कळ घायाळ झाले, असे पोर्तुगीजांचे म्हणणे, तर मराठी कागदपत्रात ४०० पोर्तुगीज सैनिक ठार झाले असे म्हटले आहे.

पोर्तुगीज अधिकारी आपली प्राणहानी कितीही कमी सांगोत, पण सिंधुदुर्गची लष्करी मोहीम त्याना फार महागात पडली, हे नाकबूल करता येणार नाही. मात्र ह्या प्रकरणामुळे उभयपक्षामधील संबंध विकोपास गेले नाहीत, ही विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे. त्याचा पुरावा म्हणजे स. १७६५ साली इंग्रजानी सिंधुदुर्ग घेतला, तेव्हा महाराणी ताराबाई यांच्या विनंतीवरून गोव्याच्या व्हिसेरेइने इंग्रजांकडे शिष्टाई करून सिंधुदुर्ग करवीरकराना परत मिळवून दिला हा होय.

अनुक्रमणिका

स. १७६५ नंतर करवीरचे छत्रपती आणि पोर्तुगीज यांच्यामधील राजनैतिक संबंधाना बाध येण्यासारखी गंभीर घटना घडली नाही. स. १७८५ साली वाडीचे खेम सावंत तिसरे याना दिल्लीच्या बादशहाकडून मोर्चेलांचा बहुमान आणि राजेबहाद्दर हा किताब मिळाला. खेम सावंत हे महादजी शिंदे यांचे ज्येष्ठ बंधू जयाप्पा शिंदे यांचे जावई असल्याने महादजीनी दिल्ली दरबारातील आपल्या वकील-इ-मुतलिक ह्या अत्युच्च अधिकाराचा उपयोग करून खेम सावंत तिसरे याना दिल्लीच्या बादशहाकडून उपर्युक्त बहुमान मिळवून दिले होते. परंतु महादजी शिंदे याना माहीत नव्हते की, ह्या बहुमानामुळे खेम सावंतावर एक मोठे गण्डांतर येणार आहे.

वाडीकर सावंत हे कोकण प्रांतातील जुने सत्ताधारी असले तरी छत्रपती शिवाजी महाराजानी कोकण प्रांत जिंकला तेव्हा त्यानी सावंताना आपले मांडलिकत्व पत्करावयास लावले होते. स. १७३१ साली सातारचे छत्रपती शाहू महाराज व करवीरचे छत्रपती संभाजी महाराज या दोघांमध्ये वारणेचा तह होऊन स्वराज्याची विभागणी झाली, तेव्हा कोकण प्रांत करवीरच्या छत्रपतीच्या अमलाखाली आला. त्यामुळे साहजिकच वाडीकर सावंत करवीरच्या छत्रपतींचे मांडलिक बनले. अशा परिस्थितीत सावंताना दिल्लीच्या बादशहाकडून प्राप्त झालेला बहुमान स्वीकारता येत नाही, असे करवीरच्या छत्रपतींचे म्हणणे होते. सावंताना त्यानी तसा इशाराही दिला. परंतु त्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष करून खेम सावंत भोसले यानी दरबार भरवून बादशहाकडून प्राप्त झालेली मानचिन्हे धारण केली. करवीरचे छत्रपती शिवाजी तिसरे याना तो आपला आपमान वाटला. त्यानी खेम सावंतास शासन करण्याचे ठरविले. परंतु सावंताचा नक्षा उतरविण्याचे काम ते स्वतःच्या हिमतीवर करू शकत नव्हते. म्हणून त्यानी सावंताविरुद्ध पोर्तुगीजांची मदत मागितली.

सावंताना अद्दल घडविण्याच्या बाबतीत करवीरचे छत्रपती हट्टास पेटले त्याला आणखीही एक कारण होते. स. १७८१ साली खेम सावंत भोसले यानी करवीरकरांच्या अमलाखाली असलेल्या रांगणा किल्ल्यास वेढा घालून करवीरकरांची कुरापत काढण्याचे धारिष्ट्य केले होते. त्याचाही बदला त्याना घ्यायचा होता.

दि. १८ जानेवारी १७८८ रोजी गोव्याचा व्हिसेरेइ पोर्तुगालच्या राज्य सचिवास लिहितो की, 'कोल्हापूरचा राजा व भोसले या दोघांचे संबंध सांप्रत बिघडले आहेत. भोसल्यांना अद्दल घडवावी असा कोल्हापूरच्या राजाचा विचार दिसतो. आणि हे युद्ध जर झाले तर आम्ही आपणाला भोसल्यांविरुद्ध मदत करावी, अथवा मदत करणे शक्य नसल्यास तटस्थता तरी पाळावी अशी मागणी कोल्हापूरच्या राजाने आमच्याकडे केली आहे.'

करवीरचा वकील गोव्याला पोर्तुगीजांची मदत मिळविण्यासाठी आल्याची बातमी पोर्तुगीजांच्या दरबारातील सावंतांच्या वकिलाने सावंताना कळविताच त्यानीही पोर्तुगीजांकडे मदतीचा संदर्भ लावला. पोर्तुगीजाना गोव्याच्या रक्षणासाठी सावंतासारखा दुबळा शेजारी नेहमीच हवा होता. ह्या त्यांच्या जुन्या धोरणास अनुसरून त्यानी वाडीकर सावंताना करवीरच्या छत्रपतीविरूद्ध सशर्त मदत करण्याचे ठरविले. सावंताकडे असलेल्या पेडणे महालाचा शेष भाग त्याना हवा होता.

त्या दरम्यान, गोव्यात तळ देऊन राहिलेल्या कोल्हापूरच्या वकिलाचा पोर्तुगीजानी चांगला परामर्ष केला. त्यानी त्याला बऱ्याच दिवसानी सांगितले की, मदतीच्या कराराची बोलणी करण्यासाठी तुम्ही

करवीरच्या महाराजांकडून अधिकारपत्रे घेऊन या. हा जबाब मिळाल्यावर करवीरचा वकील कोल्हापूरला निघून गेला.

करवीरच्या फौजानी सावंताच्या हद्दीत शिरून आक्रमण केल्यामुळे खेम सावंत भोसले याना पोर्तुगीजांशी मदतीचा करार करण्यापलिकडे गत्यंतर उरले नाही.

दि. २९ जानेवारी १७८८ रोजी वाडीकर सावंत आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये १९ कलमी मैत्रीचा करार होऊन सावंताने पोर्तुगीजांचे मांडलिकत्व पत्करले. सावंताची परिस्थिती अत्यंत बिकट होती. त्यांच्या सैन्यात बेशिस्तपणा माजला होता व दारूगोळ्याची आणि इतर सामानांची टंचाई होती. करवीरच्या सैन्याने घाट उतरून नेवती आणि भरतगड हे दोन किल्ले घेऊं रेडीच्या किल्ल्यास वेढा घातला होता. अशा परिस्थितीत सबंध राज्य करवीरकराना घेऊन देणे किंवा पेडणे महालावर पाणी सोडून पोर्तुगीजांच्या मदतीने उरलेल्या राज्याचे रक्षण करणे हे दोनच पर्याय सावंतासमोर होते. त्यानी दुसरा पर्याय स्वीकारून पोर्तुगीजांशी वरील लज्जास्पद करार केला व पेडणे महालाचा शेष भाग पोर्तुगीजाना देऊन टाकला.

पोर्तुगीजानी आपल्या वकिलास गोव्यात बरेच दिवस ठेवून घेऊन काळकाढूपणा केला व त्या दरम्यानच्या काळात वाडीकर सावंताशी मैत्रीचा करार करून आपणास तोंडघशी पाडले म्हणून कोल्हापूरच्या छत्रपतीस विषाद वाटला. परंतु पोर्तुगीजांना ह्या दगलबाजीपणाबद्दल धडा शिकविण्यास करवीरचे छत्रपती असमर्थ असल्याने त्याना मूग गिळून गप्प बसावे लागले.

दि. ५ फेब्रुवारी १७८८ रोजी गोव्याचा गव्हर्नर फ्रान्सिश्कु कुन्य द मिनेझिश याने कोल्हापूरचे छत्रपती शिवाजी तिसरे याना जे पत्र पाठविले त्याचा तर्जुमा असा :

'तुमचे वकील सुल्तानराव भोसले हे इकडे मदतीच्या कराराबाबत वाटाघाटी करण्यासाठी आले होते. त्याना आम्ही तुमच्याकडून वाटाघाटी करण्यास अधिकारपत्रे आणण्यासाठी म्हणून कोल्हापूरला पाठविले होते. परंतु ते इकडे परतले नाहीत. त्या दरम्यान वाडीचे सावंत यानी आमच्याशी तह करण्याची निकड दर्शविल्याने त्यांच्याशी आम्हाला तह करावा लागला. तो दि. २९ जानेवारी रोजी पार पडला. सदर्हू करारान्वये भोसल्यानी आम्हाला पेडणे महालाचा उर्वरित भाग देऊन टाकला आहे. त्याच्या बदली भोसल्याना आम्ही सैन्याची आणि दारूगोळ्याची मदत करण्याचे अभिवचन दिले आहे.

'तुम्हाला आम्ही कळवू इच्छितो की, आमचे सैन्य भोसल्यांच्या कुमकेस रवाना होत आहे. तरी भोसले यांच्या राज्यात तुमचे जे सैन्य घुसले आहे ते मागे घेण्याची आज्ञा तुम्ही तुमच्या सेनाधिकाऱ्याना करावी. न झाल्यास आमचे जे सैन्य भोसल्यांच्या कुमकेला जात आहे, त्याच्याशी तुमच्या सैन्याला मुकाबला करावा लागेल आणि तसे जर घडले तर त्याची जबाबदारी तुमच्यावर राहील.'

वाडीकर सावंताशी आपला मैत्रीचा तह झाल्याची बातमी गोव्याच्या राज्य सचिवाने पुणे दरबारातील आपला वकील नारायण शेणवी यास दि. १३ फेब्रुवारी १७८८ रोजी पाठविलेल्या पत्रानुसार कळविली सदर्हू पत्रात तो म्हणतो की, 'आमच्या आरमाराची आणि कोल्हापूरच्या आरमाराची रेडी येथे गांठ पडून कोल्हापूरच्या आरमाराचा धुव्वा उडाला. कोल्हापूरचे सैन्य भोसल्यांच्या राजधानीवर हल्ला करण्याच्या बेतात होते. त्याने आता कुडाळपर्यंत माघार घेतली आहे.'

अनुक्रमणिका

गोव्याचा राज्य सचिव उपर्युक्त पत्रात म्हणतो की, 'सावंतानी आम्हाला पेडणे प्रांताचा ऊर्वरित भाग देण्याचे कबूल केले आहे. तसेच डिचोली, साखळी आणि हळदोणे ह्या तिन्ही प्रांतांवरील हक्क त्यानी प्रस्तुतच्या करारान्वये सोडून द्यायचे आहे.'

राज्य सचिव पत्रात पुढे म्हणतो : 'पुणे दरबाराची इच्छा असती तर त्याला भोसले आणि कोल्हापूरचे छत्रपती यांच्यामधील युद्ध टाळता आले असते. त्याने तटस्थताही पाळलेली नाही. कारण तो कोल्हापूरच्या महाराजाना मदत करीत असल्याचे आमच्या कानावर आले आहे. तुम्ही नाना फडणीस यांच्या निदर्शनास आणून द्यावे की, हे युद्ध पुणे दरबाराच्या हिताचे नाही. त्याचा फायदा टिपू सुल्तान घेतल्यावाचून राहाणार नाही. आमचा असा होरा आहे की, दोन्ही पक्ष एकमेकांशी लढून जर्जर झाले की टिपू सुल्तान या भांडणात हस्तक्षेप करील. त्याने यापूर्वी तसा हस्तक्षेप अन्यत्र केलेला आहे.

'करवीरचे महाराज आणि सावंत यांच्यामध्ये सलोखा असणे पुणे दरबाराच्या हिताचे आहे. ह्या युद्धात भोसल्यांचा नाश होणे स्वाभाविक होते. ते आम्हाला नको होते म्हणून आम्ही त्याना मदत केली. परंतु त्याचबरोबर कोल्हापूरचे महाराजही दुबळे झालेले नको आहेत. थोडक्यात दोघेही दुबळे झालेले आम्हाला नको आहेत. म्हणून दोघानाही फायदेशीर असा तह घडवून आणला पाहिजे. असा तह नाना फडणीस घडवून आणू शकतील; पण त्यानी पुढाकार घेतला पाहिजे.'

पोर्तुगीजानी वाडीकर सावंतांशी मैत्रीचा करार करून त्याना सैन्याची आणि दारूगोळ्याची मदत जरी केली असली, तरी प्रस्तुतच्या करारातील सगळी नऊ कलमे त्यानी अमलात आणली नाहीत. त्यानी ती अमलात आणली असती, तर पुणे दरबाराशी त्यांचा संघर्ष उडाला असता. त्याना ते नको होते म्हणून त्यानी हात आवरता घेतला. त्यांचा हा चाणाक्षपणा गोव्याचा गव्हर्नर फ्रान्सिश्कु द व्हैग काब्राल याने भोसल्यांच्या मदतीस गेलेल्या आपल्या एका लष्करी अधिकाऱ्यास दि. १७ फेब्रुवारी १७८८ रोजी लिहिलेल्या पत्रातून दिसून येतो. सदर्हू पत्रात तो म्हणतो :

'........भोसल्यांशी आमचा जो करार झाला आहे त्याच्या पहिल्या भागाची कार्यवाही आम्ही केली आहे. दुसऱ्या भागाची कार्यवाही करण्याचेही बंधन आम्हावर आहे. परंतु ती कार्यवाही करून आमच्या राज्याची सुरक्षितता धोक्यात आणण्याची आमची तयारी नाही. आम्हास युद्धात गुंतविण्याचा भोसल्यांचा हा धूर्त डाव आहे. त्याला आम्ही बळी पडता कामा नये. तसे झाले तर मराठ्यांशी आम्हाला युद्ध करावे लागणार हे उघड आहे. म्हणून सर्व परिस्थितीचा विचार करून मी आपणाला आज्ञा करतो की, कर्नल गोदिन्यू द मीर याना त्यांच्या हाताखालच्या सैन्यासह 'मदुरे' येथून माघार घेण्याचा हुकूम आपण करावा.'

अखेर कोल्हापूरचे छत्रपती आणि वाडीकर सावंत यांच्यामध्ये चाललेले हे लांबलेले युद्ध पुणे दरबाराच्या हस्तक्षेपामुळे संपुष्टात आले. स. १७९० च्या फेब्रुवारी महिन्यात दोन्ही युद्धमान पक्षानी तहाच्या करारावर सह्या केल्या.

मागे आलेच आहे की, खेम सावंत भोसले तिसरे हे महादजी शिंदे यांचे ज्येष्ठ बंधू जयाप्पा शिंदे यांचे जावई होते. महादजींची इच्छा असती तर त्यानी या युद्धात सावंताच्या बाजूने प्रवेश करून कोल्हापूरच्या छत्रपतींचा पराभव केला असता. परंतु पेशव्यांचे कारभारी नाना फडणीस आणि महादजी शिंदे यांचे संबंध चांगले नव्हते. शिवाय ह्या युद्धात पुणे दरबाराकडून करवीरच्या छत्रपतीना मदतही होत होती. त्यामुळे पुणे

दरबाराला दुखवून सावंतांच्या मदतीला सैन्य धाडणे महादजी शिंदे याना शक्य झाले नाही. तरीही पुणे दरबारातील आपल्या वजनाचा उपयोग करून त्यानी नाना फडणीसाना ह्या युद्धात हस्तक्षेप करावयास लावले. ह्या युद्धात करवीरचे छत्रपती किंवा वाडीकर सावंत या दोघांपैकी कुणाचाच फायदा झाला नाही. रेडीच्या आरमारी लढाईत करवीरचे सर्व आरामार नष्ट झाले. शिवाय करवीरच्या छत्रपतीना त्यानी सावंताचा जो प्रदेश घेतला होता तो खाली करावा लागला.

वाडीकर सावंतानी पोर्तुगीजांची मदत घेतल्यामुळे सबंध पेडणे महाल त्यांच्या हातचा गेला. शिवाय डिचोली, साखळी आणि मणेरी ह्या तीन महालांवरील अधिसत्ताही त्याना सोडावी लागली. आणि विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे ज्या मोर्चेलांमुळे हे युद्ध सावंतानी आपणावर ओढवून घेतले, ती मोर्चेले पुणे दरबाराने त्यांच्याकडून मागवून घेऊन पुण्यास नेऊन ठेवली. मात्र राजेबहाद्दर हा किताब धारण करण्याची परवानगी पुणे दरबाराने त्याना दिली.

दोघांचे भांडण आणि तिसऱ्याचा लाभ ह्या म्हणीप्रमाणे वाडीकर सावंत आणि करवीरचे छत्रपती यांच्यामधील भांडणात पोर्तुगीजांचा लाभ झाला. त्यांचा हा संधिसाधूपणा करवीरचे छत्रपती आणि वाडीकर सावंत या दोघानाही कळून चुकला. तरीही त्या दोघांचे त्यांच्याकडील संबंध शत्रूत्वाचे नव्हते.

अनुक्रमणिका

# १८. सोंधे संस्थान

सोंधे संस्थान दक्षिण कारवार जिल्ह्यात कारवार शहरापासून जवळ होते. कर्नाटकातील ज्या छोट्या संस्थानांचा अंतर्भाव विजयनगरच्या साम्राज्यात झालेला होता, त्यांच्यापैकी सोंधे संस्थान हे एक होते. विजयनगरच्या सम्राटाना ही संस्थाने मांडलिक या नात्याने कर भरत असत. विजयनगरचे साम्राज्य रसातळास गेल्यावर सोंधे संस्थान विजापूरच्या अंमलाखाली गेले. पुढे शिवाजी महाराजानी कारवार प्रांत घेतल्यावर सोंधे संस्थानच्या राजास महाराजांचे मांडलिकत्व पत्करावे लागले.

संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत कोकणातील आणि कारवार प्रांतातील देसायांच्या वतनाचा काही भाग सरकारजमा करण्याचा उपक्रम संभाजी महाराजानी सुरू केल्याने हे सर्व देसाई त्यांच्याविरुद्ध उठले. कोकणातील बंडखोर देसायांमध्ये कुडाळचे खेम सावंत भोसले, राम दळवी, तान सावंत, साखळीचे रुद्राजी राणे, येसोबा राणे, हे अग्रेसर होते. या बंडाचे लोण कारवार प्रांतातही पसरले. तेथील देसायानी आपली बायकामुले पोर्तुगीजांच्या अधिसत्तेखाली असलेल्या आंजेदिव बेटावर नेऊन ठेवून सर्वत्र धामधूम आरंभिली. त्यानी कारवारच्या किल्ल्यातील मराठा शिबंदीवर मात करून तो किल्ला आपल्या ताब्यात घेतला व भटकळपासून अवर्सापर्यंतचा टापू मराठ्यांकडून हस्तगत करून तो सोंधेच्या राजाच्या हवाली केला. ह्या सर्व घडामोडी स. १६८५–८६ च्या सुमारास घडल्या. कारवारचा किल्ला आणि उपरिनिर्दिष्ट मुलुख मिळाल्याने सोंधेच्या राजाचे आसन चांगलेच बळकट झाले. नंतर त्याने सैन्य धाडून (सांप्रतच्या गोव्यातील) रामाच्या भुशिरा (खोलगड) पासून अंकोलेपर्यंतचा मुलुख आपल्या राज्यास जोडला.

सोंधे संस्थानात पुढील सात किल्ल्यांचा अंतर्भाव होत होता : खोलगड, कूर्मगड ऊर्फ सिंपीगड, सिंपीगड, सिवेश्वरचा कोट, कद्रे येथील कोट, अंकोलेचा कोट, आणि महेन्द्रगड. हे सर्व किल्ले शिवाजी महाराजानी बांधिले होते. संभाजी महाराजांचा आणि कारवारच्या देसायांचा संघर्ष उडाला तेव्हा देसायानी हे किल्ले मराठ्यांकडून घेऊन सोंधेच्या राजास देऊन टाकले. परंतु सदहू किल्ल्यांवर सोंधेच्या राजाचा अंमल फार दिवस टिकला नाही. मोगल फौजांनी कारवार प्रांतात चढाई करून वरील सर्व किल्ले आणि तदलगतचा मुलुख आपल्या ताब्यात घेतला.

कारवार प्रांत मोगली अधिसत्तेखाली गेल्याने सोंधेच्या राजास औरंगजेबाच्या मर्जीवर अवलंबून राहावे लागले.

दि. २३ सप्टेंबर १६८३ रोजी डॉ. लुईश गोंसाल्विज द कॉश्त या नावाचा पोर्तुगीज गृहस्थ पोर्तुगालला लिहिलेल्या पत्रात म्हणतो :

‘केशव प्रभुने (पेडणेचा) कुडाळपासून अंकोल्यापर्यंतच्या प्रदेशातील देसायांची माहिती काढून व्हिसेरेइला कळविले आहे की, हे सर्व देसाई संभाजीच्या जांचाने संत्रस्त झाले असल्याने संभाजीविरूद्धच्या युद्धात पोर्तुगीजाना सामील होण्यास तयार होतील.’

ह्यावरून असा कयास करण्यास जागा आहे की, उपरिनिर्दिष्ट देसायानी संभाजीविरुद्ध जी बंडाळी माजविली तिच्या मागे पोर्तुगीजांची चिथावणी असावी; कारण कॉश्त याच्या आणखी एका पत्रात उल्लेख

अनुक्रमणिका

आहे की, 'कुडाळकर खेम सावंतास संभाजीविरूद्ध उठाव करावयास लावण्यात पोर्तुगीज यशस्वी झाले आहेत.'

पोर्तुगीजानी केशव प्रभु याला दक्षिण कोकणातील देसायांची माहिती काढावयास लावली त्यामागे त्यांची एक योजना होती. अन् ती म्हणते कोकण प्रांत आपल्या अमलाखाली आणण्याची.

सोंधेच्या राजास मोगली अमदानी मानवली नाही, आणि कोकणातील देसाईही मोगलांना विटून छत्रपती राजारामास जाऊन मिळाले. हा उल्लेख गोव्याचा व्हिसेरेइ दों रुद्रिगु द कॉश्त याच्या पोर्तुगालच्या राजास लिहिलेल्या एका पत्रातील आहे. आणखी एका पोर्तुगीज पत्रात म्हटले आहे, 'मणेरी आणि साखळी येथील देसाई राजारामास जाऊन मिळाले आहेत. त्याच्या हाताखाली आता उत्कृष्ट सैन्य जमले आहे. त्याने संताजी घोरपडे याच्या कुशल नेतृत्वाखाली मोगलाना सळो की पळो करून सोडले आहे. मराठ्यांच्या गनिमी हल्ल्यानी औरंगजेब बादशहा इतका हैराण होऊन गेला आहे की, 'माणसाच्या हातात काही नसते. सर्व काही देवाच्या इच्छेवर औलंबून असते. असे उद्‌गार त्याने काढल्याचे सांगतात.'

दि. १६ जानेवारी १६९१ रोजी दख्खनमधील राजकीय घडामोडीचा आढावा घेऊन लुईश गोंसाल्विज द कॉश्त हा पोर्तुगालच्या राजास लिहितो : '..... अशी वार्ता आहे की, राजारामाच्या सैन्याने देसायांच्या सहकार्याने फोंडे आणि डिचोली हे दोन्ही प्रांत मोगलांकडून परत घेतले आहेत. मोगलांविषयी बोलायचे तर मुसलमानापेक्षा हिंदूचा शेजार आम्हाला बरा वाटतो. मुसलमानावर कधीच विश्वास ठेवू नये. त्याना वचनाची चाड नसते. ते भांडखोर आणि ऊर्मट असतात.

'कोकण प्रांतातील मोगलांचा राज्यकारभार ढिला पडल्याची संधी लाधून व मोगल बादशहाकडून तेथील लष्करी अधिकाऱ्याना कुमक न आलेली पाहून कोकणातील देसायानी मोगल बादशहाची अधिसत्ता झुगारून देऊन ते राजारामास जाऊन मिळाले आहेत. खरे सांगायचे तर राजारामानेच त्याना मोगलांविरूद्ध बंड करण्यास चिथावणी दिली. कारण ते राजारामाच्या जातीचे आहेत. मुसलमानांच्या अरेरावीची आणि उर्मटपणाची त्याना चीड आली आहे. मुसलमानाची हिंदूची देवळे बाटविली आणि हिंदू स्त्रियांवर हात टाकल्याने कोकणातील देसायानी त्यांच्याविरूद्ध युद्ध पुकारले.'

कोकण प्रांतात प्रारंभी मोगलांची सरशी झाली. नंतर मराठ्यानी चढाई करून त्याना तेथून हुसकून लावून आपला अंमल तिकडे बसविला. परंतु कारवारचा प्रदेश फार दिवस मराठ्यांच्या अधिसत्तेखाली राहू शकला नाही. जिंजी येथील छत्रपती राजारामाचा कारभार उधळपट्टीचा होता. खर्चाची तोंड मिळवणी करणे त्याला शक्य होईना. त्यामुळे त्याला इंग्रज, फ्रेंच, डच वगैरे युरोपियन लोकांकडून प्रदेश गहाण टाकून पैसा उभारावा लागला. सोंधेचा राजा हा त्याचा मांडलिक..त्याला त्याने कारवार, सिवेश्वर, अडवट (काणकोण) खोलगडासहीत व पंचमहाल (अष्टागार, हेमाड बारसे) बाळ्ळी, चंद्रवाडी, व काकोडे, हा सर्व प्रदेश सालिना बावीस हजार दोनशे होनास भोगवट्याने दिला. तेव्हापासून हा सर्व मुलुख सोंधेच्या राजाच्या अमलाखाली गेला. बाळ्ळी आणि चंद्रवाडी हे दोन महाल पोर्तुगीजांच्या अमलाखाली असलेल्या साष्टी प्रांताला भिडलेले होते. सोंधेचा राजा आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये राजनैतिक संबंध जुळलेले होते. परंतु आता दोन्ही राज्याची हद्द एकमेकाना भिडली तेव्हा त्यांच्यामध्ये कटकटी निर्माण होणे अपरिहार्य ठरले. उदाहरणार्थ, कुकळ्ळीकर देसाई आणि पोर्तुगीज यांच्यामधले हाडवैर फार जुने असल्याने ते सोंधेच्या

राजाच्या राज्यात राहून पोर्तुगीजाना उपद्रव देत होते. या संबंधी गोव्याचा व्हिसेरेइ कौंट द व्हिलाव्हेर्द हा दि. १२ नवंबर १६९४ रोजी सोंधेच्या राजास लिहितो :

'कुकल्लीची जी गावकर मंडळी तुमच्या राज्यात पळून गेली आहे, त्यानी मोगलांच्या बंडखोर सरदारांशी हात मिळवणी करून शिवाजीशी (मराठ्यांशी) संधान जुळविले असल्याची बातमी फोंड्याचा सुभेदार एखलासखान याने मला कळविली आहे. मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, कुकल्लीच्या गावकराना मी आमच्या राज्यात परत येऊन राहा म्हणून कधीच सांगणार नाही, आणि त्यांच्या जमिनीही त्याना परत करणार नाही. हे शत्रू आमच्या राज्यात परत यावेत अशी माझी इच्छा नाही. आणि ते परत आले तर त्यांची डोकी उडविण्याची तयारी मी करून ठेवली आहे. ते इकडे कधी परत येतात त्याची मी वाट पाहात आहे. मी तुम्हाला इशारा देतो की, कुकल्लीच्या गावकरांपासून तुम्ही सावध असावे. ते धोकेबाज असल्याने तुम्ही त्याना शासन केले पाहिजे. आणि तुम्ही जर त्याना शासन केले नाही, तर तुमच्यावतीने मी ते काम करीन.'

सोंधेचा राजा छत्रपती राजघराण्याचा मांडलिक असला आणि त्याला छत्रपती राजाराम महाराजांकडून कारवार, सिवेश्वर, काणकोण, वगैरे महाल भोगावयास मिळाले असले, तरी तो मराठ्याना एकनिष्ठ न राहाता त्यांच्याविरुद्ध कारवाया करीत होता. स. १७०२ साली मराठे आणि मोंगल यांचे युद्ध फोंड्याच्या परिसरात चालले असता, सोंधेच्या राजाकडून मोगलाना मदत होत होती, असे एका पोर्तुगीज कागदावरून कळून येते. दुसऱ्या एका पोर्तुगीज कागदात म्हटले आहे की, अंत्रूज महाल तेथील किल्ल्यासह मोगलानी सोंधेच्या राजास सालिना ऐंशी हजार रुपये खंडणीला दिला आहे.

अंत्रूज महाल सोंधेच्या राजास मोगलांकडून मिळावा म्हणून गोव्याचा व्हिसेरेइ कायतानु द मेलू द काश्त्रू याने खटपट केली होती, असे दुसऱ्या एका पोर्तुगीज कागदावरून दिसून येते. सोंधेचा राजा अथवा वाडीकर सावंत यांच्यासारखे दुबळे शेजारी पोर्तुगीजाना हवे असत, हे त्यांच्या राजकीय धोरणावरून सिद्ध होते. दुबळ्या शेजाऱ्यांमुळे सरहद्दी सुरक्षित तर राहातच; शिवाय त्यांचा प्रदेशही त्याना कुरतडता येत असे. सावंतांचा बराच मोठा मुलुख पोर्तुगीजानी अशा प्रकारे लाटला, आणि सोंधेच्या राजासही नंतर गिळंकृत केले.

स. १७०८ साली सातारचे शाहू छत्रपती यानी रांगणा किल्ल्यास भेट दिली, त्यानी गोव्याचा व्हिसेरेइ दों रुद्रिगु द कॉश्त याला एक पत्र पाठविले होते. त्यात त्यानी म्हटले आहे : 'बांदे, पेडणे, साखळी आणि मणेरी हे महाल काही वर्षापासून खेम सावंताकडे असून फोंडे महाल सोंधेच्या राजाकडे आहे. खेम सावंत हा कुडाळचा सरदेसाई तर सोंधेचा राजा सोंधे संस्थानचा अधिपती आहे. असे असता वरील दोन्ही महाल त्यांच्याकडे का?'

छत्रपती शाहू महाराजांची जरब पोर्तुगीजाना वाटत होती, हे अनेक पोर्तुगीज पत्रांवरून सिद्ध होते. त्यांच्याप्रमाणेच सोंधेचा राजाही छत्रपती शाहू महाराजाना वचकून होता. म्हणून त्याने शाहू महाराजांशी फोंडे आणि पंचमहाल हे दोन्ही महाल सालिना पंचवीस हजार रुपयाना भोगवट्यास एका करारान्वये मिळविले. हा सौदा त्याला स्वस्तात पडला. कारण एका फोंडे महालासाठी त्याला सालिना ऐंशी हजार रूपये मोगलाना भरावे लागत असत.

अनुक्रमणिका

स. १७१९ साली गोव्याचा व्हिसेरेइ कौंट द एरिसैरा हा सोंधेच्या राजाविषयी पोर्तुगालच्या राज्यास लिहितो :

'सोंधेचा राजा हा वाणीज्य जमातीतला असून त्याची प्रजाही त्याच जमातीपैकी आहे. त्यामुळे हा राजा शेजारी म्हणून आम्हाला बरा आहे.'

स. १७१२ साली वाडीकर सावंत आणि पोर्तुगीज यांचा जो तह झाला त्यातील पहिलेच कलम असे आहे :

१. 'ह्या राज्याने (गोवा) सोंधेच्या राजाची फोंड्यावरील अधिसत्ता मान्य केली आहे. तरी बाबू देसाई यानी सोंधेच्या राजाची कुरापत काढू नये.'

त्या काळी फोंडेचा किल्ला मोक्याचे ठिकाणी असल्याने तो आपणाकडे असावा, असे वाडीकर सावंतानाही वाटत होते. फार कशाला त्यानी हा किल्ला मोगलांकडून घेण्याचा स. १६९८ व १७०० ह्या साली दोनदा प्रयत्न केला होता.

स. १७२६ साली पोर्तुगीज आणि वाडीकर फोंड सावंत यांच्यामध्ये आणखी एक तह झाला. त्याचे पहिले कलम पुढीलप्रमाणे आहे :

'त्यानी (फोंड सावंताने) फोंड्याचा प्रश्न पुनः उपस्थित करू नये, कारण ह्या राज्याने (गोवा) फोंड्याचा किल्ला व त्याच्या कक्षेखालच्या प्रदेशावरील सोंधेच्या राजाची सत्ता मान्य केली आहे.'

थोडक्यात सांगायचे म्हणजे वाडीकर सावंताचा डोळा फोंड्याच्या किल्ल्यावर शेवटपर्यंत होता. आणि सोंधेच्या राजास पोर्तुगीजांचा आश्रय जर मिळाला नसता तर तो किल्ला वाडीकर सावंत घेतल्याशिवाय राहिले नसते.

सोंधेचा राजा मराठ्यांचा मांडलिक होता हे वर आलेच आहे. स. १७३१ साली सातारचे छत्रपती शाहू महाराज आणि करवीरचे छत्रपती संभाजी महाराज या दोघांमध्ये जो वारणेचा तह झाला, तदनुसार कोकण आणि कारवार प्रांत छत्रपती संभाजी महाराजांच्या अधिसत्तेखाली आले. त्यामुळे सोंधेचा राजा करवीर राज्याचा मांडलिक बनला. परंतु हा राजा इतका चिवट होता की, तो खंडणी नियमीतपणे कधीच भरत नसे. त्याला वरचेवर तंबी द्यावी लागे.

स. १७३७ साली करवीरचे सैन्य थकलेली खंडणी वसूल करण्यासाठी सोंधे संस्थानावर चालून गेले. ह्या हालचालीचा सुगावा पोर्तुगीजाना लागल्याने सोंधेच्या राजाला त्यानी त्याची पूर्वसूचना दिली. गोवा राज्याचा मुख्य सचिव 'लुईज आफाँस दांतश' हा दि. २४ डिसेंबर १७३७ रोजी सोंधेच्या राजाचा दिवाण अण्णाजी पंडित ह्याला लिहितो :

‘......... वळवई नदीत तुमच्या ज्या नौका आहेत त्या तुम्ही आमच्या हद्दीत आणून ठेवा. नंतर शत्रूने बालाघाटपर्यंत माघार घेतल्यावर तुम्हास त्या परत नेता येतील. तुमच्या नौका शत्रूच्या हातास लागल्या तर तो त्यांचा तुमच्याविरुद्ध उपयोग केल्यावाचून राहाणार नाही.

‘शत्रू तुमच्यावर चालून आल्याचे कळताच नामदार गव्हर्नरसाहेब तुम्हाला दारूगोळ्याची त्वरीत मदत धाडतील व तुमच्या राज्याच्या रक्षणास हातभार लावतील.’

उपरिनिर्दिष्ट पत्रावरून गोव्याचे पोर्तुगीज सोंधे संस्थानच्या सुरक्षिततेबाबत किती दक्ष होते त्याची कल्पना करता येते.

स. १७३९ साली वसईचे युद्ध चालू असता पेशव्यांच्या सैन्याने गोव्यावर स्वारी केली, तेव्हा १ मार्च १७३९ रोजी फोंड्याचा किल्ला मराठ्यानी घेतला. परंतु स. १७३९ च्या मे महिन्यात पेशव्यांचे सरदार आणि पोर्तुगीज अधिकारी यांच्यामध्ये ‘राय’ येथे तह झाला, तेव्हा फोंड्याचा किल्ला सोंधेच्या राजाच्या हवाली करण्यास पोर्तुगीज अधिकाऱ्यानी पेशव्यांच्या सरदाराचे मन वळविले.

स. १७४२ साली करवीरच्या छत्रपतीचा एक सरदार गोविंदपंत ठाकूर हा गोव्यावर चालून आला, तेव्हा त्याने सांगे आणि फोंडे येथील किल्ले सोंधे संस्थानच्या सैन्याकडून हस्तगत केले होते. परंतु हे दोन्ही किल्ले करवीरच्या सैन्याकडे पोर्तुगीजाना राहू द्यायचे नव्हते म्हणून ते परत घेण्यासाठी पोर्तुगीजानी सोंधेच्या राजास मदत केली. दि. ८ जून १७४२ रोजी पोर्तुगीज सैन्य आणि गोविंदपंतांचे सैन्य यांच्यामध्ये तीन तास लढाई होऊन पोर्तुगीजानी सांगेचा किल्ला घेतला. दुसऱ्याच दिवशी त्यानी हा किल्ला तोफा डागून भुईसपाट करून टाकला. इकडे फोंड्याचा किल्ला गोविंदपंत ठाकूर यांचा एक सरदार अण्णाजी प्रभू हा फोंड्याच्या किल्ल्याचे रक्षण करीत होता. त्याच्या हाताखाली अवघी शंभर सैनिकांची शिबंदी होती. दारूगोळाही किल्ल्यात भरपूर नव्हता. त्यामुळे पोर्तुगीज सैन्य ह्या किल्ल्यावर चाल करून येताच अण्णाजी प्रभू याने शरणागती पत्करली. अण्णाजी प्रभूने सुपेचा किल्लाही पोर्तुगीजांच्या ताब्यात देण्याचा हुकूम त्या किल्ल्याच्या किल्लेदारास धाडला.

फोंडेचा किल्ला पाडून टाकण्याचा विचार पोर्तुगीज सेनाधिकारी करीत होते. परंतु सोंधेच्या राजाचा सेनापती कलापय्या याच्या विनंतीवरून त्यानी तो बेत रद्द केला. कलापय्याने हा किल्ला स. १७४२ च्या जूनमध्ये आपल्या ताब्यात घेतला.

स. १७४६ साली वाडीकर सावंत आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये युद्ध सुरू झाले तेव्हा सोंधेच्या राजाने पोर्तुगीजाना सावंतांविरुद्ध उघडपणे मदत केली. या युद्धात वाडीकर सावंताचा पराभव झालेला नानासाहेब पेशवे याना नको होता. म्हणून त्यानी आपले चुलत बंधू सदाशिवराव भाऊ याना सैन्य देऊन कोकणात पाठविले. सदाशिवराव भाऊ सुपे येथे आपल्या सैन्याचा तळ देऊन राहिले. पेशव्यांचे सैन्य सावंतांच्या मदतीस आले तर त्याचा उपसर्ग गोव्यास पोहोचेल या भीतीने गोव्याच्या व्हिसेरेइने सोंधेच्या राजाचा कारभारी जीवन नाईक हनगल याला सदाशिवराव भाऊंकडे शिष्टाईसाठी सुप्यास पाठविले. सदाशिवराव भाऊनी सोंधेच्या राजाने थकलेली खंडणी भरली पाहिजे असा आग्रह धरला. जीवन नाईकाने एक लक्ष रुपये देण्याचे कबूल केले. अखेर थकलेल्या खंडणीपैकी निम्मी रक्कम वसूल करून सदाशिवराव भाऊनी आपला सुपे येथील तळ दि. १० मार्च १७४७ रोजी उठविला.

अनुक्रमणिका

पोर्तुगाल हे लहान राष्ट्र असल्याने हिंदुस्थानसारख्या खंडप्राय देशात त्याला मर्यादित लष्करी साधने आणि मनुष्यबलाची कमतरता यामुळे राज्य विस्तार करणे शक्य झाले नाही. तरी पण दुबळ्या शेजाऱ्यांचा प्रदेश मुत्सद्दिगिरीने आणि लष्करी बलाने घेणे हे त्यांचे एक जुने धोरण होते. त्याला अनुसरून दक्षिण कोकणमधील आरांवदे नदी व कारवार प्रांतातील काळी नदी या दरम्यानचा प्रदेश घेण्याची महत्वाकांक्षा ते बाळगून होते. मुख्यत्वे मराठ्यांच्या आक्रमणापासून गोव्याचे रक्षण करण्यासाठी त्याना प्रस्तुतचा प्रदेश हवा होता.

स. १७५२ सालच्या नवंबर महिन्यात काही कारण नसताना व्हिसेरेइ मार्केज द ताव्होरा याने सोंधेच्या राजाची कुरापत काढून कूर्मगड आणि सदाशिवगड हे दोन किल्ले व 'कोर्वे' येथील कोट घेतला. नंतर पुढच्या वर्षाच्या जानेवारीत पोर्तुगीज सैन्याने सोंधेच्या राजाची काही खेडी जाळली. यावेळी पेशव्यांचे सैन्य सोंधेच्या राजाच्या मदतीस आले नाही, इतकेच नव्हे तर, सोंधेच्या राजाकडे थकलेली खंडणी वसूल करण्यासाठी नानासाहेब पेशवे यानी सोंधेच्या राजाविरूद्ध लष्करी कारवाई करण्याचा बेत केला. ह्या योजनेचा सुगावा पोर्तुगीजाना लागल्याने म्हणा अथवा सोंधेच्या राजाच्या विनंतीवरून म्हणा गोव्याचा व्हिसेरेइ कौंट द आल्व्हा हा तह करण्यास तयार झाला.

स. १७५६ सालच्या फेब्रुवारी महिन्यात पेशव्यांचे सैन्य सोंधेच्या राज्यात घुसले. सोंधेच्या राजापाशी थकलेली खंडणी भरण्यासाठी पैसा नसल्याने त्याने पेशव्यांकडे फोंडेचा किल्ला गहाण ठेवण्याचे ठरविले. त्याचा सुगावा गोव्याचा व्हिसेरेइ कौंट द आल्वा याला कळताच तो दि. १ जून १७५६ रोजी सैन्य घेऊन फोंड्यावर चालून गेला. पेशव्यांच्या सैन्याने फोंड्याच्या किल्ल्याचा ताबा घेण्यापूर्वीच आपण तो किल्ला सोंधेच्या सैन्याकडून घ्यावा म्हणून व्हिसेरेइने पावसाळा डोक्यावर आला असताही लष्करी मोहीम हाती घेतली.

व्हिसेरेइ कौंट द आल्व्हा ह्याचा फोंड्याचा किल्ला घेण्याचा प्रयत्न कसा फसला व फोंड्याच्या लढाईत तो कसा मारला गेला तो वृत्तांत मागे येऊन गेला असल्याने त्याची पुनरुक्ति येणे करण्याची आवश्यकता नाही.

स. १७५६ सालची लष्करी मोहीम फसली, तरी फोंड्याचा किल्ला घेण्याचा विचार पोर्तुगीजांच्या डोक्यातून गेला नाही. ते संधीची वाट पहात राहिले.

स. १७६२ साली पोर्तुगीज आणि वाडीवर सावंत यांच्यामध्ये एक गुप्त करार होऊन उभयतानी सोंधेच्या राजास मर्दनगड मराठ्यांकडून घेण्यास प्रवृत्त करावे असे ठरले. सोंधेच्या राजाने ही मोहीम हाती घेतल्यास वाडीकर सावंत त्याला दोन हजार सैन्याची कुमक देण्यास तयार होते. पोर्तुगीजानी दोघानाही वाटेल ती मदत देण्याचे कबूल केले.

उपरिनिर्दिष्ट कारस्थान शिजत असता पोर्तुगीज अधिकारी मर्दनगडच्या शिबंदीचे अधिकारी रामजी हरि, रघू सावंत आणि बापूजी मुजूमदार या तिघांना लांच चारून किल्ला ताब्यात घेण्याचा प्रयत्न करीत होते. तो अखेर यशस्वी झाला. वरील तिघा अधिकाऱ्यांनी विश्वासघाताने रक्ताचा एक थेंबही न सांडता मर्दनगड पोर्तुगीज अधिकाऱ्यांच्या ताब्यात दिला.

स. १७६३ सालच्या मे महिन्यात पोर्तुगीजानी मर्दनगडचा कबजा घेतला व मराठे तो आपणाकडून घेतील ह्या भीतीने तोफा डागून तो जमीनदोस्त करून टाकला.

पोर्तुगीजानी मर्दन घेतल्याने त्याच्या कक्षेतील फोंडे आणि पंचमहाल हे महाल पोर्तुगीजांच्या अमलाखाली आले. हे दोन्ही महाल मूळचे सोंधेच्या राजाचे असल्याने त्याने त्यांची मागणी पोर्तुगीजांकडे केली. त्याला व्हिसेरेइ कौंट द एगा ह्याने जबाब दिला की, 'ज्या अर्थी फोंड्याचा किल्ला घेताना तुम्ही आम्हाला कोणतीच मदत केली नाही, त्याअर्थी फोंडे आणि पंचमहाल मागण्याचा तुम्हाला कोणताच अधिकार पोचत नाही. तरीही ह्या दोन्ही महालांवरील तुमची नाममात्र अधिसत्ता आम्ही मान्य करतो. मात्र आमचे सैन्य ह्या महालात राहील व त्याचा खर्च तुम्हाला करावा लागेल.'

वरील अट सोंधेच्या राजास मान्य करण्यापलिकडे दुसरा पर्याय उरला नाही.

पुढे लवकरच हैदरअल्लीने सोंधे संस्थान घेतले. अंकोला, सिवेश्वर, सदाशिवगड, वगैरे ठाणी पडली. स. १७६३ च्या डिसेंबर महिन्यात हैदरअल्लीने काणकोण महाल घेऊन खोलगडास वेडा घातला. सोंधेच्या राजास पळ काढावा लागला. दि. ११ जानेवारी १७६४ रोजी तो अंत्रुज महालात बांदोडे येथे पोर्तुगीजांच्या आश्रयास येऊन राहिला. परंतु पोर्तुगीजानी त्याला संरक्षणाचा करार केल्याखेरीज राजकीय आश्रय दिला नाही. ह्या करारान्वये पोर्तुगीजानी काणकोण महालात सैन्य धाडून हैदरअल्लीस खोलगडचा वेढा उठवून माघार घेण्यास सांगितले.

दि. १ मार्च १७६४ रोजी हैदरअल्ली वेढा उठवून कर्नाटकात माघारा परतला.

स. १७६४ ते १७९० ह्या दरम्यानच्या काळात सोंधेचा राजा बांदोडे येथे परागंदा जीवन जगत होता. त्याचे सर्व राज्य हैदरअल्लीने घेतले असल्याने त्याच्यावर उपासमारीची पाळी आली होती. पोर्तुगीजांकडून मिळणाऱ्या ठराविक तनख्यावर त्याला आपला प्रपंच कसाबसा साधावा लागत होता. त्या दरम्यान तो मराठ्यांचा मांडलिक असल्याने आपले राज्य आपणास परत मिळवून द्यावे म्हणून पुणे दरबाराला अर्ज विनंत्या करीत होता. पुणे दरबाराने त्याला पुण्यास येऊन राहावयास सांगितले. त्या सल्ल्यानुसार त्याने सहकुटुंब पुण्यास प्रयाण करण्याचा बेत करून पोर्तुगीजांची परवानगी मागितली. परंतु गव्हर्नर फ्रान्सिश्कु कुन्य द मिनेझिश याला त्याने पुण्यास जावून राहावे असे वाटत नव्हते. हे पाखरू आपल्या पिंजऱ्यातून निसटले तर आपल्या हाताला परत लागणार नाही अशी भीती त्याला वाटत होती.

सोंधेच्या राजाने गोव्याच्या गव्हर्नरला परोपरीने सांगितले की, मी जरी पुण्यास जाऊन राहिलो तरी तुमची मैत्री मी सोडणार नाही. मी तुमचा दोस्त म्हणूनच राहीन. परंतु सोंधेच्या राजाच्या अभिवचनावर नव्हर्नर फ्रान्सिश्कु कुन्य द मिनेझिश याचा विश्वास न बसल्याने त्याने त्याला पुण्यास जाण्यास परवानगी दिली नाही. त्याने त्याचे मन वळविण्याचा प्रयत्न केला की त्याने गोवा सरकारशी करार करून ते देत असलेला तनखा स्वीकारून बांदोडे येथे कायमचे वास्तव्य करावे.

पोर्तुगीज आपणाला पुण्यास जाऊ देण्यास तयार नाहीत याची खात्री सोंधेच्या राजास पटल्याने त्याने बांदोडे येथेच कायमचे वास्तव्य करण्याचा निर्णय नाइलाजाने घेतला. दि. १७९१ रोजी सोंधेंच्या राजाने पोर्तुगीजांशी करार करून आपल्या राज्याचे उदक त्याच्या हातावर सोडले. या करारान्वये फोंडा,

अनुक्रमणिका

पंचमहाल, काणकोण, वगैरे प्रदेशावर पोर्तुगीजांचा कायदेशीर अमल सुरू झाला. तत्पूर्वी काणकोण येथे पोर्तुगीज सैन्याची एक शिबंदी होती. पण अमल सोंधेच्या राजाचा होता. नवीन कराराप्रमाणे शिबंदी उरली; परंतु सोंधेच्या राजाचा अमल गेला.

उपरिनिर्दिष्ट करार होण्यापूर्वी पोर्तुगीज सैन्याने सदाशिवगड व्यापिलेला होता. दि. २४ जानेवारी १७९१ रोजी पेशव्यांच्या आरमाराने काळी नदीतून येऊन सैन्य उतरून सदाशिवगड घेतला. दि. ३० जानेवारी १७९१ रोजी पोर्तुगीज आरमाराने सदाशिवगड मराठ्यांकडून परत घेतला. तो वर्षभर त्यांच्याकडे होता. परंतु दि. १४ मे १७९२ रोजी मराठे आणि टिपू सुल्तान यांच्यामध्ये झालेल्या तहान्वये सोंधे संस्थान टिपू सुल्तानाकडे गेल्याने सदाशिवगडही कायद्याने त्याच्याकडे गेला. टिपूने पोर्तुगीजाना तो खाली करण्यास सांगितले. त्याच्याशी युद्ध करण्याची कुवत पोर्तुगीजांमध्ये नसल्याने त्यानी तो मुकाट्याने टिपूच्या हवाली करून आपली शिबंदी तेथून काढून घेतली.

टिपूचा पाडाव झाल्यावर सदाशिवगड इंग्रजांकडे गेला. त्यादरम्यान पोर्तुगीज सैन्य काणकोण महालाच्या हद्दीवर पोळे येऊन राहिले होते. तीच पोर्तुगीज आणि इंग्रज यांच्यामधली व्यवहारिक सीमा ठरली. ती अजून कायम आहे.

अनुक्रमणिका

# संदर्भ ग्रंथ

## इंग्रजी


1. The Cambridge History of India, Vol V
   By H. H. Dodwell
2. The Rise of the Portuguese Power in India
   By R. S. Whitway
3. The Portuguese in India Vol I-II
   By Frederick Charles Danrers
4. The Portuguese Seaborne Empire (1445 - 1825)
   By C. R. Boxer
5. A Forgotten Empire
   By Robert Sewell
6. India and Indian Ocean
   By K. M. Panikkar
7. Asia and the Western Dominance
   By K. M. Panikkar


## पोर्तुगीज


1. Arquivo Portugues Oriental
   Tomo I., Volume III., Partes I— V
   Doutor A. D. Braganza Pereira
2. Assentos do Concelho do Estado
   Vol IV-V
   Prof. P. S. Pissurlenkar
3. Agentes da Diplomacia Portuguesa na India
   Prof. P. S. Pissurlenkar
4. Os Portugueses e Maratas
   Prof. P. S. Pissurlenkar
5. Cronica dos Vice-Reis & Governadores da India
   Jose F. Ferreira Martins
6. Goa
   jose Nicolas Fonseca


अनुक्रमणिका

## मराठी

१. मराठ्यांच्या इतिहासाची साधने
पोर्तुगीज दप्तर खंड ३ रा, आशिया विभाग
ले. डॉ. ए. द. ब्रागांसा पेरैरा
अनुवाद : स. शं. देसाई

२. मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पोर्तुगीज दप्तर खंड २
ले. प्रा. पां. स. पिसुर्लेंकर
अनुवाद : स. शं. देसाई

३. करवीरचे छत्रपती आणि पोर्तुगीज
संपादक अनुवादक : स. शं. देसाई

४. शिवशाही पोर्तुगीज कागदपत्रे
संपादक अनुवादक : स. शं. देसाई

५. कोल्हापूर – पोर्तुगीज संबंध
संपादक : डॉ. प्र. पां. शिरोडकर

६. पोर्तुगीज – मराठे संबंध
ले. प्रा. पां. स. पिसुर्लेंकर

७. शिवचरित्र साहित्य खंड ३ (भारत इतिहास संशोधक मंडळ–प्रकाशन)

८. मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड ८
संपादक : वि. का. राजवाडे

९. महिकावतीची बखर
संपादक : वि. का. राजवाडे

१०. श्री. शांतादुर्गा कुकळ्ळीकरीण देवस्थानचा इतिहास (अप्रकाशित)
ले. गणबा लक्ष्मण नाईक देसाई गांवकर